सन १८८६
म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.

११४

कादं

नं. ११२
म. ग्रं. सं. ठाणें
सन १८८६
विषय
संग्रहालय क्रमांक


लेखक चिं. ना. मुजुमदार

पुस्तकाचें नांव शेवटच्या सूर वाघेर

सहविचारिणी सभेची ग्रंथमाला.

( पुस्तक १० वें. )

# शेंवटचा शूर वाघेर.

ही ऐतिहासिक कादंबरी

चिंतामणराव नारायण मुजूमदार,

यांनीं लिहिली,

ती

खळे आणि मंडळी यांनीं छापून प्रसिद्ध केली.

ठाणें:—जगत्समाचार प्रेस.

सौराष्ट्रे पंच रत्नानि नदी नारी तुरंगमः।
चतुर्थं सोमनाथश्च पंचमं हरिदर्शनम् ॥

संवत् १९५३. सन १८९७.

किंमत १॥ रुपया.

सन १८६७ चे कायद्याप्रमाणें नोंदवून सर्व हक्क खळे आणि
मंडळींनें राखिले आहेत.

श्रीमंत सरकार

**सयाजीराव महाराज गायकवाड,**

सेनाखासखेल, समशेर बहादुर,

यांची

**नीतिमत्ता, सौजन्य, प्रजाकल्याणतत्परता,**

**विद्यावृद्धीविषयीं उत्कट इच्छा,**

**इत्यादि अनेक अमोल्य गुणांच्या आदरास्तव**

ही कादंबरी,

**श्रीमंतांच्या परवानगीनें,**

त्यांचे चरणीं अर्पण केली आहे.

श्रीमंतांचा नम्र सेवक

ग्रंथकर्ता.

# प्रस्तावना.

सांप्रतच्या देशस्थितीचा विचार करणारास चोहोंकडे आर्यभूमींत शांतता, लोहमार्ग, तारायंत्रें, पोष्टऑफिसें, दवाखाने, वर्तमानपत्रें, छापखाने, न्यायमंदिरें, पोलीस, म्युनिसिपालिट्या, शाळा, कॉलेजें यांची रेलचेल दृष्टीस पडेल, व अनेक तऱ्हेच्या व्यापारी जिनसांचे ढीगचे ढीग परदेशांतून आलेले आढळतील. परंतु व्यापाराचीं सर्व सूत्रें परकीयांचे हातीं! लोकांचें जीवित्व काय तें गुलामगिरीवर व बाहेरचे मालाचे व्यापारावर! अशानें संपत्ति ती कितीशी येणार? द्रव्योदकाचा लोट समुद्राकडे गेल्यामुळें, शेतकरी वर्गास सरकारी सारा कसाबसा तरी पुरा करून मोठ्या कष्टानें आपलें चैतन्य व देह एकत्र ठेवण्यापलीकडे कांहीं राहत नाहीं. प्राचीन विद्या सर्व लुप्त होउन परकीय भाषेचें ज्ञान हीच काय ती विद्या अशी समजूत सर्वत्र झाली आहे. पूर्वीची जोमदार व कसलेली प्रजा नष्ट होऊन नवीन प्रजेस डोळ्यांस चष्मे लागूं लागले; मानसिक श्रमानें शरीर निःसत्त्व झालें, विदेशीय शिक्षणानें प्राचीन चाली, रीति, आचार, धर्म ह्यांस भलतीच दिशा लागली; शिक्षकपणा व कारकुनी ह्यांशिवाय ह्या वर्गाकडे धंदाच राहिला नाहीं; देशाचा अभिमान गेला. जातीचा संकर झाला! अशा स्थितींत स्वातंत्र्याच्या शिखरास पोंचलेल्या लोकांच्या दृष्टीनें ही हतभाग्य आर्यभूमाता व तिची अनार्यत्वास पोंचलेली संतति हीं केवळ मेंढरांप्रमाणें दिसत असतील! आणि खरा विचार केल्यास त्यांनीं नसें दिसावें यांत स्वाभाविक कांहींच नाहीं. कारण, उंचावरून पाहणारास खालचे सर्व पदार्थ लहानच दिसणार! ही स्थिति केवळच अपरिहार्य असें मात्र नाहीं. तिचें निरसन करण्यास अनेक दिशांनीं अनेकांकडून यत्न झाले पाहिजेत. प्रस्तुतचा प्रयत्न त्यांपैकींच एक व त्याच हेतूनें केला आहे. या आर्यभूमींत मागें शतशः

देशाभिमानी वीररत्नें होऊन गेलीं, याची साक्ष जुने इतिहासच देत आहेत. अनुकरण करणें तें नेहमीं चांगल्याचेंच करावें, या न्यायानें पाहिलें ह्मणजे इतिहासापासून पुष्कळ चांगल्या गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. इतिहासाचें वाचन हें एक मनोरंजनाचें उत्तम साधन असून त्याचे साह्यानें आपण कोण, आपलें कर्तव्य काय, आपण सांप्रत कोणत्या स्थितींत आहोंत, पारतंत्र्यापासून आपली काय दशा झाली आहे, स्वातंत्र मिळविण्यास किती जिवापाड मेहनत करावी लागते, स्वार्थत्याग कसा करावा लागतो, कोणत्या उपायांनीं आपण परत माणुसकींत येऊं, इत्यादि गोष्टींचा विचार लोकमनांत अवश्य आला पाहिजे, व तो येण्यास हें पुस्तक अंशतः तरी कारणीभूत होईल अशी उमेद आहे.

**गुजराथेंत द्वारका** हें चार धामांपैकीं एक धाम आहे इतकीच काय ती मोघम कल्पना आजमितीस आमचे लोक समजतात. परंतु या **द्वारके**-जवळचे **यदुवंशीय वाघेर** लोक कोण व कसे आहेत याची फारशी कल्पनाही त्यांस नाहीं. वस्तुतः इतिहासदृष्टीनें या लोकांबद्दलचा विचार कोणी करील तर त्यास या लोकांची स्थिति व इतिहास फारच बोधपर वाटतील यांत यत्किंचित्‌ही संशय नाहीं. श्रीमंत **गायकवाड** सरकारचे राज्यांत **उखामंडळ** या नांवाचा एक लहानसाच भाग आहे, व त्यांतच काय ती या **वाघेर** लोकांची अति अल्पसंख्या रहाते. पण या एवढ्याशा लहान संख्येचा बंदोबस्त राखण्यास **गायकवाड** सरकारांस एक सबंध पलटण आज तारखेस कशी ठेवावी लागत आहे, त्यांस जमिनी किती फुकट दरानें द्याव्या लागल्या आहेत, त्यांचे इनसाफ कसे कडकपणें तोडावे लागतात, याचा कोणी शोध करील, तर या कडव्या जातीबद्दल त्याच्या मनांत पूज्य बुद्धि झाल्याशिवाय रहाणार नाहीं. यांचा इतिहास फारच मनोरंजक आहे, तो साद्यंत लिहीत बसणें हें एका कादंबरीच्या लेखनांत

होणें अशक्य आहे हें येथें निराळें सांगणें नलगेच. प्रस्तुतचे पुस्तकांत सन १८५३ पासून १८५७ पर्यंतचाच काय तो काळ घेतला आहे, व त्याचें स्वरूप बऱ्याच स्पष्ट रीतीनें कळण्याकरितां अवश्य तितक्याच गोष्टी मागील इतिहासावरून घेतल्या आहेत. या लोकांनीं बंड केलें खरें, परंतु तें आमचे सरकारचे दृष्टीनें किती क्षुल्लक होतें, व तहनाम्याचे शर्तीस्तव तें परभारेंच विझविण्याची पाळी आली, हें त्याबद्दलच्या माहितीच्या कागदांवरून दिसतें.

हें पुस्तक जाहिरातींत लिहिल्याप्रमाणें यापूर्वींच प्रसिद्ध व्हावयास पाहिजे होतें; परंतु **सहविचारिणी** सभेचे बहुतेक सभासद येथील सरकारी नोकर असून त्यांस नोकरीचीं कामें संभाळून फांवल्या वेळेंत अशीं लोकोपयोगी कामें करावीं लागतात, यामुळें अनेक अडचणी सोसून इतक्या उशीरां हें पुस्तक बाहेर पडत आहे याजबद्दल वाचक-वर्ग क्षमा करील अशी आशा आहे. हें पुस्तक तपासण्याचे कामीं माझे मित्र रा. सा. शंकरराव रानडे यांनीं फार मदत दिली, तसेंच रा. रा. नागेशराव बापट यांनीं पुस्तक पाहून कित्येक महत्वाच्या सूचना केल्या, त्यांजबद्दल उभयतांचाही मी फार आभारी आहें.

पुस्तककर्ता.

१ अ. ७९

# शेवटचा शूर वाघेर.

## भाग १ ला.

सौराष्ट्र अथवा काठेवाड ह्याचे पश्चिमेस जो भाग आहे, तो उखामंडळ या नांवानें प्रसिद्ध आहे. ह्यांत बहुतेक वस्ती वाघेर लोकांची आहे. ह्याची आकृति त्रिकोणाकार द्वीपकल्पाप्रमाणें आहे. ह्याचे बहुतेक बाजूस समुद्र व कांहीं भागास रण आहे. ह्याची लांबी सुमारें तीस मैल व रुंदी सुमारें पंधरा मैल आहे. यादववंशांतील अनिरुद्ध-पत्नी उषा इच्या नांवावरून या भागास हें नांव पडलें आहे असें कोणी ह्मणतात; व कोणि कोणी अशीही दंतकथा सांगतात कीं, एक उखा नांवाचा दैत्य होता, त्याच्या नांवावरून या भागाला हें नांव मिळालें. हिंदुस्थानांत जीं चार "धामें" प्रसिद्ध आहेत, त्यांपैकीं पश्चिमेकडील द्वारकाधाम या प्रांतींच असून, बेट आणि द्वारका यांत सात कोसांचें अंतर आहे. उखामंडळची जमीन नापीक, तींत गोडें पाणी दुर्मिळ, खडक फार, निवडुंग अतिशय, घांव्या पुष्कळ, शिवाय समुद्रांत लहान लहान टेंकड्या व दऱ्या, अशी स्थिति असल्यानें, लुटारू व दंगेखोर लोकांस निर्भयपणें आपला चोरीचा धंदा करण्यास ही जागा फारच सोईची झाली आहे. समुद्रांत चांचेपणाचा धंदा करण्यास तर ही जागा फारच अनुकूळ आहे. समुद्रांतील डोंगरांकडे मोठ्या नावा येऊं शकत नाहींत यामुळें, ज्या वेळची आमची ही गोष्ट आहे त्या वेळीं वाघेर लोक लहान लहान मचव्यांत बसून मिळविलेली लूट सहज रीतीनें घेऊन या डोंगरांत पळून जात. सर्व काठेवाडांत धुंडावा चालू

होता, त्या वेळेस उखामंडळचे समुद्रांतील प्रवाशांस ते कधींही सुखरूप जाऊं देत नसत. असो.

संवत् १९१२ त **वाघेर** लोकांनीं चोहोंकडून **बेटांतील** मंदिराचे तटावर हल्ला सुरू केला. सहा दिवसपर्यंत **बेटांतील गायकवाडसरकारचे** पलटणीच्या शिपायांनीं व जमादार लोकांनीं **वाघेर** लोकांस आंत येऊं दिलें नाहीं. तटाचे आंतील लोकांनीं दारूगोळा संपेपर्यंत निकरानें आपला बचाव केला. परंतु **द्वारका** व सर्व **उखामंडळ** हीं **वाघेर**लोकांचे हातीं गेलीं असें जेव्हां त्यांस कळलें, तेव्हां यापुढें आपला निभाव लागणार नाहीं असें समजून आंतील लोक बंदरांतील जहाजांच्या मदतीनें **शिलवाईकडून खंबालियाकडे** निघोन गेले. तटांतून बंदुका व तोफा यांचे आवाज येण्याचें बंद झालें, व त्या वेळीं रात्र होती यामुळें बंडखोर लोकांस हल्ला करण्यास सवड मिळाली. बुरुजांतील प्रतिबंध कमी झाल्यामुळें **वाघेर** लोकांनीं शिड्या लावून तटावर चढण्यास आरंभ केला. '**द्वारकाधीश**की जय!' ही गर्जना सुरू झाली. तटांतील मंदिरांत राहिलेले लोक आपला जीव संभाळण्यासाठीं मिळेल त्या रस्त्यानें पळत आहेत; सर्व मंदिरभर 'मारा, धरा, पकडा,' अशा ध्वनींचे प्रतिध्वनि निघत आहेत; कोणी ह्या रस्त्यानें तर कोणी त्या रस्त्यानें आपला जीव संभाळून पळत आहेत; मधून मधून बंदुकांचे आवाज ऐकूं येत आहेत; कांहीं **वाघेर** लोक कत्तल करीत **बेटांतील** वस्तींत शिरले आहेत; व जो त्यांस आढळे त्यास मारून त्यांनीं लुटीचें काम सुरू केलें आहे;— अशी धांदल सर्व गांवभर सुरू झाली होती. ह्या वेळेस **बेटांतील** सुखवस्तू राहणारांची काय स्थिति झाली असेल बरें? जो तो आपले प्राण आणि धन वांचविण्याचे फिकिरींत गुंतला होता.

या गर्दीत एक सुंदर स्त्री सांपडून अतिशय *घाबरली होती.* तिचें वय चवदा वर्षांच्या सुमाराचें होतें. ती अंगानें सडपातळ व रंगानें गोरी असून, तिचें नाक धारदार, डोळे मोठाले व पाणीदार, कपाळ रुंद, व केंस काळे-

भोर होते. आपल्या बापाच्या घरावर बंडवाले आले असें अर्धवट झोंपेच्या स्थितींत तिला वाटून ती तशीच मागील दारचे रस्त्यानें बाहेर पडली होती. या वेळेस रस्त्यांत काळोख होता, व रस्ता नीट दिसत नव्हता, यामुळें ती एके कोपऱ्यांत भेदरून चोहोंकडे पहात उभी होती. हा रस्ता आडगल्लीचा होता, त्यामुळें बंडवाले लोक ह्या रस्त्याकडे वळले नव्हते. भयानें तिचें अंग कांपत होतें, सर्व अंगास घाम सुटला होता. गळा दाटून आला होता. तोंड उतरलें होतें. घरांतील आईबापांची व माणसांची काय स्थिति झाली असेल, अब्रूचें रक्षण होऊन पुनः कुटुंबांत जाईन तेव्हां खरें, या काळजींत ती उभी होती. तिनें तोंडावर आलेला घाम आपल्या पदरानें पुसला. बंडवाले हिंदु आहेत तेव्हां मंदिरांत लूट करणार नाहींत, व मंदिरांत गेलें तर बचाव होईल असा तिच्या मनांत विचार आला, व त्यामुळें तिच्या मनाची काळजी थोडी कमी झालेली तिचे चेहेऱ्यावरून दिसण्याजोगी होती. लागलीच तिनें मंदिराकडे धांव घेतली; व आतां मंदिराचे मागचे बाजूस खिडकी होती ती ती गांठणार, इतक्यांत बंडवाल्या वाघेर लोकांची एक टोळी आपल्या पाठीमागें येत आहे असा तिला भास झाला. त्या टोळीचा गोंगाट तिच्या कानावर आला त्यामुळें तिचें सर्वांग लटलटां कापूं लागलें, डोळयांस आंधारी आली, कांहीं दिसेना, पाय जड झाले, जीव उडूं लागला. याप्रमाणें भयानें वरचेवर मागें पहात पहात ती मंदिरांत शिरली, तों समोरून कांहीं लोक राहिलें साहिलें सामान लुटून गांवचे बाजूस जात आहेत; मंदिरांतील ब्रह्मचारी व पुजारी लोक जखमी होऊन पडले आहेत; त्या दुःखानें त्यांचें ह्मणणें व ओरडणें स्पष्ट ऐकूं येत आहे; हें पाहून या सुकुमार अबलेची काय स्थिति झाली असेल बरें? मागून धांवत येत असलेल्या लोकांचा गलबला व पुढें मंदिरांतील भयंकर स्थितीचें चित्र पाहून ती चित्रासारखी स्तब्ध उभी राहिली. जीवरक्षणार्थ काय करावें हें तिला सुचेनासें झालें. जेथें ती उभी होती तेथेंच तिचे उजवे हातास किल्ल्याचे

तटावर जाण्याचा जिना होता, परंतु भयानें गांगरून गेल्यामुळें तो तिला दिसला नाहीं.

इतक्यांत बंडवाल्यांपैकीं एक काळ्या रंगाचा सिद्दी तिच्या दृष्टीस पडला. तो शरीरानें धिप्पाड असून त्याचे डोळे व दांत मात्र त्याच्या काळ्या शरीरावर शंखाप्रमाणें शुभ्र दिसत होते. त्याच्या हातांत नागवी तरवार व कंबरेस तमंचे बांधलेले होते. डोक्यावर रंगीबेरंगी फेटा असून अंगांत काळा अंगरखा होता. त्याला तिनें आपलेकडे येतांना पाहिलें. त्या शिद्यानेंही तिचें सुंदर रूप पाहून अलंकार लुटण्याची कल्पना बाजूस ठेविली, व तिच्या जवळ येऊन त्यानें तिचें मन वळविण्याचा यत्न चालविला. या वेळेस तिनें आपली दृष्टि जमिनीकडे लाविली होती, व तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा चालल्या होत्या त्यायोगानें तिच्या अंगावरचा पदर भिजून गेला होता. तिचें शरीर लटलटां कांपत होतें. ह्या भयंकर राक्षसाकडे तिच्यानें पाहवेना. त्यानें आपली तरवार म्यान केली, व जवळ येऊन तो या पवित्र अबलेवर हात टाकणार तोंच तिनें घाबरून मोठी किंकाळी फोडली. ‘ धांवा धांवा, ’ ‘ सोडवा सोडवा ’ असें मोठ्यानें ती ओरडली, व आलेल्या बंडखोरास ह्मणाली, ‘खबरदार! आंगास स्पर्श कराल तर मी आपला प्राण देईन!’ या ओरडण्यानें जरा तो मागें सरला, पण बंडखोरांच्या ह्या धांदलींत या अबलेस सोडविण्यास कोण येतो? अखेरीस ही दीनवाणी झालेली अबला बावरल्यासारखी होऊन रस्ता मिळावा ह्मणून पाठीमागें वळून पळूं लागली, तेव्हां अनायासें तटावर जाण्याचा जिना पुढें लागला. मग ती चटकर धांवत जिन्याच्या पायऱ्या चढूं लागली. आपण कोणीकडे धांवत आहों हें भान तिला या वेळेस नव्हतें. ती पुढें पळत आहे, व हा लांडग्याप्रमाणें तिच्या मागें लागला आहे, अशा स्थितींत ‘सोडवा सोडवा’ असे तिच्या तोंडांतून शब्द निघत ते फार हृदयद्रावक होते. धांवण्यानें ती फार दमली होती. बावरेपणामुळें चेहेऱ्याची लाली जाऊन मुखावर पांढरेपणा आला होता. केशकलाप सुटून वाऱ्यानें

ते अस्ताव्यस्त उडत होते. धांवतां धांवतां किल्ल्याच्या एका बुरुजाकडे ती वळली. भयानें व थकल्यामुळें कोणी सोडविण्यास येईल या आशेनें पुनः एकवेळ तिनें किंकाळी फोडली, व बुरुजाचे आंत जाऊन ती थकलेली कोमल बाला निश्चेष्टित पडली!! तिला धरण्यासाठीं मागून हा **सिद्दी** थोड्या अंतरावर धांवत येत होताच. तिला पडलेली पाहून त्याचे मुखावर आनंद दिसूं लागला. त्या आनंदाचे भरांत तो ह्मणाला 'अनायासें एकांत बुरुजावर ही स्त्री धांवत आली नसती तर मला मुद्दाम एकांत स्थळ पहावें लागतें.' अशा रीतीनें ही स्वारी आपल्या मनांत मांडे खात या बेशुद्ध पडलेल्या अबलेवजळ आली, व थोड्या अंतरावर उभी राहून तिचें अस्ताव्यस्त स्थितींत पडलेलें शरीर न्याहाळून पाहूं लागली.

रूपवती स्त्रिया कोणत्याही स्थितींत असल्या तरी त्या स्थितींत त्यांचें रूप सुशोभितच दिसतें. ती घाबरून पडली होती तरी तिचा एक हात गालाखालीं होता, व ती कुशीस निजावें अशा स्थितींत पडल्यामुळें भयानें व श्वासानें तिचे उन्नत कुच कांपत व हालत होते. सर्व शरीर घामानें भिजल्यामुळें अंगावरील वस्त्र अंगासरशीं चिकटलें होतें. गळ्यांतील भूषणें श्वासोच्छ्वासाबरोबर हलत होतीं. नाकांतून दीर्घ श्वास निघत, त्यामुळें कल्पनारूपानें विचारतरंगांत तिच्या जिवास निरनिराळ्या परिणामांचा भास होऊन त्यामुळें चेहेऱ्यावर पहाणारास अनेक रीतीनें पालट झालेला दिसे. केव्हां तिचा चेहेरा भयानक दिसे, केव्हां तो अगदीं निस्तेज होई, केव्हां त्यावर किंचित् आनंदाचीं चिन्हें दिसत. या चित्राचें अवलोकन करणारा **सिद्दी** तीस ह्मणाला, 'काय स्त्रिया लाववी असतात पहा! मला इतका वेळ किल्ल्याच्या तटावर धांवण्याची मेहनत देऊन शेवटीं आपणच मला एकांतस्थळीं घेऊन आली, व आतां पडल्या पडल्या क्षणांत हंसते काय, क्षणांत रडते काय व क्षणांत निश्चेष्टित होते काय,—वाः जी वाः!' इतकें बोलून व मिशांवर ताव देऊन तो पुढें ह्मणाला, 'पण अशा ह्या स्त्रीचरित्रानें हा शिपाई फसणारा नव्हे समजलीस?'

कांहीं वेळानें आणखी थोडा जवळ जाऊन तो ह्मणाला, 'दिलजान्! ढोंग सोड, व दमलेल्या शिपायाशीं दोन शब्द बोल. मीं लग्न केलेलें नाहीं, एकटा आहें. कराची जरी माझी जन्मभूमि आहे, तरी या लुटींत तुला व मला आनंदानें राहतां येईल इतकें द्रव्य मीं मिळविलें आहे!' याप्रमाणें बोलत तो तिला वारा घालून सावध करणार, तोंच त्यास पुनः वाटलें कीं, ही स्त्री ढोंगी आहे, हिची खुशामत कशास पाहिजे? इतक्यांत निश्चेष्ट पडलेल्या त्या अबलेनें आपले रागानें लाल झालेले डोळे हळूच उघडले, व आपल्याजवळ बसलेल्या यवनराक्षसाला पाहून, ती चटकर घाबरून उभी राहिली; तेव्हां तर शिपाई बुवा आनंदानें नाचूं लागले. त्यांना वाटलें कीं, आपण सांगितलेली सर्व हकीकत तिनें ऐकली, व ती आतां आपण होऊन उभी राहिली आहे! पुनः शिपाई ह्मणाला, 'दिलचमन, शिपाई लोकांचा रोजगार त्यांच्या हातावर असतो, परंतु त्यांतला मी नाहीं. मी वतनदार व कुलवान आहें, व माझें लग्न झालेलें नाहीं, शिवाय तुला संभाळण्यापुरती माझी ऐपत आहे. वाघेर लोक जरी बंड करीत आहेत तरी ते आमचेच हिमायतीवर. तूं मला वरलेंस, व मी तुझ्याशीं निका अगर शादी केली, ह्मणजे वाघेरलोक तुझ्या केंसालाही धक्का लावूं शकणार नाहींत. मंदिरांत चाललेलें तुफान व गांवांतील बखेडा ह्यांपासून तुला कांहीं भय नाहीं.' असें ह्मणून तिच्या गळ्यांत हात घालावा अशा बेतानें तो जवळ गेला, त्यासरसे त्या घाबरलेल्या स्त्रीनें रागानें डोळे लाल केले, व अंगास स्पर्श करशील तर प्राण देईन असें ह्मटलें, त्यायोगानें शिपाई थोडासा हिरमुसला झाला. त्याचें तोंड भयानें व रागानें तांबडें लाल झालें; डोळे गरागर फिरूं लागले; रागाच्या पुटपुटण्यानें त्याच्या ओठांतून दंतपंक्ति दिसूं लागल्या; व एदकम जाऊन त्या स्त्रीस मिठी मारून आपला संभोगहेतु पार पाडावा या हेतूनें तो ह्मणाला, 'अशा बायकोच्या रडण्याओरडण्यानें या शिपायास कींव येणार नाहीं; व आपला हेतु तडीस नेल्याशिवाय तो सोडणार नाहीं.' असें ह्मणून तो

तिला धरण्यासाठीं तिचे अंगावर धांवला. लगेच ती भयानें बुरुजाचे आंतील कोटावर जाण्यास ज्या पायऱ्या होत्या त्यांवर चढली, व कोटावर उभी राहिली. त्याबरोबर हे शिपाई गृहस्थ मागोमाग जाऊन दोन पायऱ्यांचे अंतरावर उभे राहिले, व रागाचे आणि लोभाचे दृष्टीनें तिजकडे पाहूं लागले. त्यांना वाटलें कीं, आपण जर पुढें सरकलों तर ती खचित समुद्रांत उडी घालील. या विचारानें स्वारी तेथेंच उभी राहून तिच्याकडे टक लावून पाहूं लागली.

आतां या मानवस्वरूपी राक्षसापासून आपला बचाव करण्यास समुद्रांत पडून जीव देण्यापेक्षां दुसरा मार्ग राहिला नाहीं असे विचार तिच्या मनांत घोळूं लागले. या वेळेस समुद्र वाऱ्यानें खवळला होता, व डोंगरासारख्या लाटा किल्ल्याचे तटावर आदळत होत्या, त्यामुळें समुद्राची गर्जना स्पष्ट ऐकूं येई. इतक्यांत त्या मानवी राक्षसाचे पाठीमागें हातांत तरवार घेऊन कोणी शूर पुरुष उभा असून, त्याचा गोरा रंग, विशाल भाल, क्रोधानें लाल झालेली मुद्रा, त्याच्या अंगांत असलेलें चिलखत, कंबरेस असलेले तमंचे, जमिये, व डोक्यावर काठेवाडी तऱ्हेचा ऐटदार फेटा, हीं एकदम तिचे दृष्टीस पडलीं. आपण हें स्वप्न पाहत आहों, कीं प्रत्यक्ष **श्री द्वारकानाथ** मदतीसाठीं आला आहे, हें त्या अबलेस कळेना. खुणेनें अगर बोलून त्यास तिला सांगतां येईना, कारण हा दुष्ट त्याच्याशीं तंटा करील अगर आपल्याला ढकलील, असें एकामागून एक विचारतरंग तिच्या मनांत येऊं लागले, त्यामुळें तिच्या तोंडांतून एक अवाक्षर निघेना. शेवटीं त्या अधमानें तिला ओढावी ह्मणून एकदम लांडग्याप्रमाणें चवताळून धरण्यासाठीं आपला हात पुढें केला मात्र, तोंच मागून आलेल्या पुरुषानें तरवारीचा असा एक जोरानें झटका मारला, कीं **सिद्दी**मियाचीं दोन शकलें होऊन बुरुजांत पडलीं. इकडे हा घातकी मनुष्य आपणास धरल्याशिवाय रहात नाहीं असें तिला वाटून ती न कळतां मागें सरकली त्याबरोबर ती एकदम समुद्रांत पडली !

जे शूर असतात ते आपल्या देहाची पर्वा करीत नाहींत. ती रूपवती अबला समुद्रांत पडलेली पाहून त्यानें चटकर अंगांतील चिलखत काढून टाकिलें, व धाडकन तिच्या पाठोपाठ उडी टाकिली. त्याबरोबर पाणी मात्र उसळलें, व तो पाण्याचे तळाशीं गेला!!

## भाग २ रा.

आमची नायिका ज्या वेळीं पाय घसरून समुद्रांत पडली, त्या वेळीं रात्र संपून अरुणोदय होण्याची संधि होती. नक्षत्रांचा प्रकाश अंधक अंधक होता. रात्र केव्हां सरेल ह्याची वाट पहात व मंजुळ ध्वनि करीत पक्ष्यांची आपले घरट्यांत चळवळ सुरू झाली होती. बेटांत जेथें ह्या वेळेस नेहमीं शांतता असून, कांकडआरतीच्या दर्शनाचे भक्त मात्र मंदिरांत जाण्याच्या धांदलींत असावयाचे, तेथें सर्व गांवभर धामधूम चालली होती. बंडखोर लोकांच्या झुंडीच्या झुंडी आपलीं ठाणीं ठिकठिकाणीं बसवून आपणास जे हरकत करण्यास येत त्यांशीं सामना करण्यांत दंग झाले होते.

आमची अभागी अबला जेव्हां समुद्रांत पडली, तेव्हां तिच्या सर्व वृत्ति एकवटून गोंधळून गेल्या होत्या. मनोवृत्तीवर ज्या वेळीं एकाद्या चित्राचें प्रतिबिंब वठतें, त्या वेळीं कल्पनासृष्टींत मन तल्लीन होऊन तदाकार होतें, त्याचप्रमाणें त्या दुष्ट शिपायापासून सोडविणाऱ्या वीर पुरुषाची मूर्ति तिनें पाहिल्यापासून ती तिच्या हृत्पटलावर उमटली होती. त्या मूर्तीच्या निरीक्षणाच्या ध्यासांत आपण पाय सरकून मागें समुद्रांत पडूं ह्याचें तिला भान राहिलें नव्हतें. ह्या मानसिक अवस्थेंत तिचा देह समुद्रावर आदळल्यानें त्यास यत्किंचितही इजा झाली नाहीं. निमिषमात्रांत विद्युल्लता ज्याप्रमाणें मेघमंडळांत चमकते .त्याप्रमाणें ती कोटाव-

रून पाण्यांत पडली. सृष्टिशास्त्राच्या नियमाप्रमाणें कोणताही पदार्थ आपलें वजन आणि उंची यांच्या प्रमाणानें खालीं पडतो खरा, पण तितक्याच जोरानें तो पाण्याच्या सपाटीखालीं जात नाहीं. पाण्याचा धर्म त्याच्या घटकावयवाप्रमाणें आंत पडणारा पदार्थ हलका असल्यास त्यास सपाटीवर काढून टाकितो, त्याप्रमाणें आमची नायिका एकवेळ पाण्यांत पडून तळाशीं जाऊन पुन्हां वर आली, व शरीरधर्माप्रमाणें ती वर येऊन घाबरली. ती अस्ताव्यस्त रीतीनें हातपाय हलवूं लागली. तिला त्या जुलमी मनुष्याच्या हातून सोडविणाऱ्या त्या शूर **वाघेरानें**ही ती समुद्रांत पडली हें पाहतांच तिजसाठीं तिच्या पाठोपाट उडी ठोकली होती, व एकवेळ पाण्याच्या सपाटीखालीं जाऊन वर येतांच जवळच हातपाय हालवून बुचकळया खाणाऱ्या त्या अबलेकडे तिराप्रमाणें जाऊन त्यानें बुडी मारली, व तिला आपल्या पाठीवर घेतलें.

त्या वेळीं ती स्त्री घाबरून गेली होती. पाण्यांत पडल्यामुळें तिच्या नाकातोंडांत पाणी जाऊन तिला ठसका लागला होता. तिनें भयानें डोळे मिटले होते. त्यानें लागलीच तिच्या तोंडावर आलेले केंस बाजूस सारले. पुनः नाकातोंडांत पाणी न जाई अशा रीतीनें पाण्यावर ठेवून तो निघाला, व थोड्या वेळानें ठसका कमी झाला. अशा स्थितींत तिला घेऊन नौकेप्रमाणें मोठ्या लाटेबरोबर हेलकावत किनारा ज्या दिशेस होता तिकडे त्यानें आपल्या पोंहण्याचा रोंख फिरविला. पडलेल्या जागेपासून बेटांतील परिघ बराच दूरवर होता. एका बाजूस **वाघेर** लोकांचा हल्ला सुरू झाला होता, त्यामुळें समोर लहान लहान टेंकड्या होत्या तिकडे किनाऱ्यास लागण्यासाठीं त्यानें समोर रोंख धरिला. त्या वेळीं समुद्राचें घोंघावणें व वाऱ्याचा सोसाटा हीं ऐकूं येत होतीं. किल्ल्याकडील बाजूस बंडखोरांचे 'धरा, मारा, पकडा' असे शब्द दुरून वाहणाऱ्या वाऱ्याच्या झोंकानें बरोबर ऐकूं येत होते. आमचा नायक **वाघेर** लोकांत उत्तम पोंहणारा असल्यामुळें पांच दहा कोस समुद्रांत पोंहून

जाणें त्याच्या खात्रींत नव्हतें. नौकेप्रमाणें त्या अबलेला पाठीवर येऊन त्यानें आपलें पोंहणें शांतपणें लाटेबरोबर हेलकावे खात खात सुरू केलें होतें. मधून मधून त्या पाठीवर घेतलेल्या स्त्रीस तो नीट सांवरून धरीत होता.

आपलें शरीर पाण्यांत आहे, सर्व वस्त्रें भिजून गार झालीं आहेत, परंतु शरीर पाण्यांत न जातां लाटेवर तरंगत आहे, आपण नौकेंत पडलों नाहीं, आपण स्वप्न पाहत आहों किंवा खरेंच समुद्रांत आहों, ह्या विचारांत तिनें आपले डोळे हळूच उघडले. ह्या वेळीं सूर्योदय जरी झाला नव्हता, तरी प्रातःकाळचा संधिप्रकाश स्पष्ट दिसत होता. चोहोंकडे समुद्राचें हिरवेंगार पाणी व वर आकाश दिसत होतें, तथापि ह्या वेळीं आपला आहार मिळविण्यासाठीं शब्द करीत आपणापासून थोड्या अंतरावर उडत असलेले आकाशांत फिरणारे पक्षी मात्र तिला दि- सले. स्त्रिया जात्याच शरीरानें नाजूक आणि कोमल असतात, त्यांत आमची नायिका कोटावर भ्यालेली व गोंधळून गेलेली असल्यामुळें तिनें आपले नेत्र पुनः भयानें घट्ट मिटले. आपण पाण्यांत काय आधारावर आहों याबद्दल तिच्या मनांत विचार येऊं लागले. **बेटांतील** बंडखोर लोकांची धामधूम; आपण **द्वारकानाथाच्या** देवळांत भयानें बावरून पळून गेलों; कामातुर झालेला अगर अंगावरील अलंकारांच्या लोभानें आलेला काळ्या रंगाचा **सिद्दी** पाठीस लागला, व आपण कोटावर उभी आहों तों तो राक्षस आपणास धरण्यास समोर उभा आहे, त्याच्या पाठी- मागें आपणास सोडविणारा पुरुष येऊन पोहोंचला, व त्यानें त्याचे दोन तुकडे केले; त्या वीर पुरुषाचें अंधारांत पाहिलेलें चित्र, अशा एकामागून एक अनेक कल्पना तिच्या मनांत उभ्या राहिल्या. त्यामुळें ती भयानें आपले डोळे उघडी, लागलेच मिटी. मग अंगास कोणी स्पर्श करीत आहे व आपलें शरीर पाण्यांत बुडूं न देण्याविषयीं यत्न करीत आहे असा तिला भास झाला, तेव्हां आपण स्वप्न पाहत नसून जागृत स्थितींत आहों हें जाणण्या-

करितां तिनें धैर्यानें पुनः डोळे उघडले व मान वळवून बाजूला पाहिलें, तों कोणी पुरुष आपणास पाठीवर घेऊन शांतपणें पोंहत आहे असें तिला दिसलें. त्याचे मस्तकावरील केंस चकाकत असून ते मानेपर्यंत कातरलेले होते. त्याचा वर्ण गौर असून त्याची मान लाल झालेली दिसली. तेव्हां आपल्या शरीराचा भार आपली कींव मनांत आणून वाहून नेणाऱ्याला कमी व्हावा, असें करणें तिला जरूरीचें वाटूं लागलें; व लागलीच आपले अंगावरील अस्ताव्यस्त झालेलें वस्त्र तिनें नीट सांवरून नीटनेटकें खोंचलें, व अगदीं हुशार होऊन ती ह्मणाली, "मजवर आपण महत् उपकार केले आहेत व करीत आहांत. ह्याची फेड या अबलेनें कशी करावी? मला थोडें पोंहतां येतें आहे. हा विस्तीर्ण समुद्र पोंहून जाण्याचें सामार्थ्य नाहीं, व धैर्यही होत नाहीं, तरी आपले साहाय्यानें हिम्मत येईल तर बघतें." हे मंजुळ शब्द कानीं पडले त्या वेळीं त्यास अतिशय आनंद वाटला. त्यास आपण केलेल्या साहसाचें चीज झालेंसें वाटलें, कारण ज्या वेळीं त्यानें तिला पाठीवर घेतलें, त्या वेळीं ती अगदीं बेशुद्ध होती. या आनंदानें त्यास पहिल्यापेक्षां जास्त हुशारी वाटून तो ह्मणाला: "जर तशी हिम्मत असली, तर पाण्यावर तरून व माझ्या पाठीवर हात ठेवून ज्याप्रमाणें भोंपळ्यावर हात ठेवून पोंहतात तसें करा." इतके शब्द ह्याचे तोंडांतून निघतांच ती पाण्यावर तरंगूं लागली, व आश्रयासाठीं तिनें त्याच्या अंगावर आपला हात मात्र ठेवला. ती मनांत ह्मणाली "जो या अफाट समुद्रांतून तरून जाण्यास साहाय्य करीत आहे, तोच पुढें संसारसमुद्र नीतीनें तरून जाण्यास मिळेल काय?" त्याचें तें धिप्पाड सतेज, गौरवर्णाचें, गुलजार परंतु लोखंडाप्रमाणें कसलेलें शरीर जेव्हां तिच्या हातास लागलें, व तिच्या दृष्टीस जेव्हां त्याची रुंद प्यालेदार छाती, विशाल भाल, कमानीदार भिंवया, ओंठावर नुकतीच फुटलेली मिसरू, त्याची तारुण्याची लाली, व शूर मुद्राहीं पडलीं जेव्हां तिचें मन तल्लीन झालें. आपल्या पाठीवरील

बोजा कमी झाल्यामुळें त्यासही अधिक हुशारी वाटूं लागली. पुण्याहवाचनाचे वेळेस अगर यज्ञयागादि मंगलकार्यांत पत्नी जशी पतीजवळ असून संकल्पाचे वेळेस त्याच्या हातास स्पर्श करून त्याजकडे सलज्ज दृष्टीनें चोरून न्याहाळीत असते, तसा हा स्त्रीपुरुषांचा जोडा जलक्रीडा करण्याचा संकल्प करून पोंहत होता, व तिनें आपला हात विश्वासानें, प्रेमानें व ममतेनें त्याच्या अंगावर ठेविला होता.

दोघेंही पोंहत असतां प्रेमदृष्टीनें एकमेकांचें निरीक्षण करीत. त्यांत एक कृतज्ञ दृष्टीनें व दुसरा सहेतुक केलेल्या उपकारबुद्धीनें मिळालेल्या यशाचे तोऱ्यांत पाही; व एकमेकांचें मनोगत जाणण्याकरितां उभयतांच्या चेहेऱ्यावर क्षणोक्षणीं विचारतरंग उठत होते, ते पाहून दोघेंही मनांत संतुष्ट होत. तिचा हस्तिदंतासारखा रंग, त्यावर आलित्याप्रमाणें आलेली गुलाबी लाली, विशाल भाल, हरिणासारखे पाणीदार डोळे,-कुरळे काळेभोर, व पाण्यानें भिजून कानामागें सारलेले पाठीवर भुजंगाप्रमाणें आंदोलत प्रावणारे केंस,उन्नत वक्षःस्थळ,सरळ, व लांब हंसाप्रमाणें मान, गोंडस हात, चवळीच्या शेंगेप्रमाणें असलेलीं बोटें, हीं जेव्हां पाण्याबाहेर आलेलीं दृष्टीस पडत, तेव्हां आपण पाण्यांत पोंहत आहोंत कीं जमिनीवर आहोंत ह्याचें त्यास भान न राहून अगदीं त्याचें मन गोंधळून गेलें. नवख्या स्त्रीशीं आपण कसें बोलावें? काय बोलावें? आपल्या मनांतील भाव तिला कळवावा कीं नाहीं? कदाचित् ही स्त्री विवाहित असून तिला भलतीच गोष्ट विचारिली,तर त्याचा परिणाम तिच्या मनावर कसा होईल? असे तरंग येत ते तो दाबी, व तिच्या तोंडाकडे पाहण्याचें सोडून देई, परंतु लोहचुंबक जसा लोखंडास आकर्षण करतो, त्याप्रमाणें त्याचें चित्त पुनः पुनः तिजकडे वळे, व मनांत नसतांही पुनः तिच्याकडे पहावें असें त्यास वाटे. आपणावरच सर्वस्वीं अवलंबलेली व आपलाच जीस आश्रय आहे अशी ती जेव्हां जेव्हां त्याच्या नजरेस पडे, तेव्हां तेव्हां तो ह्मणे कीं, "थोडी मजल राहिली आहे, धीर सोडूं नको, घटका दों घटकेंतच आपले

जमिनीला पाय लागतील. " ह्या प्रोत्साहनानें तीस धीर येत असे. तिच्या मनांतही अशीच विचारमाला घोळत होती. ह्या प्राणदात्याच्या उपकाराची फेड कशी होईल? आपण कुमारिका आहों. धर्माप्रमाणें आई-बापांचे संमतीशिवाय कांहीं करितां येत नाहीं. कदाचित् आपण मनो-भावानें माळ घालण्यास तयार व्हावें, तर आपल्या कुलशीलाबद्दल त्याच्या मनांत शंका येईल. पुनः असेंही वाटे कीं, हा पुरुष इतके दिवस अविवाहित कसा राहिला असेल? अशा पुरुषाचें मन दुसऱ्या एकाद्या भाग्यशाली स्त्रीनें कशावरून ओढून घेतलें नसेल? जेव्हां मला ह्यानें सोडविण्याचा यत्न केला, तेव्हां मजवर त्याचें लक्ष असेल ह्मणूनच त्यानें धाडस केलें नसेल कशावरून? आणखी असेंही तिला वाटे कीं, शूर पुरुष असतात ते परोपकारसाठीं असें साहस करितात; त्या केलेल्या कृत्यापासून स्वतःस कांहीं लाभ व्हावा अशी इच्छा ते मुळींच ठेवीत नाहींत; अशा प्रकारच्या पुरुषाचें तर हें कृत्य नसेलना! देव करो, आणि माझ्या इष्ट हेतूशिवाय त्याचा निराळा हेतु नसो. अशी तिनें ईश्वराची करुणा भाकली. हे तिचे विचारतरंग तिच्या चेहेऱ्यावर स्पष्ट दिसत; कारण जेव्हां जेव्हां ह्या अबलेचा एक हात पोहण्यानें थके, तेव्हां तेव्हां तो ती बाजू बदलून तिला आपल्या दुसऱ्या बाजूस घेण्यास तत्पर असे.

याप्रमाणें कोस दोन कोस मजल झाली, व आमच्या सुकुमार अबलेला जरी पोहतांना इतका आश्रय होता, तरी ती अगदीं थकली; परंतु तिला ह्यापेक्षां जास्त भार ह्या परोपकारी पुरुषावर टाकण्याचें धैर्य होईना. तिला वाटे, एवढ्या थोडक्या मजलींत आश्रय असतांही जर मी इतकी थकलें, तर त्यांस किती थकवा आला असेल! जेव्हां हा चोरून तिजकडे पाही, तेव्हां तिचें तें गहिंवरलेलें, लज्जेनें म्लान झालेलें मुख हे तिच्या मनांतील विचार त्यास तेव्हांच सांगे. अखेर तो ह्मणाला "जर पोहण्याचे श्रमानें थकवा आला असेल, तर पुनः मी पहिल्याप्रमाणें तुला

पाठीवर घेतों." परंतु तिच्या मुखांतून कांहीं उत्तर निघेना. त्याजकडे ती सलज्ज दृष्टीनें पाहून खजील झाली.

इतक्यांत थोड्या अंतरावर आठ दहा हात लांबीचा व हातभर रुंदीच्या फळीचा एक तुकडा लाटेवर हेलकावे खात येत आहे असें त्यास दिसलें. त्यासरसा तो तिजसह आडवा पोंहत जाऊन त्या फळीपाशीं पोहोंचला. त्यानें ती फळी आपल्या हातानें पाण्यांत दाबून पाहिली, तों ती दोघांचाही भार साहूं शकेल अशी त्याची खातरी झाली. तेव्हां तो त्या स्त्रीला ह्मणाला "ईश्वरानें ही फळी पाठविली आहे. हिचा आपण आश्रय करूं." असें ह्मणतांच चटकर तिनें ती फळी धरून पोटाखालीं घेतली, व ईश्वराचा स्तव करून ती ह्मणाली "आपण देखील हिचाच आश्रय करा. आपणास ह्या दीन अबलेसाठीं फार श्रम झाले आहेत." हें एकतांच त्यानेंही आपल्या शरीराचा तोल दिला. या वेळीं दोघेंही फळीच्या दोहों बाजूंस आश्रय घेऊन आपल्या थकलेल्या हातपायांस विश्रांति देण्यांत गुंतलीं. त्यांनीं फळीच्या आश्रयानें जरा उंच होऊन किनाऱ्याकडे नजर फेंकली. त्यावर तो तिला ह्मणाला "आणखी दोनचार घटका ही फळी लाटेबरोबर चालवीत नेली तर आपण किनारा गांठूं. तीं पहा समोर पाण्यांतील टेंकडीवर हिरवींचार झुडपें दिसत आहेत." तिलाही तीं दिसलीं, त्यामुळें तीस धैर्य आलें, व पुनः त्यांनीं ईश्वराचें स्मरण करून आपला मार्ग क्रमण्यास आरंभ केला. ह्या वेळीं सूर्य मध्यान्हावर आला होता, त्यामुळें त्याचा प्रखर ताप पहिल्यापेक्षां जास्त झाला होता. परंतु वारा सोसाट्यानें वाहत असून शरीराखालीं पाणी असल्यामुळें त्या तापापासून उभयतांस फारसा त्रास होत नव्हता. दोघेंही आपला भार त्या फळीवर टाकून तीसह पायानें पाणी ढकलीत. वाराही त्याच बाजूनें वाहूं लागल्यामुळें हीं अपरिचित स्त्रीपुरुषें आपआपल्या विचारतरंगांत तरंगत डोंगराकडे जाऊं लागलीं, तों समोरच्या बाजूस त्यांस हिरवी टेंकडी दिसली. जों जों तीं जवळ जवळ येत चाललीं तों तों त्यां-

ना एकदा केव्हां जमिनीवर जाऊन उभीं राहूं अशी उतावळ झाली. या पांच सात कोसांच्या टप्यांत त्यास सुदैवानें कोणत्याही जलचराची पीडा झाली नाहीं. अशा रीतीनें तीं ५० हातांचे अंतरावर येऊन पोंचलीं; पण यापुढें ती फळी पुढें सरकेना. पायांस समुद्रांच्या पाण्यांतील झुडुपें व वेली लागूं लागल्या. त्या वेळीं त्या पुरुषानें तिला सांगितलें 'त्या फळीवर सर्व भार टाकल्याशिवाय झुडपांचा त्रास मिटणार नाहीं' तेव्हां निरुपायानें तिला त्याप्रमाणें करणें भाग पडलें. या वेळीं फळीच्या एका टोंकावर पुढचे बाजूस ती बसली, व मागून त्यानें वेलींच्या जाळ्याचा आश्रय करून फळी पायानें नेटानें लोटिली. या वेलींचे जाळ्यांतून जाण्यास किनारा जवळ होता, तथापि ह्या थोड्याशा प्रवासांत त्यास जसे श्रम झाले तसे पूर्वीच्या प्रवासांत झाले नव्हते.

मनुष्यप्राण्यांत आशा हा कांहीं विलक्षण मनोधर्म आहे. कसेही अनिवार्य प्रसंग येवोत, कितीही दुःखें पडोत, तथापि अश्रांत श्रम करून ही आशा त्यांतून पार पडण्यास हिम्मत आणिते. आशेसारखें दुःख नाहीं अशी सर्वत्र ह्मण आहे; परंतु ती कोणासही या जगांत सुटली नाहीं. कित्येक लोक संसारास त्रासून संसारसंबंधी आशेचा त्याग करितात; परंतु या जगांत मायेची आशा सुटली, तरीही परमार्थाची व परलोकाची आशा मोठ्या वीतरागी, त्यागी, साधुजनांसही सुटत नाहीं.

याप्रमाणें हें अपरिचित जोडपें एकदांचें समुद्रकिनाऱ्यावर कोरड्या जागेवर जाऊन उभें राहिलें, व उभयतांनीं आपआपली भिजलेलीं वस्त्रें पिळून थोडीं कोरडीं केलीं. या पुरुषाच्या कंबरेला दुपेटा होता तो सोडून त्यानें चांगला वाळविला. तो वाळविण्यास तिनेंही त्या दुपेट्याचा दुसरा पदर आपल्या हातांत धरून त्यास मदत केली. हें वस्त्र वाळतांच त्यानें तिला नेसावयास सांगितलें. परंतु परक्या पुरुषाचें वस्त्र कसें नेसावें असें तिच्या मनांत येऊन तिनें लज्जेनें मान खालीं घातली. इतक्यांत तिच्या मनांत आलें कीं, ज्यानें आपल्याकरितां स्वतःच्या जिवाचीही परवा न

करितां समुद्रांत उडी टाकली, त्याचें ह्मणणें अमान्य करणें हें योग्य नव्हे. ह्मणून ती जवळच्या झुडपाआड जाऊन तें नेसली, व त्याच वेळेस तिनें अंगांतील चोळी पिळून वाळविली व पुनः अंगांत घातली. तिचें प्रथमचें लुगडें वाळल्यावर ती तें नेसली, व सोडलेला दुपेटा पुनः पाण्याकडे घेऊन जाऊं लागली. परंतु तसें करूं देणें ह्या गृहस्थास बरें वाटलें नाहीं. तेव्हां तो ह्मणाला, "तूं फार थकली आहेस. असलें काम तुला करूं देणें मला बरें दिसत नाहीं." असें ह्मणून त्यानें तिजकडे न पाहतां तें वस्त्र तिच्या हातांतून घेतलें, आणि तो ह्मणाला "ऊन फार झालें आहे, याकरितां थोडें वर जाऊन चांगला छायेचा वृक्ष पाहून त्या खालीं तूं जरा विश्रांति घे, म्हणजे मी आसपास पाणी वगैरे मिळेल तर पाहतों." तिनें तोंडानें स्पष्ट रुकार न देतां मर्यादशीलपणानें माननें तसें करण्यास सुचविलें. मग त्यांनीं डोंगरावर चढण्यास सुरुवात केली. हा डोंगर फार उंच नव्हता, तरी त्यास वळणें फार होतीं, व दऱ्याही होत्या. थोडें वर गेल्यावर श्रमानें थकल्यामुळें एक वृक्ष पाहून त्याच्या खालीं एक चांगलें स्वच्छ कातळ होतें, व त्यावर बरेच ओबड धोबड दगड पडले होते, तेथें तीं उभीं राहिलीं. त्यानें तिला स्वस्थ बसण्याबद्दल इशारा केला, व आपण फळांच्या व पाण्याच्या शोधार्थ जातों असें सांगून तिजकडे मागें पाहत पाहत तो दूर गेला. या वेळीं ती अगदीं थकली होती. भुकेनें तिचा जीव व्याकुळ झाला होता. परंतु करते काय? आलेल्या प्रसंगास सादर झालेंच पाहिजे. नंतर कातळावर एक दगड उशाखालीं घेऊन विश्रांतीसाठीं ती आडवी झाली, व तिचा अंमळ डोळा लागला. ह्मण आहे कीं 'भुकेस कोंडा व निजेस धोंडा.' त्या सुकुमार स्त्रीस गादींतील सरकी देखील खुपावी; तिला कधींही अनवाणी चालण्याचा सराव नसावा; परंतु जेव्हां आकास्मिक कारणानें स्वार्थबुद्धीसाठीं द्वंद्वानल पेटून शांत व निरामय स्थानांतही भंग होऊन दरोडे, अग्निप्रळय इत्यादि गोष्टींनीं शांततेचा नाश होतो, तेव्हांच

अशा सुंदर व नेत्रास आनंद देणाऱ्या युवतिही आपलें सद्वर्तन कायम राखण्यासाठीं रानोमाळ हिंडतात. मोठे जहागीरदार, धनिक, व्यापारी व सत्ताधीश या वेळीं हात टेंकितात, व अगदीं गरीब स्थितींतला मनुष्य देखील संपत्तीच्या शिखरास जातो. जेथें उत्तम मंदिरें व देवालयें असतात, तेथें या द्वंद्वानें ओस अरण्यें होतात. ही महत्वाकांक्षा आपला परिणाम कोठपर्यंत नेईल त्याचें अनुमान होणें अशक्य आहे. ज्या वेळीं एकादे राष्ट्राची चढती होऊन त्याच्या सत्तेचा कळस होतो, आराम वाटूं लागतात, पादाक्रांत केलेले लोक त्यास कसपटाप्रमाणें वाटतात, व तें राष्ट्र आपल्या सत्तेच्या जोरावर स्वतःचें सुख व अधिकार यांपलीकडे कांहीं पाहीनासें होतें, तेव्हां महत्वाकांक्षा ह्मणजे काय आहे हें निर्बल झालेल्या लोकांस कसें कळावें? ज्या देशांत लोकांची महत्वाकांक्षा नाहींशी होते, तेथें परतंत्रतेचें फळ भोगण्याशिवाय त्यांस दुसरा मार्ग नाहींसा होतो. सरासरीं शरीरपोषण करून दिवस जाईल तो खरा अशी दशा येते. परंतु महत्वाकांक्षा केव्हां व कोणांत उत्पन्न होईल ह्याचा नेम नाहीं. महत्वाकांक्षेनेंच **शिवाजीसारखे** वीर या **आर्यावर्तांत** उदयास आले.

आमचा नायक या डोंगरांतील माहीतगार होता. त्यानें आपल्या कंबरेची तरवार हातीं घेतली, व तो एका दरीच्या बाजूनें निघून वाघेर लोकांनीं चांचेपणा करून पश्चिम समुद्रांतून जाणाऱ्या व्यापारी लोकांचीं गलबतें लुटून आणून ठेविलेल्या लुटीच्या जागा शोधूं लागला. तो एका दरीमध्यें दुसरी आड दरी होती तींत गेला, व न्याहाळून पाहतो तों त्यास एक मोठा दगड उभा असलेला आढळला. तेव्हां त्याच्या आड कांहीं असावें असें वाटल्यावरून त्यानें अंगाच्या नेटानें तो दगड बाजूस सारिला. आंत पाहूं लागतो, तों एके बाजूस पोतीं रचून ठेविलीं आहेत, दुसरे बाजूस भांडीं पडलीं आहेत, कापडाचे गढे व व्यापारी माल पडला आहे, असें त्यास दिसलें. पोतीं उघडून पा-

हतां त्यापैकीं कांहीं पोत्यांत अंजीर, कांहींत बदाम, बेदाणा, खडीसाखर, मस्कती खजूर इत्यादि पुष्कळ किराणा जिन्नस सांपडला. आमच्या नायकानें त्या पोत्यांतून दोघांस पुरें इतकें साहित्य आपले दुपेट्याचे पदरांत घेतलें, व पडलेल्या भांड्यांपैकीं एक तपेली घेऊन तो आलेल्या रस्त्यानेंच जेथें ती बसली होती तेथें परत आला. त्यानें येतांना डोंगरांतील झऱ्याचें पाणी भांड्यांत भरून आणलें होतें. तिचे पुढें त्यानें आणिलेलें सर्व सामान ठेविलें. जवळ वडाचे झाड होतें त्याचीं पानें काढून त्यांस टांके देऊन तीं फाळकींही त्यानें तिच्या पुढें ठेविलीं. तिनें तो आणिलेला मेवा स्वच्छ निवडला, दोन पात्रें वाढून सलज्जपणानें तिनें त्यास उपहार करण्याबद्दल विनंती केली. मग त्यानें एक वाढलेली पत्रावळ आपण घेतली व दुसरी तिला दिली. हा प्रकार होईपर्यंत उपहार मुकाट्यानें चालला होता. शेंवटीं तो ह्मणाला 'साखरेचा खाणार त्यास देव देणार' ही ह्मण आज अनुभवास आली. ह्या वेळेस संध्याकाळ झाली नव्हती. सरासरीं दोन घटका दिवस उरला असावा. उपहार झाल्यावर तो थोड्या अंतरावर एका दगडावर बसून वनसौंदर्य पाहूं लागला. ह्या डोंगराच्या एका बाजूस समुद्र होता, व दुसऱ्या बाजूस डोंगराची रांग बरीच लांबवर पसरली होती. डोंगरांत मोठीं झाडें ह्मणण्यासारखीं कायतीं वडाचीं दिसलीं. लहान झुडपें तर अगणित होतीं. कोठें कोठें सारखी काळ्या रंगाची कातळ, व कोठें मातीचे ढीग दिसले. ढीग शंभर दोनशें हातांपेक्षां जास्त उंचीचे नव्हते; व त्याच मातीचे डोंगर कातरून जाऊन पाण्याच्या वर्षणानें दऱ्या झालेल्या होत्या. त्या इतक्या आंत आंत असत कीं एकदम पाहणारास त्या दिसत नसत. या दऱ्यांत वाघ, लांडगे इत्यादि हिंस्र पशु रहात असत. अंधार पडण्यापूर्वी एकाद्या जवळच्या खोऱ्यांत आश्रय करून रात्र घालवावी असा त्यानें आपला विचार तीस कळविला, व तिनेंही त्याच्या ह्मणण्यास रुकार दिला. दोघेंही हळू हळू विश्रांतिस्थळाचे शोधार्थ चाललीं. अस्तमानाचा समय अगदीं नजीक आला होता. जमिनीचे

भागाकडून पक्षिसमुदाय आपलीं घरटीं ज्या झाडावर असत तिकडे येऊं लागला असतां त्याचा कलकलाट बराच ऐकूं येत होता. दोघेंही सर्व दिवस पोहण्याचे श्रमानें थकलीं होतीं. जवळ एक लहानशी दरी होती तिच्या वळणांत लहानसा निर्मळ पाण्याचा स्वच्छ झरा वाहत होता, तेथें पुनः त्यांनीं आपली तृषा शांत केली, व दरीचा आश्रय केला. वाघेरानें चकमकीच्या गारा शोधून काढून आपल्या अंगवस्त्राची एक चिंधी फाडून तिच्या साह्यानें विस्तव पाडला. झाडाखालीं पडलेलीं वाळलेलीं पानें व कांहीं काटक्या तिनें जमा करून आणिल्या. तें जळण सर्व रात्रभर पुरण्याजोगें होतें. दरीच्या तोंडाजवळ आगटी करून तो बसला. आमची नायिका दरीच्या आंतल्या अंगास निर्मळ जागा पाहून जवळच बसली. या वेळेस डोंगरांतील वनपशूंचा भयानक शब्द व जंगलांतील रात्रीचे किड्यांची किरकिर इत्यादि प्रकार चाललेच होते. दोघेंही विश्रांतीसाठीं आपआपले जागीं लवंडलीं; परंतु कोण, कोठचे, नांव, धंदा वगैरे एकमेकांस विचारण्याचा कोणी हिय्या करीना. उभयतांच्याही मनांत एकमेकांस माहिती विचारावी असें आलें होतें. शेंवटीं त्या पुरुषानेंच तुझा वृत्तांत ऐकावा अशी माझी इच्छा आहे ह्मणून सभ्यपणानें आरंभ केला. मग ती ह्मणाली "बेटांतील मंदिराचे बाहेरील बाजूस जी वस्ती आहे त्या आळींत माझ्या बापाचें घर आहे. त्याचें नांव **जोधा कुंभाणी.** माझ्या आईचें नांव **जितावा,** व माझें नांव **लालबा.** माझें लग्न झालेलें नाहीं रात्रीं बंडवाल्यांनीं गांवांत दंगा केला त्या वेळेस आमच्या घरावर दरोडा पडला. त्या गर्दींत आई सामान गोळा करण्याच्या धांदलींत मागील बाजूस गेली; व बाबा हत्यारें घेऊन दरोडेखोर लोकांस दटावीत त्यांचेकडे गेले. दोघांसही त्या धांदलींत एकमेकांची खबर कळली नाहीं. मी भयानें गांगरून जाऊन मागील ओसरींत आई असेल अशा समजुतीनें गेलें, परंतु पुनः घरांत दंगेखोर शिरले असा भास झाला. त्या भयानें मी मागील रस्त्यानें पळालें. रस्त्यांत सामसूम होती ह्मणून एका

घराचे पडछायेंत तशीच उभी राहिलें. तेथून आमच्या घरांत कांहीं गडबड ऐकूं येते कीं नाहीं ह्मणून एक दोन वेळ कानोसा घेतला, व आंत कोणी नाहीं असें वाटलें, ह्मणून भीतभीत परत घराकडे गेलें. पण घर रिकामें आहे असें वाटलें, तेव्हां माझा स्वतःचे घरांतही जाण्यास दम होईना. कारण दरवड्याचे वेळीं दहा पंधरा दरोडेखोर लोक माझे घराचे आंगणांत शिरले होते, त्यांनीं घराचें दार मोडून आंतील दारें फोडण्याचें काम चालविलें होतें. तेव्हां तशीच परत फिरून मी मंदिराचे मागील बाजूस गेलें. इतक्यांत समोरून भयानें लोक धांवत येऊं लागलेले पाहून मी मंदिरांत शिरलें. तेथें एक भयानक काळपुरुष माझे मागें लागला, तेव्हां त्याचे भीतीनें कोटाचे बुरुजाकडे वळलें. शेवटीं तो मला धरून ओढणार इतक्यांत आपण त्याला वार केलात एवढें मीं पाहिलें; परंतु कोटावरून भयानें मागें सरतांना मी पाण्यांत पडलें. माझा बाप श्रीमान नाहीं, परंतु थोडी सावकारी व शेतीभाती आहे तिजवर गुजराण करण्याइतकी त्याची ऐपत आहे. आपण मला जीवदान दिलें, परंतु तिकडे बाबांची व आईची काय स्थिति झाली असेल कोण जाणे ? घरांतील चीजवस्तेची तर चोरांनीं नासाडी केली असेल." या वेळेस चीजवस्तेच्या स्मरणानें ती घाबरल्यासारखी झाली. तिच्या तोंडांतून स्पष्ट शब्द निघेना. आईबापांच्या स्मरणानें तिच्या डोळ्यांतून अश्रु टपटप गळूं लागले. कंठ दाटून आला. ही थोडीशी हकीकत ऐकून तो शूर पुरुष ह्मणाला "मी बेटांत अगर जमिनीवर कोठें जवळपास असतों, तर तेव्हांच धांव मारून शोध केला असता, तुझ्या आईबापांस मदत केली असती, व तुलाही त्यांचे स्वाधीन केलें असतें. पण आतां समुद्र ओलांडून जाणें जिवावरचें काम आहे. कारण, जेव्हां प्रसंग असतो, तेव्हां दुःसाध्य कृत्यें करण्यासही जीव मागें घेत नाहीं; पण मध्यें थोडीशी सवड असली ह्मणजे युक्तिप्रयुक्ति काढण्याकडे मन जातें ! आतांच पहा, एक वेळ वाटतें, हा डोंगर ओलांडून बेटाकडे पायरस्त्यानें जावें. पण बेट बंडखोरांचे हातीं आहे कीं आणखी कांहीं

अनिवार्य प्रसंग गुदरला आहे, हें कळल्याशिवाय आतांच बेटाकडे जाणें धोक्याचें वाटत आहे. त्या डोंगरांत एका साधूचा मठ आहे असें माझ्या ऐकिवांत आहे. तेव्हां त्याचा शोध करून तेथें तुला ठेवून नंतर तुझ्या आईबापाचा तपास करण्यास जावें हें बरें दिसतें. आतां रात्र बरीच झाली आहे,--सर्व दिवसभर दगदगीनें तुझें शरीर थकलें असेल, यासाठीं तूं आतां विश्रांति घे. मीही थोडी विश्रांति घेतों. परंतु जंगली जनांवराचें येथें भय आहे, यासाठीं पाळीपाळीनें आपण पहारा करावा हें चांगलें." आगटीजवळ श्वापदें येत नाहींत ह्मणून गुहेच्या तोंडाशींच आगटी पेटविली होती, आणि तेथेंच तो निजला. लालबा ही आपले जागीं आपल्या आईबापांच्या विचारांत व आलेल्या प्रसंगाच्या ध्यानांत निमग्न झाली असतांही तिचा कांहीं वेळानें डोळा लागला.

डोंगरांत किर्र झाडी असल्यामुळें श्वापदांच्या शब्दाखेरीज दुसरें कांहींच ऐकूं येत नव्हतें, व काळोख असल्यामुळें आकाशांत नक्षत्रें मात्र चमकत होतीं, अशा निरामय स्थितींत तें अपरिचित जोडपें निद्रावश झालें.

सर्व दिवस दगदगीनें थकलेला अगर रोगानें पीडित असलेला अगर राजकारणाच्या त्रिविध तापानें त्रस्त झालेला मनुष्य जेव्हां खरा निद्रावश होतो, तेव्हां त्याची बाह्येंद्रियें व ज्ञानेंद्रियें लय पावतात. परंतु निद्रावस्थेंतच जेव्हां स्वप्नावस्था प्राप्त होते, तेव्हां बाह्येंद्रियें मात्र विश्रांति घेतात, व मनोराज्य चालू होतें. जे जे पदार्थ पाहिलेले व ऐकिलेले असतात, त्यांवर विचारतरंग हवी तशी इमारत उभी करितात. जाग्रदवस्थेंत देखील केव्हां केव्हां स्वप्नाप्रमाणें प्रकार घडतात. आनंदानें नाटकगृहांत नाटक पाहतांना पाहणारा जागृत असतो, परंतु कथासंविधानानें त्याचे विचार त्या त्या रसांत गढून जातात, आणि त्यामुळें त्यास केव्हां हंसूं येतें, केव्हां रडूं कोसळतें, केव्हां त्याचा कंठ सद्गदित होतो, केव्हां तो गांगरून जातो, व केव्हां त्यास कामविकारही होतात. परंतु हे सर्व विकार प्रत्यक्ष

पाहण्याचे व ऐकण्याचे परिणाम होत. हें नाटक ह्मणजे जाग्रद्वस्थेंतील स्वप्न आहे असें जेव्हां त्यास भान होतें, तेव्हां त्याच्या हृदयांत एकदम प्रकाश पडतो; व अंतःकरणादि पंचज्ञानेद्रियांना तज्जन्य विकाराचे श्रम वाटतात. जाग्रत्, स्वप्न आणि सुषुप्ति, या तिन्ही अवस्थांत निद्रावस्था शरीरास हुशारी देणारी व आयुष्यवर्धन करणारी आहे. असो.

## भाग ३ रा.

ह्या वेळेस ह्मणजे संवत् १९१२ त **बडोद्यास गायकवाडी** गादीवर श्री. **खंडेराव महाराज** हे अधिपति होते. राज्याचे दिवाण **गोविंदराव पांडुरंग रोडे** व कारभारी **गणेशपंत भाऊ ओझे** असत. **ब्रिटिश** सरकार व **गायकवाड** यांचे दरम्यान वकिलीचें काम **रोडे**च करीत होते. **खंडेराव** महाराजांचें शरीर पहिलवानाप्रमाणें पिळदार व फार तेजस्वी असत. त्यांची मुद्रा भयंकर दिसे. त्यांची ती वळींव दाढी, वाघासारखे उग्र डोळे, व मोठा आवाज ऐकून साधारण मनुष्याची धांदल उडे. कुस्तीनें त्यांचें शरीर पहिलवानासारखें कसलेलें होतें. त्यांना नेहमीं साध्या पोशाखाची आवड असे. ते प्रायः पांढरी कानटोपी व मांडचोळणा घालून चौरंगावर बसत, व सणावाराशिवाय अलंकार घालीत नसत. शरीरसंपत्तीसारखी दुसरी संपत्ति नाहीं ही ह्मण ह्यांस अक्षरशः लागू होती. त्या वेळचे रीतीप्रमाणें त्यांस बेताचें शिक्षण मिळालें होतें. त्यांस आपल्या शरीरसामर्थ्याचें फार भूषण वाटत असे, व तें त्यांस शोभण्यासारखेंही होतें. ते हत्तीवरून किंवा घोड्यावरून वाघाच्या शिकारी करीत. कधीं कधीं ते कडकडीत उन्हांत देखील शिकारीस जात, व त्या वेळेस त्यांना छत्रीचीही जरूर नसे. शक्तिमान् पुरुषास शौर्यादि गुणांची आवड असतेच. मल्लांच्या कुस्त्यांसाठीं त्यांनीं

शेंकडों पहिलवान तयार केले होते. रमजूसारख्या प्रसिद्ध पहिलवानाबरोबर ते आपल्या बळाची साम्यता करीत. या षोकामुळें हजारों प्रसिद्ध पहिलवान लोक महाराजांकडे चाहून येत, व आपल्या गुणांप्रमाणें हजारों रुपये मिळवीत. महाराजांनीं कित्येक पदरच्या पहिलवानांस गांवें इनाम करून दिलीं होतीं. रमजूसारखी दिग्गज माणसें पाहणें आतां दुर्मिळ आहे. त्यांस नुसतें पाहण्यास शेंकडों एतद्देशीय व युरोपियन लोक येत. जसा या महाराजांचा कुस्तीकडे भर होता, तसाच लष्करी खात्याकडेही होता. इ. सन १८५७ तील बंडाच्या धामधुमीच्या वेळेस ह्यांनीं दोस्त सरकार इंग्रज यांस मदत दिली होती. ह्यांचे कारकीर्दींत फौजेची सुधारणा झाली. पलटणें, ट्रुप, रिसाले, चांदीच्या तोफा, ह्यांच्या वेळींच झाल्या. पागेंतील सर्व स्वारांस यांनीं मंदील, दुपट्टे, कडीं, कंठ्या, इत्यादि सरंजाम देऊन त्यांचीं जुनीं कर्जें फेडलीं. वडोदें येथील दसऱ्याची स्वारी व आषाढीची स्वारी पाहण्यास फार दूरदूरचे लोक येत असत. महाराज जरी दिसण्यांत उग्र असत, तरी अंतःकरणाचे दयाळू असत. औदार्याबद्दल त्यांस लोक कर्णाची उपमा देत. ते सत्यप्रिय व निर्व्यसनी असत. लबाड, मद्यपी, व व्यभिचारी लोकांस ते काळाप्रमाणें भासत. त्यांना भूतदया फार असे. आपल्या राज्यांत कोणाला अन्नाची ददात असूं नये असें त्यांस वाटे; व सर्व रयतेनें आनंदांत व सुखांत असावें अशी त्यांची मनापासून इच्छा असे. ब्राह्मणांस खिचडी पूर्वीपासून मिळत असे, पण एकादशी व सोमवार ह्या दिवशीं मिळत नसे ती त्यांनीं चालू केली. हिंदू व मुसलमान ह्यांच्यांत केव्हांही दुही होऊं नये, धर्मसंबंधानें दोवांत मात्सर्य राहूं नये, या तत्त्वावर त्यांनीं ग्यारमी नांवाचा कारखाना सुरू केला, त्यांत हिंदूंप्रमाणें मुसलमान लोकांसही खिचडी देण्याचा प्रघात आहे. परभु लोकांनीं राज्य स्थापन करण्याचे कामीं यत्न केले होते हें स्मरून त्यांना याचना करण्याचा प्रसंग न यावा या हेतूनें महाराजांनीं त्या लोकांस माणशीं दरमहा चार रुपये करून दिले. हिंदु धर्माची देवालयें व मुसलमानांच्या मशिदी व पीरस्थानें

त्यांस नेमणुका व वर्षासनें बांधून दिलीं. अन्नसंतर्पणें हमेषा होत. शिवाय सर्व जातीच्या अंधपंगु लोकांस हजारों रुपयांची खैरात ते वांटीत. एकंदर राज्यांत हिंदुमुसलमान लोकांत धर्मसंबंधानें कलह न व्हावा यासाठीं त्यांजवर त्यांची फार दूरवर दृष्टि होती असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं.

काशीपासून रामेश्वरापर्यंतचे विद्वान ब्राह्मण वेदशास्त्रादिकांचा अभ्यास करून बडोद्यास येत असत. त्यांच्या परीक्षा घेण्यास राजगुरु व दानाध्यक्ष यांचे देखरेखीखालीं दरबारांतील विद्वान शास्त्री, पंडित, वैदिक, ज्योतिषी, हरदास, पुराणिक ह्यांची मंडळी नेमीत, व ज्यांचे त्यांचे विद्वत्तेप्रमाणें त्यांस दक्षिणा, बिदाग्या, महावस्त्रें इत्यादि मिळत. श्रावणमहिना या समारंभाचा नेमलेला असे. या वेळेस बडोदें शहर विद्वान मंडळींनीं गजबजलेलें असे. ठिकठिकाणीं मंत्रजागरणांतील वेदघोष, व शास्त्रांचे वादविवाद होत असत. मंदिरांत हरिकथा व पुराणें यांची एकच गर्दी चाललेली दिसे. गुजराथी व दक्षिणी ब्राह्मणांचा अनुक्रमें वद्य व शुद्ध एकादशीस रमणा होण्याचा संप्रदाय असे. या वेळेस रमण्यासाठीं आलेल्या शेंकडों गांवच्या ब्राह्मणांनीं पाणीदरवाज्याकडील साठमारीच्या आगडांतील जागा व केदारेश्वर महादेवाचीं मंदिरें भरून जात, आणि महाराजांच्या नांवाचा जयजयकार ऐकूं येई. श्रावणी सोमवार व शनिवार लोकसमूहाचे दर्शनानें व राजवैभवानें प्रफुल्लित असत. या जत्रेच्या दिवशीं हजारों मिठाईवाले, तांबोळी व इतर व्यापारी, ह्यांचीं दुकानें लागत. ठिकठिकाणीं भजनाचे मेळे आणि लोकरंजनार्थ तमाशे चाललेले दिसत. या मेळ्यांस जाणाऱ्या लोकांचे थवेच्या थवे चैनीनें इकडून तिकडे फिरतांना मौज पाहण्यांत गुंतलेले दिसत. कुलस्त्रिया अलंकारविभूषित होऊन देवदर्शनार्थ जातांना दृग्गोचर होत. मधून मधून पावसाची सर आली ह्मणजे कित्येक लोक भिजलेले, व कित्येकांनीं छत्र्या घेतलेल्या आहेत,—अशा लोकांची एकच धांदल दिसे. विश्वयोपिता आपल्या रूपयौवनाचें जाळें पसरण्यास हिंडत असलेल्या आणि त्यांचे सा-

थीदार हास्यविनोदांत निमग्न झालेले दिसत. रस्त्यांतून चिखलाचें पाणी उडवित जाणारे स्वार, गाड्या, हत्ती ह्यांचे धांवण्याची मोटी मौज दिसे. असे मेळे व जत्रा यांतील मूळ धर्माचा भाग बाजूस राहून, आतां मजा मारण्याचे व हौसेचे दिवस आले आहेत. कालांतरानें लोकाभिरुचि जसजशी बदलत जाते, तसतसें धर्मास व आचारास स्वरूप येत जातें. ज्या काळांत जे मोठे असतात, ते जसें वागतात तसें वागण्याची नक्कल इतर लोक हौसेनें करतात.

देशी राज्यास मुकलेलीं व दीन झालेलीं कित्येक कुंटुबें बडोदें येथें चरितार्थासाठीं येऊन आनंदानें राहून महाराजांस दुवा देत होतीं. त्या वेळेस या राज्यास धर्मराज्य असें नांव मिळालें होतें. सर्व देशांतून सर्व प्रकारचे कारागीर व गुणी लोक येत, व त्यांचे गुणांप्रमाणें त्यांची बूज होत असे. त्यावेळीं हें संपत्तिमान शहर सुखानें नांदत असे. रस्त्यांतून हिंडणारांना कडीं, कंठें, शाली, दुपेटे, व तोडे घातलेले शेंकडों लोक दृष्टीस पडत. गांवांत शेंकडों कसरतीच्या तालमी असत. दांडपट्टे व घोड्यांचे भाला बोथाटीचे फेर चाललेले दिसत. लोकांस तालिमबाजीच्या कामीं महाराज फार उत्तेजन देत, त्यामुळें लोकही हौसेनें त्यांस शरीरें बनवून दाखवीत. गांवांतील तालमीचें दंगल पाहण्यास खुद्द महाराज बसून ते हौसेनें मुलांस उत्तेजनार्थ बक्षिसें देत. गुणग्राहकता असली ह्मणजे गुणिजनांस उत्तेजन येतें. खंडेराव महाराजांचे कारकीर्दींत शारीरिक शिक्षणाला उत्तेजन मिळालें होतें. तसें नाच, बैठकी, तमाशे साठमाऱ्या, हत्ती गेंड्यांच्या टकरा वगैरेंसही उत्तेजन आलें होतें. बाहेरच्या लोकांना बडोदें हें आनंदाचें स्थान वाटे. हे महाराज बाहेर चौरंगावर नेहमींप्रमाणें पांढरा पोशाख करून बसले, ह्मणजे कारभारी कामदार जवळ बसून आपलीं कामें समजावीत, व अर्जदारांनाही त्यावेळेस जवळ जाण्यास मोकळीक असे. एकादी निराश्रित वृद्ध बाई देखील दाद मागण्यास गेली असतां तिला मज्जाव नसे. महाराज चौरंगावर येऊन बसले

ह्मणजे हजारों लोक त्यांचे सभोंवती आपआपले दर्ज्याप्रमाणें उभे राहत, त्यांत शिपाई, जासूद, साठमार, पहिलवान, तमासबीन वगैरे लोक डोकीस मंदील, कंबरेस दुपेटे, गळ्यांत कंठे घातलेले हातांत सोन्याचांदीच्या छड्या घेतलेले असत, तें राजवैभव पाहून पाहणारांचे डोळे दिपत. महाराज सत्यप्रिय व दयाळू असल्यामुळें लबाड माणसांस त्यांचे समोर जाण्याची हिम्मत होत नसे. त्यांचें उग्र तेजःपुंज व भव्य शरीर पाहून त्यांचे समोर बोलणाराची बोबडी वळे. त्यांचा सर्व कामदारांवर दरारा असे. त्यांनीं गावोंगांवीं विहिरी, कुवे, तळीं बांधलीं. त्यांचे कारकीर्दीत जमिनीस अबादी येऊन दुपटीवर जमाबंदी झाली. त्यांनीं स्वारीसाठीं सोन्याची अंबारी केली तेव्हां रयतेनें हजारों रुपये त्यांस नजराणे केले. रयत त्यांस जीव कीं प्राण वाटत असे. ब्रिटिश सरकारांकडून याच वेळेस त्यांस मोर्चलें वापरण्याचा मान मिळाला. त्यांची देणगी व धर्म विपुल असत, तसेंच त्यांचें शासनही कडक असे. केव्हां केव्हां ते लहान अपराधालाही मोठें शासन करीत. खैरातीच्या कामीं लबाडी करणारास फटके व दंड या शिक्षा करीत, त्यामुळें गुन्हा करणारास अगर लबाडी करणारास मोठें भय असे. हल्लींप्रमाणें त्यांचे वेळेस न्याय, मुलकी, पोलिस, मिलिटरी, शाळा, जंगल, अपकारी, आणि दवाखाने हीं खातीं पृथक् केलेलीं नव्हतीं, तरी या खात्यांबद्दलही निराळी व्यवस्था केलेली असे. इंग्रजी दफ्तर त्या वेळेस नव्हतें. सर्व काम देशी भाषेंत चालत असे. फक्त इंग्रज सरकारांशीं पत्रव्यवहार इंग्रजींत चाले. इंग्रजी भाषा जरा आली कीं झाला विद्वान, असा काळ तो नव्हता. मुत्सद्दीपणाला त्या वेळेस मान अधिक असे. राज्याची हकीकत लिहून अंतःस्थिति उघडी करून दाखविणें त्या वेळीं धोक्याचें समजत असत. फौजेचा व संपत्तीचा अंत लागूं न देतां दोन्ही फार गुप्त ठेवीत. यामुळें बाहेर या राज्याच्या सामर्थ्याचा दबदबा असे. दोस्त ब्रिटिश सरकार अंतर्व्यवस्थेकडे कधींही पाहत नसे. ओझे हे त्या वेळीं कारभार पाहत

होते, परंतु **गोविंदराव रोडे** यांचा पगडा पुढें पडूं लागला होता. महाराजांची कृपा संपादण्याकडे दोघांचे यत्न जारी असत. एकाच व्यक्तीकडे राज्यस्वातंत्र्य जेथें असतें, तेथें त्या व्यक्तीला खुष राखण्याकडे सर्वांचे यत्न सुरू असतात. महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली कीं, दुसऱ्याचें वर्चस्व नसावें व आपलें तेज पडावें असें प्रत्येकाला वाटूं लागतें, व त्यासाठीं जो तो आपला पक्ष सबळ करण्याच्या खटपटीस लागतो. दोन्ही पक्षांचीं माणसें आपापले हितासाठीं झटतात. अशा खटपटींत तिसऱ्याची हानि किंवा लाभ होतो. **द्वारका** येथील **वाघेर** लोकांची तक्रार होती, त्यांस अडचणी काय व कशानें आल्या, व ते जीं कारणें दाखवितात तीं विचार करण्यासारखीं होतीं कीं नाहीं, ह्या गोष्टींचें महत्व कोते दृष्टीनें पाहणारांचे नजरेस आलें नाहीं. **वाघेर** लोक तुफानी व लबाड आहेत अशाच पोकळ कागाळया महाराजांचे कानावर जाऊं लागल्या. आपल्या कामदारांचा त्यांजवर जुलूम होता कीं काय, आणि त्यांची मागणी योग्य आहे किंवा नाहीं, हें बरोबर समजाविण्याचें काम मुत्सद्दी मंडळींचें होतें; परंतु एका पक्षाचा ओढा **द्वारकेचे** वहिवाटदार **नारायणराव रघुनाथ** यांजकडेस, व दुसऱ्या पक्षाचा ओढा **सखाराम पुरुषोत्तम** यांजकडे होता. **सखाराम पुरुषोत्तम** यांजबरोबर फौज, तोफा वगैरे देऊन त्यांस **वाघेर** लोकांवर पाठविलें. त्यांत एका पक्षाचा हेतु असा होता कीं, जर **सखाराम पुरुषोत्तम** यांस यश आलें तर ठीकच; न आलें, तर **नारायणराव रघुनाथ** यांची योग्यता ठरेल. **सखाराम पुरुषोत्तमाचा** चळचळाट दोन्ही पक्षांस असह्य झाला होता. **वाघेर** लोक शूर व कडवे आहेत, त्यांचा उपयोग राज्यास कधीं तरी होण्यासारखा आहे, अशी दूरदृष्टीची नजर कोणींहीं पोंचविली नाहीं. **वाघेरांचे** हें क्षुल्लक बंड आहे, व त्या हरामखोरांचा जोर कमी झाला पाहिजे, असा महाराजांचा ग्रह झाला असावा, त्यामुळें तहनाम्याप्रमाणें दोस्त सरकारचे हातून परभारें बंदोबस्त व्हावा अशी मसलत ठरली असावी. हमेषा मनुष्याची दृष्टि तात्कालिक

प्रसंगापुरती असते. ज्यांची दृष्टि दूरवर पोंचत नाहीं ते खरे मुत्सद्दी नव्हत. जो राज्य कमावितो त्यालच, माणसें कशीं वाळगावीं, त्यांचे मान कसे ठेवावे, त्यांस स्वरूप येण्यासाठीं उत्तेजन कसें द्यावें, हें माहीत असतें. ही कारकीर्द पूर्वी संपादिलेल्या ऐश्वर्याचा सुखोपभोग घेण्याची होती. फौजफांटा राज्यरक्षणासाठीं असला पाहिजे अशी समजूत असणें दुरापास्त होतें, कारण या कारकीर्दीला परचक्राची धास्ती मुळींच नव्हती. ती काळजी दोस्त सरकारानें आपल्याकडे ठेविली होती.

जेव्हां जेव्हां असा बेफिकीरीचा काळ येतो, तेव्हां रिकामे दिखाऊ खर्च राज्यांत वाढतात. ज्यांनीं आपल्या शरीराचे बळी देऊन राज्य मिळविण्याचे कामीं अश्रांत श्रम केलेले असतात, तीं माणसें, त्यांस दिलेल्या जहागिरींचे शोभेसाठीं राखलेली फौज, आणि प्रजा, यांच्या सुखाविषयीं बेदरकारी होत जाते. पूर्वीच्या लोकांनीं अश्रांत केलेल्या श्रमांची कल्पना व अनुभव नव्या मंडळीस नसतो, त्यामुळें त्यांचे वंशज निरुपयोगी आहेत असें कार्यधुरंधरांस वाटूं लागतें. एवढेंच नव्हे, तर जे चैनीचे खर्च आहेत त्यांचा पुरवठा काळीचे उत्पन्नांतून होईनासा झाला, ह्मणजे मग हा खर्च कमी कर, तो खर्च कमी कर, असें सहज होतें. पूर्वीचीं गंजलेलीं हत्यारें स्वच्छ राखण्याचा कंटाळा येतो, एवढेंच नव्हे, पण घरांत हत्यारांनीं जी जागा अडलेली असते त्या जागेचीही अडचण वाटूं लागते! अशा वेळीं पहिली धाव निराश्रित दानधर्माची. तिजवर काय ती मितव्यय करण्याची शक्कल! तेवढ्यानें जर पुरें न झालें, तर जहागिरी व इनामें ज्यांस दिलेलीं आहेत ते लोक ऋणकऱ्यांसारखे भासूं लागतात. त्यांचेंही कमी करून बाष्फळ खर्च पुरेनासा झाला, ह्मणजे जमिनीचा सारा वाढविण्याकडे दृष्टि जाते. तात्पर्य काय, अशी स्थिति येऊं लागली, ह्मणजे रयत नाराज; हक्कदार नाराज; सरदार नाराज! इतका परिणाम फक्त स्वतःस स्वतःचें संभाळण्यासाठीं जोखीम नसल्यानें होतो.

आमचें हें संविधानक ज्या काळास अनुलक्षून लिहिण्यांत येत आहे, त्या काळीं आतांपर्यंत वर्णन केलेली अशीच स्थिति केवळ झाली नव्हती. गायकवाड सरकारांस जरी परचक्रापासून स्वतःचें रक्षण करण्याची जरूर राहिली नव्हती, तरी आपण स्वतंत्र आहोंत व आपलें स्वातंत्र्य संभाळण्यास मुख्य रयत, वतनदार, गिरासदार, हक्कदार, इनामदार, सरदार, लष्कर आणि कामदार त्यांस खुष ठेवण्याची जरूर काय, असें त्या वेळच्या राज्यकर्त्यांस वाटत नसे. प्रजासत्तात्मक राज्य बाजूस ठेविलें, तरी ह्या गोष्टीकडे हेवा व दुर्लक्ष्य झालें तर त्याचे परिणाम विपरीत होतात हें त्यांस माहित होतें. खंडेराव महाराज हे स्वभावानें फार अभिमानी असत; ज्यास ते आपला ह्मणवीत त्यास ते कधींही कमी पडूं देत नसत. राजाचे अंगीं जितके गुण असावे तितके सर्व त्यांचे अंगीं नव्हते, तरी औदार्य, शौर्य, मानीपणा, सत्यप्रियता, निर्व्यसन, नीति, हे गुण स्वभावतःच त्यांच्या अंगीं असत.

महाराज तिसरे मजल्यावरील बारद्वारींत मुत्सद्दी मंडळीसह बसले असून कामाची सुनावणी होऊन जे हुकूम होत त्यांची नोंद ठेवण्याचें काम सुरू झालें होतें. रोडे यांचे दिवाणगिरीचे मुदतींत त्यांची सही कोठेंही होत नसे, मग किरकोळ कामांवर महाराजांची सही कोठून असणार? सही हें कायद्याच्या काळांतील पुराव्याचें चिन्ह आहे. नुसत्या विश्वासानें जेव्हां कामें चालत, तेव्हां सहीचें महत्त्व कोठून असणार? हल्लीं स्वतःची सही अगर स्वदस्तुरचे लिहिलेले लेख असूनही कोर्टांत माझ्या अक्षरासारखें अक्षर आहे, पण माझें नव्हे, असें ह्मणून न्याय मिळतो. सत्यभाषणाची किंमत ह्या काळांत काय आहे? व रहावी तरी कशी? केव्हां असेंही घडतें कीं, एकादें कृत्य खरें असून त्यास पुराव्यासाठीं खोटें रूप देऊन तयार केलें नाहीं, तर खऱ्याचा लोप होतो. या आमच्या ह्मणण्यानें आजही सर्वच लोक असत्य बोलणारे आहेत असें नाहीं. केव्हांही झालें तरी दोन्ही गोष्टींस अपवाद असणारच.

परंतु विश्वासानें जशीं चांगलीं कामें होतात, तशीं गैरविश्वासानें होत नाहींत. कित्येक गोष्टी अशाही आहेत कीं, विश्वास ठेवण्याशिवाय तेथें दुसरा मार्गच नाहीं.

या वेळेस दिवाणाचे हातीं जासुदानें एक लाखोटा दिला. त्यानें तो फोडून आंतील पत्र वाचलें. त्यांत **उखामंडळांत वाघेर** लोकांनीं बंड करून **द्वारका** घेतल्याचें लिहिलें होतें. हा मजकूर महाराजांस श्रुत केल्याबरोबर त्यांची मुद्रा रागानें लाल झाली. '**कांपांत** जा व बंदोबस्त करण्यास **रेसिडेंटास** सांगा. ते जर बंदोबस्त करीत नसतील तर एकदम लष्कराची तयारी करून चढाई करावी. **द्वारकेची** गादी चोरट्यांनीं घ्यावी!' हे त्यांचे तोंडांतून शब्द निघतांना कामदार मंडळीच्यानें त्यांच्याकडे पहावेना. **गोविंदराव रोडे** म्हणाले, 'यांत विशेष कांहीं नाहीं. आपले हुकमाप्रमाणें मी सर्व तजवीज लावितों.' **रोडे रेसिडेंटाकडे** गेले, त्या वेळेस याच विषयासंबंधानें व **वाघेर** लोकांचे मागील बंडासंबंधानें बोलणीं चालली होतीं. इतक्यांत वकील **कांपांतून** परत आले. **क्यापटन बार्टन** यांची बंड मोडण्याकडे नेमणूक झाली, व आपलेकडील वहिवाटदार यांनीं तेथील असलेलें लष्कर घेऊन त्यांस मदत करावी असें **रेसिडेंटाचें** ह्मणणें वकिलांनीं कळविलें; व सर्वानुमतें वहिवाटदार यांजवर हुकूम लिहिण्याचें ठरलें. नंतर महाराजांचा रोष थोडा कमी झाला. मुत्सद्दी, कामदार लोक आपआपलीं कामें संपवून आपआपले उद्योगास लागले. खुषमस्कऱ्ये लोक महाराजांजवळ जमले. दरबारी कामाचे वेळेस ह्या लोकांस येण्यास परवानगी नसे. एकवेळ ही बारभाई मंडळी जमली ह्मणजे महाराजांजवळ एक चाकरही राहत नसे. ही मंडळी जमली ह्मणजे हवी तशी थट्टा चाले. त्यावेळीं महाराजांस देखील पाहिजे त्यानें पाहिजे तें बोलावें अशी मुभा असे. या संस्थेत देखील खरें बोलण्याच्या मुभेनें लोक महाराजांस त्यांचे दोष कळवीत, त्यामुळें कित्येक चुकांची दुरुस्ती होई. एकाद्याच्या वर्तनावर झालेला महाराजां-

चा ग्रह सदरहू मंडळींच्या बोलण्यानें बदले. गरीब लोकांवर कामदारांकडून जुलूम झाला तर त्यांचे कानावर जाई. नंतर चंडोल, बुलबुल वगैरे पक्ष्यांच्या लढाया पहात भांड लोकांच्या नकला चालत. वेळ मिळाला तर सायंकाळीं पतंग, तुक्कल इत्यादि उडवीत. एकच विषय मनास नेहमी रंजवीत नाहीं. अनेक विषयांकडे मनाची धांव असते. मात्र ती धांव नियमित पाहिजे, ह्मणजे वाईटापासूनही चांगलें निष्पन्न होतें.

## भाग ४ था.

**द्वारकानाथाचें** मंदिर तटबंदी असल्यामुळें किल्ल्याप्रमाणें दिसे. त्या तटास दोन खिडक्या होत्या. त्यांत एक दक्षिण बाजूची, जिला **स्वर्गबारी** असें ह्मणतात; व दुसरी उत्तरेकडची, जिला **मोक्षबारी** असें ह्मणतात. **स्वर्गबारीवर शंभु** जमादाराचा **कोंकणी** बेहेडा होता. **मोक्षबारीचे** भागांत वहिवाटदार यांची कचेरी व त्यांची रहाण्याची जागा असे. **मुरलीधर** बावा हे गृहस्थ पूर्वीं **इंग्रजाचे** नौकर होते. पुढें हे वहिवाटदाराचे ताब्यांत राहून काम पाहत असत. **नारायणराव रघुनाथ** त्यावेळेस वहिवाटदार होते. **वसईचा** बंदोबस्त राखून **सखाराम पुरुषोत्तम** हेही याच तटाच्या दुसऱ्या भागांत ह्मणजे **रामवाडींत** राहत होते. यांनीं खर्च कमी करून बंदोबस्त केल्याचीं पत्रें **बडोद्यास** रवाना केलीं. त्यांत **वाघेर** लोकांचे गिरास चालू केले, **वसईचा** निवडुंग कांपण्याची व्यवस्था केली, व जामिनकीबद्दल **वाघेर** लोक ओलीस घेतले. या पत्रव्यवहारावरून **बडोद्यास** निराळा व्यूह रचला गेला. **सखाराम पुरुषोत्तम** हे पाठविणारांचे बाजूचे असल्यानें त्यांनीं खर्च वाढविला, व **वाघेर** लोकांस मिळून राहिले आहेत, असें विरुद्ध पक्षानें महाराजांस भासविलें असावें.

त्यावरून खर्च कमी करून बंदोबस्त करावा असें ठरलें. तोफा व दोनशें लोक **बडोद्याहून** रवाना झाले. मागून येणारा तो शहाणा व पूर्वीचा तो वेडा अशी समजून असते. **सखाराम पुरुषोत्तम** यांनीं उपजीविकेचा वगैरे बंदोबस्त करून **वाघेर** लोक शांत केले होते. ती व्यवस्थ यांनीं बदलली त्यामुळें **सखाराम पुरुषोत्तम** यांस मिळलेलें यश गमावलेसें वाटणें स्वाभाविक आहे. मग ते तुटक रीतीनें वागूं लागले. त्यांचे बरोबरचे लोकही नाराज झाले. त्यांस वाढवून दिलेले पगार परत घेण्याचें ठरलें. अंमलदार लोकांत कुजबुज होऊं लागली. दुफळीचा स्पष्ट भास होऊं लागला. **वाघेर** लोकांनीं शिबंदीकडील कांहीं **शिद्दी, मकराणी** फोडण्याचा यत्न केला, अशी गुणगुण निघाली. **वाघेर** लोक तुफान करतील असें आंतले आंत लोक बोलूं लागले होते, स्पष्ट मात्र बोलत नसत. शांततेच्या प्रकाशावर भय आणि बेदिलीचीं ढगें आलीं होतीं. **नारायणराव रघुनाथ** हे सद्दीच्या जोरांत असल्यामुळें या गुणगुणीचा परिणाम भलताच होईल असें त्यांस वाटलें नाहीं, व ते त्यामुळें बेफिकीर राहिले.

श्रावण शुद्ध १ संवत् १९१४ च्या रात्रीं पावसाची काळोखी असल्यामुळें **द्वारका** व **बेट** अंधारांत घोरत पडलीं होतीं. **वाघेर** लोकांच्या टोळ्या नेमले वेळीं गोळा होऊं लागल्या. त्यांपैकीं **वाढेल** व **वाघेर** लोकांची एक टोळी **बेटा**कडे गेली, व एक **द्वारके**कडे वळली. त्यांनीं किल्ल्यास वेढा देऊन आग्नेयी दिशेकडे शिड्या लाविल्या. बुरुजावरील ज्या कांहीं फितुरी लोकांस या रात्रीं होणारें कृत्य माहित होतें. ते मात्र सावध होते. बाकीचे लोक झोपेंत होते. किल्ल्यांत **वाघेर** लोक शिरल्याची बातमी मिळतांच **जगन्नाथ जमादार** यानें आपले लोक तयार केले. शिबंदी बदललेली होती, तथापि **हरि कोंडाजीनें** समजावून लोक एकत्र केले. त्यामुळें **स्वर्गवारी**कडे हल्ला व्हावा तसा झाला नाहीं. जे लोक कोटावर चढत त्यांच्याशीं सामना होई. बंदुकांचे बार सुरू झाले.

'**द्वारकानाथ**की जय' असा **वाघेर** लोकांचा जयघोष ऐकूं येऊं लागला. शेंकडो **वाघेर** लोक **मोक्ष**बारीनें आंत शिरले. त्यांस फितुरामुळें दरवाजा खुला झाला होता. समोर जाई त्यास जखमा होऊं लागल्या. **स्वर्गबारी**चे बुरुजाखालीं आलेल्या **वाघेर** लोकांचा समाचार **शंभु** जमादार घेत होता. त्याजजवळ दारूगोळीचा भरपूर पुरवठा नव्हता, तरी त्यानें बरेच **वाघेर** लोक जाया केले. इकडे ही धांदल चालली होती तिची **नारायणराव रघुनाथ** यांस दादही नव्हती. चांगलें फटफटीत उजाडून माणसास माणूस दिसूं लागलें. **वाघेर** लोकांनीं वहिवाटदार कचेरीवर हल्ला करण्याची तयारी केली, व वहिवाटदार यांस धरण्यासाठीं त्यांचे रहाण्याच्या जागेच्या आसपास त्यांचे लोक जमले. या वेळेस **नारायणराव रघुनाथ** प्रातःस्नान करून देवपुजेच्या गडबडींत होते, ते गोळीचे बार ऐकून पूजा टाकून तिसरे मजल्यावर पळाले. जिन्यांत **नाना** कप्तान व थोडे शिपाई उभे होते. जे **वाघेर** वर चढत त्यांस **नाना** कप्तान सफा करीत. तेथें बरेच लोक मारले गेले, तेव्हां **वाघेर** लोक दुसरे जिन्यानें वर चढून गेले, व त्यांनीं **नाना** कप्तानवर वार केले. त्यामुळें **नाना** जखमी होऊन तेथेंच पडले. **तात्या पुणेंकर** लोकांस धीर देऊन दुसरे जागीं त्यांना एकत्र करीत होते. या वेळेस सूर्य सहा सात घटका दिवसावर आला होता. थोड्या वेळानें **तात्या पुणेंकरास जगन्नाथ** जामदार कांहीं लोकांसहित येऊन मिळाला.

मंदिरांत व गांवांत एकच आकांत झाला. लोक आपलें जीवित व वित्त संभाळण्याचे उद्योगास लागले. जे लोक बंडवाल्यांचे हातीं लागले त्यांस ते बांधून मारण्याचें भय दाखवून पैसे काढूं लागले. **नारायणराव रघुनाथाचे** वाड्यावर त्यांस पकडण्यासाठीं **वाघेर** लोकांनीं हल्ला केला, त्या वेळेस ते तिसरे मजल्यावर कडी लावून बसले होते.

या वेळेस **सखाराम पुरुषोत्तम** हे श्मश्रू करवून स्नानसंध्या आटोपून बसले होते. **नारायण रघुनाथ** ठाण्यांत अडकले आहेत, व **वाघेर**

लोकांचा त्यांसभोंवती वेढा पडला आहे, ही बातमी त्यांस कळतांच स्वतः ढालतरवार बांधून **शिवलाल शुक्ल कडीकर** व तैनातीचे लोक यांसह **नारायणरावांस** सोडविण्याचे हेतूनें निघाले. त्यांचे बरोबरचे लोकांनीं व त्यांनीं बरेच **वाघेर** लोक जखमी केले, हें पाहून **वाघेर** लोकांनीं त्यांजवर बंदुकीचा ताशेरा झाडला. या ताशेऱ्यापासून कोणास इजा झाली नाहीं, यामुळें त्यांनीं ताशेरा केला तो खोटा आहे असेंही ह्मणण्यास **जगन्नाथ** जमादार व दुसरे कित्येक लोक चुकले नाहींत.

**सखारामबापू** ज्या माडीवर राहत होते तेथें गोळया सुरू होत्या. **सोरटच्या** बारवटियास यांपैकीं एक गोळी लागून तो पडला. **सखारामबापूंनीं** आपले लोक घेऊन मोठ्या धैर्यानें **वाघेर** लोकांची फळी फोडली, व ते शिबंदी घेऊन वाड्यांत शिरले. परंतु **नारायणरावांचा** बराच वेळ पत्ता लागेना. शेंवटीं ते तिसऱ्या मजल्यावर वळकटींत सोंवळें नेसलेले, सांपडले. **बापू** त्यांस धीर देऊन ह्मणाले, "**वाघेर** लोकांचा शिरकाव सर्व ठिकाणीं झाला आहे. आपल्या तोफा व शिपाई लोक अव्यवस्थित स्थितींत आहेत. शिबंदीचे लोक आणि बेहेड्यांतील लोक एकत्र करून सामना करण्यास आतां सवड राहिली नाहीं. तथापि जेवढे लोक माझ्या बरोबर आहेत तेवढ्यांचे साहाय्यानें आपणास मागचे रस्त्यानें निघून जातां येईल." ही मसलत **नारायणराव रघुनाथ** यांस पसंत पडली. नंतर राहिलेले लोक बरोबर घेऊन उभयतांनीं वाड्यांतील मागचे रस्त्यानें **जामपुराचा** रस्ता धरिला. ह्या वेळीं त्यांस अडविण्याचें सामर्थ्य **वाघेर** लोकांस होतें, परंतु हे **गायकवाड** सरकारचे अंमलदार आहेत; व **वाघेर** लोकांनीं **जामपुराकडे** जाणाऱ्या लोकांवर त्यांस अडविण्याकरितां **नानाध्रुवाचे** धर्मशाळेजवळ तोफ लाविली होती, एवढ्याच दृष्टीनें **जोधा माणेक** यानें त्यांजवर हल्ला होऊं दिला नाहीं. या वेळेस **वाघेर** लोक सर्व बाजारांत शिरले होते. **शंभु** जामदार यानें हा वेळपर्यंत बराच टिकाव धरला होता. परंतु

जेव्हां शिबंदी कामदार लोक **जामपुरा**कडे निघून गेल्याचें त्यास कळलें, तेव्हां निरुपाय होऊन तोही आपले लोकांसुद्धां **जामपुरा**कडे निघाला. **द्वारका वाघेर** लोकांचे कबजांत गेली. **दक्षिणामूर्ती**चे मठांत **टोकरा-स्वामी** रहात होते. **वाघेर** लोक त्यांस गुरूप्रमाणें मानीत असता, तरी त्यांनीं तो मठ लुटण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं. **नाना** कप्तान जखमी झाल्याची खबर मठांत कळली, त्यावरून स्वामींनीं त्यांस आणण्यासाठीं कांहीं शिष्य पाठवून जखमी झालेला कप्तान मठांत आणविला. **मुरली-धर** बाबांची स्त्री याच मठांत प्रसूत झाली होती, त्या बाळंत बाईच्या खोलींत जें सामान होतें तें मात्र सुरक्षित राहिलें; कारण **वाघेर** लोक बायकांच्या वाटेस कधींही जात नाहींत.

**जामपुरां**त या वेळेस **गायकवाड** सरकारचे अंमलदार व तैनाती शिबंदी मिळून तीनचारशें लोक होते. ही जागा चांगली मजबूद होती. इतके लोक **वाघेर** लोकांशीं सामना करण्यास पुरेसे नव्हते, त्यामुळें पुन हल्ला करण्याची हिंमत राहिली नव्हती. **द्वारका** हातीं आली तेव्हां **भिवा माणेक** यास **वरवाळा** गांव घेण्यासाठीं **जोधा माणेक** ह्यानें रवाना केलें, व **देवा छवाणी** याच्या मदतीस **पिंडारी** लोक देऊन **बेटा**कडे मदतीस पाठविलें. **बेटां**तील जमादारानें बराच वेळ टिकाव धरिला, बरेच **वाघेर** लोक मारले, परंतु **द्वारके**कडून कुमक येऊन पोहोंचली नाहीं. किल्ल्यांतील खाण्याचें सामान सरलें, व दारूगोळा संपला, तेव्हां आप-ल्या लोकांसुद्धां मागील रस्त्यानें त्यानेंही किल्ला सोडला. श्रावण शुद्ध ६-७ मीस **बेट वाघेर** लोकांचे हातीं गेलें. बरेच शिपाई कामास आले. यांत एक शूर वीर **वाघेर** लोकांस मागें हटवीत होता. याचें वय पंचविशीच्या आंत असावें. ह्यास मिसूरू फुटली नव्हती, व तो शरीरानें धिप्पाड नव्हता तरी ठेंगणाही नव्हता. त्याचे तोंडावर ज्वानीचा भर दिसत होता. **बेटां**तील जमादार या तरुण शूराचें शौर्य पाहून अगदीं थक्क झाला होता; परंतु हा आपली बाजू धरून लढणारा कोण असावा याचा तर्क

त्यास होईना. तो रात्रीचे अंधेराचे हल्ल्यांत मंदिरांत आला होता. बराच वेळ त्याची तरवार चालली, व शेंवटीं त्या गर्दींतच तो दिसेनासाही झाला.

सूर्यास्त झाला. मंदिरांतील कांहीं पुजारी देवाचे गाभाऱ्यांत दारें बंद करून बसले. कांहीं जखमी होऊन विव्हळत पडले होते. **जामपुरा**-कडे शिबंदीचे लोक निघून गेल्यामुळें **वाघेर** लोकांचे हातीं तोफ लागली. दारूगोळाही त्यांच्या हातीं लागला. कांहीं **मकराणी** व **सिद्दी** फितूर होते ते **वाघेर** लोकांचे टोळींत मिसळले. **वाघेर** लोकांनीं **जाम-पुरा**कडे तोफ नेऊन **नानाध्रुवा**च्या धर्मशाळेजवळ लाविली. सर्व **गायकवाडी** लोक तोफेनें उडवून द्यावे असा त्यांचा हेतु होता. परंतु **जोधा माणेका**नें तसें करूं दिलें नाहीं. त्या लोकांस त्यानें असें समजावून सांगितलें कीं, 'कसेंही झालें तरी ते आपले अन्नदाते आहेत, व **द्वारका** आपले हातीं आली आहे, तेव्हां त्यांस मारण्यांत विशेष पुरुषार्थ नाहीं.' त्यानें इतकें सांगितलें, तरी **वाघेर** लोकांस त्यांनीं **जाम-पुरांत** राहावें हें ठीक दिसेना. त्यांनीं **जामपुरास नारायणराव रघु-नाथ** व **सखाराम पुरुषोत्तम** यांजकडे सांगून पाठविलें कीं, तुह्मी **जामपुरांतून** निघून जा, नाहीं तर तुमचेवर हल्ला करावा लागेल. असा कडकडीत निरोप आला तेव्हां त्यांजजवळ तीनशें चारशें लोकांचा भरणा होता, तरीही निरुपायानें त्यांना **जामपुर** सोडावें लागलें. त्यांनीं **खंबालिया**चा रस्ता धरला. त्यांच्या लोकांना त्या दिवशीं खाण्यासही मिळालें नाहीं. जीव घेऊन निमूटपणें चालतें व्हावें हेंच त्यांस बरें वा-टलें. वास्तविकपणें या लष्करांत दुही नसती तर **वाघेर** लोकांस परत हटविण्यास तेवढेंच लष्कर पुरें होतें. **आर्यावर्ता**ची हल्लींची दीनदशा होण्याचें कारण तरी हेंच होय!! **बेट** ताब्यांत आल्याची खबर आली, तेव्हां सर्व **उखामंडळ** आपल्या ताब्यांत आलें असें बंडवाल्यांस वाटलें. **जोधा माणेक** यास सर्वांनीं **उखामंडळा**चें आधिपत्य दिलें. त्यानें नाके-बंदी केली. **बेटां**तील व **द्वारकें**तील वस्तींत लूट सुरू झाली. **वाघेर** लो-

कांनीं धनत्तर सावकार लोक पकडून त्यांज जवळून धन काढण्यासाठीं त्यांचेवर जुलूम केले. त्या वेळचा लोकांचा आकांत काय वर्णावा? त्यांना प्रतिबंध करण्यास **गायकवाडांच्या** तर्फेचें तेथें कोणीही नव्हतें. **मुजुमदार** वगैरे वतनदार लोक या धांदलींत **राजकोटचे** हद्दींत पळून गेले होते. **वाघेर** लोक बंडावा करतील अशी त्यांजकडून **नारायणराव रघुनाथ** यांस गुप्त खबर मिळाली होती, परंतु त्यांचें तें बोलणें थट्टेवर नऊन हे उगाच भितात असें वाटून त्यांनीं तिकडे लक्षच दिलें नव्हतें. वतनदार लोकांनीं परभारें **बडोद्यास** याबद्दल कारभारी मंडळीस कळविलें होतें.

**उखामंडळ वाघेर** लोकांच्या हातीं गेल्याची खबर **खंबाळियाहून बडोद्यास** गेली. **जामनगरचे जामसाहेब** यांचे अधिकाऱ्यांनीं **गायकवाडांचे** लोकांची चांगली बरदास्त ठेवली.

**वाघेर** लोकांनीं **द्वारकेचा** कारभार चालविण्याचें काम सुरू केलें. आळीपाळीनें गांवांतील लोकांनीं धान्याचा पुरवठा करावा असे व्यापारी लोकांकडून त्यांनीं करार करून घेतले. नंतर **जोधा माणेक** यानें लूट बंद करविली. यात्रेकरू लोकांपासून **गायकवाड** कर घेत असत तसा कर घेण्याचें त्यानें सुरू केलें, व यात्रेकऱ्यांस बंडांतील लोकांपासून त्रास होऊं नये ह्मणून वळावे अथवा जाप्ता देण्यासही आरंभ केला. **उखामंडळचे** राजे कायते आपणच असें वाटून, त्यानें आपलें सर्व जातभाई व आप्तस्वकीय यांस आणि **राहू** व **डुंगराणी** लोकांस '**श्रीद्वारकानाथाची** आपल्यावर कृपा झाली आहे, श्रीचे दर्शनास यावें.' अशी पत्रें लिहिलीं. रोज नित्य राजभोग सुरू झाले. चोहोंकडून 'घणी खमा घणी खमा' असे **भाट, बारोट** व **चारण** यांचे स्तुतिपाठ होऊं लागले. ब्राह्मणांस धर्म मिळूं लागला. शौर्यानें लढलेल्या लोकांस त्यांच्या योग्यतेप्रमाणें बक्षिसेंही देण्यांत आलीं.

या वेळेस सर्व **काठेवाडांत बारवटिये** लोक उठले होते. त्यांच्या टोळ्या चोहोंकडे फिरत, व भटांब्राह्मणांखेरीज इतर वाटसरू लोकांस लु-

टीत. बडोदें सरकारचीं व आसपासच्या संस्थानिकांचीं गांवें लुटण्यासही ते मागें पुढें पहात नसत. या बारवटे करणारांच्या घोड्या फार चपळ असून त्या पडल्या वेळेस चाळीस पन्नास कोशांची मजल सहज करीत. या लोकांपाशीं खांद्यावर भाला, कंबरेस तरवार, व पाठीशीं ढाल असून, घाटे बांधलेले असत. कित्येकांचे अंगांत चिलखतें असत. कित्येक बारवटियांनीं लष्करी व पोलिस लोकांसही लुटलें होतें, व त्यांचे सरकारी पोशाख घालून कांहीं लोक फिरत. केव्हां केव्हां प्रवाशांस अगर गांवच्या लोकांस आपण सरकारी स्वार आहोंत अशा थापा देऊन ते लुटीत, त्यामुळें खरे लष्करी गेले असतां लोक गांवांतील लोक त्यांस फार वचकत. अशा वेळेस खऱ्या खोट्याची परीक्षा करणें फार कठीण असतें. तत्काळ जिवावर बेतण्याची पाळी येई. या लोकांचे मागें सरकारी स्वार व प्यादे लागलेले असत; परंतु हरणें जशीं कळपानें धांवतात, अगर पक्षी जसे भरारी मारून पाहतां पाहतां दिसेनासे होतात, तशा बारवटिये लोकांच्या चपळ घोड्या पळून जात. एकाद्या वाण्याच्या दुकानावर यांचा छापा पडला कीं, हे लोक तुपाचे बुधले तरवारीनें कापून उघडे करीत. साखर, गूळ, कणीक, लंवडून देत; व बारवटिया इतर माल लुटण्यास दुकानांत अगर घरांत शिरला, कीं घोड्या तूप, गुळ, साखर, कणीक, यांवर डल्ला मारीत. अशा आठ दहा घोड्या मोकळ्या शेजारीं एकत्र झाल्या असल्या, तरी शेजारच्या घरांतल्या लोकांस त्यांची चाहुल देखील कळत नसे. जसे त्यांचे धनी-तशाच त्या घोड्याही चोर व चपळ असत. ह्या बारवटियांचे लोक त्रासानें काहीर झाले होते. वाघेर लोकांकडूनही त्यांचा बंदोबस्त होईना. हमेषां लष्कराबरोबर बाजारबुणगें सुरू झालें कीं, चोरट्यांचा रोजगार पिकला. त्यांत असल्या लोकांचा डोळा सरकारावर नसतो. ते आपल्या स्वार्थापुरतीं कृत्यें करितात. त्यांस कोणाशीं सामना करून लढण्याचें धैर्य नसतें, व त्यांचा तसा मूळ हेतुही नसतो.

दारूगोळा व रसद वेळेवर न पोहोंचल्यानें सरकारी जहाजें होतीं त्यांत बसून श्रावण शुद्ध ६ चे दिवशीं किल्ल्यांतील बहादर जमादारानें सळाया बंदराकडे पळ काढला. बेटांतील किल्लेदारानें वाघेर लोकांशीं मोठ्या शौर्यानें सहा दिवस टिकाव धरला;परंतु जोधा माणेक याच्या बहादरीपुढें त्यांचें कांहीं चालेना. चोहोंकडे वाघेरलोक उखामंडळांत पसरल्याचें जेव्हां त्यास कळलें, तेव्हां त्यानें निरुपायानें किल्ला सोडला. बेटावरील किल्ल्यांत असलेल्या लहान मोठ्या एकोणीस तोफा व राहिलेला दारूगोळा बंडवाल्यांचे हातीं लागला. त्यांत एक तोफ नादुरुस्त झाली होती.नऊ तोफा बडोद्याहून वसईवर हल्ला करण्यासाठीं आल्या होत्या, व बाकीच्या बेटांतल्याच होत्या.उखामंडळ वाघेरलोकांनीं सर केलें,त्या वेळेस दोनचार हजार हत्यारबंद लोक जमले होते. शिवाय बारवटिये लोक त्यांस येऊन मिळाले होते. त्यांतच बरड्याचे डोंगरांतील मेर जातीचे लोक व शिवाय शेंदीडशें शिदी यांचीही भर पडली होती. धिणकी गांवचा त्रियो बरवाळा हा पिंडारी गांवचें काम पाहूं लागला, व पिंडारीचे लोक बेटांत काम पाहूं लागले. बेटाजवळचे समुद्रबारींत वारा नसल्यामुळें व्यापारी लोकांच्या फत्तेमाऱ्या नांगरल्या होत्या त्या ह्यांचे हातीं लागल्या. त्यांत बाराशें पिंपें सोरा व सातशें पिंपें गंधक होता, त्यामुळें या लोकांस अधिक जोर आला. काळ्या पाण्यावरून पळून आलेला विघा सुमणिया आणि मत्राशीचा भिवा खोडा हे दोघे त्यांस मिळाले होते, व त्यांचा धुंडावा भयंकर रीतीनें चालू होता. रणमल पिंडारी यानें देवळांतील पुजारी लोकांस पकडून पैसे काढण्याचा यत्न केला, परंतु जोधा माणेक यानें तसें करूं दिलें नाहीं, आणि मंदिरांत कोणतेही तऱ्हेची लूट होऊं नये ह्मणून त्यानें पाहरे बसविले.

गायकवाडांचे लोक खंबाळियास होते त्यांस देखील तेथें राहूं न देण्याबद्दल वाघेर लोकांनीं जामसाहेबांस धमकीचीं पत्रें लिहिलीं; त्यामुळें तेथून निरुपायानें त्या लोकांस जा असें जामसाहेबांस ह्मणावें लागलें.

तेव्हां ही सर्व मंडळी **राजकोटास** गेली. **नगरचे** अधिकाऱ्यांस पण **वाघेरलोक** ह्मणत कीं, **उखामंडळचीं गुरुघड** व **पिंडारू** हीं गांवें तुह्मीं दाबून बसलां आहांत तीं सोडा. या धमकीमुळें **नवानगरचे जाम**-साहेबही घाबरले होते.

आषाढ वद्य ४ संवत् १९१४ रोजीं **वाघेऱ्यांनीं** किल्ला हस्तगत करून **गायकवाडचे** लोकांस बाहेर घालवून दिल्याची ही खबर **बडोद्यास** पोहोंचतांच मदतीसाठीं **बडोद्याहून** पलटणचे दोनशें गारदी व दोनशें स्वार रवाना झाले, परंतु तेवढ्यानें **वाघेर** लोकांचा पाडाव होण्यासारखा नव्हता. **बडोद्याचे** रेसिडेंट यांस या बंडाचा बंदोबस्त करण्यास **गायकवाडांनीं** कळविलें, त्यावरून त्यांनीं तारीख ९ आगष्ट रोजीं **क्याप्टन वार्टन्** यांस तिकडे पाठविलें; व **अमदावाद** येथील **कर्नल वुडवर्न** यांस त्यांचे सल्ल्यानें काम करण्याचा हुकूम सुटला. प्रथम त्यांनीं बंडवाले आणि **काठेवाडचे** तालुकदार यांचें दळणवळण बंद केलें, व फौज घेऊन ते **राजकोटास** गेले. त्यांनीं चोहींकडे नाकेबंदी करून **काठेवाडचे** पोलिटिकल एजंटांकडून मदतीची तरतूद केली. **नारायणराव रघुनाथ** यांनीं **उखामंडळचा** सर्व कारभार **वार्टन** यांस सोंपावा, व शिबंदी फौजेनें त्यांचे मदतीस राहून चालावें, असा **गायकवाड** सरकारांकडून हुकूम झाला होता. **नगर, राजकोट,** व **बडोदें** येथील फौज एकत्र झाली. **डिशाचे** छावणींतून लष्करची मदत गेली. **मुंबईहून** लढाऊ आगबोटी मागविल्या होत्या त्या तारीख ८ आगष्ट रोजीं तिकडे जाऊन दाखल होऊन **द्वारका** आणि **मळाया** या बंदरांपाशीं नांगरल्या होत्या. पायरस्त्याची फौजही दाखल झाली. तोफा येऊन पोहोंचल्या, व आरमारांतून तोफांचे आठ बार झाले, त्यामुळें **वाघेर** लोक सावध झाले, व त्यांनीं **जोधा माणेक** त्या वेळेस **बेटांत** होता त्यास बेटांतून सामना करण्याचे तयारीसाठीं बोलाविलें. **द्वारकेतील** लोकांपासून माणशीं अडीच कोऱ्या

घेऊन त्यांस गांव सोडण्याचा हुकूम दिला या वेळेस **वाघेर** लोकांचीं कुटुंबें **द्वारकेस** गोळा झालीं होतीं.

**क्याप्टन वार्टननें द्वारके**कडे यात्रेकरी लोक जाण्याचें बंद केलें. **राजकोटास** आल्यावर त्यानें **वाघेर** लोकांस कळण्यासाठीं एक जाहिरनामा काढला. त्यांत " **गायकवाड** सरकारांनीं **उखामंडळ**ची सर्व हुकमत **इंग्रज** सरकारास सोंपली आहे, सत्वर तुफान न करतां तुमचे पैकीं पुढारी पाटील असतील त्यांनीं आमचेकडे हजर व्हावें. या लोकांस आह्मांकडून कोणतेही तऱ्हेची हरकत होणार नाहीं. **द्वारका** आणि **बेटां**तील किल्ला या जागा जशा तुमचे हस्तगत झाल्या आहेत तशाच लुटीसुद्धां तुह्मी आमचे स्वाधीन कराव्या. तुमच्या तक्रारी असतील त्या ऐकण्यांत येऊन त्यांचा रीतसर तपास व बंदोबस्त होईल. " असा मजकूर लिहिला होता.

हा जाहिरनामा **वाघेर** लोकांच्या हातीं पडला, परंतु तो वाचून कोणीं दाखवावा? लिहिण्यावाचण्याचें काम त्या बापड्यांनीं कधीं केलें नव्हतें. त्यांनीं **पोपटिया इंदर** व **हिराशेट** यांस वाचण्यासाठीं बोलाविलें; परंतु जाहिरनामा वाचून त्यांतील मतलब त्यांस सांगतां येईना. तेव्हां **वाघेर** लोकांनीं **नवानगराहून रामजी** नांवाचा वकील आणविला, व त्यानें जाहिरनामा नीट वाचून त्यांस समजाविला. तो ऐकून जमलेली मंडळी ह्मणाली "काय? हे आह्मांला भिवडावीत आहेत? सामना तर होऊं द्या, यांचें हाडन्हाड नरम करून टाकूं." कांहीं ह्मणाले "त्यांच्यांत दम नाहीं ह्मणूनच हें बोलणें त्यांनीं लाविलें आहे." **सुळू माणेक** ह्मणाला, "**जोधाभा** आल्यावर त्याचे सल्ल्यानें जाब द्यावा." शेंवटीं तसेच सर्वानुमतें ठरलें. परंतु ही मसलत शेंवटास गेली नाहीं. कांहीं ह्मणाले, "**इंग्रजांचें** राज्य बुडालें. **पेशव्यांनीं** त्यांस **हिंदुस्थानाच्या** बाहेर हांकून दिलें आहे. त्यांची आतां बिशाद काय?" अशा प्रकारें बोलणें चालत आहे इतक्यांत **जोधा माणेक** येऊन पोहोंचला. त्याचा विचार सामो-

पत्रारानें निकाल करावा असा होता; परंतु **जगन्नाथ वाघेर** व इतर मंडळी यांनीं त्याला अनुकूळ न होतां आग्रहानें त्यास हिम्मत देऊन त्याचा विचार फिरविला. सर्वांचें मत सोडून चालण्याची त्याचीही हिम्मत होईना, तेव्हां शेंवटीं मंडळीचे ह्मणण्यास तोही कबूल झाला.

बेटांतील **वाघेर**लोकांनीं मोरचेबंदी केली. दोन्ही बाजूंकडून तयारी चालली. **फिरोझ** नांवाची तिसरी लढाऊ आगबोट **बेटाचे** समोर येऊन पोहोंचली. ही **वाघेर** लोकांची धामधूम श्रावण शुद्ध १ पासून भाद्रपद महिन्याचे अखेरीपर्यंत चालली. **वाघेर** लोक जात्या शूर, मजबूत, धाडशी व बळकट होते, त्याबरोबरच त्यांस विद्येचें पाठबळ असतें, तर या धामधुमीचा परिणाम कांहीं निराळाच झाला असता. शरीर मूळचें जड आहे, त्याची हालचाल चैतन्याशिवाय होत नाहीं, तसें विद्येशिवाय नुसत्या शौर्यानें कार्य होत नाहीं. त्यास इतर गुणांची अपेक्षा राहते. शक्ति, सरस्वती व लक्ष्मी या तिहींचा संयोग झाला पाहिजे. कदाचित् शक्तीनें लक्ष्मी मिळूं शकेल, पण सरस्वतीवांचून तिला चिरकालिकत्व येऊं शकत नाहीं.

---

## भाग ५ वा.

हेमंत ऋतूनें आपलें ठाणें बसविलें. पावसाळ्यांत चोहोंकडे हिरवें चार होऊन गारवा आला होता, त्यामुळें शरीरांत असलेली रोगराई बंद झाली. थंडीनें आपला अंमल बसविला. शेतें रबीचे पिकानें हिरवीं चार झालेलीं दिसूं लागलीं. त्यांवर पक्ष्यांचे कळप जीवनकलहासाठीं इकडे तिकडे उडतांना दिसत होते. शेतकरी लोक सूर्योदयाचे वेळेस पक्षी उडविण्यासाठीं शब्द करीत होते. या वेळेस क्षितिजावर सूर्यनारा-

यणाचें बिंब आरक्त दिसूं लागलें असून, त्याचे प्रकाशानें रात्रौ पडलेलें दंव मोत्याप्रमाणें चमकत होतें. शीतनिवारणार्थ कोठें शेतांत व कोठें बाजूस झाडाचे आश्रयाखालीं आगट्या पेटल्या होत्या, व त्यांच्या सभोंवतीं मुलें हुरडा शेंकण्याच्या गडबडींत दिसत होतीं. गाईम्हशींचें दूध काढून गांवाकडे विकण्यासाठीं दूधवाले जात होते. गांवांतील गुरें चरण्यासाठीं मोकळीं थव्यानें जात होतीं, व त्यांचे बराबर पांवे वाजवीत गवळ्यांचीं मुलें हातांत काठ्या घेऊन चालली होतीं. मोळविक्ये व भाजीपाला विकणारे लोक आपल्या पाट्या घेऊन भराभर रस्त्यानें जात होते. प्रातःस्नान करून भस्माचे पट्टे लावून, व गळ्यांत रुद्राक्ष घातलेले व कोणी हातीं समिधा घेतलेले ब्राह्मण लोक पूजेस शिवालयाकडे जात होते, व कोणी नदीचे घाटावर आपलीं आसनें लावून प्राणायामांत निमग्न झालेले दिसत होते. गांवांतील स्त्रियांचा समुदाय आपलीं वस्त्रें धुण्यासाठीं जात होता. अशा वेळीं **आसणवेल**चे वेशींतून तीनचार घोडेस्वार बाहेर पडले. त्यांचे घोडे पाणीदार असून चित्रासारखे सुरेख होते; व त्यांवर काहीं **वाघेर** लोक **काठेवाडी** तऱ्हेचें सामान घातलेले व एका हातांत हुक्का व दुसऱ्या हातांत माळ घेऊन बसलेले दिसले. हे स्वार वेशीजवळ भेटले, व त्यांच्या भाषणांत त्या रात्रीं वडाखालीं एकत्र होण्याचीं निमंत्रणें नेमलेल्या गांवीं देण्यासाठीं निरनिराळे रस्त्यानें जाण्याचें ठरून त्यांनीं आदबीनें एकमेकांस राराम करून आपला रस्ता धरला. वायुवेगाप्रमाणें त्यांचे घोडे पाहतां पाहतां दिसेनातसे झाले. हे स्वार **वाघेर** लोकांचे पाटील असून ते **वसई, घडेची, मकनपुर, मूळवासर, सामळासर, गोरियाली, राजपुर, पिंडारी**, इत्यादि गांवीं तेथील पुढारी लोकांस सूचना देण्याकारितां निघाले होते. **आसणवेल**चे शिवेंत फार जुनाट वटवृक्ष आहे, त्याचे छायेंत हजारों माणसें बसूं शकतील. त्या झाडाखालीं जागा साफ करण्याचें काम गांवचा पाटील लोकांकडून करवीत होता. येणारे पाहुणे मंडळीसाठीं पाणी, कुसुंबा, मिठाई वगैरेच्या तजविजीची वाटाघाट परगांवच्या

व्यापाऱ्यांमार्फत सुरू होती. हें काम दोनप्रहरचे आंत पुरें झालें. गेलेले स्वार निमंत्रणें करून सायंकाळपर्यंत परत आले. सूर्यास्त झाला. पक्षी आपआपले घरट्याकडे थव्यानें येऊं लागले. एकच कलकलाट सुरू झाला. रात्र अंधारी असल्यामुळें वडाचे झाडाखालीं अगदीं काळोख पडला होता. झाडाचे आजूबाजूस चौकीदार लोक नाक्यानाक्यांनीं बसविले होते. नांववार ठरविलेल्या आपल्या माणसांशिवाय या वडाचे झाडाकडे कोणी न जाईल अशी व्यवस्था केली होती.चौकीदारांच्या आगटीशिवाय तेथें दुसरा प्रकाश नव्हता.बसण्यासाठीं वडाखालीं मोठमोठाले आथर घातले होते, व **दादाभाई** आणि **रामाभाई** हे येणाऱ्या मंडळीची वाट पाहत होते. संकेताप्रमाणें एकामागून एक याप्रमाणें **उखामंडळ**चे पुढारी **वाघेरे** जमले, व एकमेकांस भेटले. परस्परांस कुशलप्रश्न विचारल्यावर ते त्या वडाखालीं बसले. अफिणीचा कुसुंबा सर्वांस दिला. नंतर मिठाई, पानसुपारी सुरू होऊन चांदीचे हुक्यांचा गुडगुड शब्दही सुरू झाला. अशा प्रकारें कांहीं वेळ गेल्यावर या दिवशींच्या मुख्य कामास आरंभ झाला.

या वेळेस थंडी कडकून राहिली होती. मध्यरात्रीचा सुमार होता, व चंद्रोदयास बराच वेळ राहिला होता. थंडीनें झाडांस बांधलेल्या घोड्यांचा राहून राहून खिकाळण्याचा मात्र शब्द ऐकूं येई. असो.

**वसईचा रवा माणेक** ह्मणाला, "आज आपण सर्व आप्त स्नेही येथें जमलों आहोंत, त्याचा उद्देश आपल्या सद्यःस्थितीबद्दल विचार करण्याचा आहे. **गायकवाड** सरकारांनीं आपले जीवारे ( वतनें ) बंद केले आहेत, त्यामुळें अनेक रीतीच्या हरकती होत आहेत. आपल्या सर्व गांवाच्या भोंवतीं प्रचंड कोटाप्रमाणें निवडुंगाच्या कुंपणाचे सात परिघ आहेत. त्यांच्या योगानें शत्रूंचा रिघाव तर काय, परंतु त्यांच्या बंदुकीची गोळी देखील आंत येऊं शकणार नाहीं. **वडोद्याहून** कोणी **सखाराम पुरुषोत्तम** नांवाचे कामदार तोफा व पलटणें घेऊन हें कुंपण

काढून टाकण्याच्या उद्देशानें आले आहेत. त्यांनीं वसईवर तोफा लावल्या, परंतु त्यांच्या पासून कांहीं झालें नाहीं. तरी अखेर त्यांच्याशीं बोलणें सुरू करावें लागलें. हजारों वर्षांचें कुंपण काढून टाकण्याची त्यांस कबुलायत दिली, व त्याप्रमाणें करण्यासाठीं ओलीस जामिनकीबद्दल आठ दहा वाघेरे दिले. तेव्हां ते आपली फौज घेऊन द्वारकेस गेले. हे कामदार आमच्या उपजीविकेबद्दल बंदोबस्त करतों, व बडोद्यास लिहिलें आहे त्याचा खुलासा आला ह्मणजे कळवूं, असें ह्मणतात. या गोष्टीबद्दल व शिवाय एकंदर विचारासाठीं आपण सर्वजण येथें जमलों आहों."

यावर **थोराणी**चा मुखी **रणमल्ल** ह्मणाला. "एक अधिकारी येतो तो प्रथम थापा देतो;आपल्याशीं सख्य कारितो;लुटी, चोऱ्या, करवितो, व आमच्या लुटीच्या भागास वांटेकरी होतो. गुन्ह्यांत सांपडलों तर सजा आह्मांस होते. शिवाय या कृत्याबद्दल **बडोद्यास** कळलें आहे, त्यामुळें दुसरा कामदार आला. वतनदार लोक आपल्या कागाळ्या पत्रानें महाराजांस कळवितात, व रूबरू आपल्याशीं स्नेह दाखवितात, पण त्यांवर आपण विश्वास ठेवूं नये."

**मकनपुर**चा **हाबु कुंभाणी** ह्मणाला, "काय ? सरकारचें पांचशें सातशें लष्कर येथें आहे त्यांपैकीं खर्च कमी करण्याकडे कामदार लोक लागले आहेत. येथील बेहेड्याचे लोक नाराज आहेत. **उत्तर हिंदुस्थानांत नानासाहेब पेशव्यांचें** बंड सुरू झालें आहे. **झांशी**ची राणी त्यांना मिळाली आहे. लष्कर **ग्वाल्हेर** त्यांनीं घेतलें. **टोपीवाल्यांला** देमाय झालें आहे. त्यांचीं सर्व काळीं पलटणें त्यांचेवर धर्मामुळें उठलीं आहेत. दारूगोळा **पेशव्यांचे** हातीं लागला आहे. आतां त्यांना पुनः समुद्रमार्गानें पळण्याशिवाय दुसरी तोंड नाहीं. **टोपीवाल्यांचें** भय मुळींच राहिलें नाहीं. **गायकवाड** आपलें राज्य संभाळतील, की इतकें लांब तुमच्याबरोबर लढण्यास येतील? आलेच तर आपण त्यांच्याशीं

सामना करण्यास कां तयार नसावें ? आपले वाडवडील हेंच करीत आले आहेत. परतंत्रता आपण किती दिवस भोगावी ? **द्वारकाधीशानें** असा सुदिन आणिला ही त्याची मोठी कृपा समजली पाहिजे. "

यावर दुसरा ह्मणाला 'अहो, यत्न केला ह्मणजे देव साह्य करतो. उपासमार काढण्यापेक्षां मरण बरें. त्यांत आणखी आतां समय बरा आहे. सरकारचे फौजेंत बेदिली आहे. कित्येक जमादार **शिंदी** वगैरे आपलेकडे वळतील असे आहेत. बाकी राहिलेल्यांचा आपण समाचार घेऊं. **नारायणराव रघुनाथ** यांचा अपमान होणें हें **सखाराम पुरुषोत्तम** यांस इष्ट आहे, तेव्हां ते या गोष्टीकडे दुर्लक्ष करतील. **इंग्रजांना** देशाच्या बाहेर हांकून लाविल्याचें यात्रेकरू लोक सांगतात.'

**मूळवासरचा पुंजा जसाणी** मध्येंच ह्मणाला " काय, आपला पराक्रम कमी आहे ? **जुनागड, कुतियाणा, गोंडळ, नगर, पोरबंदर** यांच्या आजूबाजूच्या लोकांना आपला किती दरारा आहे ! आपण पाहिजे तिकडे लूटफाट करतों, व त्यांचे हद्दींत आपण गेलों तर ते उलट आपली बरदास्त ठेवितात, ती मेहेरबानीखातर नव्हे, तर भयानें ! तेव्हां हेच तेवढे मोठे संस्थानिक असें कसें ह्मणतां येईल ? आपण खरे **यादव**वंशी आहोंत, तेव्हां आपण स्वतंत्र राज्य कां करूं नये ?. "

**जोधा माणिक अमरापुर**चा हा पोक्त होता. तो शरीरानेंही मजबूत असून साडेसहा फूट उंच व जमलेल्या मंडळींत प्रमुख मानलेला होता. तो ह्मणाला, " **इंग्रजांना उत्तरहिंदुस्थानांतून** हांकून लाविलें, ह्याची खात्री काय ? **गायकवाड** व **इंग्रज** हे एकमेकांचे दोस्त आहेत, हेंही विसरतां उपयोगी नाहीं. शिवाय **विठ्ठलराव देवाजी** यांनीं सर्व **काठेवाड** पादाक्रांत केलें त्या वेळेस आपलें शौर्य कोठें होतें ? अश्वमेधाप्रमाणें त्यानें बकरीचे गळयांत सोन्याची सरी घालून ती **काठेवाड**भर फिरविली, व **बाबासाहेबांची** बकरी ह्मणून तिला कोणीं हात लाविला नाहीं ! ते जरी आज हयात नाहींत, तरी **मराठ्यांची** तरवार

गाजलेली आहे. हल्लींचे महाराज केवळ बाव्र आहेत. ज्यांना आपलीं मुलेंमाणसें नकोशीं झालीं असतील, त्यांनीं त्यांच्याशीं वदफैली करावी. आपल्या अर्जाचा ते अजून निकाल करीत नाहींत, तर त्यांना पुनः अर्ज करावा. ते आपला बंदोबस्त करून देतील. परंतु आपलें बलाबल पाहून जे करणें तें करावें."

**रवा माणेक, मुळु माणेक** व इतर **वाघेर** एकदम ह्मणाले, "ना, ना, ना, असें कधीं तरी आपले स्वप्नीं येईल ? आपण काय भित्रे आहांत ? आपले आप्त स्वकीय कमींत कमी दोन हजारांवर आहेत, व ते आपल्यासाठीं जीव देण्यास मागें पुढें पाहणार नाहींत. **जोधाजी !** आपण असले नाउमेदीचे व भित्रे विचार बोलूं नका. आह्मी जो आपणास वडिलपणाचा मान देतों, तो तुम्ही आमचे मुख्य म्हणून कीं अशा नामर्दपणासाठीं ? छिः, असें नाहीं ! आपण शूर आहांत, पोक्त आहांत. आपण पुष्कळ गोष्टी पाहिल्या व ऐकल्या आहेत, म्हणून आम्ही आपणांस मान देतों."

**जोधा माणेक** पुनः शांतपणानें ह्मणाला, "अजून तुमच अंगांत ताजें रक्त आहे, त्यामुळें तुमचे विचारही कच्चे आहेत. जें करणें तें विचारानें करावें."

त्यानें इतकें सांगितलें, परंतु हूड आणि तरुण मंडळी, तसेंच ज्यांस त्रास झाला; होता असे **वसईचे** व इतर **वाघेर, जोधाचे** ह्मणण्यास रुकार देईनात. अखेर, सर्वांनीं **द्वारका** घेण्याची वाटावाट चालविली. **जोधा** सर्व कृत्य तटस्थ वृत्तीनें पाहत राहिला. **मुळू माणेक** हा त्या ठिकाणीं जमलेल्या मंडळीचा सरदार बनला. **जोधा माणेक** हा त्याचा काका, पण शौर्याचें वारें **मुळूच्या** अंगांत भरलें, व पंधरा वीस असामी निरनिराळ्या गांवचे मुख्य होते त्यांस उद्देशून **मुळूनें** पुढील प्रकारें शौर्य व आवेश यांनीं युक्त असें भाषण केलें.

" आपण **यादव**वंशांतील आहोंत. शेंकडों वर्षें या **सौराष्ट्राचें** आधिपत्य आपण केलें आहे. इतकेंच नाहीं, तर सर्व **आर्यावर्तभर** आपली कीर्ति पसरली होती, याबद्दल इतिहासपुराणांत दाखले आहेत. **भारतांत** देखील आपल्या शौर्याचे पोवाडे गाइलेले आहेत. परंतु कांहीं कारणांनीं त्यांचा लोप होत गेला. हल्लीं जी संधि आली आहे ती जर आपणें घालविली, तर आपणासारखे भ्याड व निर्बल जगांत कोणी नाहीं, असें लोक आपणास ह्मणतील. क्षत्रियांना रणांत मरण आलें असतां त्यासारखें कीर्तिकर व कुलास दुसरें भूषण नाहीं. आपला मुख्य धर्म गोब्राह्मण यांचें रक्षण करणें हा होय. **यवनांचें** राज्य पुष्कळ वर्षें आपणावर झालें, त्यामुळें आपलें तेज मलिन झालें आहे. धर्म बुडत चालला. परतंत्रतेनें आपण आज कंगाल बनलों आहोत. आपणांस लोक लुटारू, चोरटे, ह्मणूं लागले. पडत्या काळांत आपण तें कृत्य उदरनिर्वाहासाठीं केलें; परंतु अशी नामोषी यापुढें सोशीत बसण्याची वाईट खोड आपण टाकली पाहिजे. स्वहित बाजूस ठेविलें पाहिजे. **यवनांचा** पराभव करून **पेशव्यांनीं** आपले झेंडे **अटकेवर** लाविले त्या स्थितीकडे पहा. **मराठे** प्रथम आपल्यासारखेच पडत्या स्थितींत होते. पडती स्थिति असल्याखेरीज व अज्ञानदशा झाल्याखेरीज निजलेलें शौर्य जागें होत नाहीं. परंतु अगदीं अज्ञान दशा झाल्यावर व शरीर परस्वाधीन झाल्यावर असलीं कार्यें होत नसतात. जे धूर्त असतात ते आलेली संधि व्यर्थ जाऊं देत नाहीं. शूर भाईहो! हल्लींच्या **द्वारकेचें** राज्य मिळविणें बिलकुल अशक्य नाहीं. मात्र आपण सर्वांनीं एक दिलानें सर्वांचें हित यांतच आहे अशा समजुतीनें कटून लढलें पाहिजे. यांत जे पडतील त्यांस स्वर्ग तयार आहे, राहतील त्यांस राज्य तयार आहे."

याप्रमाणें त्याचे उद्गार निघतांच **गोरियालीचा धोधा**, **राजपुरचा धोधा**, **जसा**, **माणेक**, **दादाभाई**, **रायभाई**, **देवा**, **बावू कुंभाणी**, **वसईचा रेवा** व इतर सर्वजण शाबास शाबास ह्मणून त्याची पाठ थोपटूं

लागले, व सर्वांनीं प्रेमानें त्यास आलिंगन दिलें. त्याचे सांगण्याप्रमाणें वागण्याचा सर्वांनीं निश्चय केला, व आपले हातावर कुसुंबा घेतला; व एकानें दुसऱ्याचे हातावरचा व दुसऱ्यानें पहिल्याचे हातावरचा याप्रमाणें सर्वजणांनीं शपथेदाखल कुसुंबा गट्ट केला. त्यावर कैफ येण्यासाठीं त्यांनीं मिठाई खाल्ली. थंडी उडविण्याकरितां त्यांनीं पुनः पुनः हुके भरले, व आपले सर्व जातभाई एकत्र करून श्रावण शुद्ध प्रतिपदेच्या मुहूर्तानें रात्रौ निघून मध्यान्हरात्रीनंतर **द्वारकेवर** व **बेटावर** हल्ला करण्याचें ठरविलें **जोधा माणेक** यास ही मसलत पसंत नव्हती, तरी बाकीचे लोकांनीं त्यास तसें करण्याबद्दल आग्रहानें शपथा दिल्या. त्यास वाटे कीं, **द्वारका** हातीं घेणें सहज आहे, परंतु पुढें टिकाव धरणें मात्र कठीण पडेल. हे त्याचे विचार ओंठाबाहेर निघाले त्या वेळेस चांगला चंद्रोदय झाला होता. झाडांच्या छाया चंद्रप्रकाशानें लांबपर्यंत पसरल्या होत्या. या एवढ्या जागेशिवाय चोहोंकडे शांत होतें. राहून राहून दूर कुत्र्यांचें भुंकणें मात्र ऐकूं येत होतें. जमलेल्या सर्व **वाघेर** लोकांजवळ बहुतेक घोड्या होत्या, त्यामुळें बिलकुल गडबड झाली नाहीं. बारवटे करणारांचीं घोडीं केव्हांही खिकाळत नाहींत. त्यांच्या पावलांचे आवाजही ऐकूं येत नाहींत. त्यांचे धनी ज्याप्रमाणें चोरीनें गुपचुप जातात, त्याचप्रमाणें त्यांसही जाण्याचा अभ्यास झाला असल्यामुळें तीं सर्व जनावरें गुपचुप मजल मारतात. या वेळेस घोड्या थंडीनें कांकडल्या होत्या. जमलेल्या **वाघेर** मंडळीनें एकमेकांचे निरोप घेतले, व आपापल्या घोड्यांजवळ येऊन त्यांस थोपटलें. त्यांनीं लगामा चढविल्या, व स्वार होऊन परस्परांस रामराम करीत आपआपले निरनिराळ्या रस्त्याकडे घोडे हांकले. **ब्रासणवेलचा** मुख्य पाटील **दादाभाई** यानें बिछाईत गोळा करवून पगी लोकांबरोबर रवाना केली. गांवांतील सर्व लोक या थंडीच्या रात्रीं घोरत पडले होते, व या मसलतीचा मागमूसही त्यांस मुळींच नव्हता, यामुळें ते लोक नेहमींप्रमाणें शांत राहून प्रातःकाळीं उठून आपआपल्या नित्याच्या धंद्यास लागले.

---

१०२-६

# भाग ६ वा.

विठ्ठलराव देवाजी यांनीं काठेवाड सर केलें त्या वेळेस त्याचा एक जिवलग स्नेही सुरा जोधाणी या नांवाचा वाघेर होता. तो पोक्त वयाचा, कुलीन, शूर व या प्रांताचा माहितगार असून चांगला सल्लागार होता. गायकवाड सरकारांकडे त्याचें चांगलें लक्ष असे, ह्मणून काठेवाडचे सर्व मोहिमेंत त्यांस विठ्ठलरावांनीं आपल्याबरोबर ठेविलें होतें. डोंगरांतील चोरवाटा व चोर लोक यांचा तो पुरा माहितगार होता. चोरटे लोक त्यास वचकून असत. काठेवाडचे स्वारीचे मोहिमेंत त्यानें इमानेंइतबारें जी मदत केली, तिचा मोबदला त्याला विठ्ठलराव यांनीं काठेवाडचा बंदोबस्त केला त्या वेळेस दिला. त्यांनीं सुरा जोधाणीला गिरासाचा हक्क संपादन करून दिला, व शिवाय कांहीं गांवांची जहागीरही करून दिली. ही छोटी जहागीर द्वारकेपासून बरेच अंतरावर असून गिरांतून निघालेल्या जावंत्री नदीनें तीस वेढा दिला होता, त्यामुळें ती बेटाप्रमाणें दिसत होती. संपादकाचें नांव सुरा जोधाणी, यावरून त्या जहागिरीस सुरपुरा हें नांव मिळालें.

ही जहागीर आजुबाजूस प्रसिद्ध होती, व तेथील पाहुणचार सर्वांच्या तोंडीं असे. विठ्ठलराव यांनीं ही जहागीर गायकवाड यांचे राज्यांतून काढून दिली नसून नवीन कमाविलेल्या मुलखांतून करून दिली होती. सुरा जोधाणी यानें नोकरी इमानानें केली, शौर्य दाखविलें. शेंकडों नवे गांव मिळवून दिले इतकेंच नाहीं, पण गीर मिळविण्यांत देखील त्यानें बहादुरी केली होती. गिरांत देखील बरेच गांव गायकवाड यांनीं जहागीर करून दिलेले अद्याप आहेत!! शांततेचे काळांत पुरावा, ताम्रलेख, वहिवाट, व हक्क यांच्या धोरणावर इनसाफ होतात. जे

गीर तरवारीनें मिळविलें त्याची सनद कोण देणार? परंतु हल्लींच्या पुराण्याचे काळांत चांदीसोन्याच्या गोळयांनीं लढावें लागतें! **रणजितसिंगास, दिल्लीपतीस,** अगर हल्लींचे राज्यकर्त्यांस मुलुखाच्या कोणी सनदा लिहून दिल्या नाहींत. सर्वांनीं आपले तरवारीचे व अकलेचे जोरावर मुलुख मिळविला. सरहद्दीवर जशीं तुफानें नेहमी आधाशीपणानें होतात, तशी अंतःस्थिति नसते. तेथें शांतता असते. व्यापार, आगगाड्या, तारायंत्रें, पोष्टें सुयंत्र चालतात. न्यायाचीं कोर्टें स्थापिलीं जातात. तेथील इनसाफ जसा कायद्यानें चालतो, तसा सरहद्दीवरचा इनसाफ तरवारीनें चालत असतो.

**विठ्ठलरावां**चे कारकीर्दीचे शेवटीं हा वयोवृद्ध **वाघेर** मृत्यु पावला. त्यास दोन मुलगे होते. वडील मुलगा **पन्नामल** हा त्या वेळीं पंचवीस वर्षांचा होता व दुसरा मुलगा **राजपाळ** याचें वय वीस वर्षांचें होतें. आपण **गायकवाड** सरकारच्या कृपेनें जहागीरदार झालों ह्मणून तेच आपले खरे अन्नदाते आहेत असे विचार **सुरा जोधाणी** यानें आपल्या मुलांच्या मनांत भरवून दिले होते. खऱ्या नीतीनें व निमकहलालीनें राहण्यांत परमेश्वर राजी असतो असा उपदेश तो त्यांस नेहमी करी, व मरतेवेळींही त्यानें हाच उपदेश त्यांस केला होता. घोड्यावर बसण्यांत, निशाण मारण्यांत, दांडपट्टा खेळण्यांत, पोंहण्यांत व शिकार करण्यांत या मुलांचा हातखंडा असे. दोघेही आपल्या वृद्ध मातुश्रीचे आज्ञेंत राहून आपल्या रयतेस पोटच्या पोराप्रमाणें समजत.

**पन्नामल** यास घोड्याचा शोक फार असे. तो नेहमीं **काठेवाडां**तील चांगल्या जनावरांचा शोध ठेवी. एके वेळीं **चोटाला**गांवीं एका गृहस्थाचे घरीं **ताजण** जातीचा एक बछेरा फारच चांगला आहे, व त्याला कोणाची दृष्ट लागेल ह्मणून तो नेहमी तळवरांत बांधलेला आहे, अशी त्यास खबर मिळाली. **काठेवाडांत काठी, बारवटिये**लोक सुरेख जनावरें नेहमीं तळवरांत ठेवतात. या जनावरांस आलोटण्या-

साठीं रुजामे घातलेले असतात, व पोटच्या मुलापेक्षांही घोड्याची योजना ते लोक अधिक ठेवतात, अशी प्रसिद्धि आहे. **पत्रामल** यानें मुशाफर लोकांचे तोंडून या बछेऱ्याची तारीफ ऐकल्यापासून तो केव्हां दिसेल व मिळेल असें त्यास झालें होतें. त्याचे स्वतःचे घरींही जातिवंत घोडीं बरीच होतीं, तरी पण कोणीही मनुष्य **चोटाल्या**कडून आलेला त्यास भेटला असतां त्यास तो त्या बछेऱ्याबद्दल विचारी, आणि त्याची स्तुति आलेल्या लोकांच्या मुखानें ऐकिली ह्मणजे सर्व दिवस तो त्याच विचारांत काढी. कित्येक गृहस्थांस त्यानें तो बछेरा मिळण्यासाठीं त्याचे धन्याजवळ गोष्ट काढण्यास सांगितलें होतें. परंतु त्या बछेऱ्याचा मालक बछेरा देऊं इच्छित नाहींत असा त्यास जाब मिळे. कोणताही पदार्थ आपल्याला हवा असला ह्मणजे तो मिळेपर्यंत मनास स्वस्थता नसते, याप्रमाणेंच **पत्रामल**ची स्थिति झाली होती.

**राजपाळ** हा कपिलाषष्ठीचे पर्वावर आपल्या वृद्ध आईची रजा घेऊन **गोमतीस्नानासाठीं द्वारकेस** निघून गेला होता. यामुळें तो परत आल्याशिवाय बछेरा पाहण्यासाठीं जाण्याबद्दलची रजा आपल्या आईजवळ मागण्याचें **पत्रामलास** कांहीं दिवसपर्यंत धैर्य होईना. तथापि बछेरा पाहण्याची उत्कंठा लागल्यामुळें त्यास चैन पडेना अशी जेव्हां स्थिति झाली, तेव्हां केवळ नाइलाज समजून **पत्रामलानें** बेछरा पाहण्यास जाण्याची आईची परवानगी मागितली, व तिनेंही ती निरुपायानें दिली. मातुश्रीची परवानगी मिळतांच त्यानें मुशाफरीची तयारी केली. दोन गडी बरोबर घेतले व आपण आईच्या पायां पडून घोड्यावर बसून निघाला. आईनें डोळ्यांत आंसवें आणून 'बाळा ! लौकर परत ये' असें सांगून मोठ्या संकटानें त्याला निरोप दिला. मुलें स्वतःस सोडून दूर जातात तेव्हां वृद्ध आईस जें दुःख होतें तें तिचें तिलाच पुसावें. तें इतरांस कळावयाचें नाहीं !

**पत्रामलानें** घरांतील वृद्ध कारभाऱ्यास सर्व व्यवस्था ठेवण्यास व आपल्याबद्दल आईला खंत न वाटे अशी तजवीज ठेवण्यास सांगून ठेविलें होतें. घराबाहेर निघतांना त्याला एक कुमारिका कोरा घडा घेऊन येतांना भेटली. हा शुभ शकून पाहून वेशीपर्यंत पोंचविण्यास आलेल्या वृद्ध चाकर लोकांस आनंद वाटला. ते दिवशीं त्यानें दहाबारा कोसांची मजल मारली. याप्रमाणें दरकुच दरमजल करीत **चोटेला** गांवापासून दहाबारा कोसांवर तो येऊन पोहोंचला. बरोबरचीं गडीमाणसें व घोडीं जवळच्या एका खेड्यांत ठेवण्याचा त्याचा बेत होऊन. त्याप्रमाणें त्यांची तेथें खाण्यापिण्याची तरतूद लावून देऊन आपण परत येईपर्यंत तेथेंच राहण्याचा त्यानें त्यांस हुकूम दिला. त्यानें कंबरेस पट्टयाप्रमाणें तरवार बांधली, बाहेरून थोडें जवाहीरही बांधून घेतलें, व अगदीं साधारण शेतकऱ्याप्रमाणें अंगावर कपडे घातले. जाड्या खादीची तुमान, खादीचीच बाराबंडी, व डोक्यास साधा फेंटा, अशा जाड्या भरड्या पोशाखानें आपणास कोणी ओळखणार नाहीं असें त्यास वाटलें. मग चाकरांस सांगून रात्रीचे वेळीं त्यानें मार्ग क्रमण्यास आरंभ केला. एकादें कृत्य करावयाचें असा एकदा मनाचा निग्रह झाला, ह्मणजे तें कृत्य करतांना कितीही संकटें आलीं तरी मनुष्य त्यास जुमानीत नाहीं. **पत्रामल** उंच बांध्याचा, गोरा, वाटोळ्या तोंडाचा, नुकती मिश्रु फुटलेला असा होता. त्यानें जाडेभरडे कपडे घातले होते, व हातांत गुराख्याप्रमाणें काठी घेतली होती, तरी त्याचें मूळचें रूप झांकलें नाहीं.

**पत्रामल** या वेशानें सर्व रात्रभर चालला. **चोटेला** गांव नदीपलीकडे दूर दिसूं लागला, त्यावेळेस सूर्योदय झाला नव्हता, तरी माणसाला माणूस दिसूं लागलें होतें. नक्षत्रें निस्तेज होऊन संधिप्रकाश पडूं लागला होता. पांखरें झाडावर कलकलाट करीत होतीं. गांवाचे वेशीबाहेर **सुमती** नदीचा लहान प्रवाह वाहत होता. गांवाचे बाजूस नदीला घाट बांधलेला नव्हता, परंतु दोन्ही तटाला मोठें वाळवंट होतें. वाळवंटांत कांहीं लोक

दांतवण करीत चघळीत बसले होते, कांहीं स्नान करण्यासाठीं आपलीं वस्त्रें कांठावर उतरून पाण्यांत शिरले होते. ब्राह्मण हातांत अर्घ्य घेऊन सूर्यनारायणाच्या उदयाची वाट पहात होते. पत्रामलानें आपली तुमान वर सारली. नदीचें उथळ पात्र उतरून तो गांवाकडे आला. लोक स्नान करीत होते त्या जागेपासून जरा दूर जाऊन त्यानें आपला मुखमार्जनादि विधि उरकला. रात्रभर चालण्यानें त्यास थोडा थकवा आला होता, ह्मणून तेथेंच जरा प्रातःकाळची गार हवा खात बसला. गांवांतील स्त्रिया पाण्यासाठीं तेथें येऊं लागल्या. नदीवर लोकांची बरीच गर्दी झाली. कांहींजणांस त्यानें गांवची माहिती विचारली. गांवांत श्रीमान कोण आहेत, सावकार कोण आहेत, असें एका इसमास त्यानें विचारलें, त्या इसमास या तरुणाकडे पाहून असें वाटलें कीं, असलीं रूपवान माणसें गरिबांत देखील असतात. दुसरा ह्मणाला 'तूं राहणारा कोठला, व तूं इकडे कां आलास?' त्यानें नम्रतेनें उत्तर दिलें 'पोटासाठीं आलों. मी जातीचा काठी आहें, शेतभात होतें तें सावकारानें कर्जांत घेतलें. त्यामुळें देशोधडीस लागलों.' त्यांचे भाषण ऐकणाऱ्या गृहस्थास रत्न उकिरड्यावर पडलें तरी त्याची चमक कमी होत नाहीं असें वाटलें, व तो आपलें तोंड धुतांधुतां त्यास ह्मणाला, 'बाबा, गांवांत जा, चार चौघे गुहस्थ आहेत त्यांजकडे तपास कर, तेथें अन्नास लागशील. माझी तूर्त ऐपत नाहीं, नाहीं तर मी देखील तुला शेतीभातीचे कामावर ठेविलें असतें.' पत्रामलानें त्यास लवून रामराम करून हळूहळू समोर झाडांत दिसत असलेल्या गांवाची वाट धरली. लोक रस्त्यानें जात येत होते. गांवांतून गुरें पाण्यावर घेण्याची वेळ झाली होती. त्यांचे बाजूनें हा गांवाचे वेशींत गेला. वेशीजवळ पार बांधलेलें एक पिंपळाचें झाड होतें, त्यावर लहान लहान देवळ्या बांधल्या होत्या, व जवळच एक महादेवाचें देवालय होतें. बैरागी लोक या पारावर आपले हातीं चिलमा घेऊन धूम्रपान करीत होते. पत्रामलानें मंदिरांत जाऊन देवदर्शन घेतलें, व

साधुमंडळीला नमस्कार करून तो त्यांजपासून थोडे अंतरावर बसला. तो सुंदर पण दरिद्रावस्थेंत दिसत होता, यामुळें कफल्लकांपाशीं कफल्लक येण्याबरोबर त्यांनीं त्यास धुडकारलें, आणि 'ये जोगी लोकोंकी जगा है, मुशाफरखाना नही है, गांममें चल जा' असें लाल डोळे करून ते बोलले. त्यावर तो नम्रतेनें ह्मणाला, 'मी गरीब परदेशी मुशाफर आहें, मी अंमळ येथें बसलों ह्मणून रागावूं नका, थोडे वेळानें मी गांवांत जातों.' परंतु त्या गरिबाचे बोलण्याकडे लक्ष कोण देतो? जे ते आपल्या धुन्या चिमट्यानें सारून गांजा, भांग, तंबाखू भरण्याचे तयारींत होते. त्यांनीं याजकडे पुनः पाहिलें सुद्धां नाहीं. या बैरागी मंडळीज-वळ बसून वेळ घालविण्यांत हंशील नाहीं असें समजून तो तेथून उठला. गांवांत फिरलों तर माहिती मिळेल अशा उद्देशानें तो तेथून निघाला. गांवांत पांचसातशें घरांची वस्ती होती. बहुतेक **काठी** लोकांचीच वस्ती होती. शिवाय भाट, ब्राह्मण, उदीम, व्यापारी यांचीही घरीच वस्ती होती. गांवांत सडका नव्हत्या तरी घरें ओळीनें बांधलेलीं होतीं. रस्ते बरेच रुंद होते. गांवांत घोडीं, गाई, ह्मशी फार होत्या. घोड्यांचा व्यापार येथें फार होत असे. गांवाचें नांवावरून **काठेवाडी** घोड्यांत **चोटेल्या** जातीची प्रसिद्धि होती. तेथील व्यापारी माद्वान व वळू ठेवून शिंगरें अथवा शिंगे तयार करून विकीत असत. जातवान माद्वान बहुत-करून ते विकीत नसत. **पत्रामल** गांवांतील चव्हाट्याचे जागेवर येऊन पोहों-चला. तेथें कांहीं सौदागर व इतर लोक घोडे पाहण्याचे धांदलींत होते. कोणी घोडे फिरवून पहात आहेत, कोणी भोंवरी व खतखोडा पहात आहेत, कित्येक शिंगे उपायीं येऊन दुलाच्या झाडीत आहेत, असा घोड्यांचा बाजार पहात तो तेथें उभा राहिला. घोड्यांचे माल-कांत एक वृद्ध गृहस्थ, **हमीर जसाजी** नांवाचा, सुमारें ऐंशी पंचा-यशी वर्षें उमरीचा व साडेसहा सात फूट उंचीचा उभा होता. पिक-ल्या पानाप्रमाणें त्याचा रंग गोरा व त्याची दाढी व मिशा पिकून पांढ-

त्या सफेत झाल्या होत्या. तो हातांत चांदीचा हुक्का घेऊन ओढीत इकडे तिकडे फिरत होता. त्याचे नौकर दोन तीन शिंगे हातीं धरून फिरवीत होते. कांहीं वेळानें त्यानें आपला हुक्का ओढण्याचें बंद केलें. इतक्यांत एक घोडा नोकराचे हातांतून सुटून थोडा वेळ बाजारांत एकच धांदल उडाली. घोडीं, घोडे व अल्लड शिंगरें यांचें खिकाळणें व लाथाळें सुरू झालें. या गर्दीतच घोड्याच्या धक्क्यानें दोन माणसें खालीं पडलीं, व तोच घोडा हमीर जसाजीजवळ भरधांव धांवत आला, व त्या घोड्याचा धक्का त्यास लागणार, इतक्यांत आमच्या तरुण प्रवाशानें एकदम धांव मारली व घोड्याजवळ जाऊन त्याची अनीन इतके सफाईनें धरली कीं, जमलेली सर्व मंडळी त्याच्याकडे टकमक पाहूं लागली. घोड्यानें दोन वेळां उपायीं येऊन हिसडे देऊन सुटण्याचा यत्न केला; परंतु तो सर्व व्यर्थ झाला. लगाम हातांत होतीच. पत्रामलानें आपले हातांतील सोडग्यानें घोड्यास असे दोन रट्टे दिले कीं, तें उपायीं येण्याचें बंद पडलें. चोहोंकडून जमलेल्या लोकांतून 'शाबास! शाबास!' असा एकदम वाहवाचा ध्वनि निघाला. हमीर जसाजीला आपणावरचें अरिष्ट यानें चुकविलेंसें वाटलें. दोनप्रहरचा समय झाला होता. व्यापारीलोक आपआपलीं जनावरें सौदागर लोकांना व गिऱ्हाइकांना ठरवून देत देत बोलत निरनिराळे दिशेनें जाऊं लागले. हमीर जसाजीनें प्रेमळ दृष्टीनें त्या गरीब मनुष्याकडे पाहिलें. अलंकार व कपडे हीं रूपाला अधिक शोभा आणतात, परंतु नुसत्या चांगल्या चेहऱ्याकडे सर्वांची दृष्टि स्वाभाविक रीतीनें जाते; कारण चुंबकासारखी आकर्षक शक्ति त्याजमध्यें असते.- आमच्या प्रवाशाचे कपडे जाडे भरडे होते, त्यांत त्याचें अंग ढगांनीं आच्छादिलेल्या सूर्याप्रमाणें क्षणार्ध झांकून गेलें होतें इतकेंच काय तें. असो; त्या वृद्ध गृहस्थास पत्रामलानें लवून रामराम केला. तेव्हां हमीर जसाजी ह्मणाला, 'तूं राहणार कोठचा? तुझें नांव काय?' तो ह्मणाला 'मी द्वारकेनजीक

एका खेड्यांत राहणारा आहें, व माझें नांव **रणमल.**' धंदा काय करतोस असें विचारतांच त्यासाठींच इकडे आलों आहें असें **पत्रामल** ह्मणाला. मग तो ह्मणाला 'माझे घरीं चल.' इतकें बोलून तो घराकडे चालला, व **पत्रामल**ही त्याजबरोबर गेला. दोन आळ्या ओलांडल्यावर मोठ्या रस्त्यावरच त्याचें घर होतें. घराचे पुढचे पडवींत घोड्यांचे तबेले होते, व आंतले बाजूस मोकळें आंगण होतें. ह्या चौकाचे एका बाजूस गुरें बांधण्याचा सोपा होता, व दुसरे बाजूस गडी वगैरे चाकरमाणसें राहण्याचा सोपा होता. याचे आंतल्या बाजूस दुसरी चौसोपी होती, तेथें मोठा चौक साधला होता. या चौसोपीवर माडी होती, व तिचे मागील पडवीस एक दार होतें. मागील चौकांत एके बाजूस सैंपाकघर व दुसरे बाजूस बायका राहण्याची जागा असून, तिचे खालीं भुयार होतें. वृद्ध **सजाजी** घरांत आल्याबरोबर बाहेरचे सोप्यांत एक चौरंग मांडला होता त्यावर टेंकला. चाकरांनीं त्याचे हातांतील हुक्का घेतला, व त्यानें आपल्या अंगावरचे कपडे काढले. बरोबर आलेल्या **रणमलास** तुमचे बरोबर जेवूं घाला असें चाकरांस सांगून तो घरांत गेला. त्याची स्त्री **चंदाबा** त्याच्याप्रमाणेंच पोक्त वयाची होती. **हमीर जसाजी**चा तीस एक वर्षांचा मुलगा **जामनगर**चे दरबारांत स्वारांत नौकर होता, तो तिकडे आपले चाकरीवरच होता. घरांत एक कन्या सोळा सतरा वर्षांची होती तिचें नांव **पाचबा**. हें पोक्त दंपत्य जसें रूपवान, तसेंच अगर त्याहून वरचढ रूपवती मुलगी होती. शरीर गौरवर्ण, नाक सरळ, ओंठ बारीक, कपाळ रुंद, भिंवया कमानदार, केश काळेभोर व कंबरेखालीं रुळत असलेले, कंबर बारीक, अशा प्रकारची ती असून बापासारखी फार उंच नव्हती. तिचा बांधा जसा गोंडस, तशी तिची वाणी शुद्ध व स्पष्ट असून कंठ मंजुळ होता. जेवण्याची तयारी असल्याचें तिनें बापास सांगितलें. जेवण झाल्यावर बाप ह्मणाला 'ईश्वरानें आज मोठी खैर केली. घोड्याखालीं

आज माझा चुराडा होत होता, पण तो प्रसंग टळला.' हें त्याचें सांगणें पुरें झालें नाहीं तों मुलीचे चेहेऱ्यावर एकदम भयाचें, व लागलेंच पित्यावरील अनिष्ट टळल्याबद्दल आनंदाचें दिग्दर्शन झालें. बापाचा बचाव कशानें झाला तें ऐकण्यास ती आतुर दिसूं लागली. जसाजी ह्मणाला 'एक कोणी गरीब मनुष्य तेथेंच उभा होता, त्यानें इतक्या सफाईनें घोडें आवरून धरिलें कीं, तेथील लोकांनीं त्याच्या धैर्याची व चातुर्याची तारीफ केली.' तें एकून चंदाबा ह्मणालीं 'तर मग त्याचे उपकार आपण फेडले पाहिजेत. गरीब असला ह्मणून हेळसांड होतां कामा नये. तसें होणार नाहींच, परंतु सुचविण्याचा माझा धर्म ह्मणून बोललें.' यावर पति ह्मणाला 'तो निराश्रित व गरीब मनुष्य पोटाचे विवंचनेंत होता ह्मणून त्याला बरोबर आणलें आहे. आपले येथें नोकर माणसें आहेत त्यांत त्याला ठेवूं, व त्याचे कामगिरीबद्दल त्यास बक्षीसही देऊं.' पुढें ठकराणी कांहीं बोलली नाहीं; परंतु तो मनुष्य प्रत्यक्ष पाहण्याची तिला इच्छा झाली. मुलीला तर त्याला केव्हां पाहीन असें झालें. परंतु परके पुरुषाच्या दृष्टीस पडण्याची चोरी ह्मणून तिला आपला विचार मनांतच ठेवावा लागला, व आपली उत्कंठा संकटानें दाबून धरावी लागली. या लोकांत केवळ मुसलमानांप्रमाणेंच पडद्याचा रिवाज नाहीं, तरी संभावित घराण्यांतील स्त्रिया पाणी व इतर कामधंदा करण्यास सहसा बाहेर पडत नाहींत, कारण असलीं बाहेरचीं कामें चाकर माणसें करितात. या जातींतील गरीब वर्गांतील स्त्रिया मात्र सर्व कामधंदे करितात.

इतर गड्यांबरोबर आपला हा नवा गडी जेवला. त्याचें घरचें रोजचें सुग्रास अन्न कोणीकडे, आणि येथील भाजीभाकर आणि ताकाचें जेवण कोणीकडे? यजमानीण बाईनें त्याचा उपकार मनांत आणून एक वाडगाभर दूध त्यास अधिक दिलें, व जेवणानंतर इतर चाकरांप्रमाणें त्याला नवे कपडेही दिले. घरांतील कामकाजाची त्यास माहिती करून दिली. स्वार्थ साधण्याकडे लक्ष असलें ह्मणजे हलकीं कामेंही हौसेनें

होतात. ज्याच्या घरीं असे कित्येक खासदार होते, त्याला आज खासदार बनावें लागलें. हा खासदार तबेले, चौसोप्या, गुरांचे गोठे, ओसऱ्या, चौक, यांची स्वच्छ झाडलोट करी, व दुसऱ्या नोकरांकडूनही करवी. विश्वासानें व काळजीनें काम करणारा नौकर इतर चाकरांपेक्षां यजमानाचे ध्यानांत अधिक भरतो. याची वागणूक व कामाची टापटीप पाहून यजमान त्यावर खुष असे, व त्यामुळेंच दिवसेंदिवस त्याचा त्यावर विश्वास बसत चालला. बाकीच्या नोकरांपेक्षां त्यास घरांतील कामें जास्त करावीं लागत. थोड्याच दिवसांत त्यानें आपल्या गुणांनीं हा एक कटुंबांतीलच मनुष्य आहे असें यजमानास वाटावयास लाविलं. त्याला खाशांबरोबर पंक्तीचें जेवण सुरू झालें, व दुसरे चाकर त्याचे हाताखालीं काम करूं लागले. मागील चौकाचे सोप्याखालीं जें तळघर होतें ह्मणून मागें सांगितलें, तें दुवईचे पांच सहा खण लांबीचें होतें. आंतील भिंती पांढऱ्या मातीनें लिंपल्या होत्या. तळघरांत हवा येण्यासाठीं वरचे मजल्याचे भिंतींतून गवाक्षें ठेवलेलीं होतीं. गवाक्षें पश्चिमेची व दक्षिणेची हवा आंत येई अशीं साधलीं होतीं. मात्र तेथें उजेडाची चांगली सोय नव्हती. तें काम दिव्याच्या साह्यानें होत असे. तळघरांत उतरण्याच्या पायऱ्या इतक्या उथळ होत्या कीं, घोडीं त्या रस्त्यानें खालीं सहज उतरत. या तळघरास दोन रस्ते होते. एक घरांतून व एक त्याच्या बाजूनें मागचे दाराजवळ निघत असे. हा मागचे दारचा तळघराचा रस्ता आंतून नेहमी बंद केलेला असे. त्या तळघरांत घोड्यांसाठीं दोन ठाणें केलेलीं होतीं, व बाकीची जागा महालाप्रमाणें शृंगारिलेली होती. घोड्यांचीं ठाणें व महाल यांचे दरम्यान एक लाल खारव्याचा पडदा बांधला होता. घोड्यांस शेजेसाठीं रुजामे आंथरलेले होते. पडद्याचे आंतील शयनगृहांत उजेडासाठीं भावनगरी पितळी समई ठेवली होती, व घोड्याच्या बाजूला उजेडासाठीं एक पितळी चाडें टांगलेलें होतें. हे दिवे अहोरात्र उजेडासाठीं तेवत असत.

घोड्यांस घासदाण्यासाठीं दगडी हौद केले होते, व लीद वगैरे काढून हमेषा स्वच्छता ठेवण्याचा बंदोबस्त केलेला होता. तळवराची जागा कुंद असल्यामुळें नेहमीं ऊद जाळीत असत. महालांतील पलंगावर एक बिछाना घातलेला असे. हुक्क्यासाठीं व घोड्यांचे रातिबाचें दूध तापविण्यासाठीं एका कोपऱ्यांत एक शेगडी पेटलेली असे. तबेल्याचे जागीं खुंट्यांवर घोड्यांचीं सामानें ठेवलेलीं होतीं. ज्या बछेऱ्याची **पत्रामलानें** कीर्ति ऐकली होती, तो याच तळवरांत त्याचे आईसुद्धां होता. हा बछेरा चौसण ह्मणजे चार वर्षांचा झाला होता. याचा रंग बगळ्याप्रमाणें पांढरा असून तो सात विती उंच होता. त्याची गर्दन मोरासारखी भरदार असून कान बारीक होते. त्याची आयाळ छातीपर्यंत पडली होती. पाठ तर इतकी कंबरी असे कीं जीन ठेवल्याशिवाय तंग लावून खुशाल त्यावर चढावें. अंगाची रुवाटी सतेज व नरम असे. **हमीर जसाजींचें** प्रेम मुलांवर होतें तसेंच ह्या बछेऱ्यावर असे. या बछेऱ्याची खाण्यापिण्याची व्यवस्था त्यानें मुलीकडे व आपल्या बायकोकडे सोंपली होती. गांवांत सामसूम झालें ह्मणजे त्यास रात्रीं बाहेर काढीत. या दोघींचा पाहरा नेहमीं या बछेऱ्यावर असे. ठाकूरठकराणी रात्रीं विश्रांतीचे स्थानीं जात, तेव्हां मुलगी तळवरांत एकटीच निजत असे. ही गोष्ट आमचे तरुण नोकरास माहीत होती. तळवरांतील जागा, बछेरा व मागील दार हीं तो **हमीर जसाजी**-बरोबर कामकाजास तळवरांत जाई तेव्हां त्यास कळली होती. त्याजवर पुष्कळ सहवासानें यजमानाचें मन बसलें होतें, एवढेंच नाहीं, परंतु घरांतील यजमानीण व **पाचबा** यांस त्याचे चेहेऱ्याकडे पाहून असें वाटे कीं, रूप व गुण हीं जातीवर नाहींत, तर तीं दोन्ही गरीबांत किंवा श्रीमंतांत सारखींच असतात. हाच जर चांगला कुळवंत व श्रीमंत असता, तर तो कन्या देण्यास योग्य होता, परंतु पेहरावावरून तो गरीब कुळांतला दिसतो त्यामुळें निरुपाय आहे असें **पाचबाच्या** आईस

वाटे. त्याचें मोहक स्वरूप पाहून मुलगी तर त्यावर फिदा झाली होती, पण त्याजकडे पोटभर न्याहाळून पाहण्यास तिला फारशी संधि मिळत नसे. हमेषां ती आईजवळ असावयाची. शिवाय चाकरमाणसांविषयीं असली गोष्ट तिच्या ओंठाबाहेर कधीं पडणेंही अशक्यच होतें. त्याच्या ध्यासांत तिचा वेळ जाऊं लागला, व संधि मिळे तेव्हां ती त्यास न्याहाळून पाहण्यास चुकत नसे.

ज्या उद्देशानें आपण चाकरी पत्करली तो बछेरा पाहण्याचा उद्देश तर सिद्धीस गेला, मात्र आतां तो येथून कसा न्यावा ही काळजी पत्रामलास लागली होती; परंतु बछेऱ्याहून अधिक रूपवान व गुणवती स्त्री दृष्टीस पडल्यापासून नुसता बछेरा घेऊन जाण्याचे त्याचे विचार मागें पडले. तिचें लावण्य पाहून त्यास वाटे कीं, सेवा करून तिचें दर्शन घेत येथेंच रहावें. तिकडे नोकर वाट पहात असतील, व आपली वृद्ध आई आपल्यासाठीं घरीं काळजी करीत असेल, याचें त्यास भान राहिलें नाहीं. केलेला बेत कोणते रीतीनें सिद्धीस नेतां येईल या विचारांत त्याचे बरेच दिवस गेले जेथें आपण इमानानें नोकरी केली, व यजमानाचा आपणावर विश्वास बसला, तेथें असें कृत्य करणें हें त्यास उचित वाटेना. शिवाय घोडा चोरून नेण्यांत मोठासा पुरुषार्थ नाहीं असे विचारही त्याचे मनांत घोळूं लागले. शेंवटीं संधि साधून तळघरांत पाचबाची एकांतीं गाठ घ्यावी, ह्मणजे तिचें आपल्यावर प्रेम कसें आहे हेंही कळेल, आणि तें कळलें ह्मणजे दोन्ही गोष्टी सहज साधतील हा विचार त्यानें मनांत आणिला. पुन्हां त्यास असें वाटे कीं, आपण जेमतेम तळघरांत गेलों, आणि तिच्याकडून तयारी नसली, तर परिणाम भयंकर होईल. अशा प्रसंगीं स्त्रीवर शस्त्र उचलणें योग्य होईल काय ! छे: तें तर कधींही होणार नाहीं. अशी कल्पना मनांत येऊन तो किंचित् निराश होई; परंतु त्यास पुनः वाटे कीं, पाचबाकडे आपण पाहतांना ती नजर चोरते, तिचे मारू डोळे मर्यादेनें सलज्ज दिसतात, व आपण दुसऱ्याशीं

बोलत असलों ह्मणजे ती गालांत हंसते, तेव्हां या सर्व चेष्टांवरून ती आपल्यास प्रतिकूळ नसावी हेंच खरें. अशा तऱ्हेनें विचार करून शेंवटीं कशी तरी तिची एकांतीं भेट घेण्याचा त्याचा निश्चय झाला. तिचा रुकार मिळवावा, यजमानाचे परवानगीनें घर सोडावें, दिवस नक्की ठरवून तिनें मागील दारीं घोड्यांसुद्धां यावें, व घोड्यांसह तिला घेऊन पळावें, असें केलें ह्मणजे चोरीचा आळ येणार नाहीं, आणि तिचे स्वतःचे संमतीनें तिला वरलें ह्मणजे त्या सुखासारखें सुख नाहीं, असा त्याचा बेत ठरला. दुसरे दिवशीं **हमीर जसाजी** नजीकचे गांवीं जाणार असें त्यास कळलें, तेव्हां रात्रीं **चंदाबा** यजमानाकडे जाईल व **पाचबा** तळघरांत एकटीच सांपडेल, तेव्हां ही संधि साधण्याच्या हेतूनें त्यानें आपलें सर्व काम संध्याकाळपर्यंत आटोपलें. नित्याप्रमाणें जेवण आटोपल्यावर तो सोप्यांत जाऊन आपले अंथरुणावर पडला. रात्र अंधेरी असल्यामुळें चोहोंकडे काळोख पडला होता. निजण्याचे जागेंत उभयतां यजमान निजून गेल्याचा त्यानें सुगावा घेतला. बाकीचे चाकर घोरत पडले होते. मग पाय न वाजवितां हळूच तो तबेल्यांत गेला. एक लांब कळक हातीं घेऊन तो त्यानें छपरास टेंकला, व त्याच्या आधारानें छपरावर चढून पाय न वाजवितां मागचे सोप्यावर गेला, व तेथें पुनः कळक खालीं टेंकून त्याला धरून तो खालीं उतरला. कळक चौकाचे बाजूस ठेवून तळघराचे दाराजवळ जाऊन पहातो तों दारास आंतून कडी लावलेली, मोठ्या जोरानें त्यानें तें दार कुसवांतून वर उचलून बाजूस केलें, व पुनः तें तसेंच बसवून, आंतून कडी लावून घेतली. जातीचा हा **वाघेला** होता, शूर होता, व बलवान होता खरा; परंतु तें कृत्य फार नाजूक होतें, तेथें नुसतें शौर्य व बल यांचा उपयोग नव्हता, यामुळें तिची मर्जी नसली तर आतांच येथून पोबारा करावा लागेल अगर प्रसंगाप्रमाणें वर्तावें लागेल, या भीतीनें त्याचे पाय लटलटां कांपूं लागले, व अंगास घाम सुटला. तरी पण जिवाचा धडा करून तळघरांतील पायऱ्या उतरण्यास त्यानें आरंभ केला.



आंत पाहतो तों समया तेवत आहेत, उदाचा वास सर्व तळघरभर येत आहे. घोड्यांवर झुली असून बछेरा रुजाम्यावर शेजेस गेला आहे. तो प्रथम हळूच पडद्यापाशीं गेला, व पडदा बाजूस सारून आंत पाहतो तों दुसरी समय तेवत आहे, व ती कुमारिका पलंगावर झोपीं गेली आहे. नंतर त्यानें आपले कंबरेची तरवार सोडून थोडें जवाहीर होतें तें गळ्यांत घातलें, व भीत भीत तो पलंगाजवळ गेला. या वेळेस दोन प्रहर रात्र झाली होती. पानसुपारीचें सामान पलंगाखालीं ठेविलें होतें. दुधाच्या तपेल्या शेगडीवर तापत होत्या. तिचें अंगावरील वस्त्र अव्यवस्थित झाल्यामुळें तिचे अवयव स्पष्ट दिसत होते. तिचे काळेभोर लांब केश उशांवर व गिरद्यांवर पसरले होते. तिचे अवयव निरीक्षण करितांना त्याच्या डोळ्याचें पारणें फिटलें. तिला हालवून जागी करावी कीं हांक मारावी, कीं दुसरी कांहीं चेष्टा करून ती जागी होईल असें करावें, या विचारांत त्याचें मन गुंतलें. कांहीं स्त्रियांची निद्रा फारच जागृत असते, असेंही त्यास आठवलें. नंतर त्यानें तिचे उशाकडे नजर फेंकली, तों खुंट्यांवर दोन तीन ताडाचे पंखे लटकत होते असें पाहून त्यांतून एक पंखा घेऊन त्याचा थोडा वारा तिचे अंगावर जाई अशा रीतीनें त्यानें हालविला. तळघरांत जरी गवाक्षें होतीं तरी दिव्याच्या ज्योतीनें व शेगडींतील विस्तवानें चांगला उकाडा होत होता. पंख्याचा वारा लागण्याबरोबर तिचा चेहरा थोडासा सुखावला असें स्पष्ट दिसलें. झोंपेंतच या कुशीवरून त्या कुशीवर वळतांना तिनें आपले पदरानें गळ्याचा घाम पुसला. परंतु पुनः वाऱ्याची झुळूक लागण्याबरोबर तिनें आपले श्वास मोकळेपणानें सोडले, व ती अर्ध निद्रावस्थेंत आली. जे विचार नेहमीं मनांत पोळतात ते स्वप्नीं भासतात. मग ती आपले मनाशींच बरळूं लागली. 'मी मोठी झालें म्हणून बाबा पांच दहा बायका असलेल्या अशा एकाद्या गृहस्थाचे गळयांत मला गोंवील! त्याला मुलगी मोठ्याचे घरीं पडावी ... कायती काळजी असेल, पण त्या सुखांत काय आहे? ठाकूर,

**राणे, राव,** यांच्या भेटी त्यांच्या राण्यांशीं होत असतील नसतील, तर अशा सुखास सुख कोण ह्मणेल? ' पुनः ती स्तब्ध होऊन आणखी ह्मणते 'नको, नको, त्यापेक्षां एखाद्या गरीबास बाबा देतील तर चांगलें. हल्लीं जो बाबांनीं नवीन नोकर ठेवला आहे तो घरांत वावरत असतो. त्याचें रूप काय कमी आहे? त्याचें बळ, त्याचा बांधा, किती मजेदार आहे? परंतु तो कसा असला तरी नोकर! तो त्यांना कसा पसंत पडेल? बाबा उद्यां जात आहेत ते अशाच कांहीं कामासाठीं जात असतील! पण मला कोठें तसलें स्थळ पसंत आहे! काम करीत असतां त्याचें मजकडे चोरून पहाणें, दुसऱ्याशीं बोलत असतां मला आनंद देणें, फेंटा मळकाच कां असेना परंतु ऐटदार किती! सर्व कामधंदा करावा लागतो तरी स्वच्छता किती-बाकीचे नोकर आहेत, पण ते गाढवासारखे पाहिजेल तिकडे लोळत असतात. ही मनोहर मूर्ति कोणीकडे, व अफिणीनें गुंग झालेले **राव, ठाकूर** कोणी! कडे? **रणमल, रणमल**' 'असा तिनें दीर्घोश्वास सोडिला व पुनः दुसरे कुशीस वळली. हा स्वप्नविचार त्यास कळला. जसें आपलें प्रेम त्या सुंदरीवर आहे, तसेंच त्या सुंदरीचेंही प्रेम आपणावर आहे अशी त्याची खात्री झाली. मग त्यास थोडा धीर आला, व इला जागृत करण्यास आतां हरकत नाहीं असें त्यास वाटलें. तिचे पलंगावर जाऊन बसावें, तिचे विखरलेले केंस बांधावे, तिचा घाम पुसावा, व पंख्यानें वारा घालावा ह्मणून तो जवळ गेला; परंतु जिच्याशीं आजपर्यंत एक शब्दही बोलण्याचा प्रसंग नाहीं, तिच्याशीं अपरिचित् आपण एकदम हिय्या करीत आहोंत असें वाटून तो थोडा दचकला. नवीन स्त्रीचे अंगास स्पर्श करणें हें बाळाचें अगर हेंकड मनुष्याचें काम आहे. ह्या त्याच्या विचारतरंगानें त्यास डवडवून घाम आला. रुमालानें घाम पुसून तो पंख्यानें आपल्याला वारा घेऊं लागला. पुनः पंखा पलंगावर ठेवला, परंतु तो पलंगाखालीं पडला. खाडकन आवाज झाला त्याबरोबर ती एकदम चमकली-झटकन पलंगावर उठून बसली. ज्याचें ध्यान, निजध्यास, व दर्शनाची

अपेक्षा आपण करीत होतों, ज्याला आपण स्वप्नांत पाहिलें, तोच **रणमल** आज निराळ्या स्वरूपानें जवळ उभा आहे; त्याच्या कमरेस तरवार लटकत आहे; गळयांत कपड्याच्या आंतून रत्नांचा हार दिव्याचे प्रकाशानें चमकत आहे; ती काममूर्ति पाहतांच एकदम ती घाबरली, व चटकर पलंगाखालीं उभी राहून लज्जेनें तिनें आपले तोंडावर बुरखा घेतला. **रणमल** इतका धैर्यवान होता, व तिचे तोंडून स्वप्नांतील आपले बद्दलचे विचार त्याचे कानीं पडले होते, तरी देशरिवाजाप्रमाणें तिच्या लगबगीच्या एकदम उठण्यानें अपरिचित कुलस्त्रीशीं एकांत स्थळीं व तिच्या वडील माणसांच्या परवानगीशिवाय चोरून जाणारास धैर्य कसें व्हावें ? अंगावर रोमांच उभे राहिले. डोळ्यांपुढें काजवे आले. तरी पण ती आपणासमोर उभी आहे, व आपल्या अवचित येण्यानें तिनें आपली नाखुषी दाखविली नाहीं, त्यामुळें त्यास थोडासा दम आला. दोघेंही एकमेकांकडे बारीक दृष्टीनें पाहत उभीं राहिलीं. शेंवटीं **रणमलानें** आपला मुग्धपणा सोडला. तो ह्मणाला, '**सुरपुरचे सुरा जोधाणी** हे माझे वडील होत. मी तुमचे येथें तळघरांतील वछेरा पाहण्यासाठीं सेवा पतकरून राहिलों होतों. चाकरमाणसांचे जाडेभरडे कपडे अंगावर दिसतात, तरी मी जहागीरदार आहें. या वछेऱ्याचे निमित्तानें तुमचेंही दर्शन झालें, त्यामुळें जास्तच कृतकृत्यता वाटली. आपले प्रेमकटाक्षानें व सार्द्रदृष्टीनें सेवा आनंदानें करण्यास हिम्मत अधिक आली. जाण्यापूर्वीं आपली भेट घेण्याचा दृढ संकल्प केला होता, व त्या योगाचीच संधि पहात होतों. आज तो योग मोठ्या कष्टानें आला. तुमच्या संमतीवांचून तुमच्या शयनमंदिरांत चोराप्रमाणें शिरलों. तुमचे स्वप्नांतील अमृतासारखे गोड शब्द कानीं पडले, यामुळें हेतुसाफल्याचा अंकुर मनांत वाढला. माझ्या यत्नास कोणत्याही रीतीचा प्रतिबंध आपलेकडून झाला नाहीं, त्यामुळें त्या अंकुरास जोर येऊन हा वृक्ष या कल्पलतिकेसमोर उभा आहे. याचीं फळें वेलीचे पुष्पानें सुगंधित व्हावीं.' हे शब्द

कानीं पडतांच तिचा कंठ प्रेमानें गहिंवरला. चंद्राप्रमाणें त्याची कांति पाहून तिचे विचारतरंग उचंबळूं लागले. प्रियदर्शनानें कामविकार होऊन शरीरावर रोमांच उभे राहिले. ती पायाचे अंगुलीचे नखानें जमीन कोरूं लागली. मर्यादेनें व लज्जेनें दृष्टि जमिनीकडे लागली. जवळ खुंटीवर टांगलेला पंखा तिनें हातीं घेतला; परंतु पंखा हालविण्यास देखील तीस धीर होईना. रणमलानें पलंगाजवळ पडलेला पंखा घेतला, व दोघांस वारा येई अशा रीतीनें तो हालवूं लागला. प्रत्युत्तर न देणें हेंच संमतीचें उत्तर असें त्यास वाटलें. तिचे मनोविकार जागृत झाले. हातांतील पंखा गळून पडला. तोंडावर घेतलेला बुरखा बाजूस सारला. डोळे भरून तिनें त्यास पाहिलें. एकदम मिठी मारावी, व कडकडून भेटावें, असें तिच्या मनास स्फुरण आलें, परंतु लज्जेनें मन आणि शरीर तसें करूं देईना. आपली साधारण स्थिति, हे थोर घराण्यांतील जाहागीरदार;–हे विवाहित असतील, कदाचित् यांचें प्रेम आपल्यावर कामापुरतें असेल, असे विचार तिचे मनांत घोळूं लागले. प्रथम घरांतील चाकर या दृष्टीनें ती त्यास पाहत असे. आतां त्याचे कुलाविषयीं पूज्यता उत्पन्न झाली. तिनें मोठ्या धैर्यानें व सद्गदित कंठानें त्यास पलंगावर बसण्याची विनंती केली. क्षुधितास अन्न, रोग्यास औषध, व कामी पुरुषास इच्छित स्त्री, यायोगानें जसा आनंद वाटतो, तसा त्यानें साहसानें केलेल्या श्रमाचा परिणाम झाला. तिच्या शब्दामृतानें त्यास आनंदाचें भरतें आलें. कामविकारानें त्याचें शरीर स्फुरण पावलें, व त्याच्या भरांत तो तिजजवळ गेला. त्याचा डावा हात तिचे कंबरेला गुंतला. उजवे हातानें तिची हनवटी धरून जी दृष्टि जमिनीकडे लागली होती ती त्यानें वर आपल्याकडे वळविली, व डावे हातानें तिला आपले अंगाशीं ओढून घेतलें. हा विळखा तिला प्रिय वाटून तिनेंही आपल्या दोहों हातांनीं त्यास मिठी मारून आपलें मुख त्याचे हृदयाशीं भिडविलें. मग त्यानें

हनवटी धरून आपले ओंठ तिच्या अधरामृतपानांत गुंतविले. तिचा एक हात याचे कंबरेला होता. दुसरे हातानें तिनें चुंबन न देण्याच्या मिषानें आपली मान फिरविली. उभयतांनीं एकमेकांस दृढालिंगन दिलें. चटकर दूर होऊन तिनें पानसुपारीचें तबक पलंगाखालून काढून पुढें बळेऱ्यासाठीं दूध तापत होतें त्यांत साखर घालून पात्र भरून त्याचेपुढें ठेविलें. इच्छित कामदेवाची मनोभावानें तिनें पूजा केली. नैवेद्यास दूध पुढें केलें. यथाभिरुचि दोघांचेंही प्राशन झालें. तिनें पानाचा विडा तयार करून त्यास दिला. मनाचा पडदा मोकळा झाला म्हणजे भिन्नभाव नाहींसा होऊन दोघेंही तदाकार होतातच. असो; नंतर त्यानें आपला बेत तिला थोडक्यांत कळविला, त्यास सर्व प्रकारें तिजकडून रुकार मिळाला. आजपासून तिसरे रात्रीं मागील रस्त्यानें मी तुला घेण्यासाठीं येईन; तळघराचें मागील कुलूप काढून ठेवावें, व मी आल्यावर घोड्यावर सामान कशीन, व उभयतां आपले गांवीं निघून जाऊं, असा बेत ठरला. या भेटींत त्यानें प्रेमानें तिचे हातांत एक आंगठी घातली. तिनेंही आपली मोहरेची आंगठी त्याचे हातांत घातली. या वेळीं रात्र संपत आली असून अरुणाची लाली आकाशांत किंचित् लकेर मारूं लागली होती. दोघांनीं पुनःपुनः एकमेकांस प्रेमालिंगनें दिलीं. तिनें तळघराबाहेर जाऊन बाहेरचे सोप्याची कडी उघडली. त्यानें आपला कळक बरोबर नेला, व तो बाहेरचे सोप्यांत सोडला. पुनः पूर्वीप्रमाणें कड्या घालून ती तळघरांत गेली. घरांत सामसूम होतें, तरी घरांतील माणसें घोरत खोंकत होतीं. पत्रामल आपले नेहमींचे आंथरुणावर पडला. त्यानें आपले कपडे बदलून चाकराचे कपडे घातले. सोप्यांतील गडी गाढ निद्रेंत होते. कोंबडा आरवूं लागला होता. नित्याप्रमाणें त्यानें बाकीचे गड्यांस कामधंद्यास उठविलें, व नेहमीप्रमाणें कामधंद्यास आरंभ झाला.

# भाग ७ वा.

सृष्टिक्रमाची नित्यक्रिया निरनिराळे ठिकाणीं निरनिराळे प्रकारची घडत असते. कोठें लग्नाची वरात, हवया, चंद्रजोती, नळे सुटत असून, वाजंत्रीं, ढोल, ताशे इत्यादि वाद्यांची घनचक्कर चालत असते. कोठें पायघड्यांवर मिरवणाऱ्या करवल्या व विहिणी गुलाल खेळण्यांत दंग असतात, आणि मध्येंच मानासाठीं पायधुण्याचे समारंभ चालतात. कोठें रोगांनीं ग्रस्त झालेल्या रोग्यांजवळ वैद्य साहाणेवर मात्रा वांशीत असतात, व त्यांचे आतस्वकीय धास्तीनें सचिंत बसलेले असतात. कोठें रात्रीं बागेंतील बंगल्यांत शोकी मंडळीची चैनबाजी चालली असते, व **आवडाजी** किंवा **राधाजी** यांचे गाण्याची 'वाहवा' सुरू होऊन जाग्रणानें शोकी मंडळी चहाकाफी, पानसुपारी खाण्यांत गर्क झालेली दिसते. कोठें बाजारांत कापडकरी, फळवाले, मिठाईवाले इत्यादिकांचे दुकानीं हजारों जिन्नससमूहांची देवघेव चाललेली; आतारी व गंधी लोकांचे दुकानांत अत्तरींचे व उदबत्त्यांचे व्यापार चाललेले; नागरिक लोक आपले व्यवसायांत निमग्न झालेले; जुगारी व किमियागार लोक भोळे लोकांस आपले सपाट्यांत आणण्यासाठीं टेहळीत असलेले; चोरटे लोक जनसमूह केव्हां निद्रिस्त होईल याची वाट पहात बसलेले; कोठें प्रवासी वाट चालत आहेत, व क्वचित् विश्रांतिही घेत आहेत; तेल्यांचे घाणे घरघर वाजत आहेत; लोहारांचे घण व सुतारांचें तासणें चालू असून, कोठें मोटा हांकणाराचे शब्द कानीं पडताहेत; मनांतून एकमेकांचे स्नेही असलेले वकील न्यायमंदिरांतून आपआपल्या अशीलांच्या तर्फे मोठ्या आवेशाचे मिथ्यावाद करीत आहेत; शाळेंतील विद्यार्थिमंडळीची गुणगुण ऐकू येते आहे; कोठें मंत्रजाग्रणाचे वेदघोष चाललेले आहेत; तीर्थांचे कांठीं देवालयांतील घंटेचा आवाज आणि "**नर्मदे हर**" असे स्नानें करणारांचे

शब्द ऐकूं येत आहेत; कोठें प्रेत दहन होत आहे; आप्तस्वकीय शोकाकुल होऊन आक्रोश करीत आहेत; कोठें मंदिरांत हरिभजनाचा व कथेकऱ्यांचे वक्तृत्वाचा ओघ कानीं येत आहे, अशीं एकाच दिवसाच्या आठ प्रहरांत सृष्टीचीं अनंत कृत्यें घडत असतात. त्यांकडे लक्ष गेलें ह्मणजे सृष्टिसौंदर्याचे विचारतरंगांत मन गर्क होतें. प्रत्येक प्राणी सुख मिळविण्याच्या आणि दुःख टाळण्याच्या यत्नांत असतो, परंतु अहंपणाचे तोऱ्यांत मीं मिळविलें, मीं केलें, मीं गमाविलें, या मायाचक्रांत तो भ्रमण करितो. इच्छित कार्यप्राप्ति न झाली ह्मणजे तो देवाला दोष देतो, तरी पण सृष्टिनियमाप्रमाणें देहाच्या क्रिया आहेत त्या निमुटपणें कराव्या लागतात, आणि बुद्धि व मन यांना अगम्य अशा अलौकिक शक्तीनें सृष्टीचीं कार्यें घडतात असें त्यास समाधान मानावें लागतें. अमुक केल्यानें अमुक परिणाम झालाच पाहिजे असा कयास केला, तरी तसें करूनही निराळे परिणाम होतात, तेव्हां जे कयास करावे त्यांस अपवाद मानण्याची पाळी येते. तात्पर्य मिळून इतकेंच कीं, सृष्टीच्या नियमांविषयीं सर्वांचे तर्क असेच फसतात.

**रणमल** आपलीं नित्याचीं कामें नेहमींप्रमाणें करीत होता, परंतु त्यास दिवस भारी मोठा दिसूं लागला, व कामाचा त्रासही वाटूं लागला. **हमीरजीस** जाण्याचें काय निमित्त सांगावें याबद्दल त्याचे विचारतरंग चालूं लागले. अखेर घरीं आईस भेटण्यास जावयाचें आहे अशी सबब सांगण्याचें त्याच्या मनानें ठरविलें. यजमान संध्याकाळीं बाहेरून आल्यावर सोप्यांत गुडगुडी ओढीत बसले होते, त्या वेळेस यानें आतांचें हें कारण सांगून रजा मागितली. असला विश्वासू नोकर रजा मागतो ह्मणून यजमान थोडा अस्वस्थ झाला. पण शेंवटीं तो ह्मणाला, 'तुझे घरची अडचण आहे तर जा, घरची व्यवस्था कर, व पुनः नोकरी करण्याची असल्यास दुसरीकडे न जातां येथेंच माघारा ये.' त्यानें घरांतून पन्नास रुपये आणवून चाकरीबद्दल **रणमलास** दिले. **रणमलानें** पहाटेस उठून जाईन असें कळविलें, व प्रेमानें

यजमानाचा निरोप घेतला घरांत जाऊन यजमानीन बाईचीही आदबीनें रजा घेतली, व आपले सोप्यांत रात्रीं विश्रांतीसाठीं आडवा झाला. सगळी रात्र व उद्यांचा सर्व दिवस गांवांत घालविला पाहिजे, त्यामुळें तो आठ प्रहरांचा वेळ त्यास वर्षासारखा मोठा वाटला. तो पांहटेस उठून गांवाबाहेर नदीचे पलीकडे गेला. खाण्याचें थोडें बरावर होतें तें त्यानें झाडाखालीं बसून खाल्लें, व तेथून थोडे अंतरावर स्मशान होतें त्याचेजवळ लहान लहान थडगीं व देवळें होतीं, तेथें कांहीं वेळ घालविला. प्रथमचा वेश होता त्यावर एक कांबळ्याची घोंगडी त्यानें पांघरावयास घेतली. त्यानें तो कंटाळवाणा दिवस जेमतेम घालविला. चार घटका रात्र झाली तेव्हां तो गांवाकडे परत येऊन राहत्या घराचे मागचे रस्त्यावर एक बखळ होती तेथें दडून बसला. मध्यरात्रीं गांवांच्या मंदिरांतील चौघड्यास सुरुवात झाली. दिवसभर धंदा करून लोक या वेळेस निद्रावश झाले होते. रस्त्यांत माणूस फिरकेनासें झालें. सर्वत्र सामसूम झालें. **हमीरजसाजी**चे मागील दाराकडे **रणमला**चें लक्ष लागलें होतें. हळूच तो बखळींतून उठला, व त्यानें त्या दाराशीं कानोसा घेतला, परंतु कांहीं हालचाल दिसली नाहीं. त्यानें हळूच दारावर थाप दिली, व तो कानोसा घेत उभा राहिला. दाराचे फटींतून दिव्याचा उजेड दिसला, त्यामुळें त्यास आनंद वाटला; परंतु दाराजवळ उभें राहण्याचें त्यास भय वाटलें. न जाणो, आपण केलेल्या बेताशिवाय दुसराही कांहीं परिणाम व्हावयाचा! कदाचित् दुसरा कोणी दार उघडीत असला, तर आपण येथें उभें राहिल्यानें संशय वाटेल, ह्मणून पुनः रस्त्यापलीकडील घराचे पडछायेंत तो गेला. दाराची आंतील कडी वाजली, व दार थोडें उघडलेलें पाहिलें, परंतु तेथें जाऊन पाहण्याचें त्यास धैर्य होईना. अखेर **पाचवा**नें आपलें तोंड बाहेर काढिलें, तेव्हां त्याची खात्री झाली, व तो चटकन् दाराकडे गेला, व आंत शिरतांच दार लागलें. दोघेंही कडकडून भेटलीं. ती घामानें अगदीं भिजली होती, व तिचे तोंडांतून नीट शब्दही निघत नव्हता.

दिललगी ही अजब वस्तु आहे. ज्यांनीं लहानाचें मोठें केलें, वाढविलें सवरलें, त्यांची माया या वस्तूनें जादूप्रमाणें कमी व्हावी अशी जगाची रहाटीच आहे. जिला एकानें वाढवावें, तिनेंच दुसऱ्याचे घरची मालकी मिळवावी, ही कांहीं लहान गोष्ट नाहीं. परंतु ती इतकी संवयीची झाली आहे कीं, तिचें आश्चर्य वाटत नाहीं. या दिललगीनें आईबाप, कुलपरंपरेची अब्रू, लौकिक देखील बाजूवर झुगारून दिल्याचीं शेंकडों उदाहरणें जगांत घडलीं आहेत, व घडतील देखील. **पाचवाचे** आलिंगनांतून मोकळें होऊन आतां येथें विचार करण्यास फारसा वेळ नाहीं असें **रणमल** ह्मणाला. दोघेंही घोड्यांजवळ आलीं, आणि तेथेंच बाजूचे खुंट्यावर चारजमे खोगीर ठेविलें होतें तें दोहोंवर चढविलें. तिनें मर्दानी पोशाख केला, व कंबरेस बापाची तरवार लटकाविली. उभयतांनींही थोडें थोडें दूध घेतलें, व हळूच त्यांनीं दोन घोडीं लगाम धरून मागचे दाराबाहेर काढिलीं. हा वछेऱ्यावर व ती घोडीवर बसली. आंतील कुलूप दाराचे बाहेरील कडीस घातलें. तिनें देवाचें स्मरण केलें, व मोठे धैर्यानें आपले जिवलगासाठीं आईबाप व घर सोडलें. त्यानें आपलें घोडें पुढें चालविलें, व तिचें मागें चाललें. याप्रमाणें गांवाबाहेरील नदी त्यांनीं ओलांडिली. या वेळेस चंद्रोदय झाला होता. मधून मधून ढगें येत होतीं. पर्जन्यकाळ संपला होता त्यामुळें रान उगवलें होतें. किड्यांचा 'किर' शब्द होत होता. गांवाचे वेशीकडे व दूर शेतकऱ्यांचीं कुत्रीं मधून मधून भुंकत होतीं. याप्रमाणें हीं दोघेंही दोन चार कोस गांव सोडून गेलीं, पण पुढें ज्या गांवीं **रणमलाचीं** माणसें होतीं तो रस्ता चुकला, व दोघेंहीं आड रस्त्यास लागलीं. या वेळेस चंद्रोदय झाला होता. वारा सोंसाट्यानें वाहूं लागून लहान लहान झाडें लवलीं, कांहीं मोडून पडलीं, व कांहीं-कांचा करकर असा शब्द होऊं लागला. त्यामुळें त्यांस एकाद्या वृक्षाचे आश्रयास जाऊन उभें राहण्याचाही धीर होईना. मागाहून थोड्या अंतरावर

कांहीं घोड्याच्या टांपा ऐकूं येऊं लागल्या, व त्या हळू हळू जवळ येत आहेत असें वाटलें. भित्यापाठीं ब्रह्मराक्षस या ह्मणीप्रमाणें **पाचवाचे** मनाची धांदल झाली. बाप रागीट आहे, त्यास कदाचित् कळलें तर तो पाठलाग केल्याशिवाय सोडणार नाहीं, असें तिला वाटूं लागलें. **रणमलाच्याही** मनांत तोच विचार घोळत होता, परंतु तो त्यानें बाहेर दिसूं दिला नाहीं. अपराध्याची हिंमत कमी झालेली असते. एकादें चोरीचें कृत्य हातून घडलें ह्मणजे चारचौघांत आपणास कोणी ओळखील काय, आपला कोणास संशय येईल काय, ह्मणून संशयानें तो लोकांचे चेहेरे न्याहाळीत असतो; त्याचे मनांत स्वस्थता नसते, त्याप्रमाणें **रणमलाचे** चेहेऱ्यावर क्षणोक्षणीं विचारतरंग राहत; परंतु **पाचवा** याचे घोड्याचे मागें चालत असल्यामुळें तिच्या ते दृष्टीस पडले नाहींत. घोड्याच्या टांपा अगदीं नजीक ऐकूं येऊं लागल्या. तेव्हां ती ह्मणाली 'आपण बाजूचे आडरस्त्याकडे वळावें, ह्मणजे हे घोडे पुढें निघून जातील.' तो शूर होता, परंतु त्यासही ती सूचना बरी वाटली, उभयतांनीं आपलीं घोडीं डावेबाजूस पानसांवरचें कुंपण होतें, व पलीकडे झाडी होती त्या बाजूस वळविले, व दोघें अंधारांत सुमारें अर्धा कोस आडवीं गेलीं. नंतर कांहीं घोडेस्वार भरधांव गेल्याचा आवाज झाला, तेव्हां ती **बारवटिये** लोकांची टोळी असावी असा त्यांनीं अंदाज केला. बराच वेळ तेथें छायेंत काढिला. शेंवटीं पुन्हां रस्त्याकडे येण्याकरतां घोडीं वळविलीं, व कांहीं कदम पुढें गेले तों डोंगराची उतरण लागली, व खालीं ओढा वाहत होता तेथें त्यांनीं पाणी पाहण्याकरितां आपलीं घोडीं हळूच ओढ्यांत घातलीं. घोडे उडवून नेण्याजोगा तो ओढा नव्हता. वीस पंचवीस हात रुंदीचें पात्र होतें, व दोहोंबाजूस ओबडधोबड धोंडे पडले होते. **रणमलानें** आपला बछेरा पार नेला, व तीही आपली घोडी पाण्यांत घालणार तों मागून शेंपन्नास लोकांची एक टोळी धांवत आली. त्यासरसें तिनें आपली



घोडी पाण्यांत घातली. पाण्यास ओढ बरीच होती. मागील घोड्यांच्या टांपा अगदी जवळ येऊन ठेंपल्या. मनाची धांदल झाली. रिकिबींतून पाय निघाला. • घोडीचे पोटास रिकिबी लागल्यामुळें ती चमकली, व पाचवा खालीं पडली. घोडी पोंहत होती ती निमिषमात्रांत बछेऱ्याचे पाठोपाठ किनाऱ्यास लागली. परंतु जी आपण मिळविलेली, व जिचें प्रेम आपलेवर, ती एकदम पाण्यांत वाहून गेली, या दुःखानें रणमल बावरला. बारवटियाचे घोडे येऊन ठेंपल्यानें तो घाबरला. त्यानें रिकामी आलेली घोडी खेंचून घेतली, व घाईनें रस्ता सोडून तो बाजूस झाडाचे आड झाला. थोडे वेळांत ती स्वारांची टोळी पुढें निघून गेली. पुनः सामसूम झाली, व दोन्ही घोडीं झाडास बांधून हा नदीचे प्रवाहाकडे तिचे शोधासाठीं पाहत पाहत चालला. परंतु त्यास कोठें ठिकाण लागेना. दोन कोसपर्यंत याप्रमाणें तो शोध करीत गेला. या नदीस पुढें दुसरी नदी मिळून संगम होऊन तिचें मोठें पात्र झालें होतें. ती पाण्यांत बुडाली असेल अगर वाहून गेली असेल असें त्याला वाटलें, त्यामुळें तो अगदीं बावरून गेला. त्याचे मनाचा उत्साह नाहींसा झाला. मिळविलेल्या प्रेमधनाचा सांठा हरपला. तो निराश झाला. परत घोडीं बांधलीं होतीं तिकडे येण्यास तो निघाला. त्या वेळेस रात्र सरून सूर्योदय होण्याचा वेळ झाला होता. परंतु पावसाचे ढगानें सांभळ पडली होती. जी वनशोभा नेत्रास सुंदर वाटावी, जो नद्यांचा खळखळाट व प्रवाहाचा शब्द कानास गोड लागावा, जे नानारंगाचे पक्ष्यांचे मंजुळ शब्द ऐकून आल्हाद व्हावा,—तींच सर्व मन उदास असल्यामुळें त्यास कंटाळवाणीं वाटूं लागलीं. ज्या बछेऱ्यासाठीं त्यानें इतके श्रम केले, व इतक्या हाल अपेष्टा भोगल्या, तो बछेरा आतां त्यास दृष्टीसमोर नकोसा झाला. प्रियेचे विरहानें घरीं जाण्यासही त्याची नाउमेद झाली. घोडी व बछेरा दोन्ही सोडून देऊन आणि

अलख बैरागी होऊन नदीचे कांठाकांठानें पुनः शोध करीत जावें, मग तिची भेट झाली तर ठीकच, नाहीं तर आपलें सर्व आयुष्य याच वेशानें एकादे तीर्थी राहून ईश्वरभजनांत घालवावें, असा त्याचा निश्चय झाला.

असो; हळूहळू तो घोड्यांजवळ गेला. त्यानें घोडीं मोकळीं सोडलीं, दोघांस कुरवाळून त्यांची मान थोपटली, त्यांचे तोंडाचे मुके घेतले, व त्यांस ह्मणाला—'बाबांनो, तुमची धनीण तुह्मांला व मला सोडून गेली तसा मीही तुम्हांस सोडतों. तुम्ही **काठेवाडां**तील अस्सल जात आहांत. आपले यजमानाचें घर तुम्हांस हुडकून काढतां येईल.' हें म्हणतांना त्याचा गळा अगदीं दाटून आला. डोळयांतून टपटप अश्रु पडले. पुन्हां त्यानें वछेऱ्यास कुरवाळलें, व आपण हळूहळू चालता झाला. घोडीं मोकळीं सोडल्याबरोबर निरुत्साह दिसूं लागलीं. त्यांनीं एकवेळ कान टवकारून त्याचेकडे पाहिलें, व आपला रस्ता धरला. तो पुन्हां नदीचे कांठीं गेला. आपलीं वस्त्रें फाडून लंगोटी लाविली, व राहिलेलीं वस्त्रें जाळून त्यांची राख अंगास फांसली, व जड जवाहीर जवळ होतें तें त्यानें कंबरेस बांधून घेतलें. त्याच नदीचे किनाऱ्यानें दऱ्या, लवणें, झुडपें ओलांडीत तो चालला. दिल्लगी अशी विचित्र जादू आहे, कीं तिचेसाठीं यानें आपली वृद्ध आई, धाकटा पाठीचा भाऊ, आणि वतन सोडून रानोमाळ फिरण्याचें धरलें. मिळाली तर तिचेसाठींच जगायाचें, नाहीं तर याच वैराग्यस्थितींत काळ घालवावयाचा, तिचेशिवाय इतर सर्व स्त्रिया मुली वहिणी, अशी त्यानें शपथ वाहिली. तिचे साठीं रडून रडून त्याचे डोळे कोरडे पडले. पुन्हां पुरुषानें रडत बसूं नये, यत्न करावा, असें त्यास वाटलें. मग तो एका झाडाखालीं बसला. या वेळेस खडे दोन प्रहर झाले होते. पोटांत भुकेनें अंमल गाजविला, त्यामुळें तिच्याकडे लागलेलं त्याचें मन तूर्त पोटाकडे

वळलें. गांवचा आश्रय केल्याशिवाय उदरपोषणाची तजवीज कशची लागते? प्रवासानें व दुःखानें तो अगदीं श्रमून गेला होता. पाणी पिऊन तूर्त भूक भागवावी ह्मणून नदीचें स्वच्छ उदक तो ओंजळीनें पोटभर प्याला, व एका झाडाखालीं निवांत जागा पाहून भुकेची वेळ झोंपेंत काढावी असा त्याचा बेत झाला; परंतु जर पोटांत कांहीं नाहीं, तर झोंप कोठची येणार! जेमतेम थकवा जाण्याइतकी थोडीशी बेताची डुकली लागली.

इकडे रात्रीचे वेळेस ओढ्यांत वाहवलेली पाचबा मागील येणाऱ्या घोड्यांचे आवाजानें विशेष घाबरलेली नव्हती, तरी आपला बाप रागीट, त्यास आपण पळाल्याचें कळलें तर तो पाठोपाठ धांवत येईल, व आपले जिवलगास व आपणास त्रास देईल, या विवंचनेंत असतां ती घोडीवरून खालीं पडली. ती थोडी पोंहणारी होती, परंतु पावसामुळें ओढ्यास पाण्याचा जोर, वळणें फार, व त्या वळणांमुळें भोंवरे पडत असल्यामुळें तिला पोंहण्याचा उपयोग करितां आला नाहीं. ती ओढ्याबरोबर घाबरून वाहत एका दर्भाचे बेटांत जाऊन लागली. दर्भ इतके उंच वाढले होते कीं, दरडीवरून पाहणारास त्या दर्भातील कांहीं दिसत नसे. ज्या वेळेस पत्रामल या कांठानें पाहत पाहत गेला, त्या वेळेस ती या दर्भाचे आड होती त्यामुळें ती दृष्टीस पडली नाहीं. सर्वरात्र तिनें कुडकुडत घालविली. थोडें दिसूं लागल्यावर तिनें चिखलांतून किनाऱ्यावर येऊन आपलीं वस्त्रें पुन्हां पाण्यांत धुवून वाळविलीं, व तीं वाळेपर्यंत ती नदीचे दरडींत बसून राहिली. नंतर पूर्ववत् पुरुषाच्या वेषानें ती वरचे बाजूस आली व रस्ता पाहूं लागली. मागें परत वळावें तर आपले गांवाकडचा रस्ता, व पुढें कोठें जावें तेही माहित नाहीं, यामुळें दरडीपासून पाऊलवाट गेली होती ती तिनें धरली. शोधण्यासाठीं आपला बाप पाठ

लाग करील हें त्याचे स्वभावावरून तिला खास वाटत होतें. आपण त्याचे हातीं सांपडलों तर आपलें रक्षण कसें होईल? आपलें रक्षण करणारा जो सुदैवानें मिळाला होता, व ज्याचे प्रेमासाठीं त्याचे सुंदर रूपाला भाळून आपलें वर, वृद्ध आईबापें व लौकिक, यांजवरही पाणी सोडलें, तोही दुर्दैवानें अंतरला! तिला पुन्हां वाटे, 'माझा बाप मला हल्लींचे वेशांत ओळखूं शकणार नाहीं.' या वाटण्यानें तिला थोडासा धीर वाटला. पुन्हां वाटे, आईबापांचें आज्ञेशिवाय केलेल्या कृत्याचे पातकानें तर हें संकट ओढवलें नसेलना? ती पुनः ह्मणे, 'रणमल माझ्या शोधार्थ एवढ्यांतच कोठेंतरी फिरत असेल. तो पक्का शोध केल्याशिवाय जाणार नाहीं.' त्याचे निजध्यासानें व दुःखानें तिनें आपले डोळे रडून सुजविले. आपण आपल्या कृत्यानें आईबापांचे तोंडास काळिमा आणिली याचेंही तिला फार वाईट वाटलें. या विलापांत असतां तिनें संध्याकाळपर्यंत नदीचा किनारा सोडला नाहीं. जों जों अंधार पडूं लागला, तों तों नदीचा किनारा जास्त भयाण दिसूं लागला. लांडगे, कोल्हीं यांचे शब्द तिचे कानावर येऊं लागले. नदीचे बाजूचे झुडपांत काजवे इकडून तिकडे उडतांना चमकूं लागले. बेडकांचे चिखलांतील डरांव डरांव शब्द पाण्याकडून ऐकूं येऊं लागले. अन्नावांचून प्राण व्याकुळ झाले. खाण्याचें बरोबर घेतलेलें घोड्याचे सामानांत राहिलें. मुशाफरीचे दगदगीनें व रडण्याचे श्रमानें ती अगदीं थकून गेली. आज पाणी पिऊनच राहावें असा तिनें निश्चय केला. थोडेंसें पाणी पिऊन एका वृक्षाखालीं तिनें सर्वरात्र अति दुःखांत काढली. सकाळीं जागी होऊन पाहते तों दूर नदीचे दरडीवर दोन्ही घोडीं चरत होतीं. तीं दृष्टीस पडतांच तिचे पोटांत एकदम धस्स् झालें. तिला वाटलें, कोणी **रणमलचा** घात केल्यामुळें हीं घोडीं उधळलीं असावींत, अथवा मी पाण्यांत वाहून गेल्यामुळें त्यानें आपल्या जिवाचा घात करून घेतला असावा. ह्या कल्पनेनें तिचें मन अगदीं गोंधळून

गेलें. त्याचें स्मरण पुनः होऊन पुनः तिला अगदीं रडूं कोसळलें. थोडे वेळानें आपलें रडें आंवरून तिनें ज्या बाजूस घोडीं चरत होतीं तिकडे आपला रोंख वळविला. दोन्ही जनावरें तिचे संवईचीं व ओळखीचीं असल्यामुळें तिला पाहतांच तीं धांवत बागडत तिचे जवळ आलीं. तिनें त्यांचे तोंडावरून हात फिरविला व त्यांस थोपटलें. बछेऱ्याचा **रणमलाशीं** संबंध थोड्या वेळाचाच होता, तथापि ज्या जागेवर रणमलनें बच्छेऱ्यास सोडलें होतें, तेथपर्यंत तो एकदोनदां धांवत जाऊन पुनः पाचवाशीं परत आला, त्यावरून हा घोडा आपल्याला खुणेची जागा दाखवीत असावा अशी तिची कल्पना झाली. नंतर ती त्याचे मागोमाग तेथपर्यंत गेली. परंतु तेथें काय असणार ? एके बाजूस तेथून नदीकडे जाणाऱ्यांचीं पावलें उमटलीं होतीं, त्या मार्गानें ती बरेच लांबपर्यंत गेली. परंतु पुढं मार्ग दिसेनासा झाला, त्यामुळें तो कोणचे वाटेनें गेला याची कल्पना होईना. हा बछेरा बरोबर घेऊन एकाद्या वस्तींत गेलें तर त्याला कोणी हिसकाऊन घेईल, अगर शोधीत येणारा मनुष्य त्याजवरून आपणास ओळखील हें तिला भय वाटलें, पण पायीं चालत जाण्याचेंही धैर्य होईना. नंतर तिनें घोड्यांवरील पडशींतून आपला फराळाचा डबा काढला, व आपली क्षुधा शांत केली. तें खात असतांना तिला **रणमलाचें** स्मरण होऊन प्रत्येक घांस घशांत अडके; परंतु तशाच दुःखांत तिनें आपलें जेमतेम पोट भरलें. हे खाण्याचे पदार्थ अशा हेतूनें घेतले होते कीं, ते एकमेकांनीं एकमेकांस भरवावे; परंतु तो योग दुर्दैवानें आला नाहीं. नजीकचे खेड्यापर्यंत जाण्याचा तिनें निश्चय केला, व घोडीवर बसून बछेरा बरोबर घेऊन ती खेड्याकडे जाण्यास निघाली. संध्याकाळपर्यंत याप्रमाणें तिनें आपली मजल कांटली. सायंकाळीं एक लहानसें खेडें लागलें तेथें मुक्काम केला. रात्रीस पुनः थोडेंसें खाल्लें. अशा वेशानें आपला प्रवास निर्विघ्नपणें होणार नाहीं, आपला नूर

पाहून कोणीही संशयानें आपणास ओळखील, या विचारांत ती पडली. नंतर तिला एक कल्पना सुचल्यामुळें आनंद झाला. **रासधारी** लोक अथवा **भवय्ये** लोक यांचे जवळ कृत्रिम दाढी मिशा असतात, या कल्पनेनें तिनें त्या खेड्यांत या जातीचे लोकांचा शोध केला. हे खेळ करणारे बहुतकरून **तरगोळा** जातीचे लोक असतात. त्यांचा शोध करून त्यांचे जवळून तिनें पैसे देऊन तसल्या दाढीमिशा मिळविल्या, व त्याच रात्रीं तिनें त्या धारण केल्या. आतां कोणीही आपणास ओळखणार नाहीं, अशी तिला हिम्मत आली. नंतर तिनें एक तरवार जंबिया व पिस्तुल गांवांतून खरेदी केलीं, व एक रूदार छिटाचा अंगरखाही मिळविला. शिपाई गिरीचे वेशाची सर्व तयारी झाली. या खेड्यांतून निघतांना थोडे मजलीवर सरकारचें लष्कर पडलें आहे अशी बातमी तीस मिळाली. एकादा चांगलासा सरदार पाहून त्यास हा बछेरा नजर करावा व नोकरी मिळवावी; कदाचित् याच लष्करांत आपला प्रिय **रणमल** याचा शोध लागण्याचा संभव आहे; अगर लष्करांतील धामधुमींत मृत्यु आला तरी बरा, या विचारानें तिनें तें खेडें सोडलें. तिनें दोन तीन मजला केल्या. त्यांत ह्मणण्यासारखा त्रास झाला नाहीं. संकटें आल्याशिवाय त्यांचे निवारणाची युक्ति सुचत नाहीं. आपत्काल व विघ्नें हीं कित्येक नवीन गोष्टी शिकवितात. याप्रमाणें हा वेशधारी प्रवासी संध्याकाळचे सुमारास एक रान ओलांडून एका लहानशा टेंकडीवर आला. तेथून दूर दूर डोंगरांच्या रांगा दिसत होत्या. शहर नजीक असल्यासारखा गोंगाट तिचे कानावर आला. दूर झाडींत कांहीं पांढरीं शिखरें दिसूं लागलीं, त्यामुळें तिकडे तिनें आपले घोडी वळविली. कांहीं ओढे व आड रस्ते ओलांडल्यावर एक छावणी दिसूं लागली. एका रांगेनें शेंकडों घोडे बांधले आहेत, चंदीचे तोबरे चढले आहेत, गवताचे ढीग प्रत्येक

घोड्यापुढें पडले आहेत, भिस्तीलोक डोलांत पाणी भरून घोड्यांस पाजीत आहेत, कित्येक नालबंद घोड्यांचे पाय हातीं धरून नाल-बंदी करीत आहेत; दुसरे बाजूस लहानसा बाजार भरला आहे, तेथें देवघेव चालली आहे; शेंकडों पालें, राहुट्या व तंबू हारीनें लागले आहेत; कित्येक तंबूपुढें संत्रीलोक पाहऱ्यास उभे आहेत; असें हें पडलेलें लष्कर एकंदर लहानशा शहराप्रमाणें दिसे. हें लष्कर **भाणवडचे** हद्दींत पडलें होतें. **जुनागड** दरबाराकडून **अनंतजी अमरचंद**, **कुतिया गोंडळ**कडून **मणिशंकर नरभेराम**, ही मंडळी नाकेबंदीचा बंदोब-स्त करण्यास जमली होती. **उखामंडळ**चा बंदोबस्त करून चार तोफा व पांचसातशें पलटणीचे लोक घेऊन **हिलसाहेब** व **माईम साहेब** दाखल झाले होते. आमचा नायक **राजपाल** या लष्करावरोबर येथें आला होता. त्यानें प्रथम ज्या अंमलदारास लाखोटा दिला होता, त्या अंमलदारास बेटांतून निघून गांठलें होतें. शूर, मजबूत माहि-तगार, हौशी व सरकारचे नेकनामींत तत्पर असल्यामुळें **वार्टन** साहेब यांनीं तो स्वतःचे उपयोगास पडेल असें जाणून त्यास खानगी खर्चानें एकाद्या मानकऱ्याप्रमाणें आपले बरोबर ठेविलें होतें.

## भाग ८ वा.

**वाघेर** लोकांनीं केलेली लढाईची तयारी आणि त्यांसमोर **इंग्रेजी**, **गायकवाडी**, व इतर संस्थानच्या जमलेल्या फौजेची मोर्चेबंदी **वाटवा** येथील तालुकदार यानें **सरबुलंदखान** झालेली पाहिली; आणि निरर्थक माणसांची खराबी होऊं नये या हेतूनें **वाघेर** लोकांचे तर्फेनें तह करण्याची सूचना **कॅप्टन वार्टन** यांस केली. परंतु **वार्टन** यानें असा जाब दिला कीं, तह करण्याची आतां वेळ राहिली नाहीं. असा

शेवटचा जाब त्यास मिळाल्यावर आपले कबिले घेऊन येण्याची त्यानें सरकारास अर्जी केली. परंतु त्यांस तशी रजा न मिळतां जामनगरचे कांहीं लोक पाठवून त्यांचीं बायकामुलें आणवून त्यास सोंपलीं. नंतर तो बाटव्याकडे चालता झाला. बेटशंखोद्धारचे समोर आगबोटी पाण्यांत नांगरल्या होत्या. त्यांसमोर वाघेर लोकांनीं हाजीकरमाणीचे जवळ मोर्चेबंदी केली होती. दोहोंकडून तोफांची सुरुवात झाली. वाघेर लोक या मारानें मागें हटले, व हाजीकरमाणीपर्यंत आगबोटी पुढें सरल्या. वाघेर लोकांनीं पुनः तुरगीवाऱ्यांत मोर्चेबंदी केली. पुनः दोहोंकडून तोफांचा भडिमार सुरू झाला. फिरोज नांवाची आगबोट आणखी मदतीसाठीं येऊन पोंचली. फिरोज आगबोटीवरून दुर्बीण लावून ते वाघेर लोकांचे मोर्चाची टेहळणी करीत आहेत, इतक्यांत वाघेर लोकांनीं फिरोज आगबोटीवर तोफांचें निशाण धरलें. तोफ सुती नसल्यामुळें, आणि तिच्या शक्तीचा अंदाज त्यांस माहित नसल्यानें, गोळ्यांचे धक्क्यानें तोफ उलटून पडली, त्यामुळें बरोबर निशाण लागलें नाहीं. आगबोटींतून तोफांची सरबत्ती सुरू झाली. त्यामुळें वाघेर लोकांस जहाजांतील मोर्चा सोडून बेटांतील किल्ल्याचा आश्रय करावा लागला. आश्विन शुद्ध ६-७-८ हे तीन दिवस हा जलसंग्राम चालला होता. शुद्ध ९ स त्यांनीं बेटांतील किल्ल्यांतून जोरानें तोफा व व बाण मारण्याचें सुरू केलें. सर्व दिवसभर त्यांनीं आगबोटीस पुढें सरकूं दिलें नाहीं. रात्र झाल्यावर आगबोटीकडून तोफा येण्याचें बंद झालें; परंतु राहून राहून तोफांचे व बाणांचे मार कोटांतून वाघेर लोक करीत असत. शुद्ध १० स सकाळचे साडेनऊ वाजेपर्यंत त्यांनीं टिकाव धरला. परंतु पुढें आगबोटी थोड्या पुढें सरकून त्यांचा मार सुरू झाला, त्यामुळें वाघेर लोक काहेर झाले व घाबरले. नंतर तह त्यांनीं करण्यासाठीं वाघेला देवाछत्राणी यास डॉनेल

साहेब याजकडे पाठविलें. हा साहेब पाण्यांतून किनाऱ्याकडे येत होता, त्यास, आह्मी बेटचा किल्ला तुमचे स्वाधीन करतों, व आह्मांस हत्यारबंद जाण्यास रजा द्या, असा निरोप होता; परंतु त्यानें हत्यारें ठेवा आणि ताब्यांत या, ह्मणजे तुमचा बचाव होईल असा जाब दिला. तेव्हां देवाछवाणी ह्मणाला 'मी बाकीचे लोकांस विचारून कळवितों, व एक अर्ध कलाकांत जाब देतों.' असें ह्मणून तो परत किल्ल्याकडे गेला. हा वेळपर्यंत आगबोटींतील तोफांचा मारा बंद झाला होता. परंतु नेमलेल्या वेळेस वाघेर लोकांकडून जाब न मिळाल्यामुळें पुनः आगबोटींतून तोफा सुरू झाल्या. अडीच वाजेपर्यंत दर्याच्या फौजेनें लोहगोलांचा वर्षाव करून सोडला. या वेळेस किल्ल्यांतून तोफा सुटण्याचें बंद झालें होतें, त्यामुळें दर्यायी लष्करास जोर येऊन तें किनाऱ्यावर उतरलें, व मुंबईमाता ह्मणून जी जागा आहे तेथपर्यंत येऊन पोंचलें. त्यानें पश्चिमेचे बुरुजाकडे कोटाचे बाजूस शिड्या लाविल्या. या वेळेस किल्ल्यांतील दारूगोळा संपला होता, तरी मंदिरांतील सोन्याचांदीचें नाणें एका तोफेंत भरून हल्ला करणाऱ्या दर्यायी फौजेवर सोडलें, त्यामुळें दर्यायी फौजेपैकीं बरेच लोक पडले. तरी त्यांनीं शिड्या लावून हल्ला करण्याचें काम जारी ठेविलें होतें. या बाजूचे बुरुजावर पांच वाघेर होते त्यांतून तिघे पळाले, व कुंभोज गांतिया आणि गोरियाईचा गिगला ह्या दोघांनीं तटावरून फौजेंत तरवार घेऊन उड्या ठोंकल्या. त्यांनीं पुष्कळ सोजीर लोक लोळविले. त्यांची तरवारबहादरी पाहून सोजीर लोक थिजले. त्यांनीं सारखा बकऱ्यांप्रमाणें सोजीर कांपण्याचा सपाटा चालविला होता. या दोघांस कित्येक गोळ्या व संगिनी लागल्या होत्या. या वेळेस त्यांचे वाघासारखे झालेले लाल डोळे व भयंकर मुद्रा पाहून सोजीर लोकांची अगदीं गाळण झाली होती. त्यांस पाहून सोजीर लोक चारी दिशा पळूं लागले; परंतु या दोघां वाघेरांस पुष्कळ जखमा

लागल्यामुळें शेंवटीं ते बहादरी करून लढाईंत कामास आले. या दोन **वाघेर** बहादरांच्या मारानें दर्यायी फौजेस पश्चिमेकडून दक्षिणेकडे पळावें लागलें. दक्षिणचे तटावर पुनः त्यांनीं शिड्या लावून हल्ला सुरू केला. **देवाछवाणी** हा उत्तर बाजूचे तटावर होता, तो पांच सात लोक घेऊन इकडे येऊन पोहोंचला. या वेळेस **इंग्रज** शिपाई शिड्यांवर चढत होते. शिड्यांचीं टोंकें कोटावर आल्यामुळें **वाघेर** लोकांनीं शिड्या परत लोटून दिल्या. फौजेंतून बंदुकांचा ताशेरा तटावर होत होता त्यामुळें एकदोन **वाघेर** जखमी झाले. **वाघेर** लोक आंतून गोळीचें असें अचुक संधान करीत, कीं खडा निवडल्याप्रमाणें फौजेंतील लोक पटापट पडत. या त्यांच्या अचुक मारानें किल्ल्याजवळ हल्ला करणाऱ्या लोकांस पुनः परत किनाऱ्याकडे हटावें लागलें. **देवाछवाणी** यास गोळी लागून तो जखमी झाला होता, व थोडे वेळानें मरण पावला, यामुळें बाकीचे **वाघेर** लोक घाबरले. जहाजाचें सुकाणूं नाहींसें व्हावें, तसा पुढारी **देवा** पडल्यामुळें बाकीच्या **वाघेर** लोकांचा धीर सुटला. या वेळेस प्रहररात्र झाली होती. दोन **वाघेरांच्या** मारानें दर्यायी फौज या वेळेस आगबोटीकडे निघून गेल्यामुळें किनाऱ्यावर सामसूम झालें होतें. **वाघेर** लोकांनीं आपल्या लोकांचीं पडलेली प्रेतें मंदिरांतील चंदनाचीं लांकडें आणून तटांतील मंदिरापुढें जाळलीं. किल्ल्याचे दरवाजे मोकळे केले, व राहिलेले लोक तेथून निघून गेले.

बेटांतल्या मंदिरांतील लोकांस असें वाटलें कीं, सर्व **वाघेर** लोक आतां पळून गेले आहेत अशी खबर दर्यायी फौजेस आपण न दिली तर कदाचित् पुनः प्रातःकाळीं तोफांची सुरुवात होईल. या भयानें **जयराम अनंतजी** यानें आपले बरोबर दोन माणसें घेतलीं, व मचव्यांत बसून तो आगबोटीकडे गेला, व आगबोटीवरील **क्याप्टन डॉनवेल** व **मेजर कर** यांस भेटला. त्यांस सर्व हकीगत त्यानें कळविली. सांगितलेली हकीगत

खरी आहे अशी त्यांची खात्री झाल्यावर ते आपल्या होड्यांत पल-टणच्या दोन कंपन्या घेऊन किल्ल्याकडे आले. जयराम यानें सांगितल्या-प्रमाणें त्यांची पूर्ण खात्री झाली, तेव्हां बरोबर नेलेल्या सोजिरांची कंपनी तेथें बंदोबस्तास ठेवून ते रात्रीं आगबोटीवर परत गेले. पांच दिवस चाललेली धामधुम आश्विन शुद्ध एकादशीचे प्रातःकाळीं संपून आतां शांतता होईल असें लोकांस वाटत होतें; परंतु जिवापाड श्रम करून जरी सोजीर वगैरेंची हानि झाली होती, हल्ला करून बेटांतील किल्ला मिळविण्याचें यश जरी त्यांस मिळालें नव्हतें, तरी धनतृष्णा फार कठीण आहे, यामुळें श्रमावांचून मिळणारा लाभ कसा सोडवेल? आयताच बेटांतील किल्ला हातीं आला. फार दिवसांपासून एकत्र जमलेली संपत्ति बेटांतील मंदिरांत आहे असा त्यांस सुगावा होताच. अर्थात् मिळविलेल्या जयश्रीचे बदल्यांत लूट करण्याची परवानगी सोजीर लोकांनीं मागितली. ती परवानगी देणा-रानें तरी कां न द्यावी? त्याचेंही त्यांत हितच होतें. जर या वेळेस लष्करी खात्याशिवाय मुत्सद्दी खात्याचा एकादा कामदार असता, तर त्यानें लूट करण्याची व हजारों निरुपद्रवी रयतेची नासाडी करण्याची परवानगी दिली नसती. लष्करी खात्याचे लोकांस जितका लुटीसाठीं आधाशीपणा असतो, तितका दुसऱ्या लोकांस क्वचित् असतो. दोन तास लूट करण्याचा अधिकाऱ्यानें हुकूम दिला. असा हुकूम दे-ण्यास त्यास सत्ता होती कीं काय हें न्यायदेवतेसच माहीत. पडते फळाची आज्ञा. कराचीहून मद्य भरलेलें एका व्यापाऱ्याचें ग-लबत तेथें नांगरल्याचा सुगावा मद्य पिणारे लोकांस पूर्वीं लागले-लाच होता. मग काय? परवानगी मिळतांच पहिली धाड त्यावरच! फुकटची दारू व सोजीर मंडळी अट्टल दारूबाज! पिपेंचीं पिपें त्यांनीं रिकामीं केलीं. छाकटे बनले, त्यांत आणखी लुटीची परवानगी, मग त्यांनीं तिच्या धुंदींत बेटांतील वस्तीवर हात

ठाकला. त्यांस लूट करण्यास अडथळा करणारे निरपराधी ब्राह्मण, वाणी, उदमी, बकाल, यांस ते मेंढरांप्रमाणें कांपूं लागले; शेंकडों लोकांचीं घरें लुटलीं. कित्येक घरें पेटवून दिलीं. कित्येक लोक जखमी केले. कित्येक कुलस्त्रियांची अब्रू घेतली. सर्व गांवभर पळापळी, रडारडी, आकांत आणि अब्रूरक्षणासाठीं काकुळती ऐकूं येत होत्या. लागलेल्या जखमांच्या दुःखानें बरेच लोक विवळत व आक्रोश करीत चोहोंकडे पडले होते. हा हृदयद्रावक व लाजीरवाणा देखावा पाहून कोणास दया येणार नाहीं ! हा देखावा ज्यांच्यामुळें दिसूं लागला त्यांस मूर्ख कोण ह्मणणार नाहीं! शेंवटीं गांवांतील लूट बंद करण्याचा हुकूम झाला. किल्ल्यावर फौजेच्या अधिकाऱ्यांनीं आपली विजयपताका उभी केली. किल्ल्यांत द्रव्य विपुल असल्याचें त्यांस कळलें होतें. मग दुसरे दिवशीं किल्ल्यास सुरुंग लावून उडविण्याचें काम सोजीर लोकांस सोंपलें. सुरुंग लाविण्याचें काम जेव्हां त्यांनीं सुरू केलें, त्या वेळेस मंदिरचे पुजारी लोकांनीं सुरुंग लावूं नका, फुकट किल्ल्याचे तटाचा, मंदिराचा, व मूर्तींचा नाश होईल असें सांगितलें. परंतु ह्या त्यांच्या प्रार्थनेकडे कोण लक्ष देणार ? स्वार्थापुढें अधिकाऱ्यांस कांहीं दिसेना ! मंदिरांतून पाहिजे तर मूर्ति उचलून न्या असा त्यांनीं जाब दिला ! शांततेचे काळांतही धर्मग्लानि करण्याचे परद्वीपस्थांचे सतत यत्न चालू असतात, मग त्या वेळेस तर काय ! जयश्रीचे तोऱ्यांत लष्करी हुकूम सुटलेला ! पुजारी लोकांनीं निरुपायानें मंदिरांतल्या मूर्ति उचलून **राधाजींचे** मंदिराच्या गोशाळेंत नेऊन ठेविल्या. सुरुंग तयार झाले. विद्युद्गर्जनेसारखे गडगडाट ऐकूं येऊं लागले. किल्ल्याच्या तटबंदीचे दगड आकाशांत पतंगांप्रमाणें उडूं लागले. मंदिरें जमीनदोस्त झालीं. दुर्मिळ व विपुल जवाहीर जसजसें त्यांचे हातीं येऊं लागलें तसतशी द्रव्याशा वाढूं लागली. त्यामुळें देवालयांची खणती जास्त

सुरू झाली. या बंडाचे आरंभीं गावांतील सुखवस्तु लोकांस असें वाटलें होतें कीं, आपलें जडजवाहीर व पैसे किल्ल्यांतील मंदिरांत ठेविले तर सुरक्षित राहतील, त्यामुळें लोकांनीं बरेच डागडागिने या मंदिरांत आणून ठेवले होते, ते आयतेच इंग्रजलुटाऱ्यांचे हातीं गेले. रयतेनें बार-टनकडे जुलूम होत असल्याचा अर्ज केला, व त्यानें एक चिठ्ठीही लिहून दिली, परंतु त्या चिठ्ठीचा अंमल बरोबर झाला नाहीं. लष्करी लोकांनीं आपलें लुटीचें काम निर्धास्तपणानें चालविलें. शेंवटीं रयतेचीं गाऱ्हाणीं मुंबईचे व्यापारी लोकांमार्फत मुंबई सरकारास पोहोंचलीं. त्यामुळें लूट बंद करण्याचा सक्तीचा हुकूम सुटला व लूट बंद झाली. लुटीचा माल ज्याचा त्यास परत देण्याचा हुकूम झाला. परंतु ह्या हुकुमाचा अंमल जास्त लूट होण्याची बंद झाली एवढाच कायतो. एकदा जें घशाखालीं उतरलें तें परत निघण्याची आशा कशाला? लुटींतला माल परत मिळेल असा लोकांचे तोंडावरून हात फिरविला, परंतु त्याचा अंमल त्यांचेच हातीं! असो; क्याप्टन वार्टन यानें लूट बंद पाडून बंदोबस्त केला. ही लूट अकरा दिवस चालू होती. कच्छ, मांडवी, जामनगर, खंबाळिया, मुंबई येथील व्यापारी लोकांनीं काठेवाडांत होत असलेला हिंदुधर्माचा छळ, बेटांतील देवस्थानांचा उच्छेद, व हिंदुधर्मांत सरकारनें केलेली ढवळाढवळ, ह्यांबद्दल चोहोंकडून एकच आरडाओरड सुरू केली. त्या मतलबाचे अर्ज सरकाराकडे गेले, व काठेवाडांतील कित्येक संस्थानिकांनींही याबद्दल लिहिलें. अखेर जी गोष्ट व्हावयाची ती होऊन गेली असा त्या अर्जांस व लेखांस जाब मिळाला. अशा जाबानें झालेल्या गोष्टीवर आवरण पडलें, व द्वारकेवर हल्ला करतेवेळीं याबद्दल काळजी घेण्याचा सरकारांतून हुकूम झाला.

दर्यायी फौजेनें बेटांतील तटाचा व मंदिरांचा विध्वंस केल्यावर ती जागा त्यांचे हातीं आली. पुढें पायदळ लष्कर खंबाळियाकडून हळ

हळू द्वारकेकडे वळलें. मढी, कुरंगा या ठिकाणीं गायकवाडांची फौज होती तेथें ठाणीं ठेवून बाकीची फौज द्वारकेकडे चालली. या वेळेस वाघेर लोक छापा घालणार आहेत अशी खबर मिळाली, तेव्हां कुरंगा येथील गायकवाडी स्वार व कमँडिंग ऑफिसर डिशाहून एक तोफ घेऊन उखामंडळ येथें मदतीस येऊन पोहोंचला. छाप्याची बातमी खोटी ठरली. या वेळेस माप माणेक व त्याचे बरोबर तिघे वाघेर असे पुनः तहाचें बोलणें करण्यासाठीं आले, आणि पुनः जाब देण्यास येऊं ह्मणून गेले ते परत आले नाहींत. यामुळें वाघेरलोक टेहळणी करण्यासाठीं आले नसतील कशावरून असा तर्क झाला. शेंवटीं जोधा माणेक यानें असें सांगून पाठविलें कीं, मी आपले ताब्यांत येण्यास तयार आहें,परंतु लोक तसें करूं देत नाहींत त्यामुळें नाइलाज आहे. आश्विन वद्य १४ चे दिवशीं दर्यायी फौजेनें द्वारकेचे बंदरांत मोरचे बांधण्याचें काम चालविलें होतें. पायदळ फौजेकडून जमिनीचे बाजूची नाकेबंदी करण्याची तजवीज झाली होती. कोणतेही रीतीनें द्वारकेंतून वाघेर लोक पळूं न शकतील असा बंदोबस्त ठेवला होता. वाघेर लोकांनीं गोमतीचे कांठीं आगबोटीसमोर तोफा लाविल्या होत्या. दोहींकडून तोफा सुरू झाल्या. जय्यत सरंजामापुढें बंडांत बंडवाल्यांच्या हातीं आलेल्या तुटपुंज्या तोफा वगैरे सामानाचा कसा टिकाव लागावा ? इंग्रजी फौज व इतर लष्करें हळू हळू वाघेर लोकांवर चाल करीत गेलीं. वाघेर लोकांच्या तोफा पाहिजे तसें कार्य करीनात. लष्करें आपला मार देत देत किल्ला व गांवचे नजीक येऊन पोहोंचलीं. सहा दिवसपर्यंत चाललेले लढाईत द्वारकानाथाचें मंदिर संभाळून सरकारी तोफा काम करीत होत्या. तोफांच्या भडिमारापुढें शारीरिक बळ किती टिकाव धरील ? या मारानें वाघेर लोक जेरीस येऊन त्रस्त झाले व घाबरले, व रात्रीं पळून जाण्याचा कित्येकांनीं बेत मनांत आणिला, व त्यास सर्व

**वाघेर** लोकांचा रुकारही मिळाला. पायरस्त्याकडून नाकेबंदी जय्यत असल्यामुळें तिकडून न जातां, **रूपण** गांवचे बाजूस दर्यायी फौजेची नाकेबंदी होती, तरी ती फौज **वाघेरांचे** तरवारीला वचकली होती यामुळें त्या रस्त्यानेंच त्यांनीं जाण्याचा बेत ठरविला. दर्यायी फौजेच्या जोराची तिच्याशीं **बेटांत** सामना झाल्यामुळें तिची खात्री झालेली होती. रात्र पडतांच त्यांनीं आपल्या खटल्यांसुद्धां त्या बाजूनें रस्ता धरला. मोरच्यांतून जातांना थोडी झटापट झाली. दोन्ही पक्षांचे थोडे लोक पडले, व ह्यांस रस्ता मिळाला. ते **रूपण** गांवाकडून **खडा** येथें पोहोंचले, त्यावेळेस **पिंडारी** लोकांची टोळी ह्यांस येऊन मिळाली.

प्रातःकाळीं **वाघेर** लोक पळाल्याची खबर मिळाल्यावर **इंग्रजी** फौजेनें मोठे पराक्रमानें **द्वारके**चा किल्ला हस्तगत करून घेतला, या वेळेस सोजीर लोकांचे तोंडास पाणी सुटलें. **बेटा**प्रमाणें येथेंही लुटीची मेजवानी मिळेल असें त्यांस वाटत होतें, परंतु त्यांचे मनाप्रमाणें घडलें नाहीं. **गोमतीचे** किनाऱ्यावर जीं देवळें व मंदिरें होती तीं विच्छिन्न करण्यास त्यांनीं आरंभ केला. **दक्षिणामूर्तीं**चा त्यांनीं भंग केला, व कित्येक दुसऱ्या मूर्तिही विच्छिन्न केल्या. ही खबर त्यांचे वरिष्ठ अंमलदारांस मिळतांच त्यांनीं असा दंगा करण्याची सक्त मनाई केली, व देवालयें संभाळण्यासाठीं पहारे बसविले. **द्वारके**वर हल्ला करण्याकरितां तोफांचे मोरचे लावते वेळीं **जगत**चे ह्मणजे **द्वारकानाथा**चे मंदिरास इजा होऊं नये अशाबद्दल काळजी घेतली होती, तरीही तोफेचा एक गोळा घुमटास लागून त्याचा खांब पडलाच. त्या वेळेस सर्व **वाघेर** लोक **वसई**कडे पळाले होते, व तेथें त्यांचा समुदाय जमूं लागला होता. ही खबर **कॅप्टन बार्टन** ह्यास मिळतांच तो थोड्या तोफा व फौज घेऊन **वसई**-कडे वळला. त्यापूर्वीच **वाघेर** लोक तेथून निघून **पोशितरा, सांमळासर,** आणि **राजपुर** या बाजूंस खटल्यासुद्धां गेले होते. **वसई**गांव लष्करानें पेट

वून दिला, व तेथील धर्मशाळा सुरुंगानें उडवून टाकिली. **गायकवाडी** व इतर फौजांच्या टोळ्या चोहोंकडून **वाघेरांचा** शोध व पाठलाग करीत निघाल्या होत्या, तसेंच **कॅप्टन बार्टन** आपले बरोबर चारशें लोक घेऊन पाठलाग करीत चालला होता. कार्तिक शुद्ध ९ चे दिवशीं सतराव्या पलटणचे लोक व रिसाला यांजबरोबर **वाघेर** लोकांचा सामना झाला. या झटापटींत दोहोंकडचे बरेच लोक पडले व कित्येक जखमी झाले. **वाघेर** लोकांच्या एक टोळीनें पुनः फौजेवर हल्ला केला, आणि त्या गर्दींत बाकीचे **वाघेर** लोक दुसरे रस्त्यानें **पिंडाऱ्याचे** कुंडाकडून **लुसारीचे** बाजूनें जे जवळचे डोंगर होते तिकडे खटल्यांसुद्धां पळाले. या वेळेस पन्नास स्वारांचे चौकींतून ते पळून गेले असें ह्मणतात. चोहोंकडे ज्या निरनिराळ्या फौजेच्या तुकड्या पसरल्या होत्या, त्यांजकडून अशी खबर मिळाली कीं, **वाघेर** लोक आतां **बरड्याचे** डोंगरांत आहेत. नंतर **भाणवड** गांवीं सर्व पसरलेल्या टोळ्यांनीं एकत्र व्हावें अशा हुकुमाच्या खबरा देण्यास स्वार सुटले, व त्याप्रमाणें चोहोंकडून लष्कर गोळा होऊं लागलें. दर्यायी फौजेचें काम संपल्यामुळें लष्करासुद्धां आगबोटी मुंबईकडे वळल्या. **काठेवाडचा** असिस्टंट पोलिटिकल एजंट **लीथ** साहेब हा **गुरघड** व **चरकल्याचे** रस्त्यानें **दातराणे** येथें आला. तेव्हां त्यास गांवचे पाटलानें अशी खबर दिली कीं, आमचे गांवचे हद्दींतून **वाघेर** लोक पसार होऊन **भवनेश्वरचे** डोंगरावर मुक्कामास होते, व गांवांतील एक माणूस पाडा मागण्यासाठीं त्यांचेकडेस गेला होता त्या वेळेस **वाघेर** लोकांनीं खाण्यासाठीं बाजरी शिजविली होती, व ती खाऊन ते **ढेबर** तलावाचे रस्त्यानें **घुमलीचे** डोंगरांत शिरले होते, व ते आतां यावेळेस **आभरा** डोंगराचे उंच शिखरावर **मदाधारचे** अश्रयानें मोरचा लावून खटल्यासुद्धां पडले असतील. **जामसाहेब** यांचे मुलखांत पैसा देऊन जोंपर्यंत खावयास मिळेल तोंपर्यंत ठीकच आहे, नाहीं तर **जामसाहेबांचीं** गांवें

लुटूं, असें **वाघेर** लोक ह्मणत असल्याचेंही पाटलानें सांगितलें. नंतर **कॅप्टन वार्टन** आपले लष्करासह **भाणवड** गांवीं आला. या वेळेस **वाघेर** लोक तालुकदाराचे हद्दींत खाण्याचे पुरवठ्यासाठीं लूट फार करीत होते.

आमचा घाटा बांधलेला खुपसुरत स्वार अगदीं **भाणवड**चे छावणीनजीक येऊन पोहोंचला. त्या वेळेस थोडा दिवस राहिला होता. छावणीचे बाहेर छावणीची रचना पहात तो विचार करीत उभा होता. त्यानें स्वाराचा वेश घेतला होता, परंतु लष्करांत एकही स्त्री नव्हती. अनेक जातींच्या पुरुषांनीं सर्व छावणी भरली आहे तींत आपले सोंगाचा निभाव लागेल किंवा नाहीं या विचारांत तिचे मनाचा गोंधळ झाला होता. आपला वेश जर उघडकीस आला तर त्यासारखी फजिती नाहीं, त्यामुळें एवढ्या पुरुषांच्या समुदायांत मिसळण्याचें तिला धैर्य होईना. शेंवटीं घेतलेल्या सोंगाची बतावणी करण्याचा तिचा निश्चय ठरला. इतक्यांत दूर एक सुंदर तरुण गृहस्थ दोन शिपायांशीं बोलत उभा असल्याचें तिनें पाहिलें. त्यास पाहतांच तिला **रणमला**ची आठवण झाली. कांहींवेळ त्याची चर्या पाहून, हा त्याचेसारखाच ईश्वरानें दुसरा पुरुष घडला आहे, अगर तोच आहे, याबद्दल ती अगदीं बुचकळ्यांत पडली. पुनः तिनें **रणमला**चें रूप ध्यानांत आणून निरखून पाहिलें, तों हा त्यापेक्षां वयानें थोडा कमी दिसला. याचे तोंडावर मिश्रू फुटली नव्हती तेवढ्यावरून तिनें आपली खातरी करून घेतली, परंतु हा त्याचा कोणी आप्त असावा असें तिनें अनुमान केलें. नंतर ती घोड्यासुद्धां त्याचेपासून थोड्या अंतरावर तो काय बोलत आहे हें ऐकण्याचे हेतूनें व त्याची दृष्टि आपलेकडे वळावी ह्मणून उभी राहिली.

**पहिला शि.**—राजपाळजी, कित्येक लोक असें ह्मणतात कीं, आजूबाजूचे तालुकदारलोक ह्या लोकांस मदत करतात, त्यांस रस, दारूगोळा पोंचता करतात, यांत कांहीं तथ्य आहे का?

दु. शि.—अरे त्याशिवाय त्यांचा निभाव कसा लागावा? चोहों-कडून नाकेबंदी झाली आहे, तरी ते अद्याप काहेर झाले नाहींत हीं काय थोडी गोष्ट आहे?

प. शि.—कालच मीं ऐकलें कीं दारूगोळा व कांहीं हत्यारें व दाण्याचे उंट त्यांजकडेस रवाना झाले.

दु. शि.—तालुकदार ह्मणतात कीं, हे तर **गायकवाडांचे बारवटिये** आहेत; आपण आपली रयत त्यांचे हातून कां खराब करून घ्यावी? व मदत न केली तर ते आपलें नुकसान करणार.

प. शि.—ह्या सर्व बातम्या सरकारचे अधिकाऱ्यांस कळतात, परंतु याबद्दलचा पुरावा तालुकदारांवर कसा व्हावा? सन १८६५ पासून तीन वर्षेपर्यंत यांचें तुफान चाललें होतें तेंही याच कारणानें होतें.

दु. शि.—सर्व **काठेवाडां**त हल्लीं तुफान चाललें आहे. चोहोंकडे **बारवटिये** लोक फिरत आहेत. **नगर, पोरबंदर, जुनागड,** येथें तर ते आपलें वर करून बसले आहेत. एके बाजूनें सरकारचा त्रास, व दुसरे बाजूनें ह्या बंडवाल्यांचा त्रास! रयतेनें काय करावें? शेतकरी लोक आपलें धान्य **वाघेर** लोक कांपून नेतील या धास्तींत! उदमीलोक आपले वखारीवर केव्हां धाड येईल या काळजींत! या लोकांचा छापा कोठें पडेल याचा नियम नाहीं, त्यामुळें रात्रं-दिवस लोक डोळ्यांत तेल घालून आपला जीव व मालमत्ता ह्यांचें रक्षण कसें होईल अशा काळजींत आजचा दिवस गेला तो खरा असे मानीत बसले आहेत. कित्येक तर त्यांचे लुटीनें कंगाल बनले आहेत. काय होईल तें होवो!

**राजपाळ**—बंडाचे वेळेस सरकार रयतेची मालमत्ता संभाळूं शकत नाहीं. रयतेनें आपल्यावर आलेलें संकट टाळण्यासाठीं बंड करणारांस आश्रय दिला, आणि तें सरकारांस कळलें, तर मदत देण्याचा आरोप

ठेवण्यास तें तयार ! दोहोंकडून रयतेची खराबी ! याप्रमाणें निराधार स्थिति झाली आहे !

इतकें बोलणें झाल्यावर दोघां शिपायांनीं यास रामराम केले, व **राजपाळ** परत जाण्यासाठीं वळणार, इतक्यांत उभा असलेल्या आमच्या स्वारानें त्यास लवून रामराम केला. **राजपाळा**ची दृष्टि स्वाराबरोबर असलेल्या बछेऱ्यावर पहिल्यानें गेली. बछेऱ्याचें रूप, कानकळाशी, व पुट्ठागर्दन पाहून तो त्याचे मनांत भरला. **राजपाळ** त्या स्वारास ह्मणाला 'तुह्मी असतां कोठें? जात कोण? धंदा काय करतां? व इकडे येण्याचें कारण काय?' स्वार ह्मणाला, 'मी **वाघेल**जातीचा रजपूत आहें. लष्कर पाहून शिपाइगिरीचे उमेदवारीनें येथें आलों.' **राजपाळ** ह्मणाला 'हा बछेरा कोणाचा आहे?' स्वार ह्मणाला, 'या बछेऱ्याचा स्वार व मी दोघे स्नेही होतों, व लष्करांत नोकरीचे हेतूनें येत होतों, वाटेंत तो एक रात्रीं मला सोडून चालता झाला. त्याचा पुष्कळ तपास केला, वाट पाहिली, व शेवटीं मी कंटाळून इकडे आलों.'

**राजपाळ** बछेऱ्याजवळ गेला. त्यास त्यानें न्याहाळून पाहिलें, त्याचे आंगावरून हात फिरविला. ह्या त्याचे करण्यानें आपले स्वारास असें वाटलें कीं, याचें मन यावर बसलें आहे. स्वार ह्मणाला, 'ज्या घोडीवर मी बसलों आहें तिचीच ही अवलाद आहे. आपणास पसंत असल्यास मी हा आपणास नजर करतों.' तें ऐकल्याबरोबर **राजपाळास** आनंद झाला. त्याला मनाजोगें घोडें बसावयास नव्हतें तें यावेळीं आयतेंच मिळालें. चौकापाणी करण्यासाठीं हाही एक स्वार पाहत होता, त्यास **राजपाळ** ह्मणाला 'माझे पंक्तीस आपण जेवावें. माझे बराबर आपण नेहमी रहावें. बाकीचा सर्व खर्च मी देईन.' स्वार घोड्यावरून खालीं उतरला. त्याचे मनाजोगा आश्रय मिळाला. दोघेही घोडीं घेऊन मुक्कामा-

वर आले. **राजपाळानें** आपले घोड्याजवळ दोन्ही घोडीं बांधलीं, व त्यांचे चंदींचाऱ्याची तजवीज केली. दोघांनीं चौक्यांत सैंपाक व रात्रींचें जेवण केलें. हें सर्व करीत असतांना तिला हा **रणमलाचाच** कोणी आप्त असावा ह्मणून वाटत होतें, एवढ्याकरितां तिनें **राजपाळास** त्याचे गांवाचें नांव विचारलें. **सुरपुर** हीं अक्षरें इचे कानीं पडलीं, त्यामुळें तिला थोडासा धीर वाटला, व हा गृहस्थ व **रणमल** हे निदान गांवकरी असावेत असा मनाचा निश्चय झाला. शेंवटीं दोघेही आपले राहुटींत आंथरुणें टाकून गोष्टी सांगत सांगत झोंपीं गेले.

## भाग ९ वा.

हिरोळ जातीचे **रजपूत कच्छकडून द्वारकेस** आले, व तेच **द्वारकेचें** राज्य करीत होते. पुढें **वाढेल** व **वाघेर** असे दोन भाग ह्या लोकांचे झाले. **वाघेर** लोकांमध्येंही दोन भेद आहेत. **कच्छकडून** जे आले ते लोक **मुसलमानी** धर्माचे आहेत, व **उखामंडळांतील वाघेर** हिंदुधर्माचे आहेत. **उखामंडळाचे वाघेर 'माकण'** या आडनांवानें उच्च प्रतीचे मानले जातात. **वाघेर** जातीचे लोकांचा रंग गौरवर्णाचा असतो. **काठी**लोकांप्रमाणें यांचा उंच बांधा नसून ते अगदीं ठेंगणेही नाहींत. त्यांचे डोळे नेहमी लाल, व मिशांचे केंस रांठ व लांब असतात. स्वभावानें क्रूर असून त्यांचा आहार **अफगाण** लोकांप्रमाणें रानटी आहे. ते कच्चें वकरें सहज खातात. बकऱ्याचें व उंटाचें दूध यांस फार आवडतें. यांचा पेहेराव **काठेवाडांतील** धनगरांप्रमाणें असतो; ह्मणजे यांचे अंगांत बंडी, पायांत ढिली तुमान व डोकीस **काठेवाडी** तऱ्हेचा पीळदार फेंटा असतो. शेतीचा व इतर धंद्यांचा

यांस स्वभावतः कंटाळा असतो. यांचा आवडता धंदा ह्मणजे चोरी, दरवडा, व लूट. यांचीं मुख्य हत्यारें बंदुका, तरवार, तीरकमठा हीं होत. मजल मारण्यांत, पळण्यांत, पोंहण्यांत, घोड्यावर बसण्यांत, हे मोठे बहादर आहेत. चांचेपणाचे धंद्यांत हे तरबेज आहेत, व स्नेहास ममताळू आहेत. यांच्या बायकांत फारच थोड्या रूपवान असतील. त्या रंगानें सांवळ्या असून त्यांचे केंस जाड व लांब असतात. यांचा नेसण्याचा कपडा इतका जाडा असतो कीं, चालतांना खडखड असा आवाज होतो. यांचे पायांतील चढाऊ जोड्यावर पुरुषांच्या जोड्यापेक्षां गोंडा अधिक असतो. त्याही पुरुषाप्रमाणें शौर्यांत बहादर आहेत. यांच्यांत व्यभिचार फार कमी आहे. शेती करतांनाही नांगरावर बंदुक तयार असावयाची. त्यांचे मुलांचा खेळ ह्मणजे शिकार व हिंसा करणें होय. एकादी खार अथवा लहान पक्षी या पोरांचे दृष्टीस पडला, तर तीं असा अचुक खडा मारतात कीं, ती खार अथवा तो पक्षी टपकन खालीं पडेल. घोड्याचे पुठ्याकडे तोंड करून उरफाटें बसणें, व भरधांव पिटाळणें, व केव्हां केव्हां घोड्यावर उभे राहून हातांत पाण्यानें भरलेला वाढगा पाणी न सांडे अशा शिताफीनें धरून घोडा पळविणें, इत्यादि गोष्टींचें बाळपणापासूनच त्यांना बाळकडू मिळालेलें असतें. दुसऱ्याच्या उंटणीचें दूध ती पळत असतां तिचे मागचे पायांवर उभे राहून अचळ पिणें हें लहानपणापासून त्यांचें शिक्षण. परंतु भाट, ब्राह्मण, चारण, बायका ह्यांस केव्हांही न लुटण्याचें त्यांचें ब्रीद असतें. हे लोक स्वातंत्र्यप्रिय असून यांची राहण्याचीं नेहमीचीं झोंपडीं असतात, व त्यांचा ज्याच्याशीं स्नेह झाला असेल त्याच्यांशीं ते पाहुणचारानें वागतात. आजच्या शांततेचे काळांत विद्यावृद्धीचें चोहोंकडून साधन व उत्तेजन असतांही ते लोक जसे पूर्वी होते तसेच आजही आहेत. विद्येकडे त्यांचें लक्ष गेलें नाहीं एवढेंच नाहीं, परंतु शेती करून निर्वाह करणें देखील त्यांस पसंत नाहीं, अशी ही विचित्र जात आहे.

निरभ्र आकाशांत नक्षत्रें चमकत होतीं तीं अरुणप्रभेनें निस्तेज होऊं लागलीं. दिवाभीतें आपले ढोलीकडे वळलीं. कोकिल व इतर पक्ष्यांचा मंजुळ ध्वनि सुरू झाला. आमच्या कथानकाचे आरंभीं सांगितलेलीं खोऱ्यांत दमून भागून निजलेलीं दोन्ही माणसें प्रातःकाळचे शीतल मंद वायूनें विश्रांति घेऊन जागीं झालीं. मुखमार्जनादि विधि जवळील झऱ्याचे उदकानें आटपला. ज्या दरींत उपहाराचें साहित्य पूर्वीं सांपडलें होतें त्या दरीकडे दोघेंही जाऊं लागलीं. जात्या नाजुक असल्यामुळें तिला खडे बोचत, परंतु करते काय? याप्रमाणें हळू हळू त्या दरीपर्यंत मजल झाली. सूर्याचीं किरणें प्रखर होऊन सूर्य मध्यान्हीं वर आला येथेंच उपहार करून दिवस जरा कलला ह्मणजे पुढें चालावें असा बेत करून त्यांनीं तेथें मुक्काम केला. दरींत विपुल साहित्य होतेंच, त्यांतून थोडे दिवस पुरेल इतकें घेऊन पुनः त्यांनीं आपली मजल काटण्यास सुरुवात केली. डोंगर, रान, आकाश, व पक्षी यांशिवाय त्यांस दुसरें कांहीं दृष्टीस पडत नव्हतें. तिला चालतांना थकलेली पाहिली ह्मणजे तिला उचलून घेऊन जाण्याबद्दल तो तिला विचारी; परंतु तिला तसें करूं देणें फार जीवावर येई. ती ह्मणे कीं, जोंपर्यंत चालवेल तोंपर्यंत चालेन. याप्रमाणें डोंगरांतील ओबडधोबड रस्त्यांतून कोठें चढाव, कोठें उतराण, व कोठें कांटेरीं झुडपें, ह्यांतून मजल मारीत त्यांनीं दोन दिवस प्रवास केला. तिसरे दिवशीं सायंकाळचे वेळेस झाडींत दूर एक देवालयाचें शिखर दिसूं लागलें. भगव्या रंगाची पताका वाऱ्यानें फडकत होती. हें देवालय अशोक, व बकुल, व आवळीचीं झाडें यांनीं वेष्टिलेलें होतें. पाण्याचा एक स्वच्छ झरा वाहत होता. देवालयाचे एके बाजूस डोंगर होता, व त्याचेच पायथ्याशीं हें मंदिर कोरून केलेलें होतें. जवळच एक लहानशी धर्मशाळा होती. देवळाचे मागील बाजूस जो डोंगर होता, त्यांत एक लहानशी गुहा होती. हें **सोमनाथाचें** मंदिर अगदीं

अरण्यांत होतें. वीस पंचवीस कोसांत आजूबाजूस वस्ती नव्हती. दोघे त्या झऱ्यापर्यंत येऊन पोहोंचलीं, ते वेळेस एक वृद्ध तापसी, ज्याचे सर्व केंस पिकून जटा झाल्या होत्या असा, संध्याकाळचे स्नानसंध्येसाठीं झऱ्यावर आला होता. दोघांनींही त्यास नमस्कार केले, तेव्हां तपस्वी ह्मणाला 'ह्या रानांत तुह्मी रस्ता चुकलां आहांत काय? हा कांहीं प्रवाशांचा मार्ग नव्हे.' बेटांतील घडलेली हकीकत त्यांनीं त्यास कळविली, त्यामुळें तपस्व्यास त्या पुरुषाचे साहसाचें व परोपकारबुद्धीचें आश्चर्य वाटलें, व आनंदही झाला. तो ह्मणाला 'परोपकारासाठीं जे साहसानें धाडस करतात, त्यांना त्याचा बदला ईश्वर आनंदानें देण्यास तयार असतो.' नंतर त्यानें आपली स्नानसंध्या आटपली. तुंबा उदकानें भरून घेतला, व तो मंदिराकडे वळला, आणि दोघांसही पाठोपाठ येण्यास त्यानें खुणेनें कळविलें. या वेळेस थोडा अंधार पडला होता, तरी ओढ्याचे बाजूस लहान मोठे धोंडे पडलेले होते त्यांतून तपस्वीबुवा आपल्या नेहमींच्या सरावानें पाउलवाटेनें चालत होते; परंतु या दोघांस रस्ता अनोळखी असल्यामुळें त्याचे मागून जातांना ठेंचा लागत. याप्रमाणें तीं देवालयापर्यंत येऊन पोहोंचलीं. दोघांनीं महादेवाचें दर्शन घेतलें. नंतर तपस्व्यानें गुहेंतून त्यांस दोन कंद आणून दिले; व ते धुणींत भाजून खा असें म्हणून तो प्रदोषकालचे पूजेसाठीं महादेवाचे गाभाऱ्यांत जाऊन बसला. बुवाचे धुणींतून त्यांनीं विस्तव घेतला. देवालयाचे आजूबाजूचे झाडांचीं पानें गोळा केलीं. थोड्या वाळलेल्या झुडपांच्या काटक्या तोडून आणल्या, व आगटी तयार केली आणि कंद शेंकले. भाजलेला कंद सोलून तो कमोदाचे भाताप्रमाणें विखरला. नंतर त्यांनीं बरोबरचा थोडा मेवा बुवाकरितां निराळा काढून ठेवला, व दोघांनीं आपली भूक शांत केली. तपस्व्याची पूजा संपल्यावर बुवापुढें मेवा ठेवला, तें पाहून तपस्वी हांसला व ह्मणाला, 'मुलांनो, हे मेव्याचे जिन्नस जगांत

राहून संसार करणारासाठीं आहेत. आम्हां तपस्व्यांला हे कंद फार चांगले आहेत. यांचे योगानें बरेच दिवस क्षुधा धरते, व दुसरे कोणतेही विकार यांपासून होत नाहींत.' याप्रमाणें तपस्वी बुवाचे सहवासांत बोलण्यांत बरीच रात्र झाली. मग तपस्वी बुवा आपले गुहेंत व हीं दोघें धर्मशाळेंत जाऊन निजलीं. तेथें तो पुरुष त्या स्त्रीला ह्मणाला 'अजून तीस चाळीस कोस डोंगर आपणांस ओलांडावा लागेल. चालण्याचे श्रमानें तुमचे पाय अगदीं थकले आहेत. कांटे, खडे व ठेंचा लागून पाय हुळहुळ झाले आहेत. तेव्हां आपण या तपस्व्याचे सहवासांत दोन दिवस घालवा. मी जाऊन एकादें तट्टू अगर घोडा घेऊन येतों.' त्या स्त्रीस चालण्याचा दम राहिला नव्हता, तरी त्यास सोडून तपस्व्याबरोबर तेथें राहण्याचा तिला धीर होईना. तिचे तोंडांतून कांहीं जाब आला नाहीं हें पाहून तो ह्मणाला 'या डोंगराची रांग ओलांडली ह्मणजे वरड्याचा डोंगर लागेल. या डोंगराखालीं बारवटिये लोकांच्या तुकड्या आणि त्यांचे मागें सरकारी स्वार फिरत असतील. त्यांतून तुह्मांस पायीं चालत जाणें फार जोखमेचें होईल; व तेंच जर तुह्मांस बसण्यास घोडें मिळेल तर आपणास त्यांतून सहज पार पडतां येईल.' तेव्हां घोडीं आणण्याबद्दल तिचाही रुकार पडला. मजसाठीं आणखी आपणास किती श्रम पडतील असें ह्मणतांना तिचा कंठ दुःखानें दाटला होता. घोडीं खरेदी करून येईपर्यंत कसा तरी वेळ या तपस्व्याचे सहवासानें घालवीन असें म्हणून तिनें आपले गळ्यांतून सुवर्णालंकार काढला, व हा मोडून दोन घोडीं खरेदी करा असें ती ह्मणाली. तो ह्मणाला 'आपले कंठास शोभविणारें भूषण राहूं द्या. घोडे आणण्यापुरते जिन्नस मजजवळ आहेत.' त्याचे आग्रहानें पुनः तें भूषण तिनें कंठांत घातलें. त्याचे मनाचे मोठेपणाबद्दल तिला संतोष वाटला. या वेळेस आगटी जळत होती. तिचे उजेडांत एकमेकांच्या रूपाचे निरीक्षणानें एकमेकांचे मनांतील विचार चेहऱ्यावरून एकमेकांस कळत. अशा

विचारांच तीं दोघेंही झोंपीं गेलीं. दोघेंही वयानें तरुण, व रूपवान; दोघांचेही मनांत एकमेकांबद्दल पूज्यता, व स्थळही एकांत, इतकें साहित्य एकत्र झालें होतें, तरी नीति व सदाचार यांचे साह्यानें मनावर विलक्षण रीतीनें दाब बसलेला होता. दीर्घ काळ टिकणारें सुख कोणतें, व उतावीळपणानें केलेलीं कृत्यें किती दुःखावह होतात-हें बुद्धीनें ठरवितां येतें; आशेच्या वृक्षास जोर येतो, व वानप्रस्थाश्रमाचें अवलंबन करण्यास धैर्य येतें. कोणतीही वस्तु एकदम मिळाली ह्मणजे तिची किंमत कमी वाटते. उपभोगार्थ विपुल पदार्थसंग्रह असला ह्मणजे मनास एका रीतीची शांति असते. पाहिजे तेव्हां त्यांचा उपभोग घेतां येईल असें वाटून वासना स्तब्ध असतात. याप्रमाणें दोघांचींही मनें मिळालीं होतीं. देवब्राह्मणांसमक्ष परस्परांचे गळ्यांत माळ पडण्याचें मात्र राहिलें होतें, व तसें होईल असें दोघांसही संभवनीय वाटत होतें. कसेंही असो; या मनांतील विचारांप्रमाणें गोष्टी घडून येतीलच अशा मनोराज्यांत तीं उभयतां गर्क झालीं होतीं हें निराळें सांगणें नलगेच.

वनश्री प्रकाशानें लख्ख दिसूं लागली. पक्ष्यांचे मंजुळ ध्वनि ऐकूं येऊं लागले. दोघेंही स्नानादि विधि उरकून पुनः शिवालयांत आलीं. त्यानें बेलाचे झाडावर चढून कोंवळीं त्रिदळ बिल्वपत्रें काढलीं, व बकुळीच्या झाडाचीं गळलेलीं फुलें वेचून तिनें सोंपटाचे तंतूंत ओंविलीं, व बिल्व पत्रें व फुलें **सोमनाथास** दोघांनींही अर्पण केलीं. या वेळेस तपस्वीबुवा आपले प्रातःस्नानादि विधि आटपून धुणीजवळ **हरि**नामाची स्मरणी ओढीत आपले मृगासनावर बसले होते. यानें आपला बेत त्यांस कळविला. तपस्वी ह्मणाला'तुम्ही परत येईपर्यंत या मुलीचा सांभाळ करीन.परोपकार करण्याचा आमचा धर्मच आहे, व धर्माचें मुख्य तत्वही तेंच आहे. तुम्ही चांगलीं घोडीं घेऊन लवकर या. नंतर नमस्कार करून तपस्व्याची त्यानें रजा

घेतली. या वेळेस ती मर्यादेनें थोडे अंतरावर उभी होती. तो तिला उद्देशून म्हणाला 'तूं येथें आश्रमांत रहा. मी लवकरच येतों.' असें ह्मणून तो वळला, परंतु थोडे दिवसांचा परिचय अगदीं जीवावर बेतण्याचे वेळेस केलेला उपकार, व त्यामुळें प्रीतीचा झालेला दृढ संबंध, तसेंच संकटस्थितींत सारखा विभागून भोगलेला सहवास, हीं आज दूर करून सोडून जावें लागतें, या विचारानें त्याचे व तिचे डोळे पाण्यानें भरून आले. गींहवर येऊन कंठ दाटला. पुढील इष्ट आशेवर नुसती मानेची खूण करून तिनें जाण्याची परवानगी दिली. तो दृष्टीआड होईपर्यंत ती त्याचेकडे सारखी पहात होती. तो पुढें चालत होता, तरी पुनः पुनः परत तिचे प्रेमाच्या अश्रूंनीं भरलेले डोळे, म्लान वदन व तोंडावर आलेली पांडुरता पाहून त्याचा पाय जड होऊं लागला. तिला आपण सोडून जात आहों याबद्दल त्यास फार दुःख वाटलें, परंतु गेल्याशिवाय दुसरा उपाय नव्हता, यामुळें कसेंबसें आपलें मन दृढ करून तो चालूं लागला. आपले मागें तिजवर काय अनर्थ ओढवतील अशीही काळजी त्यास वाटे. ज्याचे आश्रयास तिला आपण सोंपलें आहे तो तिचें रक्षण करण्यास समर्थ आहे! मग तो देवावर भरंवसा ठेवून, व तोच तिचें रक्षण करील अशा हिमतीनें, चालूं लागला. मागें तिचे विचारतरंग निराळेच चालले होते. जिकडे हे जात आहेत तिकडे बंडवाले व लुटारू लोक यांच्या टोळया फिरत आहेत त्यांपासून यांस एकादा अनर्थ होईल कीं काय ही काळजी तिला वाटत होती. शेवटीं तो दृष्टीआड झाल्यावर तिनें आपलें रडें सांवरून डोळे पुसले, व ती उभी राहिली. तो तपस्वी ह्मणाला 'बेटा, कांहीं काळजी करूं नको, आह्मी जंगलांत नेहमीं राहतों, परंतु जगांतील अनुभव आह्मीं घेतला आहे. जन्मतःच कोणी साधु नसतो. संसारतापानें चांगलें पोळल्यावर जगाचा जेव्हां कंटाळा येतो व गुरुकृपा होते, तेव्हां सन्मार्गाचें वळण लागतें. आजपर्यंत जे प्रसिद्ध साधुसंत

झाले आहेत ते बहुतेक गृहस्थाश्रमी होते. त्यांनीं जगाच्या पुष्कळ उठाठेवी केल्या, राज्यकारभार केले, संसारसुखदुःखांचे अनुभव घेतले, मग जगत् नश्वर आहे ह्याची पूर्ण खातरी झाल्यावर ते हरिभजनांत एकाद्या निरामय स्थानीं बसून राहिलेलें आयुष्य सन्मार्गानें घालवूं लागले. संसारांत आलेल्या अडचणीमुळें जे साधु होतात ते जगांत साधुवेशानें फिरून गृहस्थाश्रम्यांनीं आपल्या श्रमानें मिळविलेल्या द्रव्यावर आपला निर्वाह करतात.' ती ह्मणाली 'जगांतील वेशधारी तपस्व्यांस साधु ह्मणण्याऐवजीं भोंदू कां ह्मणूं नये? जटा वाढविलेले, अंगास राख फांसलेले, इंद्रियास कुलपें घातलेले, उंच हात करून ज्यांचे ते हात शुष्क झाले आहेत, व भगव्या कफन्या घातलेले, परमहंस यांस जे लोक पूज्य मानतात, ते त्यांचे वेशास मान देतात असें ह्मणण्यास काय हरकत आहे?' तपस्वी ह्मणाला 'ह्या आपल्या पुण्यप्रदेशांत हिमालयाचे पायथ्याशीं गंगेच्या कांठचें कदलीवन, नर्मदातटींचीं शुकव्यासादि स्थानें, अर्बुदाचलावरील निरामय गुंफा, ह्या व अशा निरामय स्थानांत जे संत राहतात त्यांचा उपसर्ग जगास नसतो. परंतु ही वेशधारी मंडळी गांवें शहरें सोडून गांवानजीक जेथें पाणवठ्याची जागा व रहदारी असेल अशा ठिकाणीं व जत्रेचे ठिकाणीं पंचाग्नि साधण्यास धुण्या लावून बसते. तसेच शरशय्येवर बसलेले, टांगून घेतलेले, उंच हात केलेले, पुरून घेतलेले, असे साधु आढळतात, यांस साधु ह्मणण्यापेक्षां आळशी व निरुद्योगी ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. हें साधूचें सोंग पार पाडण्यास त्यांस कमी श्रम पडतात असें नाहीं; परंतु एवढे श्रम त्यांनीं दुसरे उद्योगाकडे लाविले असते, तर यापेक्षां त्यांस जास्त लाभ झाला असता. परंतु साधूचा वेश घेऊन निर्वाह करणें हा ते एक पोटाचा धंदाच समजतात, त्यांत वैराग्याचा लेशही नसतो.'

याप्रमाणें दोघें बोलत बोलत गुहेकडे गेलीं. त्यानें दोन मृगचर्में तीस आंथरण्यास दिलीं, व तिला धर्मशाळेंत जाण्यास सांगितलें. तो ह्मणाला

'माझे स्नानसंध्येचे वेळाशिवाय साधेल तितका वेळ तुझी करमणूक करण्यांत घालवीन.' असें ह्मणून तो गुहेकडे गेला. तिनें राहिलेला कंद भाजला व थोडा मेवा खाऊन उपहार केला. नंतर देवालयाचे आसपासची व गुहेंतील जागा तिनें स्वच्छ झाडून काढली. ह्या ऋतूचीं जीं वनपुष्पें मिळालीं तीं परडींत भरून पूजेसाठीं तिनें तयार करून ठेवलीं. यामुळें आश्रमास नीटनेटकेपणा दिसूं लागला.

इकडे आमचा नायक **राजपाळ** घोड्याचा शोध करीत चालला होता. हा चालणारा पटाईत असल्यामुळें संध्याकाळपर्यंत त्यानें वीस पंचवीस कोसांची मजल मारली. या वेळेस अस्तमान झाला होता. डोंगराचे पायथ्याशीं वस्ती असावी असें दूर कुत्र्यांचें भोंकणें ऐकूं आल्यावरून त्याचें अनुमान झालें. ह्मणून तो त्या आवाजाचे धोरणानें डोंगराखालीं उतरूं लागला. डोंराची चढण सोडली व तो खोऱ्यांतून लवणाकडे वळला. दोन चार गवती खोंपटें त्याचे दृष्टीस पडलीं. त्या खोंपट्यांवर भोपळ्यांचे व घोसळ्याचे वेल पसरले होते. कांहीं फुलें होतीं व कांहीं फळांचे घोस लोंबत होते. बकरीं, कोंबडीं, भोंवतीं फिरत होतीं, दोन वणजारी कुत्रे दूर बसले होते, व त्यांच्याशीं एक दोन लहान मुलें खेळत होतीं. हा जवळ गेला, परंतु त्यास कोणी पुरुष दिसला नाहीं. खोंपट्यांत एक दोन तरुण बाया व एक ह्मातारी बसली होती. तिला यानें विचारलें तेव्हां ती ह्मणाली' हें खेडें नाहीं, कुरण राखण्यासाठीं आह्मी येथें राहिलो आहोंत. **कोडिनारचे रबारी** लोकांनीं हें कुरण सांभाळण्यास आह्मांस दिलें आहे. येथून **सरमटी** नदी ओलांडिली ह्मणजे एक बाजूस **जाफराबाद** व दुसरे बाजूस **उनाव**चे रस्त्यानें **सुत्रापाडा**कडे जाण्याचा रस्ता आहे. आमचे इजारदारास **गिरनारा**कडील पुष्कळ लोक हें कुरण सोडण्यासाठीं पुष्कळ लालूच दाखवीत होते; परंतु **चारण** व **रबारी**लोक **अमरेली** सरकारचे मोठे अभिमानी

आहेत, ते आपला भोगवटा धरून घसले आहेत. नेहमीं सरहद्दीवर तंटे मारामाऱ्या होतात, परंतु ते इतके इमानी व अभिमानी आहेत कीं जें आपलें आहे तें ते कधींही सोडणार नाहींत.' राजपाळास ह्मातारीचे तोंडची हकीकत ऐकून फार आश्चर्य व संतोष वाटल. अमरेळी सरकारचे अभिमानासाठीं सरहद्दीवरील गरीबलोक सुद्धां आपल्या घरच्या भाकरी खाऊन आपला इमानीपणा सोडीत नाहींत. तेव्हां माझें रक्त व माझा देह ज्यांचे अन्नानें वाढला आहे, त्यांच्या विरुद्ध जे लोक बंड करीत आहेत, ते जरी माझे जातीचे आहेत, तरी माझा धर्म निमकहलाली करणें हाच उत्तम होय. अभिमान नसता तर जगांत तंटे व लढाया झाल्या नसत्या.' नंतर त्या बाईस रात्रभर त्यानें तेथें राहूं का ह्मणून विचारलें. ती ह्मणाली 'आह्मी गरीब जंगली माणसें, आपले पाय आमचे येथें कधीं लागणार? माझीं मुलें आज येथे असतीं तर त्यांस आनंद झाला असता. त्यांनीं आपली सेवाचाकरी मोठे आनंदानें केली असती. आमचें खोंपट आपलें आहे. रात्रभर खुशाल राहा.' नंतर तिनें आपल्या सुनेस खाट आणण्यास सांगितलें. त्यावर घोंगडी आंथरली. स्वच्छ पाण्यानें मातीचा घडा भरून आणून ठेविला. वास्तविक पाहूं गेल्यास बाजरीची भाकरी व शेळीचें दूध व ताजा भाजीपाला हाच काय तो गरीबांचा पाहुणचार असतो, पण त्यांत जो खरा अगत्याचा भाग असतो, त्याचा शतांशही ऐश्वर्यानें धुंद झालेल्या श्रीमंतानें केलेल्या पाहुणचारांत नसतो. असो; आमचा पाहुणा या गरीब घरांतील पाहुणचार घेत होता, व खाटेवर बसून तेथील गृहस्थिति पहात होता. वृद्ध सासूची ताबेदारी सुना नोकरांपेक्षां जास्त करीत. नीतीचें शिक्षण पुढील प्रजेस देण्यास ह्मातारीं माणसें सारखा यत्न करीत असतात. सुधारणेचें कृत्रिम स्त्रीशिक्षण कोणीकडे व सासूचें स्वाभाविक शिक्षण कोणीकडे? मुलींचीं लग्नें लहानपणीं करूं नयेत, व केलीं तर त्यांस बाळलग्नें ह्मणतात! दुसऱ्या देशांतील चाली रीती

पाहून त्यांची नकल करतात! परंतु आपली जात, धर्म, आचार, नीति हीं दुसऱ्याचे नकलेनें कशीं रहावीं? शाळेंतील सुधारलेल्या मुलींची मर्यादा व ह्या खोंपटांतील सुनांची मर्यादा त्यांची तुलना कशी होईल? ह्या मुलींनीं डोळे वर करून त्याच्याकडे पाहिलें देखील नाहीं. नवें तितकें चांगलें असें हट्टानें प्रतिपादन करण्यांत ज्यांस भूषण वाटत असेल त्यांस खुशाल वाटो, पण वास्तविक खरें भूषण मुळींच नाहीं. राजपाळानें रात्रभर त्या पर्णकुटिकेंत विश्रांति घेतली. जाते वेळेस त्यानें कांहीं नाणें आपले कंबरेचे दाबांतून काढून मुलींचे हातावर ठेविलें, व त्या वृद्ध बाईची रजा घेऊन तो मार्गस्थ झाला. दोनप्रहरचे सुमारास त्यास एक खेडें दिसलें. या खेड्याचे आजूबाजूस शेतें पेरलेलीं होतीं. गांवानजीक ओहोळ होता. खेड्यांत पन्नास पाऊणशें घरें होतीं. ढोरें ओढ्यावर पाणी पिण्यास येत जात होतीं. त्यांत कांहीं घोडे व घोड्या याचे दृष्टीस पडल्या. तसाच गांवांत जाऊन त्यानें चावडीवर व्यापारी उदमी लोकांचा तपास केला. नंतर गळ्यांतील कंठीचा एक पदर काढला व वाण्यास विकला, व जे रुपये आले ते घेतले. पाटील लोकांस विचारून दोन चांगलीं गरीब व मजबूत घोडीं पाहिलीं. कांहीं कपडे खरेदी केले, आणि दोन्ही घोडीं बरोबर घेऊन परत आलेल्या रस्त्यानें त्यानें आश्रमाचा रस्ता धरिला. एका घोड्यावर स्वतः बसून त्यानें दुसरें घोडें दोरी लावून हातीं धरलें होतें. याप्रमाणें मजल करीत त्यानें दुसरे दिवशीं संध्याकाळीं आश्रम गांठला. चातकाप्रमाणें जिचे नेत्र रस्त्याकडे लागले होते, तिनें त्याचें मुख पाहतांच तिचें मुख प्रफुल्लित झालें. तिनें चटकर उठून घोडीं धरलीं व बाजूचे झाडाशीं बांधलीं. आजूबाजूस चांगली हिरवीं गार पानें होतीं व दूर्वाही होत्या, त्या उपटून घोड्यांपुढें टाकिल्या. राजपाळानें तपस्वीबुवास प्रणाम केला. यशस्वी हो असा त्यानें आशीर्वाद दिला. नंतर या उभयतांनीं रात्र त्याचे सहवासांत

घालविली, व त्याची रजा घेऊन आलेल्या रस्त्यानें जाण्याची तयारी केली. राजपाळानें बरोबर आणलेले कपडे तिला अंगावर घालण्यास दिले. तिनें आपला केशकलाप पठाणाप्रमाणें बांधून वर फेटा बांधला, व तुमान घालून अंगांत कपडे घातले व तपस्वी महाराजांचे आशीर्वाद घेऊन दोघें निघालीं. तपस्व्यानें जाते वेळेस त्यास सांगितलें कीं 'तूं गेल्यावर ही सचित होती. जितकी रूपानें ही चांगली दिसते तितकीच गुणानेंही आहे.' या स्तुतीचा अर्थ आपण समजालें असें राजपाळानें गालांत हंसून बुवास सुचविलें, आणि आपले आशीर्वादानें सर्व चांगलें होणार आहे असें ह्मणून त्यानें रजा घेतली. संसार सोडून एकांत स्थितींत हा तपस्वी रहात होता, परंतु त्या मुलीच्या दोन तीन दिवसांचे सहवासानें त्यासही सहवासजन्य दुःख वाटलें, व एक दोन दिवस त्यास आश्रम उदास भासत होता.

राजपाळानें आणलेलीं घोडीं भाड्याच्या तट्टांसारखीं नव्हतीं. तीं दिसण्यांत अगदीं गरीब असत, परंतु पाणीदार व कसलेलीं होतीं. हे दोघे स्वार आपला रस्ता चालूं लागले. एकास थोडी मिश्रु फुटत होती व दुसरा अगदीं कोंवळा स्वार दिसे. डोंगराचीं एक दोन लवणें त्यांनीं ओलांडलीं, व मधले खोऱ्यांतून आडवा रस्ता द्वारकेचे बाजूचा धरला. एक दोन खेडीं लागलीं तेथे राजपाळानें एक लहान तरवार घेतली, व आपल्या बरोबरच्या वेशधारी स्वाराचे कंबरेस लटकाविली. संध्याकाळीं त्यांनीं एका टेंकडावर झाडाखालीं मुक्काम केला. घोडे झाडाखालीं बांधून गाशे टाकले व त्यांवर तीं विश्रांतीसाठीं निजलीं. कांहीं वेळानें बंदुकीचे आवाज ऐकूं येऊं लागले. बाळस्वार बंदुकीचे आवाजानें दचकून जागा झाला. बेटांतील दरोड्याच्या वेळचे आवाज व आरोळ्या ज्या त्याच्या कानांत भरल्या होत्या, त्यांचें स्मरण होऊन तो घाबरला व ह्मणाला 'या डोंगरावर कशाचे आवाज होतात? मशाली पेटल्याप्रमाणें उजेड दिसत आहे हें काय?' मोठा स्वार ह्मणाला 'घाबरूं नको. आपण जवळ गेलों ह्मणजे

सर्व कळेल.' तिचे मनांत अनेक कल्पना येऊं लागल्या. बंदुकीचे आवाजानें झाडांवरील पक्षी गोंधळून आपले घरट्यांतून बाहेर पडत; व हरणें, लांडगे, कोल्हीं इकडून तिकडे धांवूं लागत. अशा स्थितींत उभयतांनीं रात्र तेथें घालविली. प्रातःकाळचे उजेडण्यानें रात्रीचें भयंकर स्वरूप बदललें. पुनः रस्ता, डोंगर, अरण्य यांची शोभा दिसूं लागली. पुनः त्यांनीं आपला रस्ता डोंगराचे पायथ्यानें धरला. कोठें कोठें रस्ता चुके, पुनः पुढें मिळे. याप्रमाणें ते एका खेड्याजवळ येऊन पोहोंचले. तेथें एक स्वार गोळी लागून पडलेला त्यांस आढळला. घोड्यासही गोळीनें ठार केलें होतें. या स्वाराजवळ एक बंदूक होती. ती राजपाळानें स्वतः घोड्यावरून उतरून घेतली. मेलेल्या घोड्यावर सामान होतें, त्याजवर थैली होती ती पाहिली. उघडून पाहिलें तों आंत कांहीं कागद होते. त्यांत एक कागद कमॅन्डिंग् साहेबाचे नांवचा होता. दुसरा मोकळा कागद—कोणी खानगी पत्र लिहिलें होतें तें यानें वाचून पाहिलें. त्यांत वाघेर लोक डोंगरांत पळाले आहेत, व चोहोंकडून हल्ला करण्याची वेळ मुकरर झाली आहे, अशी त्यास खबर मिळाली. बंदुकीबरोबर त्यास दारूगोळी वगैरे सामानही सांपडलें, त्यामुळें त्यास आनंद वाटला व धीर आला; व तें पत्र जरूरीचें असेल असें समजून तें ज्याचें त्यास द्यावें असा त्यानें निश्चय केला. ह्मणजे आपला प्रवास लष्कराबरोबर करितां येईल, व आपले बरोबरील अबलेचें रक्षणही होईल. हा बेत तिलाही पसंत झाला. थोडा दम आला. दोघेंही त्या जागेपासून घोडे हांकीत चाललीं. दूर तंबू राहुट्या लागलेल्या दिसूं लागल्या. आजूबाजूस पायदळ लागलें होतें, तोफा वगैरे पलटणी लागल्या आहेत, हें सर्व त्यास एक टेंकडीवरून दिसलें. मग हळू हळू छावणीकडे त्यांनीं रस्ता धरला. छावणीपासून थोडे अंतरावर दोघें उभीं राहिलीं. बाजारबुणगे लोक जात येत होते. रसद पोहोंचविण्यासाठीं छोटासा बाजार

लागला होता. चारा जळण वांटण्याची कामदार मंडळींची गडबड चालली होती. दिवाबत्तीची वेळ झाली असून चोहोंकडे स्वयंपाक करण्यासाठीं निरनिराळे ठिकाणीं चुली पेटल्या होत्या. जंगलांतच लष्कर पडल्यानें एकाद्या मोठ्या गांवाप्रमाणें त गजबजलें होतें. शिपाई लोक डाळ चपाती करतांना वाघेर लोकांच्या शूरपणाबद्दल तारीफ करीत होते. कोणी ह्मणत ते आपले वतनाकरितां मरत आहेत. परंतु आपले तरवारीपुढें बिचारे पळ काढतात! कांहीं भले लोक आपले घोड्याचे सामानाजवळ हुक्का ओढीत बसले होते. एक दोन दुसरे स्वार अफिणीचा कुसुंबा काढण्याच्या तयारीस लागले होते. त्यांत एक ह्मणाला 'कालची शिकार कशी साधली? आपण तर अशी बहाद्दरी कधींही पाहिली नाहीं.' दुसरे राव ह्मणाले 'काल आह्मी दुसरे टोळींत कामगिरीवर होतों तेव्हां आह्मांस सांगा.' पहिला ह्मणाला 'वाघेर लोक सर्व बरड्याकडे पळाले. एक वाघेर आमची मोरचेबंदी होती तिकडून जात होता. त्यात पाहिल्यावर आमचे सर्व मंडळीनें कोल्हेकुई करून त्यास घेरलें. त्यामुळें तो त्या मैदानांत उभा राहिला. त्यापाशीं एक तरवार होती. तो सर्व ढालबंद शिपायांस ह्मणाला, तुह्मी शिपायांच्या पोटचे आहांत, मी एकटा आहें. तुह्मी सर्व स्वार आहांत. बंदुकदार भालेकरी आहांत. पण बंदुकीशिवाय आपली बहाद्दरी दाखवा. जो शिपायाचे पोटचा नसेल, त्यानें बंदुक मारावी अशी शपथ त्यानें दिली. आम्ही सर्व स्वार त्याचेकडे पाहूं लागलों. शपथ ऐकून सर्व म्हणाले, या वाघेरड्याची काय बिशाद आहे? त्यानें आपली तरवार म्यानांतून मोकळी केली. वाघाप्रमाणें तो ज्या त्या स्वाराकडे वळून हल्ला करी, त्यामुळें स्वार मागें हटत. फरिदखां, गफुरखां, शेरखां वगैरे पुष्कळ भालेकरी होते, त्या सर्वांनीं एकदम चोहोंकडून त्यावर भाल्यांचा मारा करावा असें ठरवून त्याजवर घोडे घातले. परंतु तो सर्वांचे घोडे चुकवी आणि भाल्यांच्या लेखण्या करी.

[illegible] झालें. एका स्वाराचे पायास जखम झाली. आतां शिपाईगिरीकडे पहात राहिलें तर तो दहा पांच स्वार लोळवील असें सर्वांस वाटूं लागलें. घातलेली शपथ बाजूवर झुगारली, व एका स्वारानें तोडा बंदुकीचे घोड्यावर लावला, व त्याचेकडे बंदुकीचें निशाण धरलें. त्याबरोबर चित्त्यासारखा तो त्याचेवर गेला. बंदुकीवर तरवारीचा असा सफईचा हात केला कीं गोळी कलमेप्रमाणें उडाली. दुसरी बंदूक याचप्रमाणें झाली. एक स्वार या धांदलींत घोड्याखालीं आला. त्या स्वारास तो म्हणाला, तुम्ही पन्नास माणसें असून शपथ मोडलींत! धिक्कार असो तुमचे शिपाईगिरीला. बंदुकीचे बदल्यांत त्यानें स्वारास वार केला असता तर चालतें. परंतु तो म्हणाला, असा हात असावा. अखेर चोहोंकडून स्वार त्याचेवर पडले, व त्यांनीं मोठी गर्दी करून चार तमंचे त्याचेवर झाडले. जखमी झाला तरी त्यानें चार जवान जखमी केले व अखेर तो पडला. त्याची तरवार पाहून सर्वांची तब्बेत खुष झाली. ती तरवार फार चांगली असून सरनौबताकडे गेली. ह्या तरवारीवर सर्व स्वारांचा डोळा होता.' त्यांचे वरील कामदार तंबूकडे जाऊं लागले. गोटांत कोणी परका येऊं नये म्हणून पलटणीचें बिगूल झालें. हजिऱ्यांचीं शिंगें होऊं लागलीं. हा सर्व प्रकार पाहून आपल्या स्वारानें बरोबरचे स्वारास तेथें उभें राहण्यास सांगितलें व पत्र हातीं घेतलें, व तेथून निघून कमँडिंग ऑफिसरचे तंबूचा तपास करून तेथें गेला. पाहरेवाल्यांनीं कागद तंबूत पोंचविला त्यासरसा तो तंबूबाहेर आला, व आणणारा कोण आहे तें पाहूं लागला. कागद कोणीं दिला असा प्रश्न झाल्याबरोबर आपल्या स्वारानें घडलेली हकीकत त्यास कळविली. रस्त्यांत स्वार पडलेला होता, व कागदाची थैली त्याजजवळ होती. त्यावरून हा आणणारा वाघेराप्रमाणें जरी दिसत होता, तरी त्या पक्षाचा नसावा, असें वाटून त्यांनीं त्यास त्याची हकीकत विचारली. त्यानें गायक-

वाड सरकारचा गिराशिया आहे असें कळविलें. व त्याबद्दल ताबेदारी करण्यास तयार आहे असेंही सांगितलें. उद्यां सकाळीं तंबूवर येऊन भेट असें कमांडिंग आफिसराचें बोलणें ऐकून त्यानें सलाम केला व तो परतला. असो; छावणीचे बाजूस थोडे अंतरावर त्यांनीं आपलें घोडे बांधले, चौका लाविला, व दोघांनीं जेवण उरकलें. व घोड्याचे गाशे टाकून छावणीच्या गोष्टी ते बोलत बसले.

फौजेंतील अंमलदार वगैरे मंडळी तंबूत बसून विचार करूं लागली. त्यावेळेस खबर आली कीं, भिवा माणेक याची स्त्री गायकवाडी स्वारांचे हातीं लागली आहे. तिचेकडून तपास करतां अशी खबर मिळाली कीं, सर्व वाघेर लोक बायकांमुलांसुद्धां बरड्याचे डोंगरानें अभ्रपरा या नांवाची अति बिकट डोंगरी जागा आहे तेथें छपऱ्या बांधून राहिले आहेत. गोरियाळीचा काया माणेक आपल्या बरोबरच्या आठ दहा लोकांसह कॅप्टन बार्टन याजकडे येऊन आपलीं हत्यारें त्याचे पुढें ठेवून त्याचे हस्तगत झाला. तसेंच नागेसर येथील मियोसुमाणिया यास एके टोळीनें पकडलें अशी खबर आली. वाघेर लोक तालुकदाराचे हद्दींत निघून गेले आहेत तेव्हां त्यांनीं त्यांचा बंदोबस्त ठेवावा असें सर्वानुमतें ठरलें. नंतर बार्टन यानें आपले सर्व लष्कर घेतलें व तो उखामंडळकडे बंदोबस्तास निघाला. आमचे दोघे तरुण घोडेस्वारही त्या लष्कराबरोबर निघाले. या वेळेस उखामंडळांत कांहीं धास्तीसारखें नव्हतें, त्यामुळें त्यांनीं बेट शंखोद्धार गांठलें. संध्याकाळचा वेळ होता. लढाई होऊन किल्ले विच्छिन्न झाल्यामुळें सर्व मंदिरें, भयाण दिसत. कोटाचा बहुतेक भाग पडल्यामुळें कोटाचे तटावर तोफेचे गोळे लागलेलीं कित्येक भगदाडें पडलेलीं होतीं. बहुतेक गांवांतील द्रव्य लुटींत गेल्यामुळें बहुतकाळची एकत्र झालेली संपत्ति नाहींशी होऊन बेटांतील बहुतेक वस्ती कंगाल

झाली होती. जो तो आपली हीन स्थिति एकमेकास सांगत बसलेला दिसे. हल्ल्यांत कित्येक माणसें जखमी झालेलीं होतीं, त्यांचे नातलग त्यांचे दवादारूंत गुंतले होते. विनाकारण कत्तल करण्यांत जे लोक मेले होते, त्यांचीं बायकापोरें आक्रोश करीत होतीं, व जुलूम करणारांस शिव्या शाप देऊन व तोंडसुख घेऊन समाधान मानीत होतीं. जें शंखोद्धार बेट पूर्वी पवित्र आणि गजबजलेलें लक्ष्मीचें माहेरघर दिसे, तेंच आज ओसाड भयाण दिसूं लागलें होतें. गांवाबाहेर आमच्या नाजुक बाळस्वारानें आपला मर्दानी पोशाख काढला, व पूर्ववत् आपलीं जनानी वस्त्रें परिधान केलीं. गांवचे रस्ते तिचे माहितीचे होते, त्यामुळें तिनें घोडे पुढें चालविले व कांहीं अंतरावर तिचा सोबती मागें चालत राहिला. रस्त्यावर मंदिराचे जवळ तिचें बापाचें घर होतें. आंगण्यांत तिचा बाप खांबल्यावर बसला होता. जवळचे सोप्यांत तिची आई गृहकृत्यांत गुंतली होती. दोघांचेही राहून राहून मुलगी नाहींशी झाल्याबद्दल उद्गार निघत होते. जेव्हां तेव्हां तीं आपले कामधंदे सोडून अश्रु गाळित असत. परमेश्वर रक्षण करील तरच होईल असा द्वारकाधीशावर त्यांनीं आपला सर्वस्वीं भार टाकला होता. जेथें सर्वच समदुःखी असतात् तेथें कोणीं कोणाचें सांत्वन करावें? याप्रमाणें बेटाची स्थिति झाली होती. आपले दाराशीं घोड्याचे पावलांचा आवाज ऐकू आला. तेव्हां बायको आपले नवऱ्यास ह्मणाली 'कोणी पाहुणा आला कीं काय? पहा बरें?' हें ऐकून तो दाराशीं गेला, व पाहतो तों आपली मुलगी घोड्यावरून उतरली आहे, व घोडा दाराशीं बांधीत आहे. उभयतांची दृष्टिभेट होतांच दोघेंही कन्या व पिता एकदम थांबलीं. तिनें बापाचे गळ्यास गच्च मिठी मारली. आनंदानें व झालेल्या गोष्टीचें स्मरणानें त्यांचा गळा दाटून आला. तिनें आपले आंसवांनीं पित्याचीं वस्त्रें भिजविलीं. तो आपले पदरानें तिचे डोळे पुशीत तिला आंगणांत घेऊन

गेला. तिनें बापास सोडलें, व ज्यानें आपलें प्राणरक्षण केलें, व आपलेसाठीं मोठें साहस केलें, तो वीर दाराबाहेर घोड्यावर आहे त्यास आंत आणण्यास कळविलें, व आईचे गळयास जाऊन मिठी मारली. मायलेकींनीं एकमेकींचे आंसवांनीं आपलीं दुःखें धुतलीं. दोघींचेही तोंडांतून एक शब्द निघेना. अखेर आईनें तिचे डोळे पुसले, तिचे केंस कुरवाळिले, आणि दोघीही बसल्या. म्हातारा दाराबाहेर गेला, आणि त्यानें त्या परोपकारी स्वाराचें घोडें हातीं धरलें. त्यानें मोठे मानानें त्या स्वारास खालीं उतरण्यास सांगितलें. तो आपलें घोडें बांधीत असतां म्हाताऱ्यानें त्यास तसें करूं दिलें नाहीं. व त्यानें गड्यास हांक मारून घोड्यांस बांधून चंदीवैरण घालण्याची ताकीद दिली, व त्यास खाटेवर गाशा घालून बसविलें. झालेली हकीगत विचारली तेव्हां तो स्वार म्हणाला 'ती सर्व आपल्या मुलीस माहीत आहे.' **जोधा कुंभाणी** त्याची तारीफ करून म्हणाला, 'आपले उपकार कसे फेडतां येतील ? आपण कांहीं दिवस आपले सहवासाचा आम्हांस लाभ द्यावा.' परंतु त्यानें जरूरीचे कामास गेलेंच पाहिजे असें सांगितलें. आपलें नांव राहण्याचें ठिकाण त्यानें थोडक्यांत म्हाताऱ्यास सांगितलें. मेजवानीची तयारी घरांत झाली. भोजनानंतर त्यानें एक मोत्यांची कंठी त्यास देण्यासाठीं काढली, परंतु तो ती घेईना. मी आपल्या कर्तव्यापेक्षां जास्त कांहीं केलें नाहीं असें त्यानें सांगितलें. सर्वांचा निरोप घेतला, व **बरड्या**कडील लढाईनंतर पुनः भेटेन असें **जोधा**चे आग्रहावरून **राजपाळ** यानें कबूल केलें. त्याची व त्याच्या प्रवासांतील सहचरीची उभयतांचीही विरहस्थिति सारखीच झाली होती, मात्र बाहेर दाखवितां येत नव्हती. ज्याचे बरोबर निर्भिडपणें इतका काळ गेला, त्यास आतां जातांना तिला डोळे भरून पाहतां येईना. लोकाचाराची मर्यादा कांहीं विलक्षण आहे. या अशा मर्यादेबरोबर दुसरे देशचे लोकांच्या मर्यादेची तुलना केली, तर चांगली कोणती हें सांगणें फारसें कठीण नाहीं. तथापि, ज्या मर्यादेचे

परिणाम शुद्ध पवित्र होतात ती, आणि जेथें स्त्रीस्वातंत्र्य आहे तेथें आईबापांच्या देखत सुद्धां त्यांचीं मुलें परकीय पुरुषांची हवी तशी मनसोक्त सभावना करून मोकळीक घेऊं शकतात ती, ह्या दोन प्रकारच्या नीतींत चांगली वाईट ठरविणें सुज्ञ वाचकांवर सोंपवावें हेंच बरें.

## भाग १० वा.

**ठोकरास्वामी** रंगानें श्याम वर्णाचे, शरीरानें स्थूल व भव्य होते. वेदांत, न्याय, व्याकरण, मीमांसा, यांत निष्णात असून चारही शास्त्रांचे शिष्य त्यांचेजवळ पढत असत. हे विरक्त खरे, परंतु स्वभाव राजकारस्थानी असल्यामुळें मुत्सद्दीपणांत ते प्रसिद्ध होते. **उखामंडळांतील** प्रसिद्ध **वाघेर** मंडळी यांस गुरुप्रमाणें मानीत. यांचे राजकारणी प्रगल्भ विचार साधारण नसत. **शिवाजी** महाराजांसारखा जर एकादा दूरदृष्टीचा व भाग्यवान पुरुष पुढें सरकता, तर हे स्वामी त्यास **रामदासाच्या** ठिकाणीं झाले असते, परंतु देशाचे दुर्भाग्यानें अथवा सुदैवानें नवीन तऱ्हेचें शिक्षण लोकांस लागल्यानें असा पुरुष कसा उत्पन्न व्हावा? हिंदुस्थानांतील पश्चिमेकडचें धाम **द्वारका** यांनीं अशाच विशेष हेतूनें तर शोभविली नसेल? सद्धर्माच्या धर्मसंस्थापनेसाठीं **द्वारकेचा** मठ स्थापन करावा, आणि मठाचे संप्रदायाप्रमाणें मांडलिक आणि चक्रवर्ती मंडलाचें गुरुत्व संपादून जो मठाचा पूर्वापार हेतु तो जागृत करून तडीस न्यावा, असा कदाचित् त्यांचा विचार असेल. कारण या हेतूशिवाय दाक्षिणात्यांनीं **सौराष्ट्र** देशांत आपलें आयुष्य भजनपूजनांत घालविण्याचें मनांत आणणें हें बरोबर संभावात नाहीं. कोणत्याही देशांत धर्मास ग्लानि येते, ती आपआपसांत द्वेष उत्पन्न झाल्याशिवाय होत नाहीं. अभिमान वरपंगी नसला म्हणजे

त्याचे जोरावर पाहिजे तीं कार्यें भराभर होऊं शकतात, ह्मणून देशांत धर्माभिमान जागृत असलाच पाहिजे. परराष्ट्राचे तडाक्यांत एकवेळ देश पराधीन झाला ह्मणजे त्यांतील पोटजाति ह्मणजे वर्णाश्रमधर्म यांस जागा कशी रहावी? कन्याकुमारीचे टोंकापासून हिमालयापर्यंत शेंकडो देश, तितक्या निरनिराळ्या भाषा, तितकेच अगर त्यांहून अधिक पंथ, व एकेक पंथांत अनेक पोटभेद होऊन आचारांचे व धंद्यांचे अनेक पोट-विभाग झाले आहेत. परधर्मीयांनीं आपले धर्माचें घोडें ढकलण्यासाठीं अनादि धर्मातील दोष दाखवून अज्ञान वर्गाची गैरसमजूत घालण्याचे सतत यत्न चालू केल्यानें धर्मात द्वंद्वें उपस्थित व्हावींत, व आपआपसांत कलह उत्पन्न व्हावा, व हा कलह माजला ह्मणजे तो पाहून शांततेची तुतारी वाजवून त्यांनीं आपला कार्यभाग झाल्याचा आनंद दाखवावा, व अज्ञानपणाची कमाल मौज पाहत हंसत बसावें, ही शांत काळाची स्थिति या स्वामींसारख्या परोपकारी व स्वतंत्र विचारांचे मूर्तीस कशी आवडावी? जे कोणी लोक यांच्याशीं स्नेहानें वागत, त्यांस दीर्घ कालानें यांचेविषयीं पूर्ण खात्री झाल्यावर यांचेकडून यांचे उदात्त विचार कळत. **मुरलीधरबावा, आपाजी, नाना कप्तान** व इतर शिष्य मंडळी यांचें वैराग्य पाहून त्यांचे सिद्धपणापासून कांहीं प्रसाद व्हावा यासाठीं त्यांस गुरूप्रमाणें मानी, व हमेषा त्यांचे सेवेंत तत्पर असे. पूज्यतेचा ठसा मनावर उमटला ह्मणजे भाविक लोकांचे सर्व विचार त्याच स्वरू-पाचे बनतात. त्यांचे गुणानुवाद गाण्यांत मन तदाकार होतें. असो; शिष्यवर्गाची अशा प्रकारची भक्ति पाहून या भूमींतील अनेक शूररत्नें स्वामींचें गौरव करूं लागलीं होतीं.

आमचा बैरागी बनलेला व प्रियेच्या विरहानें विरक्त झालेला **पत्रा-मल** नदीचे कांठानें प्रवास करीत करीत या **दक्षिणामूर्तीचे** मठांत येऊन राहिला होता. बैरागीलोक हमेष या मठांत जाऊन राहत असत.

मठांत अगर मंदिरांत भिक्षा मिळाली तर ठीकच, नाहीं तर आणखी दोन घरें गांवांत फिरावीं, या रीतीचा हा बैरागी नव्हता. याचें वैराग्य थोडेच दिवसांत स्वामींनीं त्याचे चर्येवरून व स्थितीवरून ओळखलें होतें. तो मठांतील एके ओसरीचे कोंपऱ्यांत पडून होता, तरी **काठी, वाघेर, वाढेल** व इतर लोक स्वामींचे दर्शनासाठीं येत त्यांचें तो निरीक्षण करीत होता. शेजारती झाल्यावर तो मठांत येऊन आपलें खाणें संपवून आडवा झाला होता, इतक्यांत स्वामी फिरत फिरत त्याचेकडे आले, व त्यांनीं याशीं बोलण्यास आरंभ केला. ते म्हणाले 'इतर बैराग्यांप्रमाणें तूं धंदेवाईक बैरागी दिसत नाहींस. तूं येथें आल्यापासून केव्हां केव्हां भिक्षा न मागतां उपासमार करतोस, तेव्हां तुला कांहीं विशेष गोष्टीची अपेक्षा असेल, अगर काळजी लागली असेल, असें माझें अनुमान आहे.' हे त्यांचे तोंडचे शब्द ऐकतांच **पत्रामल** मनांत चपापला, व आपले मनांतील हेतु यांनीं ताडला असावा असें जाणून त्यानें स्वामींस नमस्कार केला. स्वामी म्हणाले 'मला तूं जातीचा वाणी बकाल असशील असें वाटत नाहीं, परंतु तूं **क्षत्रिय** असावास असें वाटतें. अंगास राख फांसल्यानें किंवा हवा तो वेश घेतल्यानें मूळच्या स्वभावांत अंतर पडत नाहीं. तुझ्या स्थितीवरून माझ्या या अनुमानास जास्त बळकटी येत आहे. बाबारे, **क्षत्रियास** कसाही प्रसंग आला, तरी त्यानें वैराग्य-दीक्षेत पडूं नये. इष्ट हेतूचे सिद्धीसाठीं व्यवहारांतील धंदा पत्करावा म्हणजे अनायासें देशाटन होतें. पुष्कळ लोकांशीं ओळखी होतात. त्यांचे विचार कळतात, व आपल्या मनांतील हेतु साहजिक घडून येतो.' हें स्वामींचें संदिग्ध पण उपदेशपर भाषण त्याचें कानीं पडतांच त्याचे मनास उल्हास वाटला. आपण लंगोटी लाविली, राख फांसली, हें आपले जातीस व कुळास न शोभणारें कृत्य केलें याचा त्यास पश्चात्ताप झाला. स्वामी म्हणाले 'हल्लीं धामधुमी सुरू आहेत; शिपाई लोकांचा रोजगार

चांगला पिकला आहे, व अशा धामधुमींतच प्रारब्धाची परीक्षा पाहण्यास फार चांगलें साधन मिळतें.' स्वामींच्या या भाषणावर त्यानें कांहीं एक उत्तर न देतां पूर्वीप्रमाणेंच आपण आपले विवंचनेंत व विचारांत असल्याचें त्यांस दाखविलें. जबाब न मिळाल्यामुळें स्वामी त्यास सोडून पलीकडचे सोप्यांत मठाकडे गेले. स्वामींनीं केलेल्या उपदेशाबद्दल त्यांचे आभार मानीत पन्नामल आपले जागींच राहिला. या वेळेस दहा बारा घटका रात्र झाली असेल. मठांतील दुसरे कोंपऱ्यांत दिवा लिकलिकत होता, तेथें कांहीं माणसें कागद वाचीत होतीं, व एकमेकांशीं बोलत होतीं, त्यांचेकडे जाण्यास स्वामी वळले हें त्याच्या दृष्टीस पडलें. हा कांहीं गांजेकस वर्गांतील वैरागी नव्हता. 'मी येथें आल्यापासून स्वामी कधींही आले नाहींत. आणि आजच अंधारांत या वेळेस माझेकडे कशास आले असावेत? कदाचित् मी जागा किंवा निजलेला हें पाहण्यापलीकडे त्यांचा दुसरा हेतु नसावा' असें त्यास प्रथमतः वाटलें. नंतर तो हळूच अंधारांतून पाऊल वाजूं न देतां दिव्याजवळ जमलेल्या मंडळीस न दिसे अशा जागीं अंधारांत जाऊन उभा राहिला. या वेळेस जमलेले मंडळींत स्वामी जाऊन पोहोंचले होते. सर्वांनीं त्यांस नमस्कार केले, व हरणाचें चामडें पडलें होतें त्यावर स्वामी बसले. त्या मंडळींत एक सातफूट उंचीचा, शरीरानें दृढ, ज्याच्या मिशा व दाढीचे केंस कानांमागें वळले होते, असा सुरजमल नांवाचा बारवटिया होता, तो स्वामींस ह्मणाला:—'जोधामाणेक हा उखामंडळांत राहिलेल्या वाघेरलोकांस नेण्यासाठीं आला आहे. व तो सर्वांस येण्याबद्दल आग्रह करीत आहे,' दुसरा ह्मणाला 'उखामंडळचा बंदोबस्त करण्याबद्दल बार्टन साहेबांकडून जारीनें तजवीज चालू आहे, व जे वाघेरलोक पुनः आपला धंदा करण्यास कबूल असतील त्यांस ते धंद्यास लावीत आहेत.' स्वामी ह्मणाले 'हे टोपीवाले नेहमी शांतता राखण्यास

तयार असतात. **वाघेर**लोकांचे बहादुरीबद्दल व शौर्याबद्दल आतां त्यांची खातरी होण्याचें राहिलें नाहीं. जाहीरनामे लावून गुन्हेगारांस माफ्या देवविण्याच्या खटपटी सुरू आहेत. बरेच लोक या लालचीनें येऊन रुजू होऊं लागले आहेत अशाबद्दलची बातमी साहेबांचे कानांवर जाईल असें करा, ह्मणजे सरकार त्यांस धरण्याची खटपट करणार नाहीं, व त्यांस आपलें काम होईपर्यंत **उखामंडळ** येथें राहतां येईल.' दुसरा ह्मणाला 'हें काम मीच करितों.' स्वामी ह्मणाले 'पूर्वींच मी ह्मणत होतों कीं तुमची बंड करण्याची मसलत अगदीं चुकीची आहे. तुह्मी आपलेवरील राजाचा कल कोणचे बाजूस आहे हें समजल्या-शिवाय या तुफानास आरंभ केला. आपले राजाशीं वैर केलेंत, व इं-ग्रजलोक **आर्यावर्त** सोडून पळून गेले या गप्पेवर तुह्मीं भरंवसा ठे-वलात. असो; जें झालें तें ठीकच. आतां तरी जास्त तुफान न वाढवितां सरकार ज्या अटी करून देत आहे त्या कबूल करा. तेवढ्या तुह्मांस मिळाल्या ह्मणजे पुढें मागें तुह्मांस पाहिजे तेव्हां त्या जोरानें वाढवितां येतील.' जमलेले मंडळीस स्वामींचें ह्मणणें खरें वाटलें, पण समेट करण्याची वेळ राहिली नाहीं असा त्यांनीं हट्ट घेतला, व शरण जाण्यापेक्षां अब्रूनें मरण येणें फार चांगलें असें ते ह्मणाले. यावर स्वामी ह्मणाले 'तुह्मीं **गायकवाडां**चे विरुद्ध वर्तन केलें, त्याचे ऐवजीं जर **गायक-वाडांनीं** तुमचे मदतीनें **उत्तरहिंदुस्थानां**तील चळवळीचा लाभ करून घेतला असता, तर तुमचे शौर्याची, व तुमचे कडें शिपाईगिरीची, प्रसिद्धि झाली असती. परंतु ही कल्पना 'संस्थानिकांचे स्वप्नींही येणें मुष्किल ! हल्लींचे राजकारकीर्दींत नबाब, राव, अमीर, व बहादर, सर्व पिंजऱ्यांतलि पोपटांप्रमाणें वाक्पांडित्यांत आपलें रंगरूप दाखवीत व अलंकाराचे भारांत आपलें पिंजऱ्यांत फिरत आहेत. पिंजरा संभाळतो कोण याची कल्पना त्यांस नाहीं. शांततेचे काळांत शांततेची राज्यपद्धति पाहून

यांत्रिक शक्तीनें विस्मित होऊन लोक सुखावत गेले आहेत. ते याहून-ही जास्त सुखावतील. एकवेळ सौख्याचें वळण लागलें ह्मणजे कष्ट व साहस त्यांस होणार नाहींत. पूर्वजांचे पराक्रमांची त्यांस कशी हौस यावी?' पहिला ह्मणाला, 'आतां रात्र बरीच झाली, महाराजांची रजा ध्या.' स्वामी ह्मणाले. 'हल्लीं लष्कर कोठें पडलें आहे, त्याची संख्या किती आहे, तुमचे लोक किती जमले, व त्यांनीं आपला बचाव कोठें राहून करण्याचें मनांत आणिलें आहे?' सुरजमल ह्मणाला, 'बरड्याचे डोंग-रांतील आभऱ्यावरील बिकट जागेंत वाघेरलोक मोरचेबंदी करून पडले आहेत. जामसाहेबांचे मुलखांतून त्यांस रसिद मिळते. तालुकदार-लोक आपण होऊन त्यांचे वाटेस जात नाहींत. निरुपायानें ते आमचे-शीं सामना करण्याचे येतात' परंतु त्यांचे वकिलास 'तुह्मी वाघेरलोकांस फूस देतां, हातीं आलेले वाघेर सोडतां 'याबद्दल नालस्ती करून धमकी देतात.' स्वामी ह्मणाले, 'जोधामाणेक यानें उगाच येथें उखामंडळां-त राहूं नये. वेळेस धरला जाण्याचा संभव आहे.' हा सर्व वादविवाद पन्नामलानें कोपऱ्यांत उभें राहून ऐकला. 'जोधामाणेक ताब्यांत हो-ण्यासाठीं आला आहे ही खोटी बातमी सुरजमल अंमलदारास कळवील, आणि वाघेरलोक आणखी गोळा करून घेऊन जाईल, व त्याचा परिणाम सरकारांस अनिष्ट होईल. आपण गायकवाड सरकारचे आहोंत, तेव्हां ही खबर त्यांस दिल्यानें चूक होणार नाहीं.' या विचारानें तो हळूच आपले जागेवर ऐकत राहिला. एक ह्मणाला 'गायकवाडांविरुद्ध तुफान करूं नका असें स्वामी पूर्वींच आपणांस ह्मणत होते, परंतु मुळूमाणेक व रेवामा-णेक यांचे डोक्यांत जें स्वतंत्रतेचें वारें भरलें होतें तें जोधामाणेक फिरवूं शकला नाहीं. त्यांचे पोक्त विचार तरुण मंडळीनें ऐकले नाहींत या धांदलींत स्वामींचे मसलतीप्रमाणें तसा जर कोणी आपले लोकांत पुढारी असता, तर आपले लोकांनीं गहजब करून सोडला असता. टोपी-

झाले आणि आमचे गायकवाड सरकार एक, यामुळें आमचा फडशा पडला. शेंकडों चांगलीं माणसें यांत खर्च झालीं. आमचाही फायदा झाला नाहीं, व सरकारनेंही आपला फायदा करून घेतला नाहीं.' पहिला ह्मणाला. ' वसईचे वाघेर व जोधामाणेक यांचे सोयरिकीचें मूळ या दंग्यास कारण नाहीं काय ? वसईचे वाघेर लोकांची मुलगी आम्रा-पूरचे जोधाजींनीं पतकारिली असती ह्मणजे वसईवाले आयते सखाराम बापूचे सल्ल्यानें होते! जोधाजीचा मकराणी जामीन होता त्याजवर सक्ती केली, तेव्हां अर्थात् जोधाजीस मकराण्याचा पक्ष स्वीकारावा लागला. इतकी अक्कल आपले लोकांत असती व स्वामींचे विचारानें चाललों असतों, तर असा प्रसंग कां गुदरला असता ? आतां अंगावर येऊन बेतली तेव्हां स्वामींची आठवण ! द्वारकेचे हल्ल्याचे वेळीं स्वामींचा मठ संभाळण्याचें स्मरण राहिलें नाहीं, व आतां स्वामींची सल्ला मागण्यास आलों आहोंत. ते मनाचे मोठे दयाळू आहेत ह्मणून क्षुल्लक गोष्टी ते पाहत नाहींत. ' स्वामी ह्मणाले, ' आमची स्तुति नको, ज्यांत पुष्कळांचें चांगलें होणार तें आह्मांस सर्वदा इष्ट असतें. आमची नेहमीं ईश्वरापाशीं प्रार्थनेंत हीच इच्छा असते कीं आपला देश स्वतंत्र असावा; क्षत्रिय राजे व्हावेत; त्यांनीं गाई, ब्राह्मण, भाट, चारण यांचें रक्षण करावें. सनातन वैदिक धर्माचा सर्वांनीं अभिमान बाळगावा. परधर्मी लोकांचा त्यांचे हातून पाडाव होत जावा. वर्णाश्रमाप्रमाणें साधु, संत, बैरागी, यांनीं भजनपूजनांत कालक्षेप करावा. परंतु हल्लीं तर, प्रत्येक वर्णाश्रमाप्रमाणें जाति घ्या, अगर यवन अगर त्यांतील पोटजाती घ्या, त्यांचे सनातन आचार व त्यांचे धर्म आज राहिले आहेत काय ? जें आपण पाहत आहोंत तें सध्यां आपणांस सुखावह वाटत आहे, पण परिणामीं तें तसेंच असेल काय? बाहेरून दाखवितात तोच हेतु आंत आहे काय ? कोणाचे धर्मांत आह्मी हात घालीत नाहीं असें गोड बोलून त्याचे टउल

धर्मांतर करण्याचीं दुकानें परस्थांनीं घातलीं नाहींत काय? नाशिका-
जवळ शरणपुरीसारखीं गांवें वसलीं आहेत हा त्यांचाच परिणाम नाहीं
काय? आगगाड्या व दवाखाने यांपैकीं पहिल्यांत स्पर्शास्पर्श व दुसऱ्यांत
पेयापेय या दोहोंचाही निकाल झाला आहे. पूर्वीं पन्नास साठ कोसांची मजल
मारणें हें साहजिक वाटत होतें, पण आतां अग्निरथाचा प्रवास सुखावह
वाटूं लागला आहे. कांहीं काळानें तुह्मी पहाल, आपणास हजार पांचशें
कोसांची मुशाफरी मागें होत होती, किंवा दक्षिणेंतील भिवरथडी व
गंगथडी, सौराष्ट्रांतील काठेवाडी व कच्छी घोडे, अटकेवर पाणी
पीत होते, या गोष्टींचें कोणास स्मरणही नाहींसें होईल. शारीरिक श्रम
कमी होऊं लागले ह्मणजे त्याचप्रमाणें शक्तीचा ऱ्हास होईल. या श्रमाचा
मोबदला तर देशांतून गेलाच. हळूहळू विटाळाची कल्पना नाहींशी झा-
ली ह्मणजे वर्ण बुडतील, त्याबरोबर आचार जाईल, व मग आपला धर्म
कसा होता, एवढेंच नाहीं, तुमची जात व देश विचारला तर तें तुह्मांस
सांगतां येणार नाहीं! असो; याची काळजी वाहणारा निराळा आहे.
त्यानेंच धर्मस्थापनेसाठीं अवतारमालिका घेतली आहे! हे अवतार परमेश्वर
माणसांतच घेईल, व त्यांचें दैवत माणसांतच कोणास तरी येईल. मात्र तें अम-
केच जातींत येईल असें सांगतां येणार नाहीं.' एकजण ह्मणाला 'आपण
ह्मणतां त्यांत एकही अक्षर खोटें नाहीं, परंतु हे विचार सर्वांचे मनांत एककाळीं
घोळले पाहिजेत. मतभेद व द्वेष यांचा नाश होऊन सर्वांचें संमेलन झालें
पाहिजे.' स्वामी ह्मणाले, 'काळ आहे; कोणचे वेळीं कसे पुरुष उत्पन्न
होतात तें कळत नाहीं. शिवाजी, बाजीराव बल्लाळ, महादजी शिंदे,
जानोजीराव भोंसले मल्हारराव होळकर, दमाजीराव गायक-
वाड, तसेच पटवर्धन, गोखले, व राजपुतान्यांतील रजपुत राजे हे स
र्ववीर एककालीं जमले; त्यांची देशमातेची सेवा व शौर्य ऐकिलें ह्मणजे
आपले अंगांत शौर्याचें वारें भरतें, व त्यांचे गुणांबद्दल मान डोलवावी ला-

गते. यासारख्या वीरांनीं देशहिताचीं मोठमोठीं कृत्यें केलीं तीं कशाच्या जोरावर? एका स्वार्थबुद्धीच्या त्यागावर. हा त्याग नसेल तर कोणाचेही हातून कांहीं होणार नाहीं. जेव्हां स्वार्थबुद्धि उत्पन्न होते तव्हां समुदायाचें हित कसें रहावें? पडत्या स्थितींत जें ज्याचें हातीं राहिलें तें स्वार्थबुद्धीनें सांभळलें गेलें. यावेळेस स्वतःचे हितानें एकंदर देशाचें अहित होईल ही बुद्धिही कोणास राहिली नाहीं, त्यामुळें राहिलेले संस्थानांस आज परक्यांचे कृपेवर दिवस काढावे लागत आहेत. पूर्वीचें आपलें शौर्य व तरवारी यांचें आतां कोणास तरी स्मरण राहिलें आहे काय? या संस्थानांपकीं आज कित्येक संस्थानें अदृश्य देखील होऊन गेलीं आहेत! जगाचे राहटीप्रमाणें अशा उलाढाली होणारच.' याप्रमाणें मठांतील वादविवाद संपला, व जमलेल लाक आपआपले कामास चालते झाले.

जमलेली मंडळी निघून गेल्यानंतर **पत्रामलानें** ती रात्र पुढील विचारांत घालविली, व दुसरे दिवशीं आपले जवळील थोडें सोनें विकून आपल्याला शोभतील असे कपडेलत्ते व संरक्षणासाठीं तरवार घेतली. त्यानें दुसरे रात्रीं **गोमतींत** स्नान करून आपला वैराग्याचा वेश बदलला, व **भाणवड** गांवाकडे असलेल्या छावणीचा रस्ता धरला. एक दोन मजला गेल्यावर पूर्वीं जीं आपलीं माणसें तो एका खेड्यांत ठेऊन गेला होता तीं त्याला वाटेंत निराळ्या गांवीं भेटलीं. त्यांपैकीं कांहींजण त्यास ह्मणाले 'आजपर्यंत आपली वाट पाहिली. आजूबाजूस वीस पंचवीस कोसांत आपला तपास केला. आपलेकडून खबरबात मिळाली नाहीं, दिलेली खर्चाची रकम सरत आली, त्यामुळें निरुपायानें आपले गांवीं जाण्यास निघालों. कालच या खेड्यांत मुक्कामास आलों, तों आज आपली गांठ पडली. आनंद झाला.' नंतर **पत्रामलानें** त्या खेड्यांत एक दिवस राहून विश्रांति घेतली. एक गडी व घोडें आपले बराबर ठेवलें, व बाकीच्यांस पत्र

देऊन घरीं रवाना केलें. आपलीं माणसें भेटलीं, बसण्याचें घोडेंही आलें, त्यामुळें प्रवासाच्या तयारीचें आयतेंच साधन झालें. रात्रीं जेवणखाण आटपल्यावर आपल्या घोड्याच्या गाशावर सामानास टेंकून तो निजला. धर्मशाळेच्या पडवीखालचे बाजूस घोडें बांधलें होतें तेथें गडी निजला. नंतर पडल्या पडल्या त्याचे विचार सुरू झाले. 'वैराग्याचा वेषानें नदीचे कांठीं लंगोटी लावून जे कष्ट भोगले ते सर्व फुकट झाले. जिचेसाठीं कष्ट भोगले तिचाही शोध लागत नाहीं, परंतु जें काम आपण हातीं घेतलें आहे तें आपल्या अन्नदात्याचे हिताचें आहे. आपले वडिलांनीं अशींच त्यांचीं कामें करून वतन संपादन केलें आहे. त्याचा उपभोग आज आपण घेत आहोंत. तेव्हां प्रथम हातीं घेतलेलें काम पार पाडावें, व नंतर आपले प्रियेचे शोधास लागावें' असा त्यानें निश्चय केला. दुसरे दिवशीं आपले घोड्यावर बसून त्यानें मजल सुरू केली. एक दोन मजलांत त्यास ह्मणण्यासारखें विशेष आढळलें नाहीं. तिसरे दिवशीं संध्याकाळीं त्यास बरेंच मोठें एक खेडें लागलें. गांवाबाहेरील धर्मशाळेंत त्यानें आपला मुक्काम ठेविला. गड्यानें घोड्याच्या चंदीवैरणीची तजवीज लाविली, व शिधा आणून स्वयंपाकाची सिद्धता केली. भोजनोत्तर खेड्यांत फिरून यावें अशा हेतूनें तो गांवांत फिरण्यास निघाला. यावेळेस दहा बारा घटका रात्र झाली असेल. एके घराचे कोंपऱ्याजवळ हा आला. त्या घरास पुढचे बाजूस दोन कोंपऱ्यावर दोन बंगले होते. एके माडींतून दुसरे माडींत जाण्यास सज्जाची वाट होती. त्या घरांत लगबगीनें कोणी शिरला हें त्यानें पाहिलें, तेव्हां ही खटपट काय आहे ती समजण्याची त्यास जिज्ञासा उत्पन्न झाली, ह्मणून तो त्या घराच्या समोर एके घराचे ओटीवर बसला. या वेळेस गांवांत सामसूम होतें. रात्रीचे अंधारांत कुत्र्याच्या भोंकण्याशिवाय दुसरें कांहीं ऐकूं येत नव्हतें. लगबगीनें घरांत शिरलेला मनुष्य बाहेरचें दार बंद करून सज्ज्यांत आला. दोहोंबाजूचे माड्यांतून दोहोंबा-

जूनें सज्जांत दोन तरुण स्त्रिया आल्या, व त्या दोघी त्यास आपले माडीकडे येण्याबद्दल आग्रह करूं लागल्या. त्यांत जी तरुण व रूपानं थोडी दुसरीपेक्षां बरी होती तिचेकडे हा मनुष्य वळला. पत्रामलास हें विश्वयोषितचें घर असावें असें प्रथम वाटलें; परंतु पुढें काय होतें तें समजेपर्यंत तो तथें स्वस्थ बसला. तो तरुण गृहस्थ त्या युवतीबरोबर हांसत खिदळत माडीवर गेला, व थोडे वळानें विडा चघळीत चवळीत पुनः सज्ज्याचे दाराशीं आला. इतका वेळ दुसरे माडींतील स्त्री जागचे जागीं उभी होती ती हा गृहस्थ बाहेर आलेला पाहून त्यास उद्देशून ह्मणाली, 'जमीने सो पग जवुं ह्मणजे भोजनानंतर शतपावली करावी असा वडिलांचा उपदेश आहे, एवढेंच नाहीं, तर वैद्यशास्त्रांतही शतपावलीचे गुण वर्णिले आहेत.' या गृहस्थाचे मागें ती तरुणी उभी होती त्यामुळें या प्रश्नाचें उत्तर त्यास कांहीं देतां आलें नाहीं, पण त्या स्त्रीस सवतीमत्सर कोठून सहन होणार! तिनें चटकन उत्तर दिलें. 'अशा उपदेशानें कुठें होतें काय? नुसत्या शतपावलीचें महत्व केव्हां? न जो पथारी होय. ज्याला नरम बिछाना मिळत नसेल त्यानें खुशाल शतपावल्या कराव्या.' हें मर्मभेदक भाषण पहिलीचे कानावर गेलें मात्र, तोंच ती झटकन ह्मणाली 'अजून तुझें वय लहान आहे. जगाचा अनुभव तुला कोठून असणार? पथारी उपजावे रोगने. जेवण झाल्यावर लगेच वामकुक्षि केली तर त्यापासून रोग होतात हें कुठें तुला ठाऊक आहे! व तुला कुठें त्यांचे शरीराची काळजी आहे!' असें तिचे तोंडांतील बोलणें पुरें झालें नाहीं तोंच ती तरुणी फुटाण्यासारखी नाचूं लागली. व ती ह्मणाली, 'पुरे, पुरे, काळजीनें किती वाळली आहेस? एवढी काळजी असती तर काय पाहिजे होतें? मग मीच कशाला पाहिजे होतें? सुख लागेना ह्मणून तर मला केली. अग, नुसतें बिछान्यावर लोळल्यानें रोग होतील हें मला नाहींका समजत? परंतु तें केव्हां! न मळे वैरी तोय. त्या बिछान्यावर प्रेम कर-

णारी भार्या नसल तर तूं ह्मणतेस तें खरें शोभेल. अशा लाघवानें कां तें होईल ? ते सर्व तुझे खेळ समजून आहेत. माझे वाटेस जाऊं नको, नाहीं तर तेही मला पुढें आणावे लागतील.' या बोलण्यानें दुसरी स्त्री मनांत खजिल झाली. कारण प्रेमावांचून व्यर्थ. तिनें आपलें माडीचें दार लावून बंद केलें, व या तरुणीनें आपल्या साथीदाराचा हात धरून त्यास माडींत ओढलें. दोन बायकांचा तमाशा हा पाहून **पत्रामल** दंग झाला. एकच बायको पुरे असें लोक म्हणतात तें खोटें नाहीं. एकच प्रेम दोहों ठिकाणीं कसें राहूं शकेल ? एकच वस्तु दोहों ठिकाणीं पूर्ण रीतीनें राहूं शकणार नाहीं. या पाहिलेल्या गमतीचा विचार करीत करीत तो पुनः धर्मशाळेंत आला. गडी बिछाना घालून धन्याची वाट पहात बसला होता त्यावर **पत्रामल** निजला, व गडी आपल्या घोड्याजवळील आगटीकडे विश्रांतीला गेला. बिछान्यावर पडल्यावर **पत्रामलाचे** विचार पुनः आपल्या हरवलेल्या रत्नाकडे लागले. तो म्हणाला, 'मिळेल तर तेंच रत्न या आयुष्यांत सुख देण्यास पुरें आहे. तिचे प्रेमानें माझें मन गुंतविलें आहे. तिचा शोध न लागला तर तसेंच आयुष्य घालवीन. परंतु दुसरे स्त्रीची इच्छा नको, व हा तमाशा नको. ज्या ठाकुरांस व राण्यांस पांच दहा कबिले असतील त्यांची काय फजिती ! कित्येक राव असे आहेत कीं, त्यांस आपल्या राण्या किती आहेत ह्याची खबरही नसते. कोण ही दुर्दशा !' असो; अशा प्रकारच्या विचारमालेंत व **पाचबाचे** ध्यानांत तो झोंपीं गेला.

---

## भाग ११ वा.

संकटें येऊं लागलीं ह्मणजे मनाचा उल्हास कमी होत जातो. चिंता वाढूं लागली ह्मणजे चातुर्य जातें. दुःखांनीं शरीर कृश होतें. कांहीं भयंकर

अनिवार्य प्रसंग ओढवणार असला ह्मणजे त्यापूर्वी मनास अनेक प्रकारची उदासीनता भासूं लागते. ज्या वस्तु प्रिय असतात त्या अप्रिय वाटतात. मनाची स्वस्थता नाहींशी होऊं लागते. जिवास हुरहुर लागून कोणतेही विषयांत आनंद नाहींसा होतो. रात्रीं झोंप स्वस्थ न येतां मन बहकून जाऊन नानातऱ्हेचीं दुःस्वप्नें पडतात, व त्यामुळें मन भेदरून पुनः सर्व दिवस निरुत्साहांत जातो.

पोक्तवयाचीं युग्में संसारक्रमणाच्या विचारतरंगांत अनेक बेत ठरवीत असतात. सुखदुःखांचे विभागी होऊन पुनः संसारयात्रा क्रमण्यासाठीं हे दोन्ही देह एकवटून उभयतांची मजल एकमेकांचे मदतीनें चक्रासारखी चालत असते. पाचवाचीं मातापितरें याच रीतीनें आपलें आयुष्य कंठीत असत. पाचवा निवून गेली, त्या रात्रीं तिचा पिता दररोजचे रीतीप्रमाणें आपल्या प्रियपत्नीचे महालांत गेला. पहातो तों ती गाढ निद्रेचें मिष करून बिछान्यावर निजलेली आहे. शय्यामंदिरांत रोजचेप्रमाणें ती नेहमीं वाट पहात तत्पर असावयाची, त्याचे ठिकाणीं आज त्यास पोक्त वयांत हा नवीनपणा दिसला. कदाचित् प्रकृति नादुरुस्त असेल असें वाटून तो जवळ गेला. तिचे कपाळास हात लावून पाहतां तें संतप्त झालेलें त्याचे हातास लागलें. त्यावर घाम आलेला होता तो त्यानें रुमालानें पुसला. श्वासही उष्ण वाहत होता, त्यामुळें निद्रिस्त आहे असें समजून तो जवळ बसला, आणि पलंगाजवळ असलेला हुक्का ताजा करून व नेचा तोंडांत धरून खोलींतील दिव्याचे मंदप्रकाशांत तो तिचेकडे पहात राहिला. तिचे तोंडांतून अस्पष्ट शब्द निघाले त्यामुळें ती झोंपेंत बरळत असेल तें ऐकावें, ह्मणून त्यानें हुक्क्याचे गुडगुड शब्दही थांबविले., व पुनः ती काय बरळते याकडे तो लक्ष लावीत बसला. झोंपेंत ती आपले पतीवर आलेलें मोठें संकट पाहून बावरलेली दिसली. रणांत आपला [illegible]

लढत आहे; त्याचे अंगावर जखमा झाल्या आहेत; शत्रूनें त्यास पकडून चतुर्भुज केलें आहे;—असें तिला वाटून झोंपेंतच दीनवाणीनें आपले पतीस जीवदान द्या ह्मणून तिनें पदर पसरला, व मोठ्यानें दुःखाचा हुंदका येऊन ती रडूं लागली. तिचे शब्द कानीं पडतांच तिचा पति आपल्या नेचा दूर करून तिचेजवळ गेला, व त्यानें तिचे तोंडावर हात फिरवून पाठ थोंपटली. 'मी जवळ असतांना तुला भय कशाचें? जागी हो, जागी हो.' असें ह्मणून त्यानें तिला हालविलें. एकदम भयानें ती ओरडली, व डोळे उघडून तिनें आपले जवळ आपला पति बसला आहे असें पाहून त्याचे गळ्यांत मिठी मारली. त्यानें पुनः 'जागी हो, स्वप्नांत काय दिसलें तें सांग पाहूं?' ह्मणून तिला धीर दिला, व तो ह्मणाला, 'रजपुतांच्या बायका असें स्वप्न पाहून घाबरत नाहींत.' परंतु तिचे तोंडांतून एक अक्षरही निघेना. ती भयानें त्याचे अंगास बिलगली, व पुनः पुनः त्याजकडे डोळे लावून पाहून आपण झोंपेंत नाहीं, व आपण पाहिलें तें तें स्वप्न आहे, अशाबद्दल खातरी करून घेतल्यावर ती थोडी दूर सरली.

या वेळेस दोनप्रहर रात्र होऊन गेली होती. कंठ दाटून येऊन कांहीं वेळ ती गप्प राहिली. अखेर मोठे धैर्यानें तिनें पाहिलेलें स्वप्
पतीस सांगितलें; व असलें दुष्ट स्वप्न कधीं पडलें नव्हतें.
तरी करावी असें ती ह्मणाली. तें ऐकून तिचे मनास
तो ह्मणाला, 'स्वप्नें बायकांस व मुलांसच जास्त
मन अज्ञानपणानें कोंवळें असतें, व दुसऱ्याचें
सतें. त्यामुळें एकाद्या पाहिलेल्या अथवा ए
वर जें चित्र उमटतें, त्याचाच मूळ पा
इमारत वर उभी होते. असल्या स्व
ठेवीत नाहींत. कदाचित् तुला

मनांत आली तरी आपली जात रजपुताची आहे. बिछान्यांत रोगानें झिरपत पडून मरण्यापेक्षां रणामध्यें मृत्यु येणें फार मोठे पुण्याईचें काम आहे. ईश्वरी संकेताप्रमाणें ज्या ज्या गोष्टी होणार असतात त्या घडत असतात, परंतु त्या घडण्यापूर्वी जाणण्याचें मनुष्यास सामर्थ्य नाहीं. तरी पण मनुष्यस्वभाव आपले बुद्धीप्रमाणें व शक्तीप्रमाणें यत्न करीत असतो. त्यापेक्षां तो जास्त कांहीं करूं शकत नाहीं.' इतकें बोलून तो कांहीं वेळ थांबला, व पूर्वीच्या कांहीं गोष्टी सांगितल्या असतां तिचें मन अन्य विषयाकडे वळेल, निदान हल्लीं वाटत असलेली भीति तरी ती विसरेल, असें वाटून, तो पुनः बोलूं लागला. 'सन १८०१अगर१८०४ सालीं मी चोवीस पंचवीस वर्षे वयाचा असेन, ते वेळेस मुंबईच्या एका व्यापाऱ्याचें गलबत द्वारकेच्या बंदरांत वाघेर लोकांनीं लुटलें. त्यांत एक इंग्रज जातीची स्त्री हातीं लागली. तिला त्रास देऊन शेंवटीं तिला त्या लोकांनीं समुद्रांत ढकललें. ही बातमी जेव्हां मुंबई सरकारांस कळली, तेव्हां लष्करी आगबोटी द्वारकेकडे रवाना झाल्या. उखामंडळचे तालुकदारापासून या कृत्याचा बदला घ्यावा असा सरकारचा हुकूम होता. परंतु त्या वेळेस वाघेर लोकांचाच समुदाय व जोर फार मोठा होता, त्या घमंडींत त्यांनीं त्यांस दाद दिली नाहीं. तेव्हां बडोदें सरकारचा प्रतिनिधि विठ्ठलराव देवाजी मोठा मुत्सद्दी व बहादूर होता, त्याचे मदतीशिवाय वाघेर लोकांपुढें टिकाव लागणार नाहीं असें इंग्रज सरकारांस वाटल्यावरून गायकवाड सरकारांकडून विठ्ठलरावांस त्यांनीं फौजेसुद्धां मदतीस मागितलें. कर्नल वॉकर यास फौज देऊन त्यांचे बरोबर मदतीस पाठविला होता. त्यांनीं काठेवाडावर मोहिम केली व सर्व काठेवाड हालकून सोडलें. माळिया येथील तालुकदारांचें बंड होतें तें त्यांनीं सहज मिटविलें, आणि उखामंडळाकडे फौजेचा रोंख फिरविला. उखामंडळ

ताब्यांत घेतलें. **पोशित्रा** आणि **बेट** येथील लोकांस जेर केलें. त्यांचेकडून घास, दाणा घेण्याचा ठराव केला. गलबत लुटल्याचे नुकसानीबद्दल एक लक्ष पंधरा हजार रुपये घेतले, व पुनः चोरी, लूट न करण्याबद्दल **सदाराम भंडारी** व दुसरे अब्रूदार लोक यांस जामीन घेतलें. इतकें जरी झालें होतें, तरी आमचा नेहमींचा बारवटिये करण्याचा बाणा, तेव्हां स्वस्थ कसें बसवेल! पुनः ते करार आह्मी विसरलों, व पूर्ववत् जमिनीवरील व पाण्यावरील लुटीच्या चोऱ्या सुरू झाल्या. शेंवटीं **इंग्रज** लोक या **वाघेर** लोकांस कंटाळले. **द्वारका** हिंदु लोकांची प्रसिद्ध पवित्र जागा असल्यामुळें **गायकवाड** सरकारांस हें स्थळ फार महत्वाचें वाटत होतें, तेव्हां सन १८१६ त **कर्नल स्टानहोप** हा आपलें लष्कर घेऊन **उखामंडळांत** आला. **विठ्ठलराव देवाजी** यांनीं **गायकवाडी** लष्कर घेऊन **सरायाचे** बंदरांत तळ दिला. **वाघेर** लोकांशीं पुनः या वेळेस थोडी चकमक झाली, व शेंवटीं **द्वारका** सर झाली. चौदा महिनेपर्यंत **सुंदरजी शिवाजी** वहिवाटदार होता, व त्यापुढें **उखामंडळ द्वारके**-सुद्धां **गायकवाड** सरकारचे स्वाधीन **इंग्रजांनीं** केलें. **उखामंडळांतील** तालुकदारांच्या जिवाई अथवा वतन नेमणुकी कायम ठरविल्या, व फक्त **पोशित्र्याचे** तालुकदाराचा गिरास कायम ठेवून त्यानें **गायकवाडाचे** ताब्यांत रहावें असें ठरविलें. सन १८१८ त पुनः **पत्रामल माणेक** यानें तुफान केलें. १८२० त बंड झालें. त्यांत पाहिला **मुळूमाणेक** व **वेरशी माणेक** हे पडले. **कॅप्टन मॅरेट** याच लढाईंत कामास आला. ज्या वेळेस अंगांत शक्ति असते, ताजें रक्त चढत असतें, त्या वेळेस माणसास दुनयेची फिकिर नसते, त्या वेळेस मीं किती मोहिमी केल्या! कित्येक गोरे मारले! कित्येक छाप्यांत कत्तली उडविल्या! केलेलीं कृत्यें आज डोळ्यांपुढें दिसत आहेत. **दक्षिणेंतील मराठे, परभू, ब्राह्मण** हे **गा**-

**यकवाडांचे** लष्करांत पुष्कळ असत, परंतु तेही मोठे कट्टे तरवारबहाद्दर. आह्मी **वाघेर** लोक आमचे वतनासाठीं लढतों, परंतु हे लोक आपला मुलूख सोडून नोकरीसाठीं मोठ्या बहादुऱ्या करतात, व आपले धन्याचे कार्यासाठीं निमकहलाली करतात याचें आश्चर्य वाटतें. आतां देखील ते लोक स्वस्थ राहतील असा त्यांचा जातिस्वभाव नाहीं. परंतु **काठेवाडभर स्वामीनारायण** यांनीं आपला पंथ सुरू केला आहे. चोहोंकडे मंदिरें स्थापिलीं असून **गंधेरा, मुळी, वर्ताळ** या ठिकाणीं त्यांनीं मठ स्थापन केले आहेत. आपले देशांतील पुष्कळ **रजपूत, काठी** व **पाटील**लोक त्यांचे अनुयायी झाले आहेत. त्यामुळें ते आज निर्माल्यवत् झाले आहेत. परंतु हे **वाघेर**लोक त्यांचे उपदेशास जुमानीत नाहींत; व पुढें देखील हे त्यांचे अनुयायी होतील असें वाटत नाहीं. चोहोंकडे टोपीवाल्यांचे राज्यांत सर्व **काठेवाडां**तील तालुकदार शांततेनें दिवस काढीत आहेत. परंतु **उखामंडळ**चें हवापाणीच विचित्र आहे. आमच्या लोकांस शांततेचें आयुष्य ह्मणजे एक प्रकारची शिक्षा वाटते. हल्लींच पहा, सर्व **उखामंडळ वारवटिये** आणि लढाया यांनीं त्रस्त झालें आहे. मुलखांत लोकांचे जीव धोंक्यांत पडलेले वाटतात, ते आज काय स्वस्थ बसले आहेत? छेः, तसा त्यांचा स्वभावच नाहीं. आमच्या तारुण्याचे दिवसांची आठवण झाली ह्मणजे अंगांत वारें भरतें. परंतु वृद्धावस्थेमुळें गात्रें निर्बळ होतात, मनाचा जोर कमी होतो.' या हकीकतीनें तिला पडलेल्या स्वप्नाचा विसर पडला. नंतर संसारांतील सुखदुःखाच्या गोष्टी सांगत दोघेंही झोंपीं गेलीं. रात्रींचे थोडे जाग्रणानें दोघांसही सकाळीं उठण्यास थोडा उशीर झाला. नवा ठेविलेला गडी गेल्यामुळें बाकीचे चाकर कुचरपणानें काम करण्यास लागले होते. घोड्याचे खरारे व अंगणांतील झाडलोट तेवढे वेळांत दिसण्यासारखी अव्यवस्थित झाली होती.

वृद्ध ठकराणी उठून आपले गृहकृत्यास लागली. परंतु रात्रीचे स्वप्नामुळें तिचें शरीर शिथिल होऊन गेलें होतें. घरांतील मुलगी उठून वेणीफणीसाठीं नेहमींप्रमाणें या वेळेस आली पाहिजे, परंतु डोक्यांत एक वेळ काळजीनें आपलें ठाणें बसविलें ह्मणजे शारीरिक क्रिया चुकूं लागतात, चुकल्या तरी त्या कळत नाहींत, व मन ज्या विषयांत गुंततें त्यांत तें तदाकार होतें, अशा प्रकारच्या स्थितींत ती असतां मोलकरीण कांहीं कामासाठीं पुढें आली. तिला पाहून ठकराणीस आपल्या नित्यकृत्याची आठवण होऊन पाचवा अद्याप निजली आहे काय असें तिनें तीस विचारलें. मोलकरीण ह्मणाली कीं, त्या आपले जवळ बसल्या असतील असें समजून मी पाहण्यास आलें. स्वप्नांतील विचारांनीं ठकराणीचें मन उदास झालें होतें, व कांहीं तरी संकट दुःस्वप्नानें ओढवेल अशी तिला काळजी वाटत होती. पण ते विचार हे शब्द कानीं पडतांच विजेप्रमाणें नाहींसे झाले. मुलगी यौवनदशेंत आहे ह्मणून तिचे लग्नाबद्दल स्वतः ती आपले नवऱ्याजवळ कुरकुर करीत असे. परंतु स्थळाची योजना होईल तेव्हां खरें असें नेहमीं बोलणें होत असे. मुलगी यौवनदशेंत येण्यापूर्वी विवाहित करणें फार चांगलें असें ती आपले पतीशीं नेहमीं ह्मणत असे. आणि एका अर्थानें तिचें हें ह्मणणें योग्यच होतें. कारण एक वेळ स्त्रियांस ती दशा प्राप्त झाली ह्मणजे त्यांच्या नीतीचें उल्लंघन होण्यास वेळ लागत नाहीं. मुली आईबापांचे विचारावर पति मिळण्यासाठीं स्वस्थ असतात, परंतु शरीररचनेच्या नैसर्गिक क्रियेप्रमाणें जी गोष्ट ज्या वेळेस झाली पाहिजे, त्या वेळेस ती न झाली तर अनर्थ होतात. अशा अनर्थांची बाललग्नाशीं तुलना केली तर बाललग्नापासून असे अनर्थ कमी होतील हें उघड आहे. आपल्या लोकांत ब्राह्मविवाह श्रेष्ठ मानला आहे याचें कारण तरी हेंच.

ठकराणीनें मुलगी उठली की नाहीं तें पहा असें मोलकरणीस दरडावून सांगितलें. मोलकरीण तळघराकडे गेली, पण ती परत येईपर्यंत आईचे मनांत भलभलत्या अनेक कल्पना येत होत्या. मोलकरणीनें तळघराचें दार आंतून बंद असल्याचा निरोप परत येऊन सांगितला, तेव्हां यजमानिणीनें तिला दार ठोंठावण्यास सांगितलें. त्याप्रमाणें तिनें केलें तरी आंतून जबाब आला नाहीं, तेव्हां मोलकरणीनें तो प्रकार परत येऊन कळविला. तो ऐकतांच ठकराणी स्वतःच उठली, आणि दाराजवळ जाऊन तिनें पुष्कळ हांका मारल्या व दारही ठोंठावलें. परंतु आंत कोणी असेल तरना प्रत्युत्तर येईल? खुद्द ठाकूर या वेळीं तोंडांत दांतवण चघळीत चघळीत घोड्याचे तळघरांत जाण्यासाठीं सहज आला, व स्वतः यजमानीन दार उघण्याचे खटपटींत आहे, व आंतून जाब येत नाहीं, असें पाहून आपल्या जवान मुलीबद्दल त्याचे मनांत शंका आली. तो तसाच मागचे दारीं गेला, व घरामागील तळघराचें रस्त्याकडील दार त्यानें बाहेरून पाहिलें. कुलूप नेहमीं आंतल्या बाजूस असावयाचें तें बाहेर आहे असें पाहून त्याचें काळीज चर्र झालें, व त्यास खचित कांहीं तरी दगा झाला असें वाटलें. त्याबरोबर त्याचे डोळे रागानें लाल होऊन जाऊन त्यानें तोंडांतील दांतवण फेंकून दिलें. त्याचें सर्वांग रागानें कांपूं लागून त्याचे तोंडांतून कांहीं शब्द निघेना. तसाच पाय आपटीत तो घरांत शिरला, व मोलकरणीस घराबाहेर कामास घालवून तळघराचे दाराजवळ आला. तो वृद्ध ऐशीं वर्षें वयाचा होता, तरी त्याचें शरीर निरोगी व कसलेलें असें होतें. रागाचे आवेशांत त्यानें एक लाथ दारावर मारली, तिजबरोबर दार कुसांतून निघालें. आंत शिरून पाहतो तों दोन्ही घोडे व कन्या नाहींत. तळघरांतून दिवा घेऊन सर्व जागा त्यानें पाहिली. घोडे मागचे दारानें पसार झाले होते. त्यांचे खुर दाराजवळ

उमटलेले, व त्यांचें कापड व हत्यारें कोठें दिसत नाहींत, असें पाहून हें कारस्थान त्या नव्या चाकराचेंच असावें असा त्यास एकवेळ संशय आला. पण पुनः तो आपल्या मनाशीं ह्मणाला ' छे, तो फार गरीब आहे. स्वभाविक भेटीशिवाय त्याची व मुलीची भेट केव्हांही झाली नसेल. ' बाहेर येऊन त्यानें तो राग ठकराणीवर झाडला. परंतु तीही झालेलें कृत्य पाहून हिरमुसली व ओक्साबोक्सीं रडूं लागली. ' मुलीला एकदाची देऊन टाका, असें मी नेहमीं सांगत होतें, परंतु माझे ह्मणण्याकडे कोण लक्ष देतो ? चांगले स्थळासाठीं दोन वर्षें ढकलाढकल झाली. अखेर मुलगी कोणीं लुच्चानें पळविली. मुलगी उपवर होण्यापूर्वीं त्यांचीं लग्नें करणें किती सोईचें आहे ? जाणत्या मुली झाल्यावर असेंच वेडेंवांकडें व्हायचें. आतां लोकांत तोंड काढण्यास जागा नाहीं. ' असे दुःखाचे हुंदके ती काढूं लागली. आगींत तेल पडून आग भडकावी त्याप्रमाणें या बोलण्यानें त्या वृद्ध ठाकुराच्या जिवाचा संताप झाला. लागलीच बाहेरच्या सोप्यांत येऊन त्यानें आपला घोडा कसण्यास चाकरास हुकूम करून चरफडत चरफडत अंगांत कपडे घातले, व कंबरबस्ता केला. त्यानें पाठीस ढाल लावली, कंबरेस पिस्तुल खोंचलें, तरवार लटकावली व हातांत भाला घेतला. तो सोप्यांतूनच ह्मणाला 'घर सांभाळा, मुलीचा शोध लागला तर परत येईन.' असें ह्मणून तो घोड्यावर स्वार झाला. पतीची वृद्धावस्था झाली होती, त्यामुळें ठकराणीला त्याच्याबद्दलची फार काळजी वाटूं लागली. मुलगी नाहींशी झाल्यामुळें दुःख झालें होतें, त्याहीपेक्षां आपला वृद्ध पति रागानें जात आहे त्याजबद्दलचें तिला अधिक दुःख झालें. मुलगी गेल्यामुळें राग, पतीच्या जाण्यासंबंधानें दुःख, व जनलज्जेची काळिमा या त्रिविध तापांनीं ती अगदीं करपून गेली. पतीचा रागीट व हट्टी स्वभाव तिला चांगला माहीत होता,

त्यामुळें त्यास अडथळा करण्यात तिच्या तोंडांतून एक शब्दही निघेना. म्हातारा बारवटिया रागाचे आवेशांतच चालता झाला. तो दिसेनासा होईपर्यंत जितावा दारांत उभी राहून पहात होती. तिचे डोळे पाण्यानें भरले होते, व ती त्रासानें आक्रोश करून ऊर बडवीत घरांत शिरली.

रागाचे आवेशांत आपण कोणीकडे जात आहोंत याचें त्या वृद्धाला भानही नव्हतें. दोनप्रहर होऊन गेले, परंतु त्यास भुकेचें स्मरण देखील झालें नाहीं. 'पोटची मुलगी निघून गेली, व लहानपणापासून मुलाप्रमाणें बाळगलेला बछेराही गेला. मुलीचा विवाह करून हा बछेरा तिचे नवऱ्यास आंदण देण्याचें मनांत होतें, परंतु ती कोणाबरोबर तरी गेली असावी हें खचित. चांगल्या कुळवान् माणसाबरोबर गेली असली तर तेवढेंच दुःखांत सुख मानीन. पण जर का ती एखाद्या हलकट व अकुलीन परजातीच्या जाळ्यांत फसली असेल, तर मग जगांत तोंड दाखविण्यास मला जागा कशीती राहणार नाहीं.' अशा रागाच्या व दुःखाच्या विचारांत तो आपलें घोडें हांकीत होता. दिवस कलत चालला. बराच वेळ गेल्यावर त्याच्या रागाचा जोर कमी झाला, तेव्हां कोठें त्यास भुकेची व अफिणीची आठवण झाली. त्यानें आपल्या बंडीच्या खिशांतून अफिणीची गोळी काढून तोंडांत टाकली. थोडीशी हुशारी वाटून मग रस्त्यांतील वाटसरांशीं विचारपूस करतां आपण पोरबंदराचे सरहद्दींत चालत आहों असें त्यास कळलें. बरड्याच्या डोंगराच्या रांगा तेथून बऱ्याच दूर दिसत होत्या. संध्याकाळ होत आली. जवळ एक खेडें दृष्टीस पडूं लागलें. गांवाबाहेर एक देवीचें मंदिर होतें, व मुशाफरांसाठीं मंदिराचे एके बाजूस लहानशी धर्मशाळा होती. तेथें त्यानें घोडें थांबवून घोड्यावरील सामान उतरलें. सामानांतून पाण-

दोरी लोटा काढून विहिरीचें पाणी काढलें, व हातपाय धुतले. या वेळेस गांवांतील स्त्रीपुरुष देवीचे मंदिरांत जात येत होते. त्यांत एक वाणी त्याचे दृष्टीस पडून त्याजकडून यानें स्वयंपाकासाठीं शिधा व भांडीं मागून घेतलीं. वाण्याचे पैसे चुकविले. रात्रीचें जेवण आटपलें, व जाणारे येणारे लोकांशी तो बछेऱ्याबद्दल व आपल्या मुलीबद्दल शोध करूं लागला. परंतु त्यांची त्यास कांहींएक बातमी लागेना. याच धर्मशाळेंत दुसरे कोंपऱ्यांत दुसरे दोन मुशाफर उतरले होते, त्यांनेंही रात्रीं जेवणखाण झाल्यावर ते शिळोप्याच्या गप्पा मारीत बसले होते.

एक—**विघामाणेक** व **जगन्नाथ** यांस **वाघेर** लोकांनीं सरकारास सोपावें, व बाकी सर्व लोकांनीं हत्यारें रुजू करावींत, अशाबद्दल वाटाघाट चालली होती त्याचें काय झालें?

दु०—मला कालच अशी खबर मिळाली कीं, **वाघेर** लोकांनीं हत्यार खालीं ठेवीत नाहीं असा साफ जाब मध्यस्थाचे मार्फत दिला. **विघामाणेक** सर्व **वाघेर** लोकांस उलट उत्तेजन देत आहे. तो सर्वांस सांगतो कीं मी एकदां फसून या टोपीवाल्यांचे भरंवशावर हत्यार ठेविलें होतें, परंतु त्यांनीं आपला शब्द फिरवून मला काळ्या पाण्याची शिक्षा केली. ह्या त्याचे सांगण्यानें लोक अधिक चवताळले व सरकारचा बेभरंवसा त्यांस वाटूं लागला.

प०—लोक आपलें उगीच नुकसान करून घेत आहेत. सरकारी फौजेपुढें त्यांचा कसा टिकाव लागणार?

दुसरा—हे टोपीवाले माणसांची खराबी करतील असें वाटत नाहीं. **वाघेर** लोकांस कोणतेही तऱ्हेनें बेअब्रू अगर सजा होणार नाहीं असा **जामसाहेबां**सारखा मध्यस्थी करणारा जामीन मिळाल्याशिवाय ते लोक हत्यारें खालीं ठेवतील असें धोरण दिसत नाहीं.

प०—**वाघेर** लोकांच्या उपजीविकेबद्दल पगाराच्या ज्या कोऱ्या ठरल्या आहेत त्या निर्वेधपणें चालविण्याबद्दल भाट, चारण जामीन होऊन **जामसाहेब** मध्यस्थी करतील तरच हें तुफान बंद पडेलसें वाटतें.

दु०—**देवडा**गांवचा पाटील **गांगजीबावा** व त्याचे बरोबरचे आणखी एकदोन असामी समेट करण्याचें ठरविण्यासाठीं **जोधामाणेक** आणि **दादाभाई** यांजकडे गेले होते, व **गायकवाड** सरकारांशीं तुम्हीं तुफान केलें असा ठपका देऊन त्यांस पुष्कळ बोलले. परंतु **जो-धामाणेक** म्हणाला, एकदा हत्यार खालीं ठेवलें तेव्हां सरकारनें आम्हांस कैद केलें. आतां चांगला जामीन मिळाल्यावांचून भरंवसा ठेववत नाहीं.

प०—हल्लींच्या **वाघेर** लोकांच्या स्थितीवरून ते अगदीं जेरीस आले आहेत; या वेळेस जर त्यांस तडजोडीनें समजाविलें तर खास ते समजतील.

हा चाललेला संवाद संपल्यावर **हमीर जसाजीनें** त्यांस विचारलें कीं, हल्लीं **वाघेर** लोक कोठें आहेत व सरकारचें लष्कर कोठें पडलें आहे ?

प०—**भाणवड** गांवीं सरकारचे लष्कराचा तळ पडला आहे, व **वाघेर** लोक **वरड्याचे** डोंगरांत आहेत. **जामसाहेब** यांनीं **वाघेर** लोकांस आमचे मुलखांतून निघून जा असें कळविलें होतें; परंतु **वाघेर** म्हणतात अशी बचावाची जागा दुसरी नाहीं, येथेंच मारूं अथवा मरूं, व शेंवटीं बायकामुलें कोणाच्या आश्रयास पाठवूं, आणि केशरिये होऊन सर्व मुलुख लुटून फस्त करूं.

याप्रमाणें बंडाचे संबंधानें बोलत असतां बरीच रात्र निघून गेली, व नंतर सर्व प्रवासी झोंपीं गेले. प्रातःकाळीं **हमीरजसाजीनें** **भाणवड** गां-

---

टीप—केशरिये होतात ह्मणजे रजपूतलोक मुलें बायका सर्व मारून केशरी रंगाचे कपडे घालून रणांत जातात.

वाकडे जाण्याचा रस्ता धरिला. आठपंधरा दिवस गांवोगांवीं आजूबाजूस फिरून मुलीबद्दल व घोड्याबद्दल तपास केला, परंतु कांहींच मागमूस लागला नाहीं. जुनीं माणसें मोठी पाणीदार व धूर्त असतात तसें पाणी नव्यांत नसतें. पुष्कळ शोध करून मुलीचा जेव्हां पत्ता लागेना, तेव्हां तर त्यास आपले जीवित्वही नकोसें झालें. घरीं जाण्यास तोंड राहिलें नाहीं. मुलगी व घोडें दृष्टीस पडलें व अब्रू बचावली तरच घराचा रस्ता धरावयाचा, नाहीं तर प्राणत्याग करावयाचा, असा निश्चय करून शेंवटीं जमलेल्या **वाघेर** मंडळींत जाऊन मिळावें ह्मणजे छावणींतील जमलेली मंडळीही दृष्टीस पडेल, व यांतच आपला शेंवटही होण्याचा संभव आहे, असा त्यानें मनाचा निश्चय केला.

**भाणवड**कडे लष्करांत प्राण देण्याचे विचारानें जावयाचें मग इतकें दूर तरी कशास जावें? जवळच **बरड्यांत** जावें अगर त्याच टोळींत दुसरे **बारवटिये** असतील त्यांत जाऊन मिसळावें, असा विचार करून त्यानें आपलें घोडें त्या बाजूकडे वळविलें. समोर डोंगर दिसूं लागला. या डोंगराचें नांव **घेलन** असें होतें. त्याचे पायथ्याशीं **देवा माणेक रणमल कुंभाणी, राणोजी वाढेल** व इतर ६०–७० **वाघेर** लोक नवे गांव लुटून आणलेल्या लुटीची व्यवस्था करण्यासाठीं बसले होते. वृद्ध **हमीर जसाजी** घोड्यावर बसून आपले बाजूस येत आहे असें त्यांनीं ओळखतांच त्यांपैकीं एक दोन पुढारी त्याचेकडे धांवत आले. त्यांनीं त्याचें घोडें हातीं धरून त्यास लवून रामराम केला, व त्यास आपले मंडळींत बसवून मोठा मान दिला. आपल्यांतील उंच घराण्यांपैकीं व जुन्या अनुभवी लढवय्यांपैकीं एक **भीष्मासारखें** रत्न आपल्या टोळी येऊन मिळालें, व त्याची सल्ला आपले चांगली उपयोगीं पडेल ह्मणून त्यास त्यांनीं मोठे आदरानें बसविलें. त्यांतील वृद्धांनीं त्यास प्रेमानें आलिंगन दिलें, व कुशल प्रश्न विचारले.

**हमीर जसाजी** ह्मणालाः—'माझी वृद्धावस्था झाली आहे व अशा स्थितींत मी आपला आवडता बारवटियेपणाचा धंदा करण्यास व त्यांत सामील होण्यास जो आज तुमचे मंडळींत आलों आहें, त्यास हल्लींची माझी गृहस्थितिच कारण होय. माझी मुलगी दोन चांगलीं घोडीं घेऊन घरांतून फरारी झाली आहे. तिचे शोधांत आसपास बरेच दिवस घालविले परंतु शोध लागत नाहीं. आतां हें काळें तोंड गांवांत जाऊन कसें दाखवावें? त्यापेक्षां हें शरीर तुमचे कामास लागेल तर फार बरें, देशसेवा घडेल, या हेतूनें आलों आहें. मी जरी थकलों आहें, व तुमचेसारखी दौड जरी आतां माझ्यानें होणार नाहीं, तरी तुह्मीं मला संभाळून घेतलें तर हें शरीर आपले लोकांचे सेवत हजर आहे.'

हे त्याचे खरे कळकळीचे उद्गार ऐकून कित्येकांस वाईट वाटलें. घोड्यांचे रंग कसे आहेत असें एकानें विचारलें. हा ह्मणाला 'घोडी करड्या रंगाची आहे, व बछेरा निळ्या रंगाचा असून चौसण आहे. हे शब्द कानीं पडतांच एक **वाघेर** ह्मणाला, 'सात आठ दिवसांवर मी लष्कराचे टेहेळणीसाठीं वेशांतरानें फिरत होतों. त्या वेळेस आपण ह्मणतां त्या रंगाचा व वयाचा एक सुंदर बछेरा माझे पाहण्यांत आला. तेव्हां आपण सवडीप्रमाणें टेहेळणीचे वेळेस त्यास पाहूं. जर तोच असला तर तो तेथें कसा आला ह्याचा शोध लागेल.'

इतक्यांत **वाघेर** लोकांचे टेहेळणीवर जी सरकारी स्वारांची टोळी होती, व जींत कांहीं सरकारी व **पोरबंदरचे** लोक होते, ती यांचेवर चालून आली. **वाघेर** लोकांनीं त्यांस बरेंच जवळ येऊं दिलें. कांहीं लोकांनीं लुटीचा माल घेऊन डोंगरावर चढण्यास आरंभ केला. आठ-दहा लोक शिल्लक होते, त्यांनीं त्या टोळीशीं सामना केला. **वाघेर**

लोकांनीं गोळ्या मारण्यास आरंभ केला, त्यामुळें ती टोळी मागें सरली. एक कोसपर्यंत सरकारी लोक पळत होते. शेंवटीं हातघाईवर प्रकरण आलें. दोन्ही बाजूचे लोकांनीं तरवारी म्यानांतून उपसल्या. **पोरबंदर**चे लोकांमध्यें **जमादार मुबारक** नांवाचा शिपाई होता, तो **वाघेर** लोकांचे तरवारीस जेर होऊन म्हणालाः—'आम्ही तुमचे लोकांची नेहमीं बरदास्त ठेवतों, व तुम्ही शेंवटीं आम्हास मारण्यास चुकत नाहीं.' तेव्हां **वाघेर** लोकांनीं आपली तरवार म्यान केली. त्यांनीं टोळीचे लोकांस जाऊं दिलें व ते डोंगराकडे चालते झाले.

**हमीर जसाजी** व बाकीचे लोक डोंगराचे आडवळणानें वर चढत होते. मागील सामना होऊन परत आलेले लोक यांस येऊन मिळाले. हे सर्व मिळून ज्या **आभरा** नांवाच्या अति बिकट डोंगरावर इतर **वाघेर** लोक होते तिकडे चालले होते. मोरचेबंदी करण्यासाठीं **वाघेर** लोक व त्यांचे इतर अनुयायी लोक ठिकठिकाणीं दगड रचून तयारी करीत होते त्यांत फेरफार करण्याचा सल्ला या वृद्ध गृहस्थानें त्यांस दिला. त्याच्या सूचना सर्वांस मान्य झाल्या. या वेळेस संध्याकाळचा समय झाला होता. गेलेली टोळी लूट मिळवून परत येतांना पाहून डोंगरांतील लोकांनीं मोठा जयध्वनीचा घोष केला. डोंगरांत अतिशय दाट झाडी होती, त्या बाजूस **वाघेर** लोकांनीं आपल्या बायकांमुलांसाठीं झोंपड्या बांधल्या होत्या. स्वयंपाकासाठीं ठिकठिकाणीं चुली पेटल्या होत्या, त्यामुळें डोंगराचे शिखरावर वणवा लागल्याचा भास होई. **हमीर जसाजी**साठीं डोंगरांत असलेले सर्व पुढारी लोक, तसेंच कांहीं **पुरभय्यां**पैकीं जे पुढारी होते ते, एकत्र झाले. कुसुंबा झाला. जेवणानंतर पुढचे विचारासाठीं मंडळी एकत्र जमली.

**जोधा माणेक** ह्मणाला, 'आपण मोर्चेबंदी केली परंतु वेळेस पळण्याचा रस्ता लष्कराचे ध्यानांत न येई असा ठेवणें जरूर आहे.'

मुळू ह्मणाला, 'कोडीनारचे बाजूस या डोंगराचा जा भाग जात आहे तिकडून खालीं खोऱ्यांतून झाडी फार आहे, त्या रस्त्यानें लष्कर केव्हांही येणार नाहीं. व आपणास जरूर पडेल तेव्हां त्याच रस्त्यानें बाहेर पडतां येईल.' ही सूचना सर्वांस मान्य झाली. हाजी कुंभाणी ह्मणाला, 'राजकोटचे मदतीचे माणसांकडून कांहीं बंदुकी व दारुगोळा वगैरे सामान येऊन पोहोंचलें आहे, तें सर्वांस वांटून द्यावें ह्मणजे जो तो तयार राहील.'

हमीर जसाजी ह्मणाला, 'आज आपलें ताब्यांत लोक किती आहेत तें प्रथम कळलें पाहिजे ह्मणजे, निरनिराळ्या टोळ्या करून मोर्चा मोर्च्यांनीं ठेवण्यास ठीक पडेल.' मुळू ह्मणाला 'सुमारें पंचवीसशें लोक आज हत्यारबंद तयार आहेत. त्यांत हजार बंदुकदार आहेत. कमींत कमी शेंदीडशें घोडे आहेत. चारशें पुरभय्ये आहेत. तीनशें धेड आहेत. तीनशें शिदी आहेत. व वाढेल व वाघेर मिळून पंधराशेंची संख्या आहे. एवढी फौज वस्त आहे. आपला बचाव होण्यास कांहीं हरकत नाहीं. मात्र बायकापोरें संभाळण्यासाठीं एक तुकडी निराळी ठेवली ह्मणजे झालें.'

याप्रमाणें वादविवाद होऊन त्यांनीं बेत ठरविला. अपरात्र झाल्यामुळें ते विश्रांतीस गेले. दुसरे दिवशीं लष्कराचे टेहेळणीसाठीं चार माणसांनीं जावें असें ठरलें. त्यांत हमीर जसाजी, हाजी कुंभाणी व दुसरे दोघे वाढेल होते. सर्वांनीं स्वारांच्या वेशानें निघावयाचा ठराव केला. मनुष्यस्वभाव विलक्षण आहे. त्याचें चित्त ज्या विषयांत लागेल त्यांत तें अगदीं निमग्न होतें. या वेळेस डोंगरावर असलेल्या लोकांचे विचार आपलें संरक्षण कसें करावें, दुसऱ्याचा पाडाव कसा करावा, शत्रूस जेरीस कसें आणावें, व आपलें वतन पुनः परत कसें

मिळवावें यापलीकडे कधींही जात नसतील. एवढें मिळविण्यास जातबंधूंची आहुति आहे, अजून कित्येच बळी पडतील, व राहिलेले लोक इच्छित फळ मिळविणार हें असंभवित होतें. परंतु असंभवितपणा त्यांचे दृष्टीस पडत नव्हता. त्यांचे विचार त्यांचे तरवारीचे जोरांत गुंतले होते. देशसेवेकडे जर असे विचार गुंतले नसते, तर कोणतेही देशांत महत्कार्यें झालीं नसतीं. जीविताशा व आपलपोटेपणा हे दोष आहेत असें कळून जेव्हां भ्रांतीचें निरसन होईल तेव्हां खरें.

## भाग १२ वा.

**वरडा** नांवाचा खडकाळ डोंगर **पोरबंदरचे** हद्दींत आहे. ह्याचा आकार वांटोळा असून परिघ सुमारें तीस मैल आहे. **वरड्याचे** उत्तरेकडील एक शिखर अतिशय उंच दिसतें, या शिखराखालीं **गुमलीबाग्राचीं** जीर्ण झालेलीं स्थानें आहेत. ह्यांत ठिकठिकाणीं गवत उगवलें आहे, व वनवाघळांनीं आपलीं राहण्याचीं ठिकाणें केलीं आहेत. **वरड्यांत** ठिकठिकाणीं निर्मळ झरे असून त्यांचे बाजूस कळकाची दाट झाडी असल्यानें सर्व डोंगर हिरवाचार दिसे. पाणी व झाडी असल्यानें लुटारू लोकांस ह्या डोंगरांत निर्भयपणें राहतां येत असे. शिवाय आसपासची काळी जमीन सुपीक आहे.

**भाणवडगांव मीनसार** नदीचे कांठावर होतें. पाण्याचे सोयीसाठीं लष्कराचा तळ येथेंच पडला होता. कामदार लोकांचे तंबू मोठमोठ्या छायेच्या झाडाखालीं मारले होते. शेंकडों राहुट्या, बिचवे, पालें वगैरे ओळीनें लाविलीं असल्यामुळें ही छावणी लहानशा शहराप्रमाणें दिसत होती. तालुकदारांचें, **गायकवाड सरकारचें** व **इंग्रज सरकारचें** लष्कर

एकत्र जमलें होतें. त्यांत कवायती लोकांचा नीटनेटकेपणा, व शिबंदी, पागा, बेहेड यांचा अव्यवस्थितपणा पाहणारास मजेदार दिसे. कवायती फौजेंत पांक्तवार घोड्यांच्या रांगा असत. त्यांचे पुढें गवताचे ढीग पडलेले असत. बिगुल होण्याबरोबर सर्वांपुढें चंदीचे तोबरे व पाण्याचे डोल येत. परंतु रजवाडी लष्करांत कोणाचे तोबरे चढलेले असत, कोणी घोड्याची चाकरी करीत असत, व कोणी फेरफटका करून येऊन घोड्यांस टेहलवीत असत. कित्येक हुके ओढीत, व कित्येक गप्पा मारीत बसलेले असत. **कर्नेल ऑनर** ह्यास ह्या मुलखाची व डोंगराची चांगली माहिती असल्यामुळें त्यास **भाणवड**चे छावणींत मुख्य कामदार नेमलें होतें. **जुनागड, पोरबंदर, नगर, गोंडळ** ह्या तालुकदारांचे वकील आपआपले फौजेसहित या छावणींत हजर होते. **कर्नेल ऑनर**चा तंबू छावणीचे मध्यभागीं ठोंकला होता.

प्रहररात्रीचा सुमार झाला. कामदार मंडळी साहेबाचे तंबूंत गोळा होऊं लागली, व हल्ला कसा करावा याबद्दल भवति न भवति झाली. शेवटीं सर्वानुमतें असें ठरलें कीं, **वाघेर** लोकांस हूल द्यावी ह्मणजे ते डोंगराखालीं येतील, व आपणास सामना करण्यास सोईचें पडेल; डोंगराचे पायथ्याशीं असलेली झाडी कांपण्यास बेलदार मजूर पाठवावे, व त्यांचे दिमतीस थोडे अंतरावर एक फौजेची तुकडी ठेवावी व दुसरी एक टोळी **कातरधार** येथें ठेवावी. या मसलतीप्रमाणें टोळ्या रवाना झाल्या. यामुळें प्रथम **वाघेर** लोकांस लष्कराचा हल्ला त्या बाजूनें सुरू झाला असें वाटून त्यांनीं त्या बाजूंकडे बंदुका सोडण्यास आरंभ केला. परंतु जेव्हां त्यांस ही उगीच हूल आहे असें समजलें, तेव्हां ते आपले मोर्चे सोडून बाहेर पडले नाहीत. बराच वेळ बेलदार मजूर काम करीत राहिले, परंतु **वाघेर** लोकांनीं आपला मोर्चा सोडला नाहीं, तेव्हां ही मसलत फसून पाठविलेल्या टोळ्या परत आल्या. दुसरे वेळचे मसलतींत **वाघेर** लोक

काहेर झाले आहेत' तेव्हां ते तह करण्यास कबूल होतील असें ठरलें ह्मणून त्यांजकडे निरोप पाठविला. परंतु त्यांजकडून रोंकडा जाब आला कीं, जोधाजी हत्यारें खालीं ठेवण्यास नाखुष आहेत. पुनः तिसरे रात्रीं मंडळी जमली. राजपाळ यास डोंगरांतील कांहीं विशेष कामगिरीवर पाठविलें होतें. तोही याच वेळेस येऊन पोहोंचला. कर्नल ऑनर यानें त्यास आपले तंबूंत नेलें, व त्यानें सांगितलेली सर्व माहिती कागदावर टिपून घेतली. त्यानें मिळविलेल्या उपयोगी माहितीमुळें साहेब त्याजवर फार खुष झाले. त्याचें अल्प वय, सुंदर चेहरा, चलाखी व शौर्य पाहून साहेब त्यावर नेहमीं प्रसन्न असे. राजपाळास उत्तेजन यावें याजसाटीं तो तंबूंत गेला, व एक सातबारी तमंचयाची पेटी घेऊन बाहेर आला. तोंपर्यंत राजपाळ मर्यादेनें उभा होता. कर्नलनें पेटी उघडली व तमंचा हातीं घेतला. तो राजपाळास ह्मणाला, 'हें पहा, हा चाप व ही ठेंच दिली ह्मणजे घोडा मागें सरतो.' मग कोठींत काडतुसें गोळीसुद्धां तयार होतीं तीं त्यानें आंत घालून दाखविलीं, व पुनः काम नसेल तोंपर्यंत बाजूची ठेंच चढवून ठेविली ह्मणजे पिस्तूल भरलेला असतो व ठेंच सरकविल्याशिवाय घोडा वर क्वचित् पडला तरी केप फुटत नाहीं, असें त्यास सांगितलें. हें सर्व समजेपर्यंत राजपाळ लक्ष लावून पाहत होता. शेंवटीं साहेब ह्मणाला, 'तुला हें पिस्तूल बक्षीस देत आहें, एवढ्यानें तुझें कामगिरीचें बक्षीस पुरें झालें असें नाहीं, तें बक्षीस सरकार देईल.' राजपाळानें तें पिस्तूल मोठ्या आदबीनें घेतलें, व त्यास सलाम केला. कर्नल ह्मणाला 'हें पिस्तूल लढाईंत मोठें उपयोगीं पडतें. ह्याचा मारा फार दूर जात नाहीं, तरी सुमारें दोनशें हातपर्यंत गोळी चांगला कार करते.' राजपाळ ह्मणाला, 'हातघाईला जेव्हां शिपाई भिडतात तेव्हां तरवार जंबिये जसें काम करितात तसा ह्याचा उपयोग नाहीं. पुनः भरण्यास वेळ कोठचा! शिवाय मारतांना आपले टाळींचे लोक मागें असतात त्यांस

ही धक्का लागणार.' **कर्नल** ह्मणाला, 'तुझें ह्मणणें खरें आहे. एकट्या दुकट्या माणसाशीं गांठ पडली तर ह्याचा उपयोग होईल अगर सात बार सोडीपर्यंत हें कार्य करील.' नंतर तो ह्मणाला, 'हमेष माझेजवळ असत जा.' **राजपाळ** म्हणाला, 'त्यासाठींच मी होऊन आपणापाशीं नोकरी मागून घेतली. माझें सर्व शरीर **गायकवाड** सरकारचे अन्नानें वाढलेलें आहे, व आपण त्या सरकारास मदत करण्यास आलां आहांत; तेव्हां आपणास मनापासून मदत करणें हें माझें पहिलें काम असें मी समजतों. आपण अगदीं बेफिकीर असा, मी व माझा स्वार नेहमीं तुमचे बाजूस असूं, व तुमचे केंसासही धक्का लागूं देणार नाहीं.'

नंतर ते दोघे जेथें मंडळी जमली होती त्या तंबूंत गेले. **कर्नलनें** माहितीचा कागद पुढें ठेवला व तो म्हणाला कीं '**राजपाळानें** सुचवलेला बेत मला पसंत वाटतो.' पुनः भवतिनभवति होऊन **राजपाळाची** सूचना सर्वांस मान्य झाली. **कर्नल** म्हणाला, '**घुमेलीकडे नगरचें** ६०० लष्कर ठेवावें; **दाडमी, चावडी** व **नळझरा** यांचे बाजूस सरकारी लष्कर अनुक्रमें २००, २०० व ४०० याप्रमाणें रहावें; **किल्लेसरकडे** ३०० लोक सरकारी व **पोरबंदरच्या** फौजेपैकीं १०० लोक याप्रमाणें राहून **दंताल्याचे** मोर्च्याकडे **जुनागडचे** ४००, **पोरबंदरचे** १००, व सरकारी १०० याप्रमाणें असावे, याप्रमाणें व्यवस्था राहून प्रत्येक अंमलदारानें आपआपले टोळीबरोबर रहावें. **दंताल्याचे** मोर्च्याकडे स्वतः मी माझे लोकांसहित राहीन. हल्ला आजपासून एकदोन दिवसांनीं व्हावयाचा आहे, सबब मागील रात्रीं नेमलेल्या बाजूनें हल्ला करण्याचे सूचनेसाठीं तीन तोफांचे आवाज होतील, त्याबरोबर सर्वांनीं छावणी सोडावी. त्यानंतर मीही निघेन. **वाघेर** लोक असें केल्याशिवाय ठिकाणीं यावयाचे नाहींत.' सर्वांस हा बेत पसंत पडून ही छोटी कचेरी बरखास्त झाली.

दुसरे दिवशीं लष्करांत चळवळ सुरू झाली. हत्यारें तपासण्याची हजिरी झाली. चोहोंकडे हत्यारांचा खडखडाट, घोड्यांचें खिंकाळणें, माणसांचें कुजबुजणें, पागेंतील डंके, निशाणें, शिंगें इत्यादिकांचे आवाज, यांच्या योगानें सर्व छावणी दुमदुमून गेली. लोकांचे चेहऱ्यांवर वीरश्री दिसूं लागली. सर्वांचें लक्ष तोफेच्या आवाजाकडे लागलें. जो तो आपली बांधाबांधी करीत होता. परंतु तोफेकडे लक्ष गुंतल्यामुळें हस्तक्रिया अव्यवस्थितपणें चालूं लागल्या. मन दुसऱ्या विषयांत गुंतलें ह्मणजे पोशाख करतांना आंगरख्याचा बंद बंडीस अशी उलटापालट होते. मन लढाई-कडे गुंतलें ह्मणजेच असें होतें असें नाहीं. तें मोठे आनंदांत किंवा काळ-जींत गुंतलें ह्मणजेही तसें होतें. रणांतून सुखरूप परत आल्यावर ह्याचें अमुक करीन, त्यास अमुक देईन, या विचारतरंगांत प्रत्येकाचा जीव ओंटाळत होता. जीविताशा फार बलवत्तर आहे. जे जीव शांततेच्या वेळेस रक्षण करण्यासाठीं केवढा बंदोबस्त, किती दवाखाने व हवा स्वच्छ ठेवण्याचा किती खर्च चालला असतो, तेच जीव लढाईचे वेळीं कस्पटाप्रमाणें खर्ची पडतात. मन हेंच बंधनास व मोक्षास कारण आहे असें गीतेंत ह्मटलें आहे तें अक्षरशः खरें आहे. कोणताही विषय मनानें एक वेळ घेतला ह्मणजे, कोणी लौकिकासाठीं, कोणी द्रव्यासाठीं, कोणी बाय-कामुलांसाठीं, कोणी इमानासाठीं, कोणी सूड उगविण्यासाठीं, कोणी देश-हितासाठीं सर्वस्व खर्च करण्यास व जीवाची आहुति देण्यास तयार होतो. असे परिणाम न घडते तर, आजपर्यंत जगांत ज्या उलाढाली होत आल्या आहेत त्या न होत्या. आपले देशासाठीं, आपले भावी प्रजेचे सुखासाठीं अगणित प्राण खर्च झाले आहेत हें त्यांचेंच फल होय. लष्करास सूचना देण्याकरितां पाहटेस दोन वाजतां तोफेचे तीन आवाज झाल्याबरोबर ज्यानें त्यानें घोड्यांस लगामा चढविल्या, व जो तो आपआपली तुकडी घेऊन मोर्च्याचे बाजूकडे चालला. डोंगराचे पायथ्याशीं चार

वाजतां सर्व लोक येऊन पोहोंचले. या वेळेस अंधार बराच होता, थंडी मी ह्मणत होती. नगरची सहाशें माणसांची टोळी कसारीचे बाजूस रस्त्यानें डोंगरावर चढूं लागली. यापैकीं पुढची तुकडी घुमली नांवाचे जागेवर राहिली. कसारीचे देवळाजवळ वाघेर लोकांनीं मोर्चा केला होता. एका तुकडीनें या मोर्च्यावर हल्ला केला. वाघेर लोक मोर्च्यांत थोडे होते. त्यांनीं फौजेबरोबर थोडा सामना केला, परंतु जास्त वेळ ते टिकाव धरूं शकले नाहींत. फौजेनें बंदुकांचा ताशेरा झाडल्यामुळें वाघेर लोकांनीं तो मोर्चा सोडला, व ते त्या मोर्च्यामागें असापुराजवळ दुसरा मोर्चा होता त्यांत जाऊन मिळाले. फौजेनें या मोर्च्यावरही बराच वेळ गोळ्यांचा वर्षाव केला. मोर्च्याचे आंतून वाघेर लोकही गोळ्या नेमक्या मारीत. याप्रमाणें बराच वेळ अंतरावरून लढाई झाली. शेंवटीं फौजेनें एकदम जाऊन हल्ला केला. दीनदीन, हरहर महादेव, व द्वारकाधीशकी जय असे ध्वनि एकदम निघाले. फौज मोर्च्यावर पोहोंचली. वाघेर लोक बाहेर पडले. दोहोंकडचे लोक हातघाइवर आले. परंतु सरकारी फौजेचे लोक अधिक असल्यामुळें, वाघेर लोकांनीं आपली शिकस्त केली तरी त्यांस पळ काढावा लागला. या झटापटींत दोहों बाजूंचीं बरींच माणसें पडलीं. नगरचे टोळीनें वाघेर लोकांचा पाठलाग बाबरतलावापर्यंत केला. येथे पोरबंदरची व दुसरी सरकारी टोळी येऊन त्यांस मिळाली.

दुसरे तुकडीनें आभरापुऱ्याकडून दाडमी आणि चावडी या बाजूंकडे हल्ला केला. या हल्ल्यांत कराचीचे एजन्टास डोंगर चढतांना गोळी लागली, परंतु तो तसाच हल्ल्याबरोबर वाघेर लोकांशीं लढत राहिला व त्यानें मोर्च्यांकडून त्यांस पळविलें. वाघेर लोकांस या हल्ल्यामुळें दांताल्याकडे पळावें लागलें. आभरापुराचे बाजूस जी टोळी हल्ल्याकरितां गेली होती, तिचे बरोबर खेंचरें जोडलेल्या तोफा होत्या, त्यांनीं

दांतालयाचे मोर्च्यावर तोफा लावल्या. मोर्च्याची भिंत वाघेर लोकांनीं मजबूत केली होती, व ते मोर्च्याचे आंतून अचुक गोळ्या मारीत यामुळें फौजेंतील पंधरा वीस लोक जखमी झाले व मेले. वाघेर लोकांचींही दोन चार माणसें पडलीं. तोफेचे टोळीस मोर्च्यावर हल्ला करण्याची सोय राहिली नाहीं. मोर्च्याचे भिंतीखालीं मोठा कडा तुटला होता, व कड्याखालीं खोल पाण्याचा प्रवाह होता, यामुळें तोफा दांतालयाखालीं उतरून पलीकडे जाण्याची व कड्यावर चढून जाण्याची सोय नव्हती. शिवाय या सर्व खटपटी करतांना वाघेर लोकांचा वरून मारा येईल ही अडचण होती. यामुळें अखेर मोर्च्यावर हल्ला करण्याचा बेत सोडावा लागला, आणि तेथून ही तुकडी 'आभरापुऱ्याकडे गेली. कांहीं फौज बाबरतलावावर पडली होती तिनें वाघेर लोकांचीं खोपटीं लुटलीं, त्यांत रणमल पिंढारी याची स्त्री हातीं लागली. दंतालयाचे मोर्च्यावर हल्ला करणारी तुकडी, त्या घाटीची चढण फार कठीण व रस्ता बिकट असल्यामुळें वेळेवर येऊन पोहोंचली नाहीं. दिवस अस्तास गेला. राणपुऱ्याकडे फौजेची नाकेबंदी होती, यामुळें वाघेर लोकांस त्या रस्त्यानें दांतालयाकडे जातां आलें नाहीं. ते मोडपुऱ्यास नळझऱ्याची तुकडी होती त्या बाजूनें रात्रीं पळाले. नळझऱ्याचे लोकांनीं वाघेर लोकांस आडविलें. परंतु अंधारामुळें त्यांस रस्ते दिसतना, व वाघेर लोक डोंगराचे माहितगार असल्यामुळें तें आपल्या बायकामुलांसुद्धां दंतालयाकडे पसार झाले.

फौजेची टेहेळणी करण्यासाठीं हमीरजसाजी पांच वाघेर घेऊन भाणवडचे छावणींत हल्ल्याचे पूर्व दिवशीं गेला होता, तो सायंकाळचे तीन प्रहर होण्याचे सुमारास परत दंतालयाकडे जात होता. राजपाळ व त्याचे बरोबरचा बाळस्वार कर्नल् ऑनरबरोबर थोडे स्वारांसुद्धां जात असतां टेहेळणीचे वाघेर या टोळीस दिसले. दोघांमध्यें दोनशें हातांचें अंतर होतें. राजपाळ ज्या बछेऱ्यावर बसला होता तो बछेरा हमीरजसाजीनें

ओळखला; व त्यानें डोंगरावर चढण्याचें सोडलें. बंदुकीची जामगिरी झाडली, व राजपाळाकडे बंदुकीचें निशाण धरलें. राजपाळास वाटलें कीं त्यानें कर्नलकडे बंदुकीचें निशाण धरलें आहे, तेव्हां तें चुकविण्याचे हेतूनें त्यानें आपला घोडा त्याचे आड घातला, व कर्नलास बाजूस सरण्याचा इशारा केला. हें सर्व कृत्य डोळ्याचें पातें लवतें न लवतें इतक्यांत झालें. वृद्ध जसाजीची गोळी सूं करीत कर्नलचे कानाजवळून गेली. राजपाळानें आपल्या स्वारांसुद्धां या लहान टोळीवर घोडे घातले. सर्वांचे भाले हातांत उचललेले होते. ही घोड्यांची मांड पक्ष्याप्रमाणें भरारी मारीत पोहोंचली. वाघेर लोकांनीं तरवारी उपसल्या. पांचदहा घोडे व सहा वाघेर हातघाईवर आले. दोनचार वाघेरांवर भाल्यांचा मारा झाला. वाघेऱ्यांनीं दोन तीन भाल्यांच्या लेखण्या केल्या. हमीर जसाजीवर कर्नलनें भाला फेंकला तें पाहून तो कर्नलवर तरवारीचा वार करणार, इतक्यांत राजपाळानें दुसरे बाजूनें हमीर जसाजीवर घोडें घातलें, त्याबरोबर तो घोड्याचे धक्क्यानें जमिनीवर पडला. तत्काळ राजपाळ घोड्यावरून खालीं उतरून हमीर जसाजीचे अंगावर पाय देऊन तरवारीचा वार करणार, तों त्याच्या साथीदारानें घोड्यावरून त्याचा हात धरून ह्मटलें कीं, हा वृद्ध मनुष्य आहे, जाऊं द्या याला, त्यामुळें राजपाळास दया येऊन त्यानें त्यास सोडलें. जखमी झालेले वाघेर व हमीर जसाजी यांस कैद करून स्वारांबरोबर छावणीकडे रवाना केलें, व बाकीची फौज दांताल्याकडे डोंगरावर चढूं लागली.

वाघेर लोकांच्या बंडाची बातमी विलायतेस पोहोंचली. तेथून असा हुकूम झाला कीं, गायकवाड सरकारचें राज्य मुंबई इलाख्यांत दाखल करावें, उखामंडळची व्यवस्था काठेवाडचे पोलिटिकल एजंटानें पहावी, व द्वारका लौकर हस्तगत करून वाघेर लोकांचें बंड विझवावें. या वेळेस बरड्याचे डोंगरांत वाघेर लोकांची धामधूम सुरू होती. कर्नल ऑनर

व काठेवाडचा पोलिटिकल एजंट अलेक्झॉन्डर फार्ब्स यांनीं वडोद्याचे रेसिडेन्ट्यास वाघेर लोकांच्या बंडाबद्दल पत्रें लिहिलीं होतीं. वाघेर लोक तरवार बहाद्दर, शूर व हट्टी स्वभावाचे आहेत, त्यांच्याशीं सामना करून त्यांस जेरीस आणणें ह्मणजे माणसांची फुकट हानि करून घेणें होय, वाघेर लोकांस कांहीं सवलती द्याव्या, व त्यांस समजावून पुनः घरधंद्यास लावावें, त्यांच्या तक्रारी ऐकून घेऊन बंदोबस्त करावा, असें पत्रांत सुचविलें होतें, परंतु त्यांच्या या लिहिण्याकडे यांनीं लक्ष दिलें नाहीं. तारीख १९ डिसेंबर सन १८६० रोजीं फार्ब्स यास सर्व पोलिटिकल अधिकार दिला, व फौजेचा नायक स्टोल यांस नेमिलें. बार्टन साहेब यास पोलिटिकल एजंटाचे ताब्यांत राहण्याचा हुकूम दिला. कलकत्ता सरकारांकडे बडोदें संस्थान होतें तें मुंबई सरकारांकडे गेलें, त्यामुळें बंडावर नेमलेल्या कामदार मंडळींत फेरफार झाला. ह्या संधींत वाघेर लोकांस दरोडे, लुटी व बारवटिये करण्यास सवड मिळाली.

बार्टन यानें ता० १ जानेवारी १८६० रोजीं उखामंडळ यथ कोर्टें, जेल, व ट्रेझरी यांची स्थापना केली. बडोद्याचे रेसिडेन्ट यांस एक असिस्टंट देऊन उखामंडळची व्यवस्था त्यांजकडे सोंपली. उखामंडळांतून जसे वाघेर लोक पळाले होते, तसेच ते बरड्याचे डोंगर सोडून पळाले होते. चोहोंकडे फौजेच्या नाकेबंद्या झाल्या होत्या, त्यांस चोहोंकडून हरकत होऊं लागली, त्यामुळें ते अगदीं जेरीस आले. प्राणरक्षणासाठीं शरण जाण्याखेरीज दुसरा मार्ग नाहीं असें कित्येकांस वाटलें. तारीख २८ डिसेंबर सन १८६० पर्यंत सुमारें सातशें लोकांनीं कर्नल ऑनरपुढें हजर होऊन हत्यारें ठेवलीं. जोधामाणेक व मुळूमाणेक यांचे बरोबर जिवास जीव देणारीं माणसें तेवढीं मात्र राहिलीं. जोधामाणेक याचा विचार सरकारांकडे हजर व्हावें असा होता, व यापूर्वीं पत्रामल हा द्वारकेकडून येऊन बार्टन यांस भेटला होता, व

त्यानें दिलेल्या बातमीवरून **बार्टन** यास पुष्कळ व्यवस्था करितां आली. त्यानें **पत्रामल** यास **वाघेर** लोकांस वळवून हजर करावें ही कामगिरी सांगितली होती. **पत्रामलानें जोधामाणेक** यास वळवून त्याचे विचार हजर होण्याकडे वळविले होते; परंतु **भावडा गांवचे वाघेर जोधास** म्हणत कीं ' तुम्ही जर हजर झालांत तर **वाघेर** लोकांची अब्रू जाईल, व आम्ही तुमचे बरोबर मरण्यास तयार आहोंत. ' या उत्तेजनानें त्यासही तसें करणें बरें वाटलें. इतके दिवस सरकारांशीं विरुद्ध रीतीनें वागून आतां शरण जाणें दुर्लौकिकास कारण होईल असें समजून राहिलेले **वाघेर** एके ठिकाणीं जमवून त्यानें निराळीच मसलत केली. **जुनागडच्या** प्रसिद्ध **जेसलामया वारवटियाचा** भाऊ **गिगलामया** हा **मांगरोळ**-च्या हल्लयांत पडला होता, तो सूड उगवावा म्हणून सर्वांनीं **मांगरोळवर** छापा घालण्यास जाण्याचा विचार ठरविला. काळ अनुकूळ असला म्हणजे सर्व बेत मनाप्रमाणें जुळतात, परंतु तोच प्रतिकूळ असला म्हणजे जें जें साध्य होईल असें वाटत असतें तें तें प्रतिकूळ होत जातें. ते **मांगरोळकडे** निघतांना त्यांस अपशकुन झाले. त्यामुळें तो बेत त्यांनीं सोडून दिला. धर्माचारामुळें ज्योतिषशास्त्राचें किती प्राबल्य लोकांचे मनावर झालें आहे पहा. वैदिकधर्मस्थापकांनीं सर्व आचारव्यवस्था करितांना ज्योतिषशास्त्र त्यांत दाखल केलें आहे. तथापि या शास्त्रास खरें मानणारे व खोटें मानणारे असे विद्वान व अशिक्षित दोन्ही प्रकारचे लोक आहेत. हा प्रकार जर आजमितीसही प्रत्यक्ष दिसतो, व मोठेमोठे लोकही देवभोळे शकून समजतात, जर बिचाऱ्या अज्ञानपणांत डुंबणाऱ्या **वाघेर** लोकांनीं त्या शास्त्राधारें अगर समजुतीमुळें अपशकुन मानून आपला मोहरा फिरविला ह्यांत नवल नाहीं. असो; नंतर **जोधामाणेकनें गायकवाड** सरकारचा **कोडिनार** तालुका लुटावा असा बेत ठरविला, व त्यानें आपले घोडे तिकडे फिरविले. त्यांत त्यास शुभ शकुन झाले. **कोडिनारचे**

बाजूस दंगा नसल्यानें नेहमींप्रमाणें बंदोबस्त होता. वाघेर लोकांनीं कोडिनारवर छापा घातला, गांव लुटलें, गांवांतील सधन व्यापारी धरून त्यांजकडून द्रव्य घेतलें, व मिळविलेली लूट घेऊन ते गीरचे डोंगरांत पळाले. वाघेर लोकांनीं कोडिनारवर छापा घालून गांव सबंध लुटलें ही खबर बडोद्यास लागली, त्यावरून गायकवाड सरकारनें मीर सरफराज अल्लीसरदार याचे मुलास दोनशें स्वार व उखामंडळचें पायदळ देऊन बंदोबस्तास पाठविलें. परंतु हे दाखल होण्यापूर्वीं वाघेर लोकांनीं गिरांत जाऊन लुटीची वांटणी केली होती. कोडिनारचा बंदोबस्त पुनः सरकारानें केला. गिरांत जेवढे वाघेर लोक होते, तेवढ्यांनीं बरेच दिवस स्वातंत्र्यसुखांत घालविले. हें स्वातंत्र्य काल्पनिक होतें. चोहोंकडून नाकेबंदी झाली होती. पहिल्याप्रमाणें तालुकदाराचे रयतेकडून खाण्याची तजवीज राहीना. उपासमार होऊं लागली त्यामुळें शरीर निर्बल झालें. मनास उत्तेजन राहिलें नाहीं. डोंगरी हवापाणी लागल्यामुळें कित्येकांस डोंगरी ताप लागले. वेळेवर अन्न नाहीं, व सरकारी फौजेचा पाठलाग, त्यामुळें रोज पळापळी चालली होती. वाघेर लोक अगदीं बेदम झाले. अनिष्ट काळ वाघेर लोकांचे मागें हात धुवून लागला. ज्याचेवर सर्व वाघेर लोकांची भिस्त तो जोधा माणेक तापानें आजारी पडला. त्याचेसाठीं राहिलेले लोकांनीं पर्णकुटिका तयार केली, व ते त्याचे सेवेंत गुंतले. आपले लोकांसाठीं जो जिवावर उदार होतो, त्याचे सेवेंत बिनपगारी नौकर असे तत्पर असतात! अशा प्रसंगींच खऱ्या इमानाची परीक्षा होते. ऐश्वर्याचे भरभराटींत शेंकडों आप्तस्वकीय पुढेंपुढें करितात, परंतु त्यांतून आपत्कालीं थोडेच शिल्लक राहतात. मात्र वाघेर लोक तसे नव्हते, ते अगदीं जिवाभावानें जोधा माणेकाची चाकरी करीत. त्याचा अंतकाळ जवळ येऊं लागला. ताप अंगांत इतका सणसणत होता तरी त्या तापांत तो सभोंवतीं जम-

लेल्या वाघेर लोकांस ह्मणाला, 'माझे प्रिय मित्रांनो, या तापांत माझा शेंवट होणार. आसणवेल गांवीं प्रथम आपण जमलों त्या वेळेस मीं जें सांगितलें तें कोणास पसंत पडलें नाहीं. मला सर्वांनीं धिक्कारिलें व नामर्द ह्मटलें, परंतु जमलेल्या उमेदवार मंडळीपुढें माझ्यानें बोलवेना. आपण उखामंडळची शांतता मोडली. गायकवाड सरकार आपली दाद घेत नव्हतें, व आपली उपासमार होऊं लागली, परंतु आपण शांततेनें पुनः पुनः त्यांचेकडे अर्ज केले असते ह्मणजे आपला बंदोबस्त झाला असता. टोपीवाल्यांचें राज्य गेलें व ते पळाले या गप्पांवर आपण भरंवसा ठेविला. गायकवाड सरकारचें बळ आपणांस कळलें नाहीं, त्यामुळें आपले कुळाचा क्षय झाला. आपलीं मुलें माणसें रानोमाळ झालीं. मुळू माणेकचे डोक्यांत वारें भरलें होतें त्या वेळेस माझे ह्मणण्यास कोणीं मान दिला नाहीं. त्याचा हा परिणाम आपण भोगीत आहोंत! आपले जातीचा शौर्याचा बाणा खरा, आपले लोकांत अंथरूणांवर पडून मरणारास मान नाहीं हें खरें, परंतु शौर्याला प्रसंग पाहिजे. आपलेवर जोरदार धनी पाहिजे, आणि त्याचेसाठीं शौर्य दाखविण्याची वेळ आली पाहिजे. ज्या धन्यानें आपणास पोटाचा बंदोबस्त करून दिला त्याचेशीं बेइमानी! मग त्याचें फळही तसेंच! वाघेर लोकांनीं आपलें इमान गमविलें त्यामुळें इहलोकीं अपकीर्ति! व जें चुकीनें हातून घडलें तें परलोकींही जाचेल असें झालें!!! आपले बंडाचा परिणाम बेटांतील द्वारकाधीशाचे मंदिरावर झाला. देव टोपीवाल्यांनीं उचलले, चोरांनीं देवालयें भंगलीं; अनादिकाळची देवस्थानाची संपत्ति लुटून फस्त केली, द्रव्यासाठीं तटबंदी सुरुंग लावून उडविली!! आतां लुटींत गेलेली लक्ष्मी विलायतेस गेली, ती पुनः कधींही यावयाची नाहीं. ही काळोखी जोपर्यंत वाघेर लोकांची जात उखामंडळांत राहील तोपर्यंत राहणार. ह्या चुकीची दुरुस्ती करणारा आपले वंशांत जेव्हां कोणी

उत्पन्न होईल तेंव्हांच आपल्यास शांति मिळणार. द्वारकाधीशास आमची काळजी आहे. हे **द्वारकाधीश! द्वारकानाथ!** मला सोडे अ यातना सोसत नाहींत. आतां सरकारांशीं विरोध सोडा ह्मणजे तेच तुमचा बंदोबस्त करतील. हें माझें शेंवटचें सांगणें आहे. क्षमा करा. ज्यांनीं माझेसाठीं घरेंदारें व बायकामुलें सोडून इतके श्रम केले त्यांचे फार उपकार आहेत. सर्वांनीं क्षमा केली असें ह्मटलें ह्मणजे मी सुखानें मरेन!!! माझ्या दोन मुली आहेत त्यांचें रक्षण करा. त्या तुमचे स्वाधीन केल्या आहेत.' जवळचे **वाघेर** लोक डोळयांत पाणी आणून ह्मणाले 'आपणावर उपकार करावे ह्मणून आह्मीं कांहीं काम केलें नाहीं, सर्वांचें हित जाणून केलें. आपण वडील ह्मणून आपलेसाठीं तशा रीतीनें वागलों. तें तसें करणें आमचें कामच होतें.' हें ह्मणत असतांना त्याचे डोळे खोल गेले. तोंडानें **हरिस्मरण** करीत होता. त्यानें **राम** ह्मटलें. **जोधामाणेक** संपला, त्यामुळें सर्व **वाघेर** लोकांत एकदम आकांत झाला. त्यांनीं त्याची दहनक्रिया **गिरांतील हरी** नांवाचे नदीचे कांठीं उरकली. **बरड्याचे** डोंगरांत **भ्रासणवेलचे रामाभाई** आजारी पडून संपले. **मूळवारचा मपाजसाणी** यास **बरड्याचे** लढाईंत गोळी लागली होती त्या जखमेनें त्याचा अंत झाला. **आसामाणेक** आजारी होता तोही **बरड्याचे** डोंगरांत मेला. हीं पुढारी माणसें एका-मागून एक संपत गेलीं, त्यामुळें **वाघेर** लोकांची हिम्मत खचली.

**बापूमाणेक** आणि **मकनपूरचा हबुकुंभाणी** हे लाचार होऊन **बार्टन** साहेबापाशीं हजर झाले. **जगन्नाथ वाघेरचा** भाऊ **जमाल** हा **नगरचे** तुकडीचे हातीं पडला. कित्येक **वाघेर** माफीचे जाहीरनाम्या-नें जीवरक्षणार्थ हजर झाले. या वेळेस **मुळूमाणेक** मात्र शिल्लक राहिला. **पत्रामल** यानें त्यास समजाविण्याकरितां **दुधा रबारी** यास पाठविलें

होतें. त्यानें त्यास तुला शिक्षा होणार नाहीं अशी थाप देऊन बार्टन साहेबापाशीं रुजू केलें असतां त्याचे बरोबरचे वाघेर लोकांनीं जेवण झाल्यावर हजर होऊं असें सांगून त्यास पळविलें; परंतु चौकशीचे पूर्वी त्यासच वाटलें कीं, न्याय मिळाला तर बचाव होईल, नाहीं तर शेवटीं पकडलों गेलों तर जास्त शिक्षा होईल. या भयानें तोही न्यायकोर्टापुढें हजर झाला. जुनागडचे दिवाण अनंतजी आणि माधवजी लीलाधर यांचेकडे आठ दहा वाघेर हजर झाले. जीविताशा फार विचित्र आहे. यत्न करून त्यांत यश न मिळालें ह्मणजे मनुष्य प्रारब्धावर हवाला टाकतो. मग त्याची महत्वाकांक्षा नाहींशी होते. पुढें जीव अब्रूनें अगर बेअब्रूनें कशाही रीतीनें राहो असें त्यास वाटूं लागतें. त्याच न्यायानें बहुतेक वाघेर लोक सरकारच्या सामर्थ्यापुढें टेंकीस येऊन शरणागत झाले.

धरलेल्या गुन्हेगारांची व शरण आलेल्या वाघेर लोकांची चौकशी कमिशनपुढें व्हावी असा ठराव झाला. अंडरसन्, कर्नल वॉलेस, कॅप्टन् हिल् आणि बार्डन् इतक्या अंमलदारांचें कमिशन नेमलें. त्यांत अध्यक्षस्थान अंडरसन् यास दिलें होतें. अमरेळी ही गायकवाड सरकारचे काठेवाड प्रांताची मुख्य जागा असल्यामुळें तेथेंच हें कोर्ट बसावें असें ठरलें.

कोडिनार लुटलें त्याबद्दल चौकशी बारिक रीतीनें चालली होती, त्यासंबंधानें लोकाना धरून चौकशीअंतीं असें कळलें कीं, जुनागडचा वहिवाटदार डोसा पारेख हा बंडवाल्यांस अनुकूल होता. तेव्हां त्यास धरून अमरेळी येथील कमिशनपुढें हजर ठेवावा असें ठरलें, परंतु कमिशनपुढें हजर होण्यापूर्वींच विष खाऊन मेला. हा इसम जर कमिशनपुढें हजर झाला असता तर मजा झाली असती! कदाचित् जुनागड संस्थानचे व गायकवाड सरकारचें गिराचे हद्दीबद्दल धुमसत असलेलें

गुप्त वैरही उत्पडकीस येतें. इतक्या बंदोबस्ताचे वेळेस संस्थानांतील वहिवाटदारासारख्या अंमलदारानें बंडवाल्यांबरोबर सामील होऊन स्वतंत्र राज्य मिळविण्याची महत्वाकांक्षा धरली असेल हें ह्मणणें संभवत नाहीं. कारण त्यास पूर्णपणें माहीत असण्याचा संभव होता कीं, वाघेर लोक आतां जेरीस आले आहेत, तेव्हां त्यांच्यांत मिसळण्याची ही वेळ नव्हे. बरें, त्याचे मुख्य तालुकदारानें त्यास तसें करण्यास लाविलें असें ह्मणावें, तर तो होऊन विष न खाता. पण तो विष खाऊन मेला किंवा त्यास कोणीं विष दिलें ही हकीकत बाहेर आली नाहीं. जर ती हकीकत कळती तर खचित कांहीं काळेंबेरें बाहेर पडल्यावांचून राहिलें नसतें, अशी कल्पना करण्यास कांहीं आधारही होता.

गीर गायकवाड सरकारनें आपले तरवारीचे जोरावर मिळविलें. जोंपावेतों मुलुखगिऱ्या करून घास दाणा मिळत होता, तोंपावेतों गीरची हद्द आमची आहे असें जुनागडवाले कधींही ह्मणत नसत. परंतु घास-दाणा वसुलीचें काम दोस्त सरकारानें आपल्याकडे घेतल्यापासून दोघांच्या इनसाफ त्यांचे हातीं गेला. साक्षात् देव देखील खुषामतीस राजी होतो. स्वतंत्र गायकवाड सरकारचा भोगवटा, गिरांत त्यांनीं दिलेलीं इनामें आज चालत आहेत, यावरूनच स्पष्ट दिसतो. परंतु इनसाफांत गीरचा ठराव गायकवाडांविरुद्ध झाला हा काळमहिमाच ह्मणावयाचा. हल्लींच्या एकोणिसाव्या शतकांत देखील न्याय मिळविण्यास सर्व उपाय योजावे लागतात, व ती योजना सढळ रीतीनें झाली तरच काय ती न्यायाची आशा! नाहीं तर ती न होणें हेंच आपलें प्राक्तन समजून 'बापांनो अखंड हरि हरि वदा' या मंत्राच्या घोषानें होईल तेवढें आत्मसमाधान करून घ्यावें हाच काय तो एक राजमार्ग बाकी !!!

# भाग १३ वा.

राजपाळ लालबास आपल्या स्वाधीन करून गेल्यापासून जोधाकुंभाणीस त्याचा निजध्यास लागला होता त्याचें अल्पवय, सुंदर रूप व शिपाईगिरी बाणा, गंभीरपणा, इत्यादिक गुणांबद्दल त्यास राहून राहून विलक्षण वाटे. मुलगी आपले आईजवळ त्याचे धैर्याबद्दल व शौर्याबद्दल जी वारंवार स्तुति करी, ती जेव्हां त्याचे कानावर येई, तेव्हां राजपाळाचें अचाट कृत्य मनांत येऊन त्यास-हा अद्वितीय पुरुष आहे, त्यानें आपल्या मुलीला मोठ्या साहसानें सुखरूप पोंचविलें, परंतु त्याबद्दल गर्वोक्तीचा चकार शब्द नाहीं, हें केवढें आश्चर्य! असें वाटे. पुनः राहून राहून एवढें साहस त्यानें कशाकरितां केलें, व त्यानें आपल्यावर जे महत् उपकार केले ते कसे फेडावे, याविषयींचे विचारही त्याचे मनांत येत. परंतु राजपाळ कोठला राहणारा हेंही त्यास आपण विचारिलें नाहीं, तेव्हां पुढें शोध तरी कसा लावावा या विवंचनेंत तो असे. जितावा जेव्हां जेव्हां आपले वृद्ध पतीशीं बोलत बसे, तेव्हां तेव्हां लालबा दूर अंतरावर राही; परंतु तीं राजपाळासंबंधी कांहीं बोलत असलीं ह्मणजे ती कान देऊन ऐके. एकादे वेळेस जितावा आपला पति आसपास असला ह्मणजे त्याचे कानावर जाई अशा रीतीनें लालबास झालेली हकीकत विचारी, व ती सरळ रीतीनें कांहीं लपविल्याशिवाय सांगे, तेव्हां मुलीचे निर्मळ मनाबद्दल उभयतांस आनंद वाटे. शिद्दी आपणास धरण्यास आला असतां अब्रूचे रक्षणार्थ समुद्रांत पडण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता, तेव्हां राजपाळ त्या पुरुषाचे मागें दिसल्यानें आपणाला तो शिद्दी धरणार इतक्यांत तरवारीनें त्याचीं शकलें केलीं, व आपण भयानें कोटावरून पाण्यांत पडलें असतां त्यानें आपणाला निश्चेष्टित पाठीवरून आणलें, इत्यादि गोष्टी जेव्हां ती आईजवळ सांगे तेव्हां तिची

मुद्रा अगदीं मांद्यावून जाई. राजपाळाचें नांव घेतांना तिचा कंठ दाटून येई, व त्याचे आपणावर उपकार फार झाले असें तिचे चेहेऱ्यावरून दोघांसही कळे. जितावा पतीसमक्ष आतां राजपाळाचे उपकार कसे फिटतील असें तिला विचारी तेव्हां ती लाजून मान खालीं घाली. अशा वेळेस दोघेंही तेवढ्यांत एकमेकांकडे पाहून तिचें प्रेम त्याचे ठिकाणीं आहे असें संज्ञेनें सुचवीत. लालवा आतां लग्नाला आली, एकादें स्थळ पाहून तिला देऊन टाका, असें केव्हां केव्हां जितावा आपले नवऱ्यास ह्मणे, त्या वेळीं तिला आईचें बोलणें थट्टेचें आहे असें वाटत नसे. ती तें खरें मानी. मग तिचा चेहेरा अगदीं गोरामोरा होई. यावरूनहीं आईबापें आपल्या मुलीचें प्रेम राजपाळावर आहे असें अनुमान काढीत. लालवास वाटे कीं, 'एकादें भलतेंच स्थळ पाहून मला ढकललें तर काय करूं? मनानें तर मीं राजपाळास पति मानलें आहे. आतां पाहिजे तें होवो, जीव गेला तरी पतकरला, पण हें शरीर ज्याचे अंगावर लोळलें, व ज्यानें मला हात दिला, व तो मीं धरला, त्यासच अर्पण केलें आहे. त्यांत आतां फरक पडणार नाहीं.' या मनाचे झुरणीनें ती नेहमी उदास राही. तिला या विचारानें कधीं कधीं रात्रीं झोंप येत नसे. मात्र आईबापांच्या जिवास वाईट न वाटावें एवढ्याकरितां ती आपला चेहेरा हंसरा राखी. परंतु असा बाह्यात्कारी आनंद फार तर जोंपर्यंत तिला एकांत स्थळ मिळालें नाहीं तोंपर्यंतच काय तो टिके, व पुनः ती राजपाळाचे मोहक स्वरूपाचे ध्यानांत निमग्न होई. त्याचें निर्मळ आचरण, ममतेनें वागविणें, व साहसानें त्यानें केलेले उपकार हे जेव्हां तिला स्मरत, तेव्हां तिला आशा उत्पन्न होई, व तिचा थोडा वेळ आनंदांत जाई. परंतु बरड्याचे डोंगरांत जातों असें त्याचें शेवटचें भाषण आठवलें ह्मणजे ती अगदीं निस्तेज होऊन जाई. राजपाळ जरी धीट, शूर व हिमती होता, तरी लढाईत त्याचे वर कांहीं संकट

येईल कीं काय ह्या भीतीनें ती डोळे झांकी. काळजीनें रडून रडून ती आपले डोळे सुजवी, व निरुपाय झाला ह्मणजे ती श्रीद्वारकानाथाची करुणा भाकी. 'त्याचें रक्षण करण्याची देवा! तुला काळजी असो' असें ह्मणे. श्रमानें थकली ह्मणजे देहभानावर येऊन आपली ही स्थिति कोणीं पाहिली कीं काय ह्मणून इकडे तिकडे पाही. तिला राजपाळाचा इतका काहीं ध्यास लागला होता कीं, जरा घोड्याचे पाय दाराजवळ वाजले कीं, तिला राजपाळच आला असें वाटे. इतका जरी प्रकार होता, तरी राजपाळावर आपलें प्रेम आहे असें तिनें मर्यादेमुळें कोणापाशींही सांगितलें नव्हतें. शेजारी पाजारी शिळोप्याच्या वेळेस वंडाच्या गप्पा मारीत, तेव्हां ती त्या कान देऊन ऐके, पण त्यांत राजपाळाचें नांव कसें निघावें! ती गोष्टी ऐकतांना कंटाळली ह्मणजे ह्मणे, 'ह्यांस पुरती माहिती नाहीं. हे उगीच गप्पा कां मारीत बसतात?' शेजाऱ्यांपाजाऱ्यांस तरी हिचें मन राजपाळाचे ध्यासानें रंगलें होतें हें कसें कळावें?

तिला विचार करण्यास संधि मिळाली कीं, तिचें मनोराज्य सुरू होई. स्त्रीपुरुषांच्या एकांतविलासांचा अनुभव तिला नव्हता, किंबहुना त्यांची कल्पना सुद्धां तिला नव्हती; परंतु नवरा जन्माचा साथीदार असतो, सुखदुःखाचा विभागी असतो, एवढें मात्र इतरांचे संसार पाहून तिला वाटूं लागलें होतें. राजपाळाचे उपकाराची फेड कशी करावी या विवंचनेंत ती असे. समुद्रांतून पोंहून त्यानें आपणास वांचविलें ह्या गोष्टीची जेव्हां तीस आठवण होई, तेव्हां तिला वाटे कीं, हा संसारसमुद्र तरून जाण्यास राजपाळ आपणास लडिवाळपणानें व ममतेनें मदत करील. ती मनांत ह्मणे कीं, मी त्यांजवर निर्मळ प्रेम करीन, संसारांत त्यांस मनोभावानें मदत करीन, गरीबींत देखील त्यांस स्त्री—

मुखानें राज्यसुखाची बरोबरी करण्यास लावीन, जाडेंभरडें धान्य असलें तरी नीटनेटकें रांधून त्यांस कोंड्यांचे मांडे करून घालीन, शरीरानें व मनानें कष्ट करून त्यांस संतोष देईन, ऊर्जित स्थितींत त्यांस सल्ला मसलत देईन, पति राजकारभारांत गुंतले तर गृहकृत्यें स्वतः संभाळून त्यांस संतोषवीन. यापेक्षां त्यांचे उपकाराची फेड आपल्या हातून कशी होणार?' त्याचे विरहानें तिला सुग्रास अन्न नकोसें झालें होतें, व चांगलीं वस्त्रें आणि अलंकार यांचा वीट आला होता. चंदन, वाळा, अगरु, कापूर इत्यादि सुवासिक पदार्थ व स्वच्छ चांदणें हीं मनाचा संताप दूर करणारीं आहेत, परंतु विरहास्थितींत तींच तिला ताप देणारीं झालीं होतीं.

**राजपाळा**चे ध्यासाशिवाय तिला कोणताही आजार नाहीं, त्याच काळजीनें तिचे चेहेऱ्याची लाली गेली, गाल बसले, अंगाचा गोंडसपणा कमी झाला, व ती नेहमी उदास दिसते, हें तिच्या वृद्ध आईबापांस पूर्णपणें कळून आलें. एके दिवशीं **जोधाकुंभाणी** आपल्या बायकोस ह्मणाला, 'मी **राजपाळा**चे शोधास जातों, मलाही कांहीं सुचत नाहीं. मात्र हा बेत तिचे कानांवर घाल. तिला आपण यत्न करीत आहोंत असें कळलें ह्मणजे थोडा धीर येईल.' त्यावर ती ह्मणाली, 'फार चांगली गोष्ट आहे, मुलीची मर्यादा पहा. एक अक्षर देखील **राजपाळा**बद्दल माझेजवळ नाहीं; तिचे एकंदर वर्तनावरून तिला **राजपाळा**चाच ध्यास लागला आहे असें जें आपण काढलें तेंच खरें.'

हें बोलणें झाल्यावर, रात्रीचे जेवणाचे वेळीं **जोधा** ह्मणाला, '**राजपाळा**चे उपकार आपणावर फार आहेत ते कसे तरी फेडावे हा मनाचा निश्चय झाला आहे. परंतु तो कोठें आहे ह्याचा शोध घेण्यास

मीच जातों. वरड्याची लढाई संपली. वाघेर लोकांचा पाडाव झाला. रस्त्यांत लुटफाट बंद झाली. तेव्हां अमरेळीपर्यंत मी जाऊन येतों.' जिताबा ह्मणाली ' आपण चांगला विचार केला आहे. अमरेळीपर्यंत जाणार तर मलाही माहेरीं न्या. माझी वृद्ध आई फार दिवसांत भेटली नाहीं. लालबा लहान होती, तिलाही आजी भेटेल. भावाची व त्याचे मुलांची भेट होईल.' त्यासही ही सूचना बरी वाटली. दुसऱ्या दिवशीं जेवणखाण आटपून सर्वांनीं निघावें असा बेत ठरला.

हा बेत लालबास मनापासून आवडला. राजपाळाचा शोध लागेल, आजी व मामा भेटतील, अमरेळी दिसेल. ह्या नव्या बेतांनीं तिची उदास वृत्ति पालटली. तिचे विचार जे एकाच विषयांत गुंतले होते, त्यांना आतां निराळी दिशा लागली. रस्त्याचे मुशाफरीकरितां हें घ्यावें तें घ्यावें यांत मन गुंतलें. रात्रीं निजेपर्यंत त्याच विचारांत ती होती, व त्यांतच तिला झोंप लागली.

जोधा कुंभाणी सकाळीं हुक्का ओढीत बसला असतां त्यानें चाकरांकडून जुना माफा ( बुरख्याची गाडी ) काढविला, त्याची झाडपूस करविली, चाकांस ओंगण दिलें, पडद्याच्या दोऱ्या कमीजास्त लाविल्या; व मळ्यांतून एक बैलांची जोडी गड्यासुद्धां आणविली. सर्व सामानसुमानाची आवराआवर चालविली. महिनापंधरा दिवसांच्या मुशाफरीचा बेत असल्यामुळें त्यानें घरांतील कारभाऱ्यास सांगितलें कीं, ' शेताची देखरेख ठेव, कुळांकडचा वसूल आला तर व्रजभुखणकडे भर, व त्याजकडून पावती घे.' या व्यवस्थेंत जेवणाची वेळ झाली. गाडी दाराबाहेर येऊन उभी राहिली. जिताबा व लालबा आपलें सामानसुमान गाडींत भरून बसल्या. जोधाजी आपले घोडीवर स्वार झाला. निघतांना शुभ शकुन झाले. गाडी हांकण्यास त्यानें सांगितलें. चाकरानें

त्यांचे हातांत चांदीचा हुक्का भरून दिला, व हें कुटुंब द्वारकेवरून अम-रेळीचे रस्त्यास लागलें. जातांना द्वारकानाथाचें धूळदर्शन घेतलें व गाडी पुनः चालविली. बेटांतून निघून अमरेळीस पोंहोचण्यास ५–६ मजला कराव्या लागतात, त्यांपैकीं ह्यांनीं चार मजला केल्या. तोंपर्यंत ह्मण-ण्यासारखें कांहीं घडलें नाहीं. पांचवे दिवशीं सायंकाळचे तीन प्रहराचे सुमारास जेथें चार रस्ते एके ठिकाणीं मिळतात अशा एका जागेवर ते आले. जवळच झाडापलीकडे एक विहीर होती. शेताला पाणी पाज-ण्याची मोट चालली होती. जोधाजीनें गाडी उभी करण्याचा हुकूम दिला. गड्यानें बैल पाण्यावर नेले. स्वतः यजमान गाशा टाकून त्यावर हुक्का ओढीत बसला. इतक्यांत घोड्यांच्या टापा ऐकूं येऊं लागल्या. धुळीनें दिशा भरल्या, व त्यांतून हत्यारांचा खडखडाट ऐकू येऊं लाग-ला. लागलेच रिसाल्याचे घोडेस्वार दृष्टीस पडले. त्यांचे मागून तोफा गेल्या. त्यांचे मागें कैदी लोकांचे गाडे होते. त्या गाड्यांसभोंवतीं शि-पाई लोक एका रांगेनें चालत होते. गाडींतून पडदा वर करून जिताबा व लालबा या दोघींनींही ही स्वारी पाहिली. त्यांस अशी स्वारी नवी-नच होती, त्यामुळें त्या लक्ष लावून पाहत होत्या. कैद्यांचे गाड्यांमा-गून लंगोरीवर घोडा उडवीत एक स्वार येत होता. त्याचे मागें दुसरे स्वार होते. राजपाळाचा बछेरा सुंदर व देखणा होता, पण त्यावरचा स्वार तर फारच देखणा होता. लंगोरी तो इतकी हळू हळू उडवी कीं, सर्व लष्कराच्या चालण्याच्या वेगाबरोबरच त्याच्या लंगोरीचा वेग होता. राजपाळाची मूर्ति लालबानें स्वस्थपणें न्याहाळून पाहिली. ज्याचेसाठीं जिनें आजपर्यंत काळजी वाहिली, ज्याचें ध्यान मनोभावानें केलें, व जो सुखरूप रहावा ह्मणून देवास आळविलें, त्यास पाहिल्यानें, चंद्रोदयानें जसें समुद्रास भरतें येतें, तसें तिचे अंगांत आनंदाचें भरतें आलें. अंगा-

वर रोमांच उभे राहिले. आनंदानें कंठ दाटला. प्रेमानें डोळे भरले. ही चळवळ तिचे आईचे नजरेस पडली. तिचे तोंडावर लाली आली. तिचा चेहरा प्रफुल्लित झाला. जें तिचें शरीर कालाप्रमाणें गार लागत होतें, तें आतां ऊन लागूं लागलें. जिताबाचें लक्ष आपल्या मुलीकडे होतें, त्यामुळें लंगोरी घोड्याकडे तिचें लक्ष नव्हतें. नंतर ती त्या घोड्याकडे पाहूं लागली; परंतु इतके वेळांत घोडा पुढें निघून गेल्यामुळें त्याची पाठ मात्र तिला दिसली. तरी पण त्या घोड्यावरचे स्वारास पाहून लालबास आनंद झाला असावा असा तिचा तर्क झाला. ती ह्मणाली, 'तो घोडा काय नामी उडवीत होता!' या ह्मणण्यानें लालबा लाजली, तरी तिचे चेहऱ्यावरची टवटवी थोडीच झांकणार? राजपाळानें जोधाजीस पाहिले असतें तर खचित तो तेथें उभा राहता, व दोन गोष्टी बोलून पुढें जाता. परंतु त्याचें लक्ष बैलाचे गाडीकडे होतें, त्यामुळें जोधाजी त्याचे दृष्टीस पडला नाहीं. हे स्वार पायदळाचें लष्कर गेलें, तेव्हां गाडीवाल्यानें त्यांपैकीं एकास हें लष्कर कोठें जात आहे असें विचारलें. त्याचें उत्तर 'अमरेली' असें आलें. उत्तर ऐकून तर लालबास अधिकच आनंद वाटला. अमरेलीस आतां शोध लागेल, व त्यामुळें मनाप्रमाणें कार्य होईल या आशेचे आनंदांत ती आपलें झुरणें विसरली. क्षणोक्षणीं तिचे चेहऱ्यावर नवें नवें लावण्य भासूं लागलें. डावा डोळा व बाहु स्फुरूं लागले. या शुभ शकुनानें तिच्या मनास शांतता आली.

जिताबास तो बछेरा फार सुंदर वाटला. त्याची आयाळ छातीपर्यंत लोंबत होती. त्याचा रंग बगळ्यासारखा पांढरा होता. दांडी चैरीप्रमाणें उडत होती व वरील स्वार त्याहूनही सुंदर होता, त्यामुळें दोघे मिळून एकादें चित्र काढल्याप्रमाणें दिसत. तारुण्य, लावण्य व अलौकिक गुण ह्यात आकर्षणशक्ति स्वाभाविकच असते. तिचे योगानें दुसऱ्याचा

मन सहज ओढलें जातें. त्याबद्दल आग्रह करावा लागत नाहीं. इतके वेळांत थोडीं का वोडीमाणसें आपणा पुढून गेलीं! परंतु ज्याचें तेज त्यासच, तें कां दुसऱ्यास येतें? बछेऱ्यास व वरील स्वारास उद्देशून या अर्थाचें भाषण जिताला बोलली, व त्याचा अर्थ लालबा आपल्या मनांत समजली. तिला वाटलें कीं, आपण राजपाळास पाहिल्यापासून आपले मनाची जी धांदल झाली ती आईनें ओळखली. मग ती ह्मणाली, 'दुसऱ्याचें ऐश्वर्य, गुण, विद्या हीं जरी चांगलीं असलीं, तरी तीं दैवानें ज्यास मिळतील त्यानेंच भोगावींत. तीं मिळविण्याची ज्याची योग्यता नाहीं त्यानें तीं चांगलीं आहेत एवढेंच दृष्टीनें पाहून संतोष मानावा.' नंतर लालबानें दुसरी गोष्ट काढून तो विषय बदलला. ती ह्मणाली 'अजून सगळे दोन दिवस अमरेळीस पोंहोचण्यास लागतील. पायरस्त्याचा कंटाळा आला. अमरेळी किती तरी लांब आहे!'

ह्याप्रमाणें सहा दिवसांचा प्रवास संपला. झाडांतून अमरेळींतील घरें दिसूं लागलीं. या वेळेस गुरें गांवांत जाऊं लागलीं होतीं, यामुळें धूळ चोहोंकडे उडत होती. गांवांतील गलबला ऐकूं येऊं लागला. दिवे दिसूं लागले. जातां येतां माणसें दिसलीं. अशा रीतीनें रस्ता चालतां चालतां ही गाडी लालबाचे आजोळीं जाऊन पोहोंचली.

गाडी दाराबाहेर रस्त्यांत उभी राहतांच घरांतील व आळींतील मुलें पाहण्यास जमलीं. घरांतून लालबाचा मामा पाहण्यास आला. बहिणीस व भाचीस त्यानें खालीं उतरलें, व चाकरांकडून जोधाजीचें घोडें धरविलें. त्यास उतरून घरांत नेऊन त्यानें त्यास पाटावर बसविलें. लहान मुलें लालबास ओळखीत नव्हतीं, पण तीं थोड्याच वेळानें तीस ओळखूं लागलीं. तिनें लहान मुलें कुरवाळिलीं व कडेवर घेतलीं. त्यांचे तोंडावरून हात फिरविला. जिताबा घरांत गेली. वृद्ध आई फार वर्षांनीं भेटली ह्मणून ती तिला कडकडून भेटली. लालबा जवळ

गेली असतां तिनें तिला मांडीवर घेतलें. जांवईबुवा फार वर्षांनीं घरीं आले ह्मणून सासूचे आनंदास पारावार नाहींसा झाला. मुलें व पाहुणे यांनीं घर गजबजून गेलें. सुना पाहुण्यांच्या आदर आतिथ्यासाठीं गोडधड करण्यांत गुंतल्या, तरी वृद्ध ह्मातारी अमुक असें कर, अमुक तसें कर, हें सांगतच होती. लहान मुलें संध्याकाळीं जेवलीं. पक्ष्यांचे डोळे जसे रात्रीं मिटतात तशीं सर्व दिवसभर वागडलेलीं मुलें खाणें आटपतांच पेंगूं लागलीं, व कोणी पाळण्यांत, कोणी खाटेवर, व कोणी आंथरुणावर, याप्रमाणें निजलीं. **जोधाकुंभाणी** सासूचे भेटीस आला. त्यानें तीस नमस्कार केला, व तिनें त्यास आशीर्वाद दिला. फार दिवसांनीं भेटीचा योग आला, तरी पण त्यायोगानें मला फार आनंद झाला असें ती ह्मणाली. यावर तो ह्मणाला '**लालबास** बरेच दिवस बेट नव्हतं. बेटाचे दंग्यांस दरोडेखोर घरांत शिरले होते. **द्वारकानाथाच्या** कृपेनें सर्व विघ्नें गेल्यावर इकडे कांहीं कामासाठीं यावयाचें होतेंच, तेव्हां सर्वांच्या भेटी होतील ह्मणून सर्व खटल्यासुद्धां हा येण्याचा बेत केला.' वृद्ध सासू ह्मणाली, 'माझें वय झालें, आपण सर्व भेटलांत. आतां कांहीं अशा नाहीं. **लालबाचें** लग्न एकदा माझे देखत करा ह्मणजे झालें.' **जोधाजीनें** ' पण **पथाजी** आतां कोठें आहे ?' असें विचारिलें असतां सासूनें ' तो **गोंडळचे** दरबारांत सुखरूप आहे. त्याचें पत्र आलें होतें, मात्र पत्रांत येण्याबद्दल कांहीं लिहिलें नव्हतें' असें सांगितलें.

इतकें बोलणें होत आहे तों घोड्याच्या टापा दाराकडे ऐकूं आल्या. गडी धांवत घरांत येऊन त्यानें **पथाजी** आल्याची खबर वृद्ध आईस कळविली. तें ऐकून तिला आनंदाचें भरतें आलें. **लालबा** दाराकडे धांवत गेली. **जिताबा** मुलगा आलेला पाहण्यास माजघरांत उभी होती. पांच सात वर्षांपेक्षां अधिक वयाचीं मुलें आंथरुणांवर लोळत होतीं, तीं

या गडबडीनें दाराकडे धांवलीं. पथाजीनें लालवाचे हनवटीस हात लावून पाठ थोंपटली. जमलेलीं मुलें त्यानें दोन कडेवर घेतलीं, व एक हातीं धरलें, व लालवाचे मागें घरांत शिरला. मामाची गांठ पडली. पथाजीनें आईला नमस्कार केला, परंतु मुलें त्यास आजीकडे ओढीत होतीं. आजी ज्या सोप्यांत होती तेथें तो गेला, व त्यानें तीस नमस्कार केला. तिनें त्याला पोटाशीं धरिलें, व त्याचे मस्तकावर हात फिरविला. ती ह्मणाली 'आजच्या आनंदास पारावार नाहीं. माझे डोळ्याचें पारणें फिटलें. लालवा एकदा उजवली ह्मणजे झालें. जा थकला असशील, कपडे काढ, जेवणाची तयारी आहे. पाहिजे तर साखरपाणी घे.'

मुलें साखरपाण्यासाठीं तयार होतींच, तीं 'दादा, साखरपाणी आण' ह्मणू[illegible] ओरडलीं. मन घरांत तरबेज होती. पाण्याचा तांब्या व साखरेची वाटी पुढें आली. मुलांस साखरपाणी दिलें. हा थोडें प्याला, व आपला पिता जोधाजी बसला होता तिकडे गेला. जोधाजी ह्मणाला, 'एकदम अमरेळीस तूं कसा आलास? याबद्दल पत्र नाहीं व मागील पत्रींही तूं कांहीं लिहिलें नव्हतें.' तो ह्मणाला, 'पांच सहा महिने झाले, मला स्वारांचा तांडा देऊन बरड्याचें बंड मोडण्याडे मदतीस पाठविलें. मीं तिकडे जातांना पत्र लिहावें, परंतु एकदम हुकुमाप्रमाणें निघालों. त्यामुळें वेळ झाला नाहीं. आपण येथें केव्हां आलां?' जोधाजी ह्मणाला, 'आजच संध्याकाळीं. बेटावर बंडवाल्यांनीं कहर केला तेव्हांपासून मीं तुला पत्र लिहिलें नाहीं. सर्व बेट ओसाड झालें. मंदिरें पडलीं. तटबंदी सुरुंग लावून उडविली. गांवांत टोपीवाल्यांनीं लूट केली. गरीब माणसें प्राणास मुकलीं. कित्येक दिवस रडारडी व जखमी लोकांचे केंविलवाणे शब्द कानीं येत होते. आपले बराबर दरोडा आला होता, परंतु दोन चाकर घेऊन मी त्यास आपल्या आळीपर्यंत परत लाविलें. घरीं येऊन

पाहतों तो **लालबा** घरांतून नाहींशी झाली. सर्व रात्रभर वंडाची धामधूम होती. आजूबाजूस बराच तपास केला. परंतु कांहीं पत्ता लागेना. मग आह्मी अगदीं निराश होऊन परमेश्वरावर हवाला ठेवून होतों. पोलिसांतही खबर दिली, परंतु कित्येक दिवस कांहींच सुगावा लागला नाहीं. शेवटीं एके दिवशीं सायंकाळचे सुमारास एक तरुण गृहस्थ मुलीस घेऊन घरीं आला. त्यानें **लालबास** सुखरूप पावती केली. मग आह्मीं त्या आनंदांत त्यास रात्रीं ठेवून घेतलें. परंतु **वरडयाकडे** जावयाचें आहे असें सांगून तो निघून गेला. त्याचें नांव **राजपाळ** आहे; परंतु तो कोठील राहणारा वगैरे माहिती मीं त्यास विचारली नाहीं. त्यानें **लालबाचे** संबंधानें जे आपणावर उपकार केले आहेत ते कसे फिटतील? **लालबा** त्याचे धैर्याबद्दल, शौर्याबद्दल व स्वभावाबद्दल फार स्तुति करिते. त्यास आह्मीं पा[illegible] [illegible] आहे, तेव्हां त्याचे रूपाबद्दल तर बोलणें नकोच. त्याचा चेहेरा किती गोड, डोळे किती पाणीदार! व इतकेंही असून त्यानें **लालबाबद्दल** जे श्रम केले त्याबद्दल एकही शब्द काढिला नाहीं. **लालबा** त्या दिवसापासून दिलगीर आहे. तिची टवटवी गुलाबाचें फूल जसें कोमेजतें तशी मावळली. शेवटीं इकडे तपास करावा असा बेत केला. त्यांत सर्वांचा विचार तुझे आजोळीं जावें असा ठरला, त्यामुळें इकडे आलों. आतां तूं व तुझा मामा मिळून तपास करा. लागला **राजपाळाचा** पत्ता, तर चांगलेंच. ती अगदीं त्याचे साठीं खंती असते. यावी **राजपाळाला** ह्मणजे उपकार थोडे कमी होतील व तिला सुख लागेल.' **पथाजी** ह्मणाला, 'उद्यांच तपास करूं. परंतु तो जातीचा कोण आहे, त्याचें लग्न झालें आहे किंवा नाहीं, तो लग्नास कबूल आहे किंवा कसें, मुख्यत्वें **लालबाचें** प्रेम जसें त्याचेकडे गुंतलें आहे, तसें त्याचें प्रेम हिच्याकडे गुंतलें आहे किंवा कसें, हें पाहिलें पाहिजे.' यावर बाप ह्मणाला, '**लालबाबद्दल** आह्मांला शंका नाहींच.

मात्र त्याचा पत्ता लागला ह्मणजे झालें.' हें ऐकून 'बरें तर मीही तिचेजवळून थट्टेनें कांहीं काढीन.' असें पथाजीनें उत्तर दिलें.

इतक्यांत जेवणाची तयारी झाली असें सांगण्यास लालबा घरांतून बाहेर आली. तिचेबराबर हा माजघरांत गेला. पथाजी जातीचा थट्टेखोर होता, तो आई उभी होती तिजजवळ जाऊन तिला व लालबाला ह्मणाला, 'लालबावरचें मोठें विघ्न टळलें ह्मणून बाबा मला सांगत होते. पण कायग ताई, तुला ज्यानें घरीं आणून पोंचविलें, तो बाबा ह्मणतात चांगल्या स्वभावाचा होता. सारें खरें, पण त्याच्याकरितां इतकी उठाठेव, तो गांव सोडून दे, या गांवीं ये, इतकें ग कशाला पाहिजे होतें?' इतके शब्द त्याचे तोंडून निघाले मात्र, तो लालबा हिरमुसलें तोंड करून ओसरीवर गेली. आई ह्मणाली,' पथाजी, जाऊंदे रे, तिला उगीच खिजवं नको [illegible] पडला आहे. ज्यानें तिला जीवदान दिलें, संभाळून घरीं पोहोंचविलें, त्याचे विरुद्ध कांहीं शब्द निघाले तरी ती दुःखी होते. नुसतें तुझे समक्ष जर तिचें लग्न करून टाका अशी गोष्ट काढली तर देखील तिचा चेहेरा गोरामोरा होतो. तिचें प्रेम त्यावर इतकें दृढ झालें आहे कीं तें कांहीं सांगतां येत नाहीं.'

इतकें बोलणें झाल्यावर सर्व मंडळी लालबासुद्धां जेवावयास बसली. जेवण चालू असतां जोधाकुंभाणीनें बंडांत वाघेर लोकांचें काय झालें ह्मणून प्रश्न केला, त्यावरून पथाजी ह्मणाला, ' उखामंडळांतून त्यांस पिटाळून लाविलें, तेव्हांपासून त्यांस स्वस्थता मिळाली नाहीं. रोज पळापळी चालली होती, व त्यांचे मागें लष्कर लागलें होतें. बरड्यांत त्यांनीं चांगली मोर्चेबंदी केली होती. सिंदी, वाढेल, धेड व भय्ये लोक वाघेर लोकांच्या तर्फेनें अगदीं एक दिलानें सरकारी फौजेबराबर लढले. सर्व मोर्च्यांत दंतालयाच्या मोर्च्यानें त्यांचा चांगला बचाव झाला. परंतु वाघेरांस तेथूनही पळावें लागलें. सरकारी लष्करापुढें ते किती

टिकणार?' हें ऐकून वृद्ध **जोधाजी** ह्मणाला, 'ना, ना, असें ह्मणूं नका. **वाघेर** लोकांनीं शौर्याची कमाल केली. टोपीवाले लोक त्यांचे तरवारीची बहादरी पाहून तोंडांत बोटें घालीत. व ह्मणत कीं, यांस जर चांगल्या बंदुका मिळून दारूगोळीचा चांगला पुरवठा असता, तर त्यांचीं दहा माणसें पांचशें लष्करचे शिपायांस भारी होतीं.' **पथाजी** ह्मणाला, 'एका भेद्यानें त्यांच्या मोर्च्यावर आडवाटेनें फौजेच्या तुकड्या नेल्या, व त्यांनीं त्यांच्या मोर्च्यावर चोहोंकडून मारा केला.' **जोधाजी** ह्मणाला, 'कोणी भेद्या डोंगराचा माहितगार असेल. त्याशिवाय गैरमाहित माणसें काय करणार? टोपीवाले भारी हिकमती.' हें ऐकून **पथाजी** किंचित् तिरस्काराची मुद्रा करून ह्मणाला, '**वाढेल** असोत अगर **वाघेर** असोत, पण **कर्नल ऑनर** व **कॅप्टन् वार्टन** यांच्याजवळ दोन माणसें आहेत, व तींच त्याचे वाटाड्ये आहेत असें ह्मणतात. **जोधाजी** विचारतो, 'असतील, पण हे वाटाड्ये तुझ्या ओळखीचे आहेत का? बापाच्या प्रश्नावर मुलगा उत्तर देतो. 'नाहींत, आमचें तालुकदाराचें लष्कर एके बाजूस होतें यामुळें त्यांची माझी कधीं गांठ पडली नाहीं, व शिवाय ते टोपीवाल्यांचे तंबूमागें राहतात. ते लष्करांत, स्वारांत, शिपायांत व कामदाराकडे केव्हांही येतांना दिसत नाहींत. ते मंडळींत गप्पा मारण्यास येत नाहींत, एवढेंच नव्हे, तर हुक्का, अफू, कुसुंबा वगैरे घ्यावयास बरेच वेळां छावणींत मंडळी निरनिराळी जमे तींतही ते कधीं मिसळले नाहींत. त्यामुळें परिचय झाला नाहीं.' पुनरपि **जोधाजी** म्हणाला, '**वाघेर** किती मेले?' लष्करांतले किती लोक कामास आले, व किती **वाघेर** हातीं लागले? यावर **पथाजी** उत्तर करितो '**वाघेर** लोक व सरकारी पुष्कळ लोक मेले. **वाघेर** लोक कंटाळले, व **जोधा माणेक** वगैरे पुढारी लोक आजारानें मेले. कित्येक जखमी होऊन संपले.

चोहोंकडून नाकेबंदी झाली. सरकारी लष्करानें पाठलाग केल्यामुळें वाघेर लोकांस पळतां भुई थोडी झाली. उपासमार होऊं लागले, त्यामुळें ते कंटाळले व बावरले. इतक्यांत सरकारानें बंदोबस्ताची व माफीची आशा दाखविली, त्यामुळें शेंकडों लोक स्वतः होऊन हजर झाले, व कित्येक लोक पकडले गेले.' यावर सरकारी लष्करांत बहादुरी कोणीं कोणीं केली ह्मणून ह्मताऱ्यानें विचारलें असतां पथाजी उत्तर करितो. 'तालुकदारांचें व गायकवाडांचें लष्कर सर्व झटून लढत होतें, परंतु जे भेद्ये ह्मणून मीं आपणास कळविलें, त्यांपैकीं एक तर फारच बहाद्दर आहे असें ह्मणतात. त्याचे जवळ घोडा आहे तसा घोडा सर्व लष्करांत काय, पण काठेवाडांतही नाहीं. त्यावर बसून तो ओढे ओलांडून जातो, व पाहिजे तितकी मजल मारतो, त्यामुळें त्याचे शौर्याचे व माहितगारीचें चीज झालें.' वृद्ध जोधाजीस या भाषणाचा किंचित् चमत्कार वाटून 'हा भेद्या हल्लीं कोठें आहे?' ह्मणून त्यानें आपल्या मुलास प्रश्न केला, तेव्हां पथाजी ह्मणाला, 'कैदी व गुन्हेगार लोकांचा इनसाफ करण्याकरितां येथें कमिशन होण्याचें ठरलें आहे, त्यामुळें खुद्द साहेबांनीं त्यास कैद्यांबरोबर स्वार पायदळ सुद्धां बरड्याकडून रवाना केलें, व त्यानंतर आह्मी आमचे स्वार घेऊन निघालों.' हे शब्द एकून जोधाजीस पाहिलेल्या फौजेची आठवण होऊन तो ह्मणाला, 'खरेंच, परवां स्वरांची टोळी कैदी लोकांस गाड्यांत घालून नेत होती खरी!'

बापाच्या व भावाच्या तोंडचे हे शब्द ऐकून लालबास राजपाळाचें स्मरण झालें. उभयतांचा सर्व संवाद ती कान देऊन ऐकतच होती. तिला राजपाळाची बहाद्दरी व कीर्ति लढाईत देखील झाली हें ऐकून विलक्षण आनंद झाला, व त्या आनंदाचे भरांत जेवतांना कित्येक वेळां तिचा ओंठही दातांत आला. एक दोन वेळां तर तोंडांतून घासही खालीं

पडला. जिताबा जवळ बसली होती तिचें लक्ष मुलीकडे होतेंच, व तिनें सहज ताडिलें कीं, केद्यांच्या गाड्यामागून घोडा उडवीत जाणारा गृहस्थ तोच हिचा इच्छित पुरुष असावा. मायलेकींनीं एकमेकींकडे पाहिलें, व एकीमेकींचें हृद्गत एकीमेकींनीं ताडिलें. जोधाजी आपल्या बोलण्याच्या नादांत होता, तो आपल्या मुलास ह्मणाला, 'मला वाटतें, तोच गृहस्थ त्या केद्यांबरोबरचे टोळींत होता. संध्याकाळ झाली होती, धुराळा फार उडत होता; त्यामुळें मीं त्यास पाहिलें नाहीं. असो. तें राहूंदे. एकूण तो गृहस्थ अमरेलीस आलाच असेल तर?' यावर पथाजीनें उत्तर केलें, 'हो, हो, तो आलाच असेल. उद्यां मी त्याचा शोध घेईन, व आपणास सर्व हकीकत कळवीन.'

भोजनोत्तर ह्याच गोष्टी चालू होत्या. वरांतून सासूबाईनें सांगितलें कीं, 'आतां गोष्टी पुरे करा. तुह्मी सर्वजण दूरून भागून आलां आहांत. आतां निजा. रात्र बरीच झाली आहे.' हें ऐकून जो तो विश्रांतीसाठीं बिछान्याकडे गेला. या वेळेस नागनाथाच्या मंदिरांतील मध्यरात्रीचा चौघडा झडत होता. फार दिवसांच्या एकमेकांच्या भेटीनें तें घर लग्न घराप्रमाणें वाटूं लागलें, व त्या आनंदांत सर्वांस गाढ निद्रा लागली.

# भाग १४ वा.

मनुष्यस्वभाव फार विचित्र आहे. जो विषय तो मनःपूर्वक घेतो, तो हरप्रयत्नानें तडीस नेण्यासाठी पाहिजे त्या गोष्टी करण्यास तो तयार होतो. त्यास कितीही अडचणी येवोत, पाहिजे त्या प्रकारचीं दुःखें सोसण्याचा प्रसंग येवो, एकदा कृतनिश्चय झाला कीं तो तेंच शेवटास नेण्याचा यत्न करणार हा मानवी स्वभावाचा धर्म होय. असलीं अचाट व विचित्र कृत्यें जगांत नेहमी घडत असतात, परंतु पुन्हां तीं जशीचीं तशींच अगर त्यांस थोडें निराळें रूप देऊन लोकांपुढें आलीं, तर त्यांपासून लोकसमाजास पुष्कळ गोष्टी घेण्यासारख्या असतात.

अमरेळी गांवांत बरीच सामसूम झाली होती. मध्यरात्रीचे सुमारास ओसाड वस्तीचे एका मोहोल्यांत मोठा लढवय्यासा भासणारा अशा एका मनुष्यानें एका घरास आंतून कडी घातली. त्यानें हातांतील कंदील एके भिंतीजवळ जमिनीवर ठेवून, बगलेंतील गांठोडें भिंतीस लावून ठेविलें. गांठोड्यांतून त्यानें मेणबत्ती व आरसा घेऊन मेणबत्ती पेटवून जमिनीवर ठेविली, व आरसा भिंतीस दिव्याचे उजेडाचे प्रमाणानें ठेविला. आरशांत आपला चेहेरा कांहीं वेळ पहात राहून त्यानें दाढीमिशांवर हात फिरविला, व वेशांतरानें इतके दिवस निभावले याबद्दल परमेश्वराचे आभार मानिले. त्यानें पुन्हां दाढीमिशांवर हात फिरवून मिशांस पीळ भरला. 'दाढीमिशांनो! तुह्मी धन्य आहांत. तुमचे आश्रयानें लष्करांत बिनधोक मला राहतां आलें. शूर पुरुषाप्रमाणें मीं धाडसाचीं कामें केलीं.' इतकें बोलून त्या मनुष्यानें कंबरबस्ता सोडला;—पिस्तुलें, जंबिया व तरवार एक बाजूस काढून ठेविलीं, व त्यांकडे पाहून तो ह्मणाला, 'शस्त्रदेवतांनो! तुह्मांस नमस्कार असो. तुमचे आश्रयानें शौर्य दिसावें हा तुमचा धर्म आहे; परंतु शौर्यास कांहीं राव नको, रंक नको, तें पाहिजे त्या जातींत प्रसंगानें उत्पन्न होतें! हत्यारें हीं शूरास एक साहित्य होत! या देहास पाहून छावणींतील लोक नाना तऱ्हेच्या कल्पना करीत असतील. माझी मूर्ति हमेषा हत्यारबंद त्यांस दिसते, त्यामुळें मला

शिपाईगिरीचा फार शोक असेल असें त्यांना वाटत असेल, व ते मला ढालींबंद गणीत असतील! परंतु काय जादू पहा, बाहेरचे वेशानें लोकांस कसें भुरळ पडतें तें! बाकी अंदरकी बात राम जाने या ह्मणीप्रमाणेंच होत.' इतकें बोलून तो मनुष्य कांहीं वेळ स्तब्ध राहिला, व पुन्हां आपले मनाशीं बोलूं लागला 'हो, आपण या शहरांत ओसाड वस्तींत अपरात्रीं ज्या कामाकरितां आलों, तें काम आधीं करावें.' नंतर त्यानें घरांत भरून ठेविलेलें पाणी घेऊन दाढीमिशा भिजविल्या, व त्या हळूच काढून पुसून बाजूस कपड्याचे गांठोड्यावर ठेविल्या. कांहीं वेळानें तो त्यांजकडे पाहून ह्मणाला, 'थांबा महाराज, अजून तुमचा आश्रय मला पाहिजे!' मग रूदार अंगरखा व तुमान काढून त्यानें अंगांतील रूदार बंडी घट्ट घातली होती ती काढली, व बंडी हांतात घेऊन तिकडे न्याहाळून पाहूं लागला. 'बाई! तूंच आजपर्यंत या स्त्रीरूपाची छपवणी केलीस' इतकें बोलून त्या पुरुषवेशधारी स्त्रीनें अंगातील कांचोळी काढून, आपले वक्षःस्थळाचें निरीक्षण केलें, व दीर्घश्वास सोडला. ह्या वेळीं तेथें जर कोणी दुसरें पहणारें असतें, तर त्यास तिचा उरोभाग काळजीनें निस्तेज झालेला दिसल्यावांचून राहिला नसता. अंगांतून फार दिवसांनीं बंडी निघाल्यानें तिला थोडें समाधान वाटलें. घामाचे योगानें बंडी अगदीं कुजल्यासारखी झाली होती. लोकांस घामाचा वास येऊं नये ह्मणून सुवासिक द्रव्यें बंडीचे खिशांत तिला नेहमी भरून ठेवावीं लागत, व त्यामुळेंच तिला आपल्या घामाचा वास दडवून ठेवितां आला. असो; स्वच्छ उदकानें अंग धुतल्यावर तिनें तें चांगलें पुसलें, व पुन्हां त्या आरशाकडे ती पाहूं लागली. आपल्या प्रिय माणसाचें वियोगदुःख, त्याचे भेटीसाठीं लष्करी नौकरीची दगदग, त्यामुळें तारुण्याची विटंबना, या सर्व गोष्टी एकदम तिच्या मनांत उभ्या राहिल्या. 'परमेश्वरा! आतां अंत पाहूं नको! जो गुन्हा अगर जें कृत्य हातून घडलें, त्याच्या मानानें आजपर्यंत भोगलें तें प्रायश्चित्त फार झालें! परंतु मीं जें केलें त्यांत वास्तविक पाहतां अपराध कोणता? हो, लोकरूढीच्या दृष्टीनें मात्र अपराध खरा, पण त्यास तरी माझा काय उपाय? वयाचे मानानें

ज्वानी येणें स्वाभाविक आहे. शरीरांत कामविकार उत्पन्न होण्यापूर्वींच जर बापानें लग्न करून टाकलें असतें, तर मग हा प्रसंगच न येता. परंतु रणमलास बाबांनीं घरांत आणून ठेविलें, त्याचे गुणांचें वर्णन केलें, शिवाय त्याचें सौंदर्य, ऐटदार बांधा, व बोलण्याचें चातुर्य, या गुणांनीं तो जास्त मोहक दिसूं लागला; त्याचा हमेषां निकट सहवास, यामुळें त्याचें प्रतिबिंब माझ्या हृत्पटलावर वठलें, व एकांतांत जेव्हां भेट झाली, तेव्हां नेहमी मनांत घोळत असलेले विचार चंद्रोदयानें समुद्र अनावर होतो त्याप्रमाणें अनावर होऊन उसळले! परस्परांचा एक विचार व निर्मळ प्रेम या दोहोंची गांठ पडतांच, शरीराच्या नैसर्गिक क्रिया आपोआप घडल्या यांत माझा दोष नाहीं, याची माझें मनच मला साक्ष देतें! हे जगदीशा द्वारकानाथा! तूं सर्वसाक्षी आहेस. मीं रणमलाचें रूप, गुण, कुळ पाहून त्यास जन्माचा साथीदार केलें, व त्याशिवाय जगांतील सर्व पुरुष मीं भावाप्रमाणें मानले, यांत मीं कोणती अनीति केली? माझें लग्न लौकर व्हावें यासाठीं आईनें बाबांस थोडें का सांगितलें? परंतु चांगलें कुळ स्थळ पाहण्यांत दिवस गत झाले! बाबांचा तरी काय अपराध? त्यांनीं जे दिवस गत केले, ते तरी त्यांस अडचणींनेंच गत करावे लागले असावेत! मुलांचे बरें व्हावें अशी आईबापांची इच्छा असणें साहजिक आहे हें जसें खरें, तसेंच पाण्यास तुंबारा झाला ह्मणजे पाणी आपण होऊन रस्ता काढतें हेंही पण खरेंच आहे! असो; झालें तें झालें, परंतु इतकें करूनही रणमल मला फार वेळ लाभला नाहीं. आईबापांस सोडून प्रिय रणमलाचे आधारावर घर सोडलें. दुर्दैवानें नदीच्या त्या धांदलींत त्याचा वियोग झाला! खचित त्यास वाटलें असेल कीं मी त्या वेळीं नदींत बुडून मेलें, आणखी त्यामुळेंच माझा पुढें शोध करण्याचें त्यानें सोडिलें असेल! छेः माझा वियोग त्यास दुःसह होईल! माझा शोध

करणार नाहीं असें खरेंच, त्याचें मजविषयीं प्रेम नव्हतें. ईश्वरा! माझें कांहीं होवो, पण त्यास आरोग्यांत सुखी ठेव. जे जे प्रसंग येतील ते ते भोगलेच पाहिजेत. बुद्धीनें व शरीरानें जे शोध करण्याचा यत्न आहे तेवढा करावा. यावर नशीब!' असें बोलत असतां विरहदुःखानें तिचे डोळे भरून आले, व टपटपां थेंब पडले. कांहीं वेळानें रडें सांवरून तिनें पुन्हां मांडचोळणा घातला, व चोळी घालून त्यावर रुवाची तंग बंडी घातली. बंडी घालतांना तिनें पुन्हां दीर्घ श्वास सोडला, व मनांत ह्मणाली, 'चोळी उघडपणें घालण्याचा योग येईल तो सुदिन!' नंतर पुरुषाप्रमाणें केशकलाप बांधून व दाढीमिशा पहिल्याप्रमाणें चिकटवून तिनें फेंटा व हत्यारें चढविलीं; व आरशांत आपल्या रूपांतराचें निरीक्षण केलें. 'वाः काय मजा आहे? या एका पोशाखाचे सोंगानें बनलें मी पुरुष! शिपाईगिरिच्या नुसत्या ऐटीनें मोठे मोठे शूर पळविले! याच्याच साह्यानें स्वतःचा बाप राजपाळास विनंति करून सोडविला, व नाइलाजास्तव त्यास कैदेंत राहूं दिलें, हे सर्व ह्या सोंगाचे परिणाम! जगांत अशींच हजारों कृत्यें नुसत्या सोंगाच्या बतावणीनें होत नसतील कशावरून! मागें पुराणांतरीं अर्जुनानें स्त्रीवेश घेतला होताच कीं नाहीं? मग मी तर बोलून चालून अबलाच आहे. व्यवहारांत देखील पोशाखाचे भपक्यावर किती तरी माणसें फसतात! खरें पाहिलें तर पोलीसचा भिकारडा शिपाई व एकादा शेतकरी दोघेही एकाच खेड्यांतील माणसें असतात, परंतु त्या पोलिसचे वेशानें पाहिजे त्या गरीब शेतकऱ्यास तो पकडून नेतो; पण तें फक्त त्या कपड्याचें बळ! तेंच काढून घेतलें कीं पुन्हां तो पहिल्याप्रमाणेंच गांवढेकरी होतो!'

असो; अशा प्रकारचे उद्गार मनांतून निघाल्यावर तिनें गांठोडें बांधलें व कंदील हातीं घेतला. जागेचे भाड्याचे पैसे तिनें पूर्वींच दिले होते. जातांना घरवाल्याचा गडी ओटीवर पडला होता, त्यास घर संभाळ ह्म-

शून जागें केलें, व आपले छावणींत जाण्यास ती निघाली. ती रस्त्यांत आली तेव्हां पाहटेचा चौघडा झडत होता. **अमरेळी** गांवचे वेशीचा दरवाजा दरवानानें उघडून दिला, व तिनें छावणीकडे जाण्याचा मार्ग धरला. छावणीचे पाहरेकऱ्यास तिचें **भियाजी लाखा** हें नांव ओळखीचें होतें त्यामुळें पुसतपास झाला नाहीं. नंतर आपले राहुटींत जाऊन वळकटी आंथरून ती आडवी झाली. या वेळेस झुंझुरमुंझुर दिसूं लागलें होतें, व प्रभातकाळची थंड वाऱ्याची झुळूक वाहत होती.

कांहीं वेळानें छावणींत नित्य यात्रा सुरू झाली, व जो तो आपले धंद्यास लागला. कांहीं विशेष कामासाठीं **कर्नेल ऑनर** यांनीं **बार्टन** साहेबांस चिठ्ठी दिली होती ती देण्यासाठीं **राजपाळ** त्यांचे तंबूकडे जात होता. आपला **भियाजी लाखा** हा नित्याचे वेळेस उठून बाहेर पडला होताच, त्याची व **राजपाळा**ची गांठ पडून तें दोघेही गप्पा मारीत तंबूकडे चालले. तंबूजवळ पोंचतात तोंच तंबूंतून **पत्रामल** आपलें काम संपवून बाहेर आलेला त्यांच्या दृष्टीस पडला. उभयतां बंधूंची नजरानजर होतांच त्या उभयतांस आनंदाचें भरतें आलें. दोघे बरेच दिवसांपासून निराळे होते, ते एक ठिकाणीं भेटल्यामुळें असें होणें साहजिक होतें. एकमेकांस माहीत नाहीं, तरी ज्याप्रमाणें **राजपाळाचा** उपयोग या बंडाचे कामीं झाला, त्याप्रमाणेंच **पत्रामल**ही हेंच बंड शमविण्याचे मदतीस होता. **भियाजी लाखास** तर **पत्रामलास** पाहून इतका विलक्षण आनंद झाला कीं, तो त्याच्या हृदयांत मावण्यास जागा पुरेनाशी झाली; परंतु हल्लींचे स्थितींत व वेशांत तो खुल्या रितीनें बाहेर दाखविण्याची सोय नव्हती, यामुळें तो कसा तरी दाबून रूपांतरानें तरी प्रकट करण्याकडे त्याची प्रवृत्ति झाली. तो त्या दोघां भावांजवळ जाऊन नुसता 'उभयतांचे जयजयकार! आनंद! आनंद!' एवढेच शब्द बोलला. इतक्यांत **राजपाळ** तंबूंत जाऊन चिठ्ठी साहेबांस देऊन व पुन्हां भेटेन

असें सांगून निरोप घेऊन परत आला, व उभयतां बंधु व भियाजी असे सर्व मिळून पत्रामलाचे राहुटींत गेले. इतका वेळ राजपाळ व पत्रामल यांचें नातें काय हें समजण्याची भियाजीस उत्कंठा झाली होती, व त्यावरून त्यानें राजपाळास तसें विचारिलें. राजपाळ ह्मणाला 'मी कपिलाषष्ठीचे मेळ्यासाठीं घरून हे माझे वडील बंधु पत्रामलजी यांचा निरोप घेऊन निघालों, त्या दिवसापासून पुन्हां आज ही भेट झाली.' या वेळेस जेवण्याची वेळ झाली होती, त्यामुळें राजपाळास व भियाजीस पत्रामलानें आपले तंबूवरच रहाण्यास सांगितलें. भियाजीचे चेहऱ्यावर वाटत असलेल्या आनंदाची टवटवी दिसत होती, परंतु प्रस्तुतच्या वेशानें पत्रामलचे समोर जास्त वेळ राहण्याचें धैर्य त्यास होईना, त्यामुळें त्यानें घोड्याचे चंदीचाऱ्याचें निमित्त सांगून रजा घेतली, व तो आपले राहुटीकडे गेला.

राजपाळ व पत्रामल दोघे एकटेच राहिल्यावर, कपिलाषष्ठीनंतर तूं घरीं गेला होतास कीं नाहीं ह्मणून राजपाळानें पत्रामलास विचारलें, तेव्हां पत्रामल ह्मणाला, 'मी बेटांत पोहोंचलों, व तेथें जत्रेची मजा पहात होतों. त्या वेळेस वाघेर लोकांनीं बेटावर हल्ला केला, व चोहोंकडे नाकेबंदी केली, त्यामुळें बाहेर जाण्यास रस्ताच नव्हता. मग मी बेटांतील किल्ल्यांत मंदिर आहे तिकडे गेलों. या वेळेस किल्ल्याचे बुरजाचे पाहरेकरी व जमादार यांनीं दारूगोळा संपेपर्यंत वाघेर लोकांस दाद दिली नाहीं. परंतु दारूगोळा संपला तेव्हां ते रात्रीं जहाजांत बसून मळाया बंदराकडे निघून गेले. सात दिवसपर्यंत किल्ल्यांतील लोकांनीं दम धरला, अखेर ते पळून गेले; व किल्ल्यांतून बंदुकांचे आवाज बंद झाले तेव्हां वाघेर लोक जोरावले, व त्यांनीं निकरानें तटास शिड्या लावून हल्ला सुरू केला. या हल्ल्यास अडथळा करण्यास कोणी नव्हतें. हा छोटेखानी लढाईचा सर्व सामना मीं पहात होतों. नंतर वाघेरांनीं कि-

ळ्यांत व बेटांत प्रवेश केला, व लूट सूरू केली. या धांदलींत त्यांनीं द्रव्यलोभासाठीं मंदिर लुटण्यास पुजारी लोक धरले, व ब्राह्मणांना मारूं लागले, तेंव्हां तें मात्र पाहवेना, व मी त्यांस सोडविण्यासाठीं बरेच लोक जखमी केले. एका बाईचे पाठीस तटावर एके शिदी लागला होता, व ती त्याचे हातून सुटण्यासाठीं ओरडत होती. ती केविलवाणी अंगावर थरकांप उत्पन्न करणारी आरोळी ऐकून मीं एकदम तिचे मदतीस तटावर गेलों, व तिला सोडविण्याकरितां मला त्यास ठार मारावें लागलें. ज्या स्त्रीस मीं सोडविलें, ती गर्दीत भयानें तटावरून दर्यांत पडली, त्यामुळ मी तशीच तिचे पाठोपाठ समुद्रांत उडी घातली, व तिला वर काढून समोरचे बाजूनें पायरस्त्यानें तिला तिचे बापाचे घरीं पावती केली.'

भावाचें हें भाषण ऐकून पत्रामलास फार आनंद झाला, व तो ह्मणाला 'शाबास! अनाथाचें रक्षण करणें व त्यांतही बायकांचें रक्षण करणें हें प्रत्येकाचें कर्तव्यच आहे, व भरसमुद्रांतही पडून तूं तें केलेंस ही गोष्ट तुजकडून मोठ्या धाडसाची, व तीही अनायासें बंडवाल्यांविरुद्ध आपल्या गायकवाड सरकारांचे बाजूची, झाली हें पाहून मला फारच आनंद वाटतो. कारण बाबा मरतेवेळेस त्यांनीं जो उपदेश केला तें कार्य अनायासें घडलें. गायकवाड सरकार आपले अन्नदाते आहेत असें त्यांचें नेहमी सांगणें असे. असो; बरें पण मग काय झालें?' यावर राजपाळ उत्तर करितो, 'मग वाघेर लोक बेट सोडून बरड्याचे डोंगराकडे गेले. मला लढाई पाहण्याची हौस होती, व उशीर केला असतां आयती आलेली संधि कदाचित् निघून जाईल, यासाठीं जरी या कामीं आपली व वृद्ध आईची परवानगी घेणें जरूर होतें, तरी आपण या माझ्या करण्यास नांव ठेवणार नाहीं, व बंडवाल्यांचे विरुद्ध गायकवाड सरकारांस माझ्या हातून मदत झाली असतां आपणांस संतोषच वाटेल, असें सम-

जून आपली व मातुश्रींची परवानगी घेण्यांत दिवसगत न करितां मी **कर्नेल ऑनर** साहेबांस भेटलों. आपले शिवाय त्यांस डोंगरी रस्त्यांची व चांचेपणाचे जागेची माहिती कशी मिळणार हें ओळखून या कामांत त्यांनीं मला मदतीसाठीं घेतलें, व अगदीं विश्वासू जाणून जवळ ठेविलें आहे. मीही त्यांस हवी तशी मदत देत आहें.' यावर **पत्रामल** ह्मणाला 'मीही **द्वारके**हून निघून **वार्टन** साहेबांस भेटलों, व त्यांस बंडवाल्यांचे विरुद्ध मदत दिली. हल्लीं मी त्यांचे बरोबरच फिरत आहें.' याप्रमाणें बंडाबद्दलचें बोलणें झाल्यावर उभयतां बंधूंनीं कांहीं घरच्या भाकडकथाही एकमेकांस सांगितल्या, व नंतर त्यांचीं जेवणें झालीं.

भोजनोत्तर **वाघेर** लोकांनीं हा दंगा केला याचें कारण त्या लोकांकडून कांहीं बाहेर पडलें काय ह्मणून **राजपाळा**नें सहज गोष्ट काढिली असतां **पत्रामल** ह्मणाला 'ते लोक आपणास स्पष्ट कांहीं सांगत नाहींत; परंतु कैदी केलेले **वाघेर** लोक रात्रीं एकमेकांत कांहीं कुजबुजतात त्यावरून इतकें कळतें कीं, त्या लोकांवर **गायकवाड** सरकारचा कांहीं जुलूम नाहीं; मात्र कांहीं लोकांचीं वेतनें कामदारांनीं बंद केलीं आहेत, व त्यांस कोणीं हक्कदारांनीं विचारलें, तर ते सरळ न्याय न देतां गडबड कराल तर सरकार तुमचीं मुळेंपाळें नाहींशीं करील अशी नेहमी त्या लोकांस धमकी देत व त्रास देत, या त्रासानें व भयानें बंड करणें भाग झालें, व या निमित्तानें तरी सरकार आमची दाद घेतील असें त्यांस वाटलें. आणखी असेंही कळतें कीं, बंडाचा बंदोबस्त **गायकवाड** सरकारांनीं न केला, तर टोपीवाले **उखामंडळ**ची हुकमत तालुकदारांस सोंपतील अशीही पण बदसल्ला तालुकदारांनीं त्यांस दिली. याशिवाय जास्त माहिती **वाघेर** कैद्यांकडून मिळत नाहीं.' हें ऐकून **पत्रामल** ह्मणाला 'एक गोष्ट यांत विचार करण्यासारखी आहे. **उखा**मंडळचे आजूबाजूचे तालुकदारांचा हा तिऱ्हाईत रीतीनें लाभ मिळविण्याचा

घाट अगदीं चुकीचा आहे असें नाहीं. वाघेर लोकांस बंड करण्यास लाविलें, तर त्याबद्दल आपलेकडे उघड रीतीनें कांहीं दोष येण्यासारखा नाहीं, व साधलें तर ठीकच, नाहीं तर आपण बाह्यात्कारीं सरकारांस मदतीस तयार आहों हें दाखविण्यास त्यांना कांहीं हरकत वाटली नसावी.' यावर राजपाळ ह्मणाला 'वाघेर लोकांचे बोलण्यावर तरी पण कसा भरं वसा ठेवावा?' या प्रश्नावर पन्नामल बोलला 'खरें आहे. मनुष्यमात्राचा स्वभावच असा आहे कीं, एकादी गोष्ट स्वतःचे अंगावर येऊन बेतली ह्मणजे बचाव करण्यासाठीं कोणी खोटें बोलण्यास व खोटें करण्यास मागें घेत नाहीं, ही गोष्ट तालुकदार व वाघेर या दोघांस सारखीच लागू पडते. माझा स्वतःचा ह्मणजे वाघेर लोक सर्वच चांगले असतील असा अभिप्राय नाहीं, तथापि एकंदरींत ते लोक वाईट आहेत असें मला वाटलें नाहीं, ह्मणून मी त्यांचे स्वभावाची माहिती साहेबलोकांस दिली, व त्या लोकांस आतां लढून मारविण्यांत अर्थ नाहीं, त्यापेक्षां त्यांच्या तक्रारी ऐकून तडजोडीनें त्यांस समजावून रस्त्यावर आणावें, व त्यास धंदाउद्योग लावून द्यावा, असें स्पष्ट सांगितलें. ही मसलत साहेब लोकांस पसंत पडली, व त्यांनीं आपले वरिष्ठ अंमलदाराकडे याप्रमाणें लिहून कळविलें.'

हा इतका संवाद होतो आहे इतक्यांत पथाजी या उभयतांस भेटण्यास आला, व त्यामुळें हें बोलणें इतकेंच राहिलें. उभयतांनीं पथाजीस रामराम करून आदरानें बसविलें, व आपण कोण काय वगैरे प्रश्न त्यास विचारिले, तेव्हां पथाजी ह्मणाला 'बेटांत जोधाकुंभाणी नांवाचे गृहस्थ आहेत ते माझे वडील. मी गोंडळ संस्थानांत लष्करी खात्यांत नौकर आहें. मला आपले भेटीची फार इच्छा होती. आज तो योग आला.' हें बोलणें ऐकून पन्नामल ह्मणाला, 'गोंडळचें लष्कर मदतीस आलें त्यांत मी आपणास पाहिलें असावेंसें वाटतें.' 'होय,

मीच लष्कर घेऊन आलों होतों.' असें पथाजींचें उत्तर एकून पत्रामल ह्मणाला, 'त्या धामधुमींत आपणाला व मला बसून चार गोष्टी बोलण्यास फुरसत नव्हती. आज हा भेटीचा योग आपण घडवून आणला, त्यामुळें संतोष झाला.' इतकें बोलून पत्रामल आपल्या भावाकडे वळला, व 'जोधाकुंभाणी तुझे ओळखीचे आहेत काय?' असा त्यानें त्यास प्रश्न केला. त्यावर राजपाळानें चटकर उत्तर दिलें नाहीं, परंतु किंचित् स्मरण केल्यासारखें करून 'होय, ते बेटांत मला भेटले होते' असा जबाब दिला.

राजपाळास पाहून पथाजीस आनंद झाला, व त्याच्या विषयीं तो आपले मनांत विचार करीत होता. या वेळेस राजपाळानें आपली दृष्टि खालीं भुईकडे लाविली होती, यावरून पथाजीनें त्याचे विचार आपले मनांत ताडले. कांहीं वेळानें 'जोधाजी येथें आले आहेत व ते आपली भेट घेऊं इच्छित आहेत' असें त्यानें ह्मटलें तें ऐकून 'मीच त्यांचे भेटीस सवडीप्रमाणें मोठें आनंदानें येईन. वृद्ध माणसांस तसदी देणें योग्य नाहीं.' असें राजपाळानें मोठ्या नम्रतेनें उत्तर दिलें. त्यावरून राजपाळाची आपले बापाविषयीं पूज्यबुद्धि आहे असें खास अनुमान करून त्यास यापेक्षां जास्त कांहीं सुचवावें, व त्यावरून त्याच्या मनाच्या प्रेमस्थितीचें अनुमान काढावें, या हेतूनें तो ह्मणाला 'जोधाजी आपले सौजन्याची फार तारीफ करीत होते; व ते सर्व खटल्यासुद्धां येथें आले आहेत. माझें आजोळ येथेंच आहे.' या बोलण्याचा परिणाम राजपाळाच्या मुखश्रीवर तत्काळ झाला. त्याचा चेहेरा अधिक मोहक व आनंदित झाला, व लागलाच तो म्हणाला 'आपले वडील कोणते आळींत राहतात तें समजलें म्हणजे आपण वेळ सांगाल त्या वेळीं मी अवश्य भेटण्यास येतों.' हें बोलणें ऐकून 'किल्ल्याचें आंत बाजार आहे त्याचे

मागले आळींत त्यांचें बिऱ्हाड आहे, व आपण वेळ सांगाल त्या वेळीं आपणास नेण्यास मी स्वतः हजर होईन.' असें **पथाजी** ह्मणाला.

असो. अशा रीतीनें उभयतांची ओळख झाली. नंतर लष्करासंबंधानें कांहीं थोडा वेळ इकडल्या तिकडल्या गप्पा होऊन **पथाजीनें** निरोप घेतला, व पुन्हां भेटूं असें ह्मणून रामराम करून तो चालता झाला. **पथाजी** गेल्यावर **राजपाळ** कांहीं वेळ भेटींतील गोष्टीचा विचार व स्मरण करण्यांतच दंग होऊन गेला होता. इकडे **भियाजी लाखा** घोड्याचे चंदीचाऱ्याचे निमित्तानें **राजपाळाची** रजा घेऊन आपले राहुटींत गेला होता खरा, परंतु त्या वेळीं त्याचें सगळें मन **पत्रामलाकडे** गुंतलें होतें, व देह मात्र राहुटींत होता. त्याचेसाठीं आईबाप सोडले, रानोरान फिरावें लागलें, व वेशांतर करून लष्करी खात्यांत काबाडकष्ट पतकरावे लागले, त्या सर्वांचा बदला आज आपणाला मिळाला असें त्यास वाटलें; परंतु त्याची गांठ कशी घ्यावी या विवंचनेंत त्यास जेवणखाण करण्याचें कांहीं सुचेना. फार दिवसांचा विरह या वेळेस फार दुःसह होऊं लागला. एक वेळ त्याच्या मनांत असें येई कीं, त्याची भेट एकांतीं घ्यावी, व हें सोंग त्यांचे समोर बदलावें; पण पुन्हां लज्जा वाटून **राजपाळादेखत** असा प्रसंग न येईल तर बरा असेंही त्यास वाटे. असो; अशा अनेक विचारतरंगांत त्यानें सर्व दिवस घालविला, शेंवटीं **राजपाळास** संध्याकाळीं भेटण्याच्या निमित्तानें जावें म्हणजे पुनः नेत्रसुखाचा तरी लाभ मिळेल, व त्यांतच पुढें कांहीं संधि मिळेल, असें वाटून त्यानें तिकडे जाण्याचा निश्चय केला, व लागलाच **राजपाळाचे** तंबूकडेस जाऊन त्यास रामराम करून तो मोठ्या अदबीनें उभा राहिला. **भियाजीस** पाहून **राजपाळ पत्रामलास** म्हणाला 'ज्या दिवसापासून यास मीं स्वारांत दाखल केलें, त्या दिवसापासून हा एकनिष्ठेनें काम करीत आहे. नेहमीं माझे जवळ मीं यास ठेविलें आहे, त्यामुळें

याचे सोबतीनें माझा वेळ आनंदांत जातो. याला मी कधींही नोकराप्रमाणें वागवीत नाहीं, व हाही जसा एकादा आंतड्याचा मनुष्य 'कळकळीनें काम करितो त्याप्रमाणें मला हमेषां मदत देतो.' राजपाळाच्या तोंडची ही स्तुति ऐकून भियाजी म्हणाला 'आपण मला आश्रय देऊन अन्नास लाविलें, इतकेंच नाहीं, तर सख्या भावाप्रमाणें मला वागविलें. कोणतेही कामांत माझा सल्ला घेतल्याशिवाय आपण कांहीं केलें नाहीं, व कित्येकदां तर आपण माझे शब्दांस मान देऊन गुन्हेगारांवर दयाही केली आहे. आपण थोर कुळांतले आहांत, आपले विचारही मोठेपणाचे आहेत, त्यामुळें आपण माझी अल्पसेवा मानून घेतली इतकेंच कायतें, बाकी तारीफ करण्यासारखें माझे हातून कांहीं झालें नाहीं.' हें बोलणें होत आहे इतक्यांत कर्नलकडून राजपाळास बोलावणें येऊन तो जाण्यास निघाला, व जातांना पत्रामलास म्हणाला 'साहेबांकडे दिवसभर अशा खेपा पडतात त्याला इलाज नाहीं, तरी पण रिकामा झालों म्हणजे आपले तंबूवर येत जाईन.' इतकें बोलून तो भियाजीसुद्धां आपले मुक्कामावर गेला, व कपडे वगैरे नीटनेटके करून भेटीसाठीं कर्नलचे तंबूत शिरला.

कर्नल या वेळेस आराम खुर्चीवर बसून चिरुटाचे धुराचे फुक्कारे सोडीत होते. राजपाळास पाहून त्यांनीं आरोपी वाघेर लोकांकडून बंडाचें मूळ कारण कांहीं निघतें काय म्हणून प्रश्न केला. यावर 'नाहीं साहेब, काल जी मीं आपणास हकीकत कळविली तिजपेक्षां जास्त कांहीं निघत नाहीं. आजही कित्येकांचे जाब झाले, त्यांत सर्वांची एकाच तऱ्हेची हकीकत येत आहे.' असें तो म्हणाला असतां साहेब म्हणाला, 'हो, बरी आठवण झाली, जो म्हातारा हमीरजसाजी आपण कैद करून पाठविला तो काय म्हणतो? त्याच्या पांढऱ्या दाढीमिशा

शरीराची कांति त्याचे वयाचे मानानें पाहिली म्हणजे मला त्याची कींव येते, व त्याचेबद्दल पूज्यबुद्धि होते. हा या बंडांत कसा दाखल झाला याची तर मला कल्पनाही होत नाहीं.' हें ऐकून **राजपाळ** म्हणाला 'मीं पुष्कळ वेळां त्याचपाशीं गप्पा मारीत बसलों, व कांहीं नवीन हकीकत कळावी म्हणून यत्न केला. परंतु तीन महिन्यांपूर्वीं **चोटेला** गांवीं आपण राहत होतों, व घोड्यांचा व्यापार करून सुखानें दिवस हरिभजतांत घालवीत होतों याशिवाय तो जास्त कांहीं सांगत नाहीं; व तो आपले आयुष्यास कंटाळला असावा असें त्याचे बोलण्याचे झोंकावरून मला वाटतें.' साहेब म्हणाला, 'राजपाळजी! तुम्हीच पहा, त्याचें वय सुमारें नव्वद वर्षांचें असावें असा माझा तर्क आहे. त्याचे शरीरावर वृद्धापकाळच्या खारकेसारख्या सुरकुत्या आल्या आहेत, तरी त्याचा चेहेरा गंभीर व शांत आहे. बाकीच्या **वाघेर** लोकांनीं आपल्या वतनासाठीं बंड केल्याची कल्पना होते, कारण त्यांचे जबाबांवरून मागण्या काय आहेत तें सहज कळतें. परंतु या म्हाताऱ्याची त्यांचेसारखी मागणी नाहीं. उखामंडळांत त्याचें वतन नाहीं, घरदार नाहीं, मग हा बंडांत कसा दाखल झाला? जास्त मिळवावें अशी त्याची इच्छा असावी हें त्याचे वयाचे मानानें वाटत नाहीं. परंतु आपले जन्मभूमीची सेवा करावी, आपले देशाचा उत्कर्ष व्हावा, यासाठीं आपला देह कसा तरी सत्कारणीं लावावा हाच त्याचा हेतु असेल याशिवाय दुसरा कांहीं तर्क चालत नाहीं.' साहेबाच्या या बोलण्यावर 'पहावें उद्यां तो आपले जबाबांत कांहीं जास्त सांगतो कीं काय तें' इतकें बोलून, व उद्यां काय काय कामें करावयाचीं तें विचारून घेऊन, **राजपाळानें** साहेबाचा निरोप घेतला, व उद्यां कोर्टाचे कामाचे वेळेस हजर राहीन असें बोलून तो परत आपले मुक्कामावर येण्यास निघाला. इतक्यांत साहेब म्हणाला, 'बहुतेक कमिशनचें काम उद्यां संपेल, त्या वेळीं मलाही कमिशनपुढें कांहीं कळवा-

वयाचें आहे. ज्या लोकांनीं लढाईंत चांगलीं कामें केलीं त्यांचे विषयीं मी कांहीं बोलणार आहें.' राजपाळानें हें ऐकून घेतलें, व सलाम करून तो आपले राहुटीकडे आला. कांहीं वेळानें पत्रामल फिरत फिरत त्याजकडे आला. या वेळेस छावणींत चोहोंकडे दिवे दिसत होते, व कांहीं शिपाई स्वार मंडळी शेंकटीजवळ बसून शेंकत होती, व कांहीं लोक आपापले चौक्यांत स्वयंपाक करण्याचे कामांत गुंतलेले दिसत होते. राजपाळ म्हणाला, 'दादा, आतां स्वयंपाक तयार झाला आहे. भियाजी स्वयंपाक फार चांगला करतो.' हें ऐकून पत्रामल तेथेंच जेवणास राहिला, व नंतर दोघेही गोष्टी सांगत बसले. बोलतां बोलतां द्वारकेंतील शंकरास्वामींच्या मठाची गोष्ट निघून तो मठांत पाहिला काय असें राजपाळानें पत्रामलास विचारलें, तेव्हां पत्रामल म्हणाला, 'मठ पाहिला नाहीं, परंतु स्वामींचा लौकिक ऐकिला आहे. ते मोठे पंडित आहेत. इतकेंच नाहीं, तर ते मोठे राजकारस्थानीही आहेत. मात्र संन्यास घेतल्यावर त्यांनीं जगाची उठाठेव कां करावी हें मला समजत नाहीं.' पत्रामल ह्मणाला, 'सर्वच संन्यासी व साधु संसाराचा कंटाळा येऊन दीक्षित झालेले नसतात. कित्येकांचे अंतस्थ निरनिराळे हेतु असतात. भगवें वस्त्र पाहिलें, ह्मणजे त्यास सर्व लोक मान देतात. निरपेक्ष बुद्धीनें लोकांचे हिताचे विचार सांगण्यास त्यांस कांहीं अडचण नसते. एकादे अधिकाऱ्यानें लोकांस कांहीं सांगितलें, तरी त्यापेक्षां या स्थितीचे लोकांनीं सांगितल्याचा ठसा लोकांचे मनावर जास्त वठतो. व त्याचें मुख्य कारण तरी हेंच कीं, अशा लोकांनीं स्वार्थत्याग केलेला असतो.' भावाच्या या बोलण्यावर राजपाळ ह्मणाला 'सर्व जातींत असे साधु झाले आहेत व होत असतील; परंतु हल्लींच्या काळांत त्यांचा काय उपयोग? आज शंकराचार्य धर्मगुरु असतां ते अशीं कोणतीं लोकोपयोगी कामें करतात?' भावाच्या तोंडचे हे शब्द ऐकून

पत्रामल ह्मणतो 'आजपर्यंत राज्यक्रांतीचे कित्येक प्रसंग आले अशा वेळीं धर्माचे रूपानें शंकराचार्यासारख्यांनींच लोकांस वळविलें आहे, व धर्माची जागृति त्यांच्या मनांत केली आहे. परंतु हल्लींच्या मनूंत लोकांचे धर्माहून भिन्न धर्माची सत्ता या देशांत वाढली आहे, त्यामुळें शंकराचार्यांचे मठ आज पूर्वीप्रमाणें राहिले नाहींत. धर्माचे अनेक पंथ निघाले व निघत आहेत, त्यामुळें धर्माचें बंधन शिथिल होऊन गेलें आहे. पोटधर्म उत्पन्न झाल्यानें एकमेकांत द्वेष मात्र वाढले. धर्माच्या किंवा इतर काय, कोणत्याही बाबतींत लोकांचें मुळींच ऐक्य कसें तें नाहीं. परकीय लोक सत्ताधीश आहेत, ते मात्र आपल्या धर्माची स्थापना व्हावी यासाठीं अनेक यत्न व लक्षावधि रुपये खर्च करीत आहेत.' यावर 'सारें खरें, पण मग आपले संस्थानिक व राजेरजवाडे असल्या परधर्माचा शिरकाव आपल्या देशांत कां होऊं देतात?' असें राजपाळानें ह्मटलें, तेव्हां पत्रामल ह्मणाला, 'या कामीं त्यांचा कांहीं इलाज नाहीं. हल्लीं त्यांना जें शिक्षण मिळत आहे तें अगदीं निराळ्या वळणावर आहे. दिवसेंदिवस वरिष्ठ सत्ता वाढत जाऊन हे मात्र आपली सत्ता गमावीत आहेत. सत्ताधीशांची मर्जी संपादन करावी हेंच आपलें मुख्य कर्तव्य असें त्यांना वाटतें आहे; परंतु हा पेंच कसा आहे, तो त्यांस सोडवितां येत नाहीं. असलेल्या ऐश्वर्यांत ते मजा मारतात, व त्यांतच आनंद समजतात; परंतु स्वतंत्रता काय, लोकसत्ता कशी उत्पन्न होते, त्यांत स्वार्थत्याग किती असावा लागतो, या कल्पना देखील फार थोड्यांच्या मनांत येत असतील.' पत्रामलाचें हें बोलणें ऐकून 'तर मग देशाचें दुर्भाग्यच एकंदरींत समजावयाचें! जाऊं दे, या उठाठेवी आपणास नकोत. ज्याचा तो आपलें हित पाहत असतो.' इतकें बोलून राजपाळानें हा राजकारणी विषय संपविला, व नंतर घरसंबंधाच्या गोष्टी निघाल्या. पत्रामलानें घरची कांहीं खबर आणी

काय ह्मणून **राजपाळास** विचारिलें, तेव्हां **राजपाळ** ह्मणाला ' होय, स्वार पाठविला होता. सर्व कुशळ आहेत.' **पत्रामल** ह्मणाला, 'मला वाटतें आतां बंडाचा बीमोड झाला आहे, व चोहोंकडे शांतता आहे, तेव्हां या संधीस आईस येथेंच बोलवावी.' तें ऐकून **राजपाळ** ह्मणाला, 'आतांच गाडी माणसें स्वार रवाना करतों. **द्वारकेंत** व **बेटांत** पुन्हां अर्चा होईल, व तो समारंभही आईचे दृष्टीस पडेल. बंडाचे धामधुमींत पुष्कळ परधर्मांचे लोकांनीं देवस्थानें भ्रष्ट केलीं आहेत. धर्मिष्ट लोकांचें मुख्य काम तीं पूर्ववत् व्यवस्थित करण्याचें आहे, व सेवकजन तीं करतीलच.--हो--बरें स्मरण झालें. **गोस्वामी** महाराज छप्पन्नभोग करणार असें माझ्या ऐकिवांत आहे, व शिवरात्रीचा **नागनाथाचा** महोत्सवही येथें होईल.'

हें बोलणें झाल्यावर उभयतांनीं आईस आणण्यासाठीं गाडी माणसें रवाना केलीं. मनुष्यें एकदा मोठ्या कामांत गुंतलीं ह्मणजे घरादाराकडे त्यांचें लक्ष जात नाहीं. दोघांसही या वेळेस आईचें स्मरण झालें, व ती आपलेसाठीं किती काळजी वाहत असेल इत्यादि गोष्टी त्यांच्या मनांत उभ्या राहिल्या. असो; कांहीं वेळानें **पत्रामल** आपल्या भावाचा निरोप घेऊन आपले राहुटीकडे परत गेला.

**राजपाळ** एकटा राहिला, तेव्हां **बेटांतील** मंडळी आल्याचें त्यास स्मरण झालें, व **जोधाजीचे** भेटीस गेलों तर **लालबा** कशी दृष्टीस पडेल या विचारतरंगांत तो झोंपीं गेला.

भावाभावांच्या गोष्टी चालल्या असतां बिचारा **भियाजी** एकटा होता. त्यास स्वयंपाक करतांना कसेंसेंच वाटत होतें. ज्यास प्रेमानें भरवावें, ज्याच्याशीं हितगुजाच्या गोष्टी सांगत बसावें, त्याचेसाठीं आज स्वयंपाक करण्याची वेळ सुदैवानें आली, परंतु ती **पाचवा** ह्मणून नाहीं, तर **भियाजी**

या सोंगानें! या सोंगाचे ऐवजीं स्वतः पाचवाच स्वयंपाक करीत आहे असें जर प्त्र.मल यास कळतें, तर भियाजीच्या स्वयंपाकाची तारीफ झाली तिजपेक्षांही त्या तारकेस कांहीं विलक्षण निराळें रूप आलें असतें, परंतु तें व्हावें कसें? अन्न समोर असून ते पाहण्यानें क्षुधितानें प्राण व्याकुळ होतात, गलबत किनाऱ्याजवळ येऊनही त्याचा उपयोग करून घेतां येत नाहीं, हा जगांत नेहमीचा अनुभव आहे, व हीच स्थिति या वेळेस भियाजीची झाली होती.

दुसरीकडे आरोपीलोक आपला इनसाफ उद्यां होईल या आशेचे जाळ्यांत गुंतले होते. कित्येकांस आपले कृत्याचा पश्चात्ताप होत होता. कित्येक लोक आपण निरपराधी आहोंत असें खात्रीनें मनांत आणून आपण लौकरच आपल्या मुलांलेंकरांत पडूं या तरंगांत गर्क झाले होते. कित्येक खरे अपराधी लोक आपली आयुष्याची घटका लौकरच भरणार या विवंचनेंत होते. परंतु हा प्रकार एकसारखा किती वेळ टिकणार? मनुष्यांना केव्हां ना केव्हां तरी निद्रा येणारच, व ती आली ह्मणजे हे सर्व विचारतरंग आपोआप बंद व्हावयाचे. तोच प्रकार कांहीं वेळानें जिकडे तिकडे होऊन गेला.

---

## भाग १५ वा.

बळी तो कान पिळी याप्रमाणें न्यायाचें स्वरूप आहे असें ह्मणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. व्यक्तीनें अथवा समूहानें एकादें कृत्य आपलें हितासाठीं केलें, तर त्याचा परिणाम केव्हां स्तुतीस व केव्हां निंदेस पात्र होतो. स्तुतीचे वेळेस त्यास न्याय ह्मणतात, व तेंच निंदेचे वेळेस

अन्याय ह्मणून ठरतें. चोरांचे टोळीनें एकादे वाटसरास लुटल्यावर त्या वाटसराचें काय करावयाचें हें त्या वेळेपुरतें चोरांचें मर्जीवर असतें, व त्या वेळेस ते जें करितील तोच त्यांचा न्याय असें आपण समजतों. पण हाच न्याय याहूनही पुढें माळ करावयाची ह्मटलें तरी सारखाच लागतो. एकाददुसरा असला ह्मणजे तो चोर, तेच कांहीं जास्ती झाले ह्मणजे दरवडेखोर, त्याहूनही त्यांची संख्या वाढली म्हणजे ते बंडवाले, व त्या बंडवाल्यांस यश मिळालें ह्मणजे तेच राजे, ही शेंवटपर्यंत सरणि बनते. राजे झाले कीं त्यांचीच न्यायदेवता होते, व या राजांनीं आपले सोईसाठीं जें केलें किंवा लिहून ठेविलें तेच कायदे, व त्याच कायद्यांच्या ताजव्यांनीं न्याय तोलला जातो!

उखामंडळांतल्या बंडाचा शेंवट झाल्यावर इसवी सन १८५१ च्या अकराव्या व सोळाव्या आक्टांप्रमाणें आरोपी वाघेर लोकांचा इनसाफ व्हावा असा हकूम झाला, व मागें सांगितल्याप्रमाणें अमरेळी मुक्कामीं अंडर्सन साहेबांच्या अध्यक्षतखालीं कमिशनचें कामास सुरुवात झाली. सर्व आरोपी लोक अमरेळीस यापूर्वींच दाखल झाले होते. गुन्हेगारांचे जबाब होत होते, ते पाहण्यास लोक पुष्कळ जमत असत. कांहीं लोक पुराव्याच्या खटपटींत गुंतलेले असून कांहीं आरोपींस आशा लावून खरी माहिती सांगाल तर गुन्ह्याची माफी मिळेल अशा त्यांच्या समजुती घालण्यांत गुंतले होते. जसजसा पड्याआड पुरावा तयार होई तसतसा तो रंगभूमीवर येत होता. शेहेचाळीस आरोपी एकामागून एक कमिशनपुढें आले. 'गायकवाड सरकारांनीं वेतनें बंद केलीं, व कांहींकांचे पगार बंद केले, त्यामुळें खाण्यापिण्याची आबाळ पडूं लागली. दाद मिळण्यासाठीं अर्ज पाठविले, परंतु बंदोबस्त न होतां उलट कामदारलोक सरकारचे कान भरीत कीं, वाघेर लोक तुफानी आहेत, त्यांस तंबी दिल्याशिवाय ते कह्यांत राहणार नाहींत. सरकारची अशी समजूत

झाल्यामुळें दिवसेंदिवस जास्त त्रास होऊं लागला. तेव्हां कांहीं तरी दाद लागावी या हेतूनें निरुपायास्तव बंड केलें. द्वारका हातीं आली त्यामुळें जास्त हिंमत आली. सरकारचें बळ कमी वाटलें. टोपीवाल्यांचा हिंदुस्थानांत बोमोड झाल्याच्या बातम्या येऊं लागल्या; व त्याच सुमारास बंदरांत गंधक सोऱ्याचीं भरलेलीं जहाजें हातीं आलीं, दारूगोळा व तोफा मिळाल्या. एक वेळ जीविताशा सुटली ह्मणजे भय नाहींसें होतें त्याप्रमाणें झालें. शिवाय आजूबाजूचे तालुकदारलोकांचीही मदत मिळत गेली. अशीच बहुतेकांचे तोंडून एकसारखी हकीकत निघाली. बंडाचे धामधुमींत इंग्रजलोक त्यांस ह्मणत कीं, 'आतां तुह्मी आपआपल्या धंद्यास लागा,' तेव्हां वाघेर सांगत 'गायकवाड हे आमचे आईबाप आहेत. आह्मीं त्यांचीं लेकरें, त्यांचे वर आह्मी रुसावें, व त्यांनींच आह्मांस समजवावें. परंतु तिऱ्हाईत तुम्ही कां मध्यें पडतां?' तें ऐकून इंग्रजांस आश्चर्य वाटे, व त्यांच्या स्वामिभक्तीची त्यांस मजा वाटे; व हें बंड गैरसमजुतीचा परिणाम झाला असें ह्मटल्याशिवायही त्यांच्यानें राहवत नसे.

असो; वाघेर लोकांनीं आपण गुन्हा केला नाहीं असें दाखविण्याचा मुळींच यत्न केला नाहीं, व आपणाकडून झालेलें कृत्य तें सरळ रीतीनें कबूल करीत गेले. जर त्यांना वकिलांचें साह्य मिळालें असतें तर इतकी खरी हकीकत पुढें नच येती, व पुरावा होण्यासही अडचणच पडली असती. परंतु बोलून चालून बंड झालेलें, तेव्हां त्यानंतर जो इनसाफ व्हावयाचा तोच झाला. मुळूमाणेक यास चवदा, बापूमाणेक यास सात, व सागा व घोगामाणेक यांस पांच पांच वर्षांच्या सक्त मजुरीच्या शिक्षा दिल्या, व बाकीच्या आरोपींस दोनपासून पांच वर्षांपर्यंतच्या शिक्षा फर्माविल्या गेल्या. नाहीं ह्मणावयास सतरा जणांस कमिशननें दया करून शिक्षा माफ केल्या, व त्यांनीं उखामंडळ सोडून बाहेर

जाऊं नये असें ठरविलें. ज्या आरोपींस शिक्षा दिल्या ते आरोपी शिक्षा भोगण्यास आनंदानें तयार होते, कारण गुन्हे करावे व शिक्षा मिळावी यांत ते अपमान समजत नसत. यांपैकीं कित्येक इसम प्रथम कदत जाऊन आलेले व कित्येक काळ्या पाण्यावर पाठविलेले तेथून पळून आलेले होते. आंथरुणावर दुखण्यांत पडून मरणें हें बेअब्रूचें काम आहे अशी त्यांची दृढ समजूत होती. शिक्षा फर्मावितेवेळेस ते जरी चतुर्भुज केलेले कैदी होते, तरी त्यांचे डोळे रागानें लाल झालेले असून त्यांचे क्रूर चेहेरे भयंकर दिसत. कोर्टांत त्यांजकडे पाहणारांस देखील त्यांचें भय वाटे. हा न्याय पाहण्यास शेंकडो लोकांचे थवेच्या थवे जमलेले असत, व केव्हां केव्हां कोर्टांत जाण्यासही मुष्कील होई. या प्रसंगीं झालेल्या इनसाफाबद्दल कित्येकांनीं तारीफ केली, व ज्यांचे आप्त स्वकीय त्यांत सांपडलेले होते अशा लोकांनीं झालेल्या शिक्षा अन्यायाच्या म्हटल्या. याप्रमाणें खऱ्या बंडखोरांबद्दलचा निकाल झाला; व शेंवटीं ज्या आरोपीबद्दल खुद्द कमिशनच्या लोकांसही आश्चर्य वाटत होतें, व जो बाकीच्या आरोपींहून निराळा वाटत होता, तो शेंवटला आरोपी कमिशनपुढें हजर झाला.

इतर आरोपींप्रमाणें हा नव्हता. त्यास कच्या कैदेंत देखील फारसा प्रतिबंध नव्हता, कारण तो ८०–८५ वर्षांच्या वयाचा शरीरानें धिप्पाड, रंगानें गोरा, वयानें वृद्ध असल्यामुळें त्यांचे अंगावर खारकेसारख्या सुरकुत्या पडल्या होत्या, व त्याचे दाढीमिशांचे केंस पांढरे शुभ्र झाले होते. हा जेव्हां कोर्टांत उभा राहिला तेव्हां त्याची मुद्रा शांत होती. इतर आरोपींप्रमाणें तो भयंकर दिसत नव्हता. **हमीर जसाजीस** लोकांनीं पाहिलें तेव्हां त्याचे संबंधानें लोकांचे निरनिराळे विचार सुरू झाले, व हा काय हकीकत सांगतो याजकडे सर्वांचे कान लागून राहिले.

कोर्टांत इतकी गर्दी झाली होती, तरी या वेळेस त्या जागेंत गुणगुणी-शिवाय दुसरा ध्वनि नव्हता. कोर्टानें त्यास आपली हकीकत सांगण्यास हुकूम केला, तो ऐकून तो ह्मणाला 'मी जातीचा **वाघेर** आहें. माझे वयाचे १४-१९ वर्षांपासून मीं **उखामंडळ**चे रीतीप्रमाणें शेंकडों दरवडे घातले; हजारों माणसांस लुटलें, व कित्येक खूनही माझे हातून झाले असतील. वयाचे मानाप्रमाणें व आमचे जातिस्वभावाप्रमाणें असा धंदा करण्यांत मी भूषण मानीत होतों, परंतु तें आज सांगत बसून मी वि-नाकारण आपला अमूल्य वेळ घालवीत नाहीं. मात्र एकवेळ आपले जातीपैकीं एका अंमलदारास आमचे पैकीं एकानें पाठीशीं बांधून **गिरांत** नेलेलें व त्याचे कंबरेस दोरी बांधून त्यास हातांनीं माकडा-प्रमाणें चालाविलेलें या डोळयांनीं पाहिलें आहे, ही गोष्ट जरी आपले-दप्तरीं कोठें लिहून ठेविलेली नसली, तरी आपले पैकीं पुष्कळांस ती माहीत आहेच. **वाघेर** लोकांची जात कट्टी शूर आहे हें आज आपणास नवीन समजविण्याची जरूर आहे असें नाहीं. वीस वर्षें या-प्रमाणें मीं केलें. नंतर ह्या धंद्याचा कंटाळा आला. चोरीचे धंद्यांत बरकत नाहीं, कांहीं तरी धंद्याचे जोरावर मिळवावें व तें खर्चावें, असें जिवाला वाटलें, तेव्हां थोडे पैसे जवळ होते ते घेऊन मी **उखामं-डळ** सोडलें. स्वतःचें नांव बदलून **चोटेला** गांवीं येऊन सुखवस्तू राहिलों. मीं ताजण, माणक्या, कंबऱ्या, अशा पुष्कळ तऱ्हेच्या चांग-ल्या मादवान्या घेतल्या, व त्यांचे बछेरे विकण्यास सुरुवात केली. या व्यापारांत ईश्वरानें यश दिलें, दोन पैसे कमाविले, आजू बाजूचे प्रांतांत माझें नांव झालें, व माझे घोड्यांविषयीं चोहोंकडे प्रसिद्धि झाली. या व्यापारांत एक घोडी व तिचा बछेरा अशीं दोन जनावरें फारच उत्तम निपजलीं. देशांतराहून त्यांजबद्दल मागण्या येत, परंतु हीं ज-नावरें मीं आवडीनें पोटच्या पोरांप्रमाणें संभाळलीं. हें बोलत असतां

त्यानें मोठा उसासा सोडिला, व कांहीं वेळानें तो ह्मणाला 'शेंवटीं तीं दोन्ही जनावरें व माझी एक तरुण मुलगी कोणीं पळविलीं. मला कळतांच मीं रागानें शोधासाठीं घर सोडलें, पुष्कळ फिरलों, परंतु शोध लागेना. मुलगी गेल्यामुळें वृद्धापकाळीं बेअब्रू वाटली व घोडींही गेलीं. तोंड दाखविण्यास जागा उरली नाहीं. असलें काळें तोंड घेऊन काय रहावें असें वाटलें, व जीव नकोसा झाला. आत्महत्या करावी असें एकवेळ मनांत आलें; परंतु तेंही पातकच, तेव्हां **बरड्यांत वाघेरांचा** दंगा सुरू होता त्यांत मिसळावें, कदाचित् लष्करांत शोध लागला तर ठीक, नाहीं तर लढाईंत पडून मरावें, असा मनाचा निश्चय झाला. दंग्यांत मिसळलों व लष्करची टेहेळणी करण्याचें पतकरून **बरड्याचे** डोंगरांतून खालीं आलों. परत जातांना थोडे अंतरावर स्वारांची टोळी दिसली, तींत माझा बछेरा व घोडी स्वारांखालीं पाहिलीं. त्याबरोबर राग आला व तत्काळ स्वारांवर निशाण धरलें. रागाचे आवेशांत तें चुकलें, त्यामुळें त्या स्वारांनीं आह्मी पांचजण होतों त्यांवर चाल केली. अंतर थोडें होतें. आह्मी पायदळ होतों. स्वारांचे भाले आह्मांवर पडले.' कोर्टांत **कर्नल ऑनर** बसले होते, त्यांजकडे बोट दाखवून **हमीर जसाजी** पुढें बोलला, 'मीं त्या वेळेस यांचेवर वार केला, परंतु इतक्यांत एका स्वारानें घोडा मध्यें घातला, त्या धक्क्यानें पडलों. मजबरोबरचे बाकीचे लोक जखमी होऊन सर्व कैद झालों. त्या स्वारानें मला त्याच वेळेस ठार केलें असतें, परंतु दुसरा एक स्वार आड आला त्यानें त्याची विनवणी केली तेव्हां पहिल्या स्वारानें मला सोडलें, व कैद करून पाठविलें. तेव्हांपासून मी कैदेंत आहें, व आज त्याच स्थितींत आपले समोर उभा आहें. कृपा करा. मी जीवित्वास कंटाळलों आहें. इतर आरोपींप्रमाणें मला कैदेची शिक्षा करूं नका. मला एकदम तोफेचे तोंडीं द्या, फांशीं द्या, अथवा आतांच गर्दन मारा, एवढीच

माझी आपणास प्रार्थना आहे.' हे शेंवटले शब्द बोलत असतां तो अतिशय गहिंवरला होता, व त्यानें डोळ्यांस पाणी आणून हात जोडून हे शब्द उच्चारिले.

आरोपीचें ह्मणणें बरोबर आहे काय असें विचारण्यासाठीं कमिशनचे प्रेसिडेंटांनीं **कर्नल ऑनर**कडे पाहिलें. लागलाच **कर्नल** ह्मणाला—'**हमीरजी** ह्मणतो तें अगदीं अक्षरशः खरें आहे. माझे बरोबरचे स्वारानें जर मला जागेवरून बाजूस सारलें नसतें तर मी ठारच झालों असतों.' **कर्नल**चा जबाब ऐकून **अंडरसन** साहेब ह्मणाले 'प्रत्यक्ष तुह्मांस मारणारा आरोपी तोच स्वतः ही गोष्ट कबूल करीत आहे, तेव्हां ह्याहून जास्त पुरावा नको. परंतु ज्या स्वारानें तुह्मांस वांचविलें तो कोण?' हा प्रश्न ऐकून **कर्नलनें राजपाळास** पुढें येण्याची इशारत केली, तेव्हां **राजपाळ** गर्दीतून पुढें येऊन त्यानें अध्यक्षांस अदबीनें सलाम केला. त्याचें शौर्याबद्दल लोकांस अगोदरच कळलें असून त्याचा चेहेराही स्वाभाविकच मोठा मोहक असे, यामुळें त्या वेळीं सर्व लोकांचें लक्ष **राजपाळा**कडे एकदम लागलें.

**राजपाळ** ह्मणाला, 'ह्या आरोपीची गोळी माझे स्वारानें चुकविली, त्यामुळें **कर्नल**चे प्राण वांचविल्याचें श्रेय त्यासच मिळालें पाहिजे. कारण **हमीर जसाजी**च्या उद्देशाची इशारत त्यान मला दिली नसती, तर माझ्या हातून साहेबांचा यत्किंचित्‌ही उपयोग होऊं न शकता.' जमलेल्या लोकांस **राजपाळा**च्या या भाषणाचें विलक्षण कौतुक वाटलें, व त्यांपैकीं कित्येक लोक भर कोर्टांत मोठ्यानें बोलले, 'वाहवा! याचें नांव थोरपण व औदार्य! नाहीं तर एकादें मोठें कृत्य दुसऱ्यानें केलें असलें तरी तें मीं केलें ह्मणून रिकामी फुशारकी मिळविणारेच लोक फार!' बाकीचे लोक कोर्टाच्या बेअदबीस भिऊन कांहीं बोलले नाहींत, तथापि प्रत्येकाच्या मुद्रेवरून **राजपाळा**च्या उदारपणाबद्दलची तारीफच होत असल्याचें अगदीं उघड दिसत होतें.

इतक्यांत **भियाजीस** पुढें येण्याबद्दल ताकीद झाली. तो पुढें आलेला पहातांच त्या वृद्ध आरोपीचे नेत्र एकदम लाल व वटारल्या-सारखे झाले, व दुःखानें व रागानें त्याचा चेहेरा विलक्षण दिसला. अशा स्थितींत तो मोठ्या आवेशानें ओरडला, 'हाच हाच तो स्वार. यानेंच माझेबद्दल **राजपाळास** विनंती करून माझे प्राण वांचविले!' **हमीरजींचें** हें भाषण ऐकून सर्वजण एकदम **भियाजीकडे** पाहूं लागले, व ज्याला त्याला या स्वारानें आपला प्राण वांचविला हें आरोपी स्वतः ह्मणत आहे, तर मग याचेकडे तो रागानें त्रासल्यासारखा कां पाहतो याचेंच मोठें कोडें येऊन पडलें. सरतेशेंवटीं अध्यक्षांनीं **भियाजीस** हकीकत सांगण्याविषयीं हुकूम केला.

हुकूम ऐकून **भियाजी** ह्मणाला, '**हमीरजी** स्वतःच मी त्यांचा जीव वांचविला ह्मणून आपणा सर्वांदेखत कबूल करतात, तेव्हां या बाबतींत रीतिप्रमाणें मजकडून कांहीं जास्त खुलासा होणें बाकी राहतो असें मला वाटत नाहीं. तथापि मी कांहीं जास्त बोलावें असा कोर्टाचा हुकूमच होत आहे, त्याअर्थीं कोर्टाची परवानगी मागून मी इतकेंच ह्मणतों कीं, या आरोपींचे प्राण मीं वाचविले ही गोष्ट जर त्यांना कबूल आहे, तर त्यांनीं या कामगिरीबद्दल मी मागेन तें बक्षीस मला देण्यास तयार झालें पाहिजे. त्याप्रमाणें ते तयार असतील तरच माझ्या तोंडून कांहीं जास्त हकीकत निघेल.'

**भियाजीचें** हें भाषण ऐकून सर्व लोकांचीं मनें एकदम बुचकळ्यांत पडलीं, व ते आश्चर्यानें तो काय पुढें सांगणार हें ऐकण्याविषयीं विलक्षण आतुर होऊन गेले. त्या वेळीं इतकी गर्दी कोर्टांत होती, परंतु एक चकार शब्द कीं हूं चूं कांहींएक निघत नव्हतें. स्वतः अध्य-क्षांसही **भियाजीच्या** भाषणाचा चमत्कार वाटून त्यांनीं **हमीरजीकडे**

नजर केली. त्याबरोबर हमीरजीनें डोळ्यांस पाणी आणून हात जोडले, व तो मोठ्या दुःखानें ह्मणाला, 'महाराज, पुरे ह्या यातना! या जिवाचा शेवट लौकर कराल तर चांगला! पोरीपरी पोर गेली! जिवापलीकडे संभाळलेली घोडीं गेलीं! लौकिकांत बेअब्रू झाली! आतां या दुनियेंत मीं कोणते सुखाची आशा करीत रहावें? मी होऊन आपला गुन्हा कबूल करतों. फारां दिवसांचे केलेले गुन्हेही मीं सांगितले, ते फक्त आपण लौकर माझा अंत करावा एवढ्यासाठींच! दया करा, आणखी इतःपर मला कांहीं विचारूं नका!'

इतकें बोलून तो स्तब्ध होऊन खालीं भुईकडे पाहूं लागला. त्या वेळीं जमलेल्या लोकसमुदायांत किंचित् कुजबुज सुरू झाली व जो तो ह्मणे ह्मातारा भला हट्टी दिसतो! प्रत्यक्ष कर्नलला मारण्याला तयार झालेला, तेव्हां याचें आयुष्य किती बाकी आहे हें दिसतेंच आहे! कदाचित् याला स्वतःला इतःपर कांहींवेळ जरी जगण्याची इच्छा आहे ह्मणावें, तर तोही प्रकार नाहीं, तेव्हां अशा स्थितींत हा भियाजीस तो मागतो तें कां देत नाहीं!'

कांहीं वेळानें भियाजी मागत आहे तें त्यास कां देत नाहीं असें स्वतः अध्यक्ष हमीर जसाजीस ह्मणाले. तेव्हां अत्यंत दुःखानें पीडलेला हमीरजी भियाजीस ह्मणाला, 'माग काय मागतोस तें एकदाच माग! मला जास्ती बोलायला लावूं नको!' हे शब्द ऐकल्याबरोबर भियाजी एकदम कैद्याचे जवळ गेला. त्यानें त्याचे पायांवर आपलें मस्तक ठेवून अश्रूंनीं त्याचे पाय भिजविले, व सद्गदित स्वरानें तो 'क्षमा करा!' असें ह्मणाला. या वेळीं स्वतः कैदीही अगदीं गहिंवरून गेला होता, व तो डोळ्यांत आंसवें आणून ह्मणाला, 'या स्वाराचे अपराध कांहीं असोत, त्याबद्दल मी अंतःकरणपूर्वक क्षमा करितों!' त्यानें

भियाजीस हातीं धरून उठविलें, व डोळे मिटून व हात वर करून तो ह्मणाला, ' माझी पक्की खात्री आहे कीं, ह्या स्वारानें माझा अपराध मुळींच केला नाहीं. व उलट त्यानें माझेवर उपकारच केले आहेत. परमेश्वरा! काय गूढ आहे तें तुझें तुलाच ठाऊक!' इतकें बोलून तो स्तब्ध राहिला.

भियाजी कोर्टाकडे वळून ह्मणाला ' थोडा वेळ मला बाहेर जाऊन येण्याची रजा असावी. ' कोर्टाकडून होकार तावडतोब मिळाला, व तो मिळतांच भियाजी कोर्टांतून धांवतच बाहेर निघून गेला. हें काय गौडबंगाल आहे तें कोणासच कांहीं समजेना. जो तो मनांत विचार करीत होता. एकंदरींत कमिशनचे अधिकारी व प्रेक्षकजन अगदीं तटस्थ होते.

या जमलेल्या प्रेक्षक मंडळींत पथाजी व जोधा कुंभाणी हे उभयतां राजपाळाबद्दल विचार करित उभे होतेच, त्यांनीं लालवास हा योग्य वर आहे असें मनानें ठरविलें होतें, व कोर्टास त्याबद्दल हकीकत कळविण्यास योग्य संधि येण्याची ते वाट पाहत होते. घडलेली हकीकत कोर्टापुढें लालबाचे तोंडून येण्यास ही संधि योग्य आहे असें त्यांस वाटून पथाजी धांवत घरीं गेला, व त्यानें लालबास गाडींत घालून बाहेर आणून उभी केली. मागें कोर्टांत लोकांची गुणगुण चाललीच होती, व सर्वजण पूर्ववत् तटस्थच बसले होते.

जोधा कुंभाणी कोर्टापुढें आला, व बंडाचे संबंधाची कांहीं हकीकत कळविण्याजोगी घडली आहे ती सांगणारा इसम कोर्टानें परवानगी दिल्यास पुढें येईल असें ह्मणाला. कोर्टानें तें ह्मणणें लागलेंच कबूल केलें, व त्याबरोबर पथाजीनें आपली बहीण बुरखा घेतलेली कोर्टांत आणून उभी केली. ती मर्यादेनें उभी राहिली, व कमिशनचे अध्यक्षांनीं ' सांग घाबरूं नको.' ह्मणून तिला सुचविलें असतां लज्जेमुळें ती कांहीं बोलली नाहीं, व तिनें पथाजीस तूच सांग असें हळूच कळविलें.

मुलगी बोलण्यास लाजते असें पाहून स्वतः **जोधाजीच** कोर्टास ह्मणाला, ' मी **बेट शंखोद्धार** येथें सुखवस्तू राहणारा आहें. कोर्टासमोर उभी आहे, ही माझी मुलगी. ज्या दिवशीं बेट **वाघेर** लोकांनीं घेतलें, व गांवांत लूट झाली, त्या दिवशीं रात्रीं माझे घरावर दरवडेखोर आले. रात्रीची वेळ होती त्यामुळें मी हत्यारबंद चाकर लोक घेऊन पुढचे दाराकडे गेलों, व दरवडेखोरांस पळवून आळीचे बाहेर घालविलें. घरांत ह्या वेळेस सर्वांची धांदल झाली होती. मी परतून आलों तेव्हां घरांत मुलगी नाहीं असें कळलें. थोडे दिवसांत बंडाची शांतता झाली. मीं मुलीसाठीं पुष्कळ शोध केला, पण कांहीं पत्ता लागेना, तेव्हां निरुपाय होऊन इश्वरावर हवाला टेवून होतों. बरेच दिवसांनीं संध्याकाळचे सुमारास हे **राजपाळजी** कोर्टांत हजर आहेत त्यांनीं मुलीला घोड्यावर घालून माझे येथें पावती केली, व ते दुसरे दिवशीं सकाळीं चालते झाले.'

हें ऐकून कोर्टानें मुलीस झालेली हकीकत विचारली, तेव्हां ती मर्यादेनें ह्मणाली. ' घरांत दरवडेखोर शिरले या भयानें मी मागचे रादीं गेलें, पण पुन्हां आंत जाण्याची भीति वाटली त्यामुळें मंदिरांत गेले. तेथें एक शिद्दी शिपाई माझ्या पाठीस लागला. तेव्हां पळत पळत बुरजाजावर गेलें, व समुद्रांत जीव दिल्याशिवाय हा सोडीत नाहीं असें वाटून मी तटावर उभी राहिलें, तेव्हां तो थोडकासा थांबला. पण लागलाच त्यानें मला ओढण्याकरितां आपला हात माझ्या अंगाजवळ आणला. इतक्यांत हे तेथें येऊन त्यांनीं त्याचा मुर्दा पाडला, परंतु भयानें मी मागें सरल्यामुळें समुद्रांत पडलें. तेव्हां यांनीं मला काढण्यासाठीं माझ्या पाठोपाठ समुद्रांत उडी घातली, व मला पाण्यांतून पोंहत समोरचे किनाऱ्यावर पोंहचविलें, व तेथून पायरस्त्यानें मला माझे घरीं सुखरूप पावतें केलें.'

मुलीचें याप्रमाणें भाषण झाल्यावर **जोधाजी** कोर्टास,पुनः ह्मणाला, 'राजपाळजींच्या या शौर्याच्या कृत्यामुळें त्यांची कोण तारीफ करणार नाहीं? मजवर त्यांचे अतिशय उपकार झाले आहेत, व त्यांची फेड कशी करावी याच विचारांत मी होतों. या वीर पुरुषाची बहादुरी कोर्टासमोर कळविणें जरूर वाटलें ह्मणून मीं कोर्टास ही तसदी दिली, व आणखीही थोडीशी जास्त तसदी देण्याची परवानगी मागतों. यांचे उपकाराबद्दल मी माझी मुलगी त्यांस आनंदानें आर्पण करतों, ती त्यांजकडून कोर्टानें स्वीकारवावी अशी विनंती आहे.' हें ऐकतांच **कर्नल ऑनर** यास अतिशय आनंद वाटून तो **राजपाळाचे** कानाशीं लागला, व **राजपाळाचा** हात धरून तो पुढें आला असतां **राजपाळानें** आनंदानें **हमीरजींची** देणगी स्वीकारण्यास आपण कबूल असल्याचें कळविलें. कमिशनच्या इतर सभासदांनीं जोडा सर्वांशीं योग्य आहे असे उद्गार काढले. अध्यक्षांनींही आनंदाचे भरांत रुकार दिला. लागलीच **जोधाजीनें राजपाळाचे** हातांत मुलीचा हात दिला, व 'तुह्मी उभयतां आनंदांत रहा.' असें तो मोठ्या सद्गदित वाणीनें ह्मणाला. लागलीच **पथाजीनें** कंठी, शाल व पागोटें **राजपाळाचे** हातीं दिलें. उभयतां वधूवरांनीं **जोधाजीस** नमस्कार केला, व त्यानेंही 'चिरायु व्हा.' असा मोठ्या प्रेमानें त्यांस आशीर्वाद दिला. हा प्रेमळ देखावा पाहून **कर्नल ऑनर** ह्यास ही अतिशय आनंद वाटला, व तो ह्मणाला 'वधूवरांनो! येथें देण्यास मजजवळ हातांतील आंगठीशिवाय दुसरें कांहीं नाहीं, करितां ही आंगठी मी देतों. परमेश्वर उभयतांस सुखी चिरायु करो!' इतकें बोलून त्यानें **राजपाळाचे** बोटांत ती आंगठी घातली. अध्यक्ष व दुसरे कामदार यांनीं त्याचेंच अनुकरण करून उभयतांस कोणीं आंगठ्या, कोणीं सोन्याचीं कड्यांळें, याप्रमाणें आनंदानें बक्षिसें दिलीं. एकंदरींत कोर्टाच्या जागेस त्या वेळेस लग्नमंडपाचीच शोभा आली होती.

कर्नल ऑनर ह्मणाला 'राजपाळजी! हें वक्षीस तुमच्या पराक्रमाबद्दल आह्मीं खानगी संबंधानें दिलें आहे. तुमच्या इमानदारीबद्दल सरकारांतून तुह्मांला निराळें वक्षीस मिळेल.'

असो; इतका प्रकार होऊन हीं वधूवरें आनंदानें उभीं आहेत, तोंच बुरखा घेतलेली दुसरी स्त्री कोर्टांत येऊन दाखल झाली हमीरजसाजीची दृष्टि तिजकडे गेली मात्र, तो लागलाच तिजकडे धांवत गेला, व त्यानें तिला एकदम पोटाशीं धरलें. त्याचा कंठ दाटला, व नेत्रांतून आनंदाश्रूंचा प्रवाह चालूं लागला. त्या स्त्रीनेंही आपल्या प्रिय पित्यास मिठी मारली, व ती ह्मणाली, 'बाबा! आपलें परवानगीशिवाय न होणारें तें कृत्य माझे हातून घडलें त्याची क्षमा असावी. इतका वेळ भियाजी लाखा होता तीच मी आहें!'

या वेळेस पत्रामलही तिजकडे न्याहाळीत होता, व घरून पळून निघतांना जे कपडे तिचे अंगावर होते तेच या वेळीं तिचें अंगावर आहेत हें त्यानें ताबडतोब ओळखलें. त्याबरोबर एकदम जाऊन तिला कडकडून भेटावें असें त्यास क्षणमात्र वाटलें, परंतु लोकलज्जेस्तव त्यानें विवेक करून मोठ्या कष्टानें आपलें मन आंवरलें.

पाचबानें आपल्या पित्यास रणमल उर्फ पत्रामल खुणेनें दाखविला. रणमल त्याचे ओळखीचाच होता, तो धांवत पुढें आला व त्यानें हमीरजसाजीची क्षमा मागितली. हमीर जसाजी ह्मणाला, 'क्षमेचें आतां कारणच राहिलें नाहीं. कारण ती कोर्टानेंच केली आहे, व ह्या भियाजीसही मी प्रथमच माफी देऊन चुकलों आहें.'

कोर्टानें पत्रामलास आपली सर्व हकीकत कळविण्यास सांगितलें असतां त्यानें आपण चाकराच्या वेशानें चाकरी पतकरून घोड्यांसुद्धां पाचबास घेऊन गेलों, परंतु पुढें रस्त्यांत नदींत उभयतांचा वियोग झाला

असतां आपण फकीरवेशानें फिरत फिरत द्वारकेस आलों, व तेथें कर्नल बार्टनचे नोकरींत राहिलों, येथपर्यंतची हकीकत थोडक्यांत सांगितली. ती ऐकून ही हकीकत पुरी करण्याविषयीं पाचवास कोर्टानें सूचना केली, त्या वेळेस ती ह्मणाली 'मी पाण्यांत बुडालें असें समजून हे चालते झाले. इकडे मी किनाऱ्यास लागल्यावर वरून आणलेलीं दोन्ही घोडीं चरत होतीं तीं माझ्या दृष्टीस पडलीं. नंतर स्त्रीवेशानें राहिलें असतां अनर्थ होतील असें वाटून भियाजी लाखा या रूपानें मी घोड्यासुद्धां लष्करांत येऊन राजपाळजीपाशीं स्वार होऊन राहिलें. पुढें हल्ल्याचे वेळेस माझ्या वृद्ध बाबांवर प्रसंग आला, त्या वेळेस त्यांना ओळखून मी राजपाळजींची विनंती करून त्यांचा प्राण वांचविला.'

असो; अशा प्रकारें या दोन जोडप्यांचे संबंधानें ही विचित्र हकीकत घडली, व तिचा परिणाम शेंवटीं आनंदाचा झाला. कमिशनचे अधिकाऱ्यांनीं हमीरजसाजीची ही हकीकत व ती घडण्यास झालेलीं कारणें विचारांत घेऊन त्यानें आत्महत्या करण्याकरितां गुन्हा करण्याचा यत्न केला असें ठरविलें, तरी कोर्टाच्या कामासच लग्नविधीचें अकल्पित स्वरूप आलें हा विचार मनांत आणून कर्नल आनरचे संमतीनें व क्याप्टन बार्टन यांचे शिफारशीवरून पत्रामलासाठीं जसाजीस त्याच वेळेस माफी देऊन कैदेंतून मुक्त केलें. कर्नल आणि क्याप्टन या उभयतांनींही हीं दोन्ही लग्नें हिंदुधर्मास व आचारास अनुसरून करा असें जोधाजी व हमीरजी यांस कळविलें, व त्याच वेळीं क्याप्टननें एक आंगठी पत्रामल यास लग्नाची देहनगी ह्मणून दिली

इतकें झाल्यावर, पत्रामल माझा वडील भाऊ आहे, व आह्मी लहानसे जहागिरदार आहोंत, व घरून निरनिराळ्या वेळीं दोघेही निघालों असतां या ठिकाणीं उभयतांच्या भेटी झाल्या, ही हकीकत राजपाळानें कमि-

शनास कळविली, त्यामुळें त्यांचे इमानीपणाबद्दल व त्यांनीं **गायकवाड सरकारचा** पक्ष संभाळल्याबद्दल सर्व लोकांस मोठें आश्चर्य वाटलें. विशेषतः एकदम सासरा हें नवीन पद अकल्पित मिळालेल्या उभयतां वृद्धांस तर आपल्या मुली सुस्थळीं पडल्या याबद्दल फारच धन्यता वाटली.

कमिशनचें काम संपलें. **राजपाळ, पत्रामल, हमीरजी, जोधाजी, लालबा, पाचबा** व **पथाजी** ह्या सर्वांस **पथाजीचे** मामानें आपले घरीं येण्याबद्दल आग्रह केला, व त्यास मान देऊन सर्व मंडळीनें तेथें जाण्याचें कबूल केलें. कोर्टाचे आवारांत गाड्या होत्या त्या ठिकाणीं सर्वजण आले, इतक्यांत एक स्वार दवडत येऊन त्यानें **पत्रामलाचे** हातीं कागद दिला, व आईसाहेब व कारभारी सर्व दरवाज्याच्या बाहेर उभे आहेत, त्यांस आपण सांगाल त्या ठिकाणीं आणून पोंचवितों असें ह्मटलें. ते ऐकून **पथाजीनें** त्या स्वाराबरोबर एक मनुष्य देऊन नवीन पाहुणेमंडळीस आपले मामाचें घरीं आणून पोंचविण्यास सांगितलें. अशा प्रकारें सर्व मंडळी घरीं दाखल झाली हें पाहून **लालबाचे** आजीचे पोटांत हर्ष माईना. **हमीरजी, राजपाळाची** आई, वगैरे पाहुण्यांचा तिनें मोठ्या आनंदानें सत्कार केला, व पुढें होणाऱ्या लग्नांची मंगल सूचना ह्मणून लागलीच केळवण ठरविली. त्यायोगानें एकंदरींत सर्वांस आनंदीं आनंद होऊन गेला.

घराजवळच एक मोठी बखळ होती तींत कनाती लागल्या, मांडव घातले, ब्राह्मण ज्योतिषी जमले, व आजचा मध्यरात्रीचा मुहूर्त उत्तम आहे असें त्यांनीं ठरविलें. दोन्ही लग्नें एकाच मंडपांत लागलीं. अनेक तऱ्हेच्या वाद्यांचा गजर एकसारखा होत होता, व लष्करी सामानाची यथेच्छ मदत झाल्यामुळें त्या वेळेच्या आनंदास कांहीं विलक्षणच स्वरूप येऊन गेलें. **हमीर जसाजीची** स्त्री **चंदाबा** हिला आपला पति

बंडांत सांपडला व त्यास **अमरेळीस** नेलें ही खबर मिळाली, त्यामुळें ती तावडतोब गडीमाणसें घेऊन गाडींतून आली, ती ऐन लग्नाचे दिवशींच **अमरेळीस** दाखल झाली, व तिला आपल्या पतीस माफी मिळाली व **पाचवा** सांपडली व ती आज लग्नाचे तयारींत आहे, ही हकीकत..., कळतांच तीही लग्नघटकेपूर्वी लग्नवरीं येऊन पोहोंचली होती. हा विचित्र बनाव बनलेला पाहून **पाचवास** व **हमीरजीस** किती धन्यता वाटली असेल याची कल्पना वाचकांनींच करावी. **हमीरजीनें** बछेरा **राजपाळास** व घोडी **पत्रामलास** आंदण ह्मणून देऊन आणखी दोन बछेरे, गाई, ह्मशी वगैरेंच्याही निराळ्या देणग्या दिल्या. वधूवरांस अलंकार वस्त्रें दिलीं तीं निराळींच. एकंदरींत सर्व रात्र लग्नाचे आनंदांत गेली. पुढें चार दिवस लग्नसोहळा चालूच होता. सोहळा आटपल्यावर दोन चार दिवसांतच **पत्रामल** व **राजपाळ** यांस नवीन गिरास वाढवून दिल्याचें सरकारांतून लिहून आलें. त्यानंतर हीं नवीन जोडपीं आपआपले खटल्यासुद्धां आपआपल्या गांवीं चालतीं झालीं, व **जोधाजी** व **हमीरजी** हेही **द्वारकानाथाचें** दर्शन घेऊन परत स्वस्थानीं गेले.

येथें आमची कथा संपली. सजा झालेले कैदी **बडोद्याचे** तुरुंगांत रवाना झाले. सरकारनें **वाघेर** लोकांचे निर्वाहासाठीं रोंकड कोऱ्या नाणीं बांधून दिलीं, शेतीभाती करण्यास त्यांस जमिनी दिल्या, व कित्येक **वाघेरलोक** पोलिसांत भरले. तसेंच **उखामंडळचे** बंदोबस्तासाठीं **गायकवाड** सरकारांनीं पगार देऊन एक असिस्टंट रेसिडेंट **अमरेळीस** ठेविला. हा सर्व बंदोबस्त सन १८६१ सालीं **जॉनसन** साहेबांचे हातून झाला.

**समाप्त.**

# शूर वाघेर या पुस्तकास आश्रय देणारांचीं नांवें.

## एकापेक्षां जास्त प्रतीस आश्रय देणारांचीं नांवें.

| नांवें. | प्रती. |
|---|---|
| [illegible]मं. मल्हारराव ऊर्फ पतंगशाह जव्हार. | २ |
| श्री.रा. बाबासाहेब घोरपडे, इचलकरंजी. | १० |
| ,, ,, बाळासाहेब पटवर्धन, कुरुंदवाड. | २ |
| ,, ,, बापूसाहेब पटवर्धन, कुरुंदवाड. | ५ |
| ,, ,, बापूसाहेब घाडगे, कागल. | २ |
| ,, ,, तात्यासाहेब पटवर्धन, सांगली. | ५ |
| ,, ,, दत्ताजीराव घाडगे, कागल. | २ |
| ,, ,, माधवराव मोरेश्वरपंत अमात्य बावडा. | ५ |
| ,, ,, बाळासाहेब घोरपडे, मुधोळ. | १० |
| ,, ,, आपासाहेब पटवर्धन, जमखिंडी. | ३ |
| ,, ,, आण्णासाहेब पटवर्धन, मिरज. | ३ |
| ,, ,, संताजीराव घोरपडे, कापशी. | २ |
| ,, ,, सुभानराव शिंदे, तोरगल. | २ |
| ,, ,, राजे शहाजीराव मालोजीराव भोंसले, अक्कलकोट. | २ |
| ,, ,, हणमंतराव निंबाळकर, सरलष्कर कोल्हापूर. | २ |
| ,, ,, आर. डब्ल्यू. बाळाजी, मुंबई. | २ |
| ,, ,, उदाजीराव चव्हाण हिंमतबहाद्दर, कोल्हापूर. | २ |
| ,, ,, आबाजीराव कृष्णराव पंतप्रतिनिधी, कोल्हापूर. | ४ |
| ,, ,, रघुपती पंडीत महाराज कोल्हापूर. | २ |
| ,, ,, संपतराव गायकवाड, बडोदें. | १० |
| ,, ,, नरसिंगराम [illegible]मचंद्र घोरपडे, बडोदें. | २ |
| ,, ,, नारायणराव घोरपडे, कोल्हापूर. | ३ |
| ,, ,, राजे नवलोजीराव गुजर, नागपूर. | २ |
| रा. ब. वासुदेव महादेव समर्थ, बडोदें. | ५ |
| खा.ब. जमशेटजी ए. दलाल, बडोदें. | २ |
| रा.रा. नारायण बाळकृष्ण वकील, संखेडा. | १२ |
| ,, ,, अनंत कृष्ण ओक, अहमदनगर. | २ |
| ,, ,, गणपत रामचंद्र, मुंबई. | २ |
| ,, ,, यशवंत नारायण आगरकर, वेंगुर्लें. | २ |

## एकएक प्रतीस आश्रय देणारांचीं नांवें.

( अ. )

रा. रा. अंताजी गोविंद केळकर.
" " अनंत गणेश शेकदार.
" " अनंत लाडोबा गांवसकर.
" " अनंत बी. कंटक.
" " अनंत महादेव दामले.
" " अनंत नारायण आचार्य.
" " अनंत त्रिंबक चांदवडकर.
" " अनंत रामचंद्र पंडित.
" " अनंत लक्ष्मण सोहनी.

( आ. )

रा. सा. आनंदराव गोविंद दिघे.
श्री. रा. आनंदराव राजे पांढरे.
रा. रा. आनंदराव सुंदरजी.
" " आनंदराव एस्. दळवी.
" " आनंदराव आत्माराम त्रिलोक्येकर.
" " आनंदराव विनायक कप्तान.
" " आनंदरावजी पालेकर.
" " आनंदराव दिनानाथ.
" " आनंदराव गणपतराव देसाई.
" " आनंदराव कृष्ण आचार्य.
रा. सा. आनंदराव रघुनाथ धुमे.
श्री. रा. आपासाहेब मोरे.
रा. रा. आपासाहेब भोंसले.
" " आपा वगाराम मुळे.
प्रोफेसर आबाजी विष्णु काथवटे.
रा. रा. आबाराव बळवंत.
" " आबाजी निळकंठ वसईकर.
" " आर. ए. तखेड.
" " आर. जी. आष्टीकर.
" " आर. व्ही. महाजनी.
" " आर. जे. बुधवारकर.
रा. ब. आर. एन्. आंबेगांवकर.
" " आर. व्ही. धामणसकर.
रा. रा. आर. एम्. परांजपे.
" " आर. पी. गडबोले.
" " आर. एच्. गोखले.
" " अमृतराव सखाराम वर्णीकर.
" " आत्माराम तात्याजी वेडनरे.
" " आत्माराम बाळकृष्ण किर्त्तीकर.
श्री. रा. आत्माराम अमृतराव बुटी.
रा. रा. आत्माराम मोरेश्वर पाठारे.
" " आत्माराम बापूजी फाटस.

( उ. )

रा. रा. उमयाधर लक्ष्मणजी देसाई.

( ए. )

रा. रा. एस्. घोरपडे.
" " एम्. बी. जाधव.
" " एस्. जी. फाळके.
डॉक्टर एन्. के. गाडगीळ.
रा. रा. एन्. के. आंबेगांवकर.
" " एस्. व्ही.
" " एस्. एन्. निसल.
" " एकनाथ मनोहर.
" " एम्. पी. ध्रुव.
" " एस्. आर. भांडारकर.
" " एस्. डब्ल्यु. केळकर.
" " एन्. शिवशंकर तळपदे.
" " एम्. आर. नवलकर.
" " एस्. बी. उपासनी.

,, ,, एम्. एल्. खांबाटे.
,, ,, ए. एल्. देशमुख.
,, ,, एम्. जे. कोठारे.

## ( ओ. )

रा. रा. ओमकंट भाऊराव खरे.

## ( क. )

रा. रा. कचेश्वर सखाराम देशपांडे.
,, ,, काशीनाथ केशव खासगीवाले.
खा.सा. काजी महंमद इब्राहीम.
रा. रा. काशीनाथ जगन्नाथ सोमण.
,, ,, काशीनाथ सखाराम मेढेकर.
,, ,, काशीनाथराव जोशी.
,, ,, काशीनाथ विनायक भावे.
,, ,, काशीनाथ जनार्दन मंत्री.
,, ,, काशीनाथ बावजी बुलाख.
,, ,, काशीनाथ कृष्णराव.
,, ,, काशीनाथ विष्णु.
,, ,, काशीनाथ भिकाजी.
,, ,, कृष्णाजी रघुनाथ केळकर.
,, ,, कृष्णराव पुरुषोत्तम भट.
रा. ब. कृष्णराव विनायक सारंगपाणी.
,, ,, कृष्णराव महादेव जोगळेकर.
रा. रा. कृष्णाजी भिकाजी केळकर.
,, ,, कृष्णाजी गोविंद फाटक.
,, ,, कृष्णाजी गोविंद केळकर.
,, ,, कृष्णाजी महादेव दातार.
,, ,, कृष्णराव त्रिंबक वकील.
,, ,, कृष्णराव जयराम गुप्ते.
,, ,, कृष्णराव हरी.
,, ,, कृष्णराव महादेव देशपांडे.
,, ,, कृष्णाजी विष्णु रानडे.
,, ,, कृष्णराव पांडुरंग रेळे.
[redacted]

,, ,, कृष्णाजी रघुनाथ गोखले.
,, ,, के. जी. घोटीकर.
रा. ब. के. वी. पंडित.
रा. रा. केशव गणेश खारकर.
शाह. केशवलाल शंकरलाल.
शेठ. केवुतशा इसाजी.
रा. रा. के. आर. साळुंके.
रा. सा. केशव विश्वनाथ पटवर्धन.
रा. रा. केशव विनायक खारकर.
,, ,, केशव रघुनाथ नातु.
,, ,, केशव भिकाजी परचुरे.
,, ,, केशव घनश्याम.
रा. रा. केशव महादेव कावळे.
,, ,, केशव गोपाळ ताम्हणे.
डा. के. आर. किर्तीकर.
रा. रा. के. दामोदर.
,, ,, केशव बळवंत किरकिरे.
,, ,, केशव रावजी मनोहर.
,, ,, केशवराव आत्माराम.
श्री.रा.रा.कोंडोजी बहिरोजी नाईक.

## ख.

रा. रा. खंडेराव अनंत प्रधान.
,, ,, खंडेराव हरिश्चंद्र दिघे.
,, ,, खंडेराव दिनानाथ.
,, ,, खंडेराव बाळाजी.
,, ,, खंडेराव कृष्ण.
,, ,, खेतसु लीलाधर.

## ग.

रा. रा. गंगाधर नरसिंह केतकर.
,, ,, गंगाधर कृष्ण झामरे.
,, ,, गंगाधर व्यंकटेश.
,, ,, गंगाधर बाळकृष्ण अघोर.
,, ,, गंगाधर बाळकृष्ण पाध्ये.

,, ,, गंगाराम भाऊ म्हसके.
,, ,, गंगाराम कृष्ण सबनीस.
,, ,, गंगाराम वि. रेळे.
,, ,, गजानन भगवंतराव.
रा. ब. गजानन बापूजी कोठारे.
रा. रा. गजानन मुकुंदजी.
,, ,, गणपतराव गोखले.
,, ,, गणपतराव विश्वासराव माने.
रा. ब. गणपतराव एस. गायकवाड.
रा. रा. गणपतराव मोरोबा पितळे.
,, ,, गणपत परशराम शेट.
,, ,, गणपतराव मल्हार.
,, ,, गणपत काशीनाथ मदन.
,, ,, गणपत दाजीबा गोडांबे.
,, ,, गणपत केशव.
,, ,, गणपतराव नारायण लेले.
,, ,, गणु लक्ष्मण आरोलकर.
डा. गणेश कृष्ण गर्दे.
रा. रा. गणेश कृष्ण आगाशे.
रा. सा. गणेश बळवंत आंबेगांवकर.
रा. रा. गणेश रामचंद्र पालकर.
,, ,, गणेश दाजी देसाई.
,, ,, गणेश विठू आगरवाडेकर.
,, ,, गणेश पांडुरंग वैद्य.
रा. सा. गणेश जनार्दन आगाशे.
रा. रा. गणेश लक्ष्मण भोंसकर.
रा. सा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे.
रा. रा. गणेश बळवंत देवधर.
,, ,, गणेश बळवंत चितळे.
,, ,, गणेश गोविंद.
,, ,, गोविंद महादेव जोशी.
रा. सा. गोविंद नारायण दळवी.
,, ,, गोविंद विष्णु देव.
रा. रा. गोविंद एस. पागेदार.
,, ,, गोविंद रामचंद्र दाभोळकर.
,, ,, गोविंद बाळकृष्ण रानडे.
,, ,, गोविंद बाबा गुर्जर.
,, ,, गोविंद दयाराम देव.
,, ,, गोविंद कृष्ण कर्णीक.
,, ,, गोविंदराव बासुदेवजी.
,, ,, गोविंदराव माणिक.
,, ,, गोविंदराव गणेश गोडबोले.
,, ,, गोविंदराव व्यंकाजी खोत.
,, ,, गोविंदराव महादेव कोट.
,, ,, गोविंद नरसिंह.
,, ,, गोविंद विनायक पटवर्धन.
,, ,, गोविंद महादेव दिक्षित.
,, ,, गोविंदराव आपाजी गुप्ते.
,, ,, गोविंदराव आपाजी कामळेकर.
,, ,, गोविंद व्यंकटेश.
,, ,, गोपाळ बाळकृष्ण पाटील.
,, ,, गोपाळ विनायक भागवत.
,, ,, गोपाळ शिवराम बोले.
,, ,, गोपाळ नारायण ब्रह्मे.
,, ,, गोपाळ रामचंद्र पितळे.
,, ,, गोपाळ नारायण.
,, ,, गोपाळ रामचंद्र केळकर.
श्री. गोपाळराव सिवदेव राजेबहाद्दर.
श्री. गोपाळराव लक्ष्मण मिरीकर.

## च.

रा. रा. चिंतामण गणेश दामले.
,, ,, चिंतामण मोरेश्वर गडकरी.
,, ,, चिंतामण बापूजी मारगनकर.
,, ,, चिंतामण नारायण महाजन.
,, ,, चिमणराय मोतीभाई.
,, ,, चिमणाजी डी. पारगांवकर.
रा. बा. चुनीलाल माणेकलाल.

रा. रा. चुनीलाल बापूजी.
,, ,, चुनीलाल काळीदास.

## ज.

रा. रा. जगन्नाथ भिकाजी भिडे.
,, ,, जगन्नाथ बाळकृष्ण आम्रुते.
,, ,, जनार्दन गोपाळ चेंबुरकर.
,, ,, जनार्दन भिकाजी खरे.
रा. ब. जयसिंगराव आंग्रे.
रा. रा. जयराम भिकाजी आचरेकर.
,, ,, जयराम रामचंद्र प्रधान.
डा. जी. बी. परांजपे.
रा. सा. जी. आर. निंबाळकर.
रा. रा. जी. एन. देवल.
,, ,, जी. जी. दामले.
,, ,, जी. के. आपटे.
,, ,, जुगलभाई नारायण.
,, ,, जे. के. कानडे.
,, ,, जानोबा गोविंद कुवल.

## ठ.

रा. रा. ठाकोर नरसीदास मेहेता.

## ड.

रा. ब. डाह्याभाई हरजीवनदास.
रा. रा. डी. आर. तरखडकर.
डॉ. डी. बी. सांवत.

## त.

रा. रा. तात्याजीराव रघुनाथ घाडगे.
,, ,, त्रिंबक मोरेश्वर मराठे.
,, ,, त्रिंबक हरी आचार्य.
,, ,, त्रिंबक विष्णु दातार.
,, ,, त्रिंबक सदाशिव दिवेकर.
,, ,, त्रिंबक राजाराम मुल्हेरकर.
,, त्रिंबक आबाजी जोशी.
,, ,, त्रिंबक मैराळ वकील.
,, ,, त्रिंबकराव अनंत.

## द.

रा. रा. दत्तात्रय सिताराम घोलकर.
,, ,, दत्तात्रय वामन थत्ते.
,, ,, दत्तात्रय जयराम देसाई.
,, ,, दत्तात्रय भास्कर कामत.
,, ,, दत्तात्रय गोपाळ शेट.
,, ,, दत्तात्रय कृष्ण आंबेकर.
,, ,, दत्तात्रय पांडुरंग निमक.
,, ,, दत्तात्रय नाना नेरखडी.
,, ,, दत्तात्रय कोंडोपंत घाटे.
,, ,, दत्तात्रय रंनाथ पेंडसे.
,, ,, दत्ताराम डी. पानंदीकर.
रा. सा. दाजी धोंडदेव पाटणकर.
रा. रा. दाजी बाबाजी.
,, ,, दाजी विष्णु केतकर.
,, ,, दाजीबा फकीरजी मेस्त्री.
,, ,, दादोबा सखाराम.
,, ,, दादासाहेब शुक्ल.
,, ,, दादाभाई नारायण धुमे.
,, ,, दादाभाई मदनराव.
,, ,, दामाजी कुंडलीक आंबडेकर.
डा. दामोदर रघुनाथ धुमे.
रा. रा. दामोदर दादाजी देसाई.
रा. रा. दामोदर बापु सापटणी.
,, ,, दामोदर गणेश हजिरनीस.
,, ,, दामोदर लक्ष्मण देशपांडे.
,, ,, दामोदर हरी रानडे.
,, ,, दामोदर निळकंठ.
,, ,, दामोदर रामचंद्र मुळे.
,, ,, द्वारकानाथ सदानन मानकर.
,, ,, द्वारकानाथ रामचंद्र
,, ,, द्वारकानाथ आत्मारामजी धोतर.
,, ,, दिनकर नाना मोरोजी
,, ,, दिनकर कृष्णराव देशमुख.

,, ,, दिनकर नारायण.
,, ,, दिनकर जगन्नाथ.
,, ,, दिनानाथ सदानन.
,, ,, दिनानाथ मदनजी.
,, ,, दिनानाथ हरिश्चंद्र.
,, ,, दिनानाथ तात्याजी.
,, ,, दिनानाथ सदानन देसाई.
,, ,, दुर्गाराम जगजीवन.

### ध.

रा. रा. धरणीधर बळवंत वांकणकर.
,, ,, धाकु बापु सांवत.
रा. सा. धोंडो शामराव गरुड.
रा. रा. धोंडु रावजी जामदार.

### न.

रा. रा. नरहर अपाजी.
,, ,, नरहर लक्ष्मण.
,, ,, नरहर गंगाधर.
,, ,, नबुलाल प्रसादराय.
,, ,, नरसिंगराव कृष्णराव नरगामपाली.
,, ,, नानाभाई हरिश्चंद्र.
,, ,, नानाभाई काशिनाथ नाईक.
,, ,, नानाभाई बाळकृष्णजी.
,, ,, नानाभाई विश्वनाथजी तलपदे.
,, ,, नानाभाई गणपतराव कानविंदे.
,, ,, नानाभाई चेंबुरकर.
,, ,, नारायण राघवेंद्र धारवाडकर.
,, ,, नारायण गणेश आमडेकर.
,, ,, नारायण विनायक साठे.
रा. सा. नारायण शिवराम गोरे.
श्री. रा. नारायण कृष्ण मुनसी.
रा. रा. नारायण शिवराम गणपुले.
,, ,, नारायण अनंत नरवणें.
,, ,, नारायण विनायक वर्तक.
रा. सा. नारायणराव भवानराव पावगी.
रा. रा. नारायण गोविंद तळेकर.
,, ,, नारायण महादेव रानडे.
,, ,, नारायण रामचंद्र दोंदे.
,, ,, नारायण गोविंद गोठवरकर.
,, ,, नारायण मंगेष.
,, ,, नारायण सखाराम कांगो.
,, ,, नारायण मोरेश्वर ताह्मणे.
,, ,, नारायण व्यंकट शेठ.
,, ,, नारायण गोविंद चांदोरकर.
,, ,, नारायण त्रिंबक.
,, ,, नारायण बाळाजी आगरकर.
,, ,, नारायण विनायक गोळे.
,, ,, नारायण जनार्दन पटवर्धन.
,, ,, नारायण रामचंद्र.
,, ,, नारायण काशिनाथ दाते.
,, ,, नारायण वामन.
,, ,, नारायण रामचंद्र गढीकर.
,, ,, नारायण पांडुरंग आळशी.
,, ,, नारायण महादेव चिटणीस.
,, ,, नारायण रामचंद्र पटवर्धन.
,, ,, नारायण विष्णु बापट.
,, ,, निलकंठ वामन चिटणीस.
रा. सा. निलकंठ विनायक छत्रे.
रा. रा. निलकंठ परशराम पांगशे.
,, ,, निलकंठराव वकील.
,, ,, निलकंठ गोपीनाथजी शारंगधर.

### प.

रा. रा. पद्मनाभ रावजी दंडे.
,, ,, परशुराम भिकाजी वकील.
रा. सा. परशुराम गणेश वैद्य.
रा. रा. परशुराम बापु.
,, ,, परशुराम भिकाजी भाट्ये.
रा. सा. परशुराम गोविंद देवधर.

,, ,, प्रल्हाद कृष्ण शहाणे.
रा. बा. प्रभाकर विठ्ठल गुप्ते.
रा. रा. प्रभुलाल सखीदास.
,, ,, प्राणजीवन परशोत्तम.
रा. ब. पांडुरंग दाजी अधिकारी.
रा. रा. पांडुरंग बचाजी बहूलकर.
प्रो. पांडुरंग भिकाजी नाईक.
रा. रा. पांडुरंग तुकाराम कामत.
,, ,, पांडुरंग बाळकृष्ण दडकर.
,, ,, पांडुरंग मोरेश्वर पिंगळे.
,, ,, पांडुरंग लक्ष्मण ओक.
,, ,, पांडुरंग गोविंद प्लीडर.
,, ,, पांडुरंग बाबुलजी.
,, ,, पांडुरंग बाळकृष्ण चचड.
,, ,, पांडुरंग विठोबा बोरकर.
,, ,, पांडुरंग गणेश दांडेकर.
,, ,, पांडुरंग हरिश्चंद्र मंत्री.
,, ,, पांडुरंग बळवंत फडके.
,, ,, पी. आर. नवलकर.
श्री. रा. रा. पुरुषोत्तम गोविंद रोडे.
रा. रा. पुरुषोत्तम येशवंत वांकणकर.
रा. सा. पुरुषोत्तमराव देशपांडे.
रा. रा. पुरुषोत्तम बाळकृष्ण पाठारे.
,, ,, पुरुषोत्तम परशुराम देसाई.
,, ,, पुंडलिक गंगाधर वार्दे.
,, ,, पुस्तक संग्रहालय. पेण.

## ब.

,, ,, बचाजी सगुण रेगे.
,, ,, बजाजी लक्ष्मण दाढे.
रा. बा. बळवंत नारायण जोशी.
रा. रा. बळवंत भोजराज मोहिते.
,, ,, बळवंतराव नारायण मोगरकर.
,, ,, बळवंतराव गोविंद.
,, ,, बापुराम धन:शाम.
,, ,, बापुराव धन:शाम पिंगळे.
,, ,, बापुराव भिकाजी प्रधान.
,, ,, बापुजी भगवंत चित्रे.
,, ,, बापुभाई दाजीभाई.
,, ,, बापु सखाराम आठवले.
,, ,, बापुजी रघुनाथ गडकरी.
,, ,, बापु सिताराम कंट्राक्टर.
,, ,, बाळाजी वामन.
,, ,, बाळाजी रामकृष्ण देशपांडे.
,, ,, बाळाजी नानाभाई वसकर.
रा. रा. बाबाजीराव आनाजीराव साळुंके.
,, ,, बाबा चिंतामण भट आणि कंपनी.
,, ,, बाबाजी भीमाजी वेलणकर.
,, ,, बाबाजी जिवन मेस्तरी.
,, ,, बाजीराव तात्याजीराव रणजीत.
,, ,, बाबाजीराव नाथाजीराव.
,, ,, बाबुराव विठ्ठल फडणीस.
,, ,, बाबुराव गोविंद मराठे.
,, ,, बाळकृष्ण सोमा चव्हाण.
,, ,, बाळकृष्णभाऊ प्रभु गाडेकर.
,, ,, बाळकृष्ण जिववा.
,, ,, बाळकृष्ण रामचंद्र कोतवाल.
,, ,, बाळकृष्ण बळवंत सुळे.
,, ,, बाळकृष्ण पांडुरंग.
,, ,, बाळकृष्ण विजरंग.
,, ,, बाळकृष्ण मोरेश्वर गवंडे.
,, ,, बाळकृष्ण सिताराम नामजोशी.
,, ,, बाळकृष्ण आर कोपरडे.
,, ,, बाळकृष्ण गोपाळ किवे.
रा. सा. बाळकृष्ण वी. विंझे.
रा. रा. बाळ मुकुंद वासुदेव.
,, ,, बाळशंकर दलसुखराम भट्ट.
रा. बा. बी. पी. करंदीकर.

रा. रा. वी. एन्. देवस्थळे.
रा. रा. वी. के. गांगनाईक.
रा. रा. वी. एच्. कुमठेकर.
,, ,, वी. के. मोडक.
,, ,, वी. वी. किर्तीकर.
,, ,, वी. के. कराचीकर.

भ.

रा. रा. भगवंत मोरेश्वर कुळकर्णी.
,, ,, भगवंतराव पांडुरंग.
,, ,, भगवंतराव नारायण तलपदे.
रा. सा. भाऊ येशवंत गुप्ते.
रा. रा. भाऊ हरिश्चंद्रजी.
,, ,, भालचंद्र दामोदर गुणे.
प्रो. भास्कर रामचंद्र आर्ते.
रा. रा. भास्कर भिकाजी ओजाळे.
,, ,, भास्कर एम्. पंडित.
श्री. रा. भास्करराव विठ्ठल खासगीवाले.
रा. रा. भिकाजी बळवंत कुंटे.
,, ,, भिकनराव विठलराव देशमुख.
,, ,, भिमराव रामराव अकबरनीस.
,, ,, भिवराव दौलतराव देशमुख.
,, ,, भिवराव बळवंत पतकी.

म.

श्री. रा. मल्हारराव विश्वासराव उर्फ बापुसाहेब गायकवाड.
,, ,, मल्हारराव खंडेराव चिटणीस.
रा. रा. मल्हार महादेव कुळकर्णी.
,, ,, महादेव परशराम कामत.
,, ,, महादेव दादाशेट खाडे.
,, ,, महादशेट बाबाजीशेट पाथरे.
,, ,, महादेव लक्ष्मण.
मेह. महमद करामतखां.
रा. रा. महादेव कृष्ण आपटे.
,, ,, महादेव गंगाधर दामले.
,, ,, महादेव रामचंद्र.
,, ,, महादेव भिकाजी गोखले.
मिसेस माणेकबाई कोठारे.
,, ,, माणेकलाल हरजी ध्रू.
रा. सा. माणेकभाई जसभाई.
रा. सा. मार्तंड बापुजी गुप्ते.
रा. रा. मार्तंडराव बापूजी वकील.
श्री. रा. मानाजीराव राघोजीराव आंग्रे.
,, ,, माधवराव रामचंद्र फडणीस.
रा. रा. माधवराव धोंडदेव खरे.
,, ,, माधवराव कृष्ण पवार.
रा. बा. माधवराव सोमाजी मोरे.
रा. रा. माधवराव दामोदर.
रा. सा. माधवराव जानोजी पवार.
रा. रा. माधवराव निळाजी.
,, ,, माधवराव बाळाजी.
,, ,, माधवराव सिताराम भाटवडेकर.
,, ,, माधवराय शंकरराय.
,, ,, मारोती हरी.
,, ,, मारोतीराव बुकसेलर.
,, ,, मुकुंदराव अनंत ओवळेकर.
,, ,, मुकुंद बाळकृष्ण गुर्जर.
,, ,, मुरार सखाराम शेट.
रा. रा. मोटाभाई विनायक.
रा. बा. मोरो चिंतामण जोशी.
रा. सा. मोरो विश्वनाथ जोशी.
रा. रा. मोरेश्वर गणपतराव झावबा.
,, ,, मोरेश्वर नानाभाई कोठारे.
,, ,, मोतीलाल अंबालाल.
,, ,, मोहनीराज एकनाथ पाठक.

(य.)

रा. रा. यमाजीराव हरपाळे.
,, ,, यादव धोंडदेव.
,, ,, येशवंत बाळकृष्ण लागु.
,, ,, येशवंत विठ्ठल परोळेकर.
,, ,, येशवंत बळवंत पतकी.
,, ,, येशवंत त्रिंबक चौबळ.
,, ,, येशवंत गणपतराव राघोबा.
,, ,, येशवंत गौरोबा दळवी.
,, ,, येशवंत खंडेराव टिपणीस.
,, ,, येशवंत बळवंत पांगरकर.
,, ,, येशवंतराव पडवेकर.

(र.)

रा. सा. रंगनाथ नरसिंह मुधोळकर.
रा. रा. रंगराव हरी नाचणे.
,, ,, रंगो बळवंत.
,, ,, रघुनाथ बळवंत टिपणीस.
,, ,, रघुनाथ नारायण डोंगरे.
,, ,, रघुनाथ देवराव प्रभु.
,, ,, रघुनाथ व्यंकाजी रांगणेकर.
,, ,, रघुनाथ भास्कर जोशी.
,, ,, रघुनाथ भिकाजी देसाई.
,, ,, रघुनाथ बाळाजी.
,, ,, रघुनाथ एम्. काठवी.
,, ,, रघुनाथ गणेश मुळे.
रा. सा. रघुनाथ बाळकृष्ण तळवळकर.
,, ,, रघुनाथ रतनसिंह गंभीर मारवाडी.
,, ,, रणछोडदास.
पंडिता रमाबाई.
रा. रा. राजाराम अमृतराव.
,, ,, राजाराम सिताराम निमकर.
,, ,, राजाराम येशवंत.
श्रीमंत. रामराव कृष्ण विंचुरकर.
डॉक्टर रामकृष्ण गोपाळ भांडारकर.
रा. रा. रामराव के. घाटगे.
रा. सा. रामचंद्र हरी शिंदे.
श्री. रा. रामराव गंगाधर मैराळ.
रा. रा. रामचंद्र केशवराव गायकवाड.
,, ,, रामचंद्र कृष्ण सबनीस.
,, ,, रामचंद्र बाबाजी पवार.
,, ,, रामचंद्र येशवंत सौदागर.
,, ,, रामचंद्र कृष्ण तुंगारे.
,, ,, रामचंद्र बळवंत लोटलीकर.
,, ,, रामचंद्र कृष्ण चिटणीस.
,, ,, रामचंद्र कृष्ण जोशी.
,, ,, रामचंद्र विष्णू जोशी.
,, ,, रामचंद्र येशवंत गोडबोले.
,, ,, रामचंद्र सदानंद जोशी.
,, ,, रामचंद्र नारायण.
,, ,, रामचंद्र मार्तंड गुप्ते.
,, ,, रामचंद्र गणेश करंदीकर.
,, ,, रामचंद्र मार्तंड.
श्रीमंत. रामचंद्रराव अमृतराव बुटी.
रा. रा. रामचंद्र गोविंद दळवी.
,, ,, रामचंद्र आबाजी देसाई.
,, ,, रामचंद्र विनायक रणजीत.
,, ,, रामचंद्र बापुजी प्रधान.
,, ,, रामचंद्र आ. कोपर्डे.
,, ,, रामचंद्र भास्कर पानवलकर.
रा. सा. रामचंद्र विष्णु देव.
रा. रा. रामचंद्र बजाजी बगवाडकर.
,, ,, रामकृष्ण अनंत पिंगे.
,, ,, रामकृष्ण गणपतराव गुप्ते.
,, ,, रामकृष्ण पुंजाजी.
,, ,, रामकृष्णराव शंकर मसूरकर.
,, ,, रामकृष्ण भगवंतराव.

,, ,, रामराव अनंत कित्तींकर.
,, ,, रामराव यादवराव जावरे.
,, ,, रामराव आनंदराव नवलकर.
,, ,, रामराव नारायण पांडुरंग.
रा. रा. रावजी काशीवा गोडेगांवकर.
,, ,, रावजी गंगाधर खोत.
,, ,, रावजी सखाराम केळकर.
,, ,, रावजी घनःशाम वकील.
,, ,, रावजी काशीनाथ गोखले.
,, ,, सेक्रे. रास्त्यांची पेठ लायब्ररी पुणें.
,, ,, रुद्र गोविंद दिवाकर.

(ल.)

रा. रा. लक्ष्मणराव रामचंद्र गोळवलकर.
श्री. रा. लक्ष्मणराव कदम.
रा. रा. लक्ष्मण काशीनाथ दांडेकर.
,, ,, लक्ष्मण विष्णु फडके.
,, ,, लक्ष्मण विष्णु पराळकर.
,, ,, लक्ष्मण त्रिंबक जोशी.
,, ,, लक्ष्मग रामजीशेट गुजर.
,, ,, लक्ष्मण नारायण केतकर.
,, ,, लक्ष्मण भगवंत.
,, ,, लक्ष्मण नारसिंह.
,, ,, लक्ष्मण जयवंत देशपांडे.
,, ,, लक्ष्मण सदाशिव.
,, ,, लक्ष्मीशंकर देवशंकर वकील.
,, ,, लालजी रघुनाथ देसाई.

(व.)

रा. रा. वसंतराव सखाराम राऊत.
,, ,, वसंतराव माधवरावजी छापवाले.
,, ,, व्यंकटराव आपाजी ओतुरकर.
,, ,, व्यंकटेश कृष्ण दळवी.
,, ,, व्यवस्थापक आर्यशिक्षु पुस्तकालय.
,, ,, व्रजलाल मुळचंद. मुंबई.
,, ,, वामन विष्णु लेले, वकील.
,, ,, वामन प्रभाकर साठे.
,, ,, वामन आपाजी गुप्ते.
,, ,, वामन देवराव देसाई.
,, ,, वामन आपाजी शिरगांवकर.
,, ,, वामन खंडेराव वैद्य.
,, ,, वामन केशव उदनवाडकर.
,, ,, वामन गोविंद देवसकर.
,, ,, वामन एम्. वोडस.
,, ,, वामन गणेश दिघे.
,, ,, वामन संतो देशपांडे.
,, ,, वामन चिंतामण म्हसकर.
,, ,, वामनराव दिनानाथ धुरंधर.
,, ,, वामनराव नारायण नाईक.
,, ,, वामनराव नाना.
,, ,, वामन गोपाळ जोशी.
,, ,, वामन श्रीपतराव.
,, ,, वासुदेव बाळाजी पिंपळीकर.
,, ,, वासुदेव नारायण जोग.
श्री. रा. वासुदेव पंडित उर्फ बाबा महाराज.
रा. रा. वासुदेव लक्ष्मण वायकर.
,, ,, वासुदेव लक्ष्मण दाभोळकर.
,, ,, वासुदेव गोविंद देवळालीकर.
,, ,, वासुदेव गोविंद प्रधान.
,, ,, वासुदेव आण्णाजी नाझर.
,, ,, विठ्ठल नारायण पांगरकर.
,, ,, विठ्ठल रामचंद्र पुराणीक.
,, ,, विठ्ठल गणेश प्रधान.
,, ,, विठ्ठल व्ही. वागळे.
,, ,, विठ्ठल शिवरामः
,, ,, विनायक बळवंत शाळीग्राम.
,, ,, विनायक गोविंद कोतवाल.
,, ,, विनायक ना—

,, ,, विनायक वासुदेव वर्वे.
,, ,, विनायक मोरेश्वर मोघे.
,, ,, विनायक भास्कर.
,, ,, विनायक बळवंत धामणकर.
,, ,, विनायक सावळ्याराम ओक.
,, ,, विनायक मोरेश्वर बुटी.
,, ,, वीरेश्वर वामन गोखले.
रा. बा. विष्णु मोरेश्वर भिडे.
रा. रा. विष्णु नारायण क्षोत्री.
,, ,, विष्णु अनंत पटवर्धन.
,, ,, विष्णु सिताराम. से० ने० ज० ला श्रीवर्धन.
,, ,, विष्णु कृष्ण सवनीस.
,, ,, विष्णु रामचंद्र कुळकर्णी.
,, ,, विष्णु सदाशिव जोगळेकर.
,, ,, विष्णु रामचंद्र.
,, ,, विष्णु रावजी,
,, ,, विष्णु बळवंत गोगटे.
,, ,, विष्णु बाळकृष्ण.
रा. सा. विष्णु मोरेश्वर महाजनी.
रा. रा. विष्णु हरी जोशी.
,, ,, विष्णु कृष्ण सबनीस.
,, ,, विश्वनाथ नारायण सहस्त्रबुद्धे.
,, ,, विश्राम सूर्याजी दळवी.
,, ,, विश्वनाथ गणपत शेठ.
रा. सा. विश्वनाथ नारायण दांडेकर.
श्री. विद्याशंकर भारतीशंकर.
रा. सा. व्ही. के. कीर्तीकर.
,, ,, व्ही. एल. कचठेकर.
रा. बा. व्ही. एम्. पंडीत.
रा. रा. व्ही. ए. वेलकर.
,, ,, व्ही. ए. सावेकर.
,, ,, व्ही. डी. चिवटे.
,, ,, व्ही. डी. द्रवळे.

## श.

रा. रा. शंकर वामन आगरकर.
श्री. रा. शंकरराव कृष्ण.
रा. रा. शंकर गणेश दाभोळकर.
,, ,, शंकर सदाशिव.
,, ,, शंकर गंगाधर रानडे.
,, ,, शंकर गणपतराव.
,, ,, शंकर गणेश देशपांडे.
श्री. रा. शंकर गंगाधर.
रा. रा. शंकर दत्तोबा.
,, ,, शंभुराव आर. बापट.
श्री. रा. शहाजीराव शिवाजी भोंसले.
रा. रा. शांताराम नारायण दाभोळकर.
,, ,, शांताराम विठ्ठल नाडकर्णी.
,, ,, शामराव दिनानाथ वेलकर.
,, ,, शामराव परशराम.
,, ,, शामराव राघोबा.
,, ,, शामराव बाळाजी क्षीरसागर.
,, ,, शिवराम बापूजी परांजपे.
रा. सा. शिवराम रामचंद्र काशीकर.
रा. रा. शिवराम भिकाजी भेंडे.
,, ,, शिवपा गुरमल कापशे.
रा. सा. शिवराम सिताराम बागळे.
,, ,, शिवराम द्वारकानाथ कुळकर्णी.
मे. शेख महंमद खतीब.
,, शेख अल्लीमहंमद हुशेन.
रा. रा. श्रीकृष्ण बी. पितळे.
,, ,, श्रीपद ए. छत्रे.
श्री सयाजीवैभव लायब्ररी. नवसरी.

## स.

रा. रा. सखाराम आर. बावरे.
,, ,, सखाराम रघुनाथ ठेठे नाटेकर.
रा. ब. सखाराम बाजी बावडेकर.

रा. रा. सखाराम बी.
,, ,, सखाराम रामचंद्र.
,, ,, सखाराप वापुजी वकील.
श्री. रा. सयाजीराव जाधवराव सरनोवत.
रा. रा. सदाशिव आनंदराव राजे.
,, ,, सदाशिव बाळशेट पाथरे.
,, ,, सदाशिव विश्राम दाभोळकर.
,, ,, सदाशिव हरी सोमण.
,, ,, सदाशिव रामचंद्र भागवत.
,, ,,सदाशिव जयराम से.ने.ज.ला.नागपूर.
,, ,, सदानंद टी. भांडारे.
,, ,, सदाशिव पंढरीनाथ.
,, ,, सदाशिव विश्राम नार्वेकर.
,, ,, सदाशिव सखाराम कोर्डे.
,, ,, सदाशिव अप्पाजी कुर्लेकर.
,, ,, सदाशिव शंकर गटणे.
श्री. रा. सरदेसाई सिरसिंगीकर.
,, ,, सरदेसाई जांबिवली.
रा. रा. संपतराव परवतराव देशमुख.
,, ,, संभाजी महादेव भानकर.
,, ,, संभाजीराव धारराव निंबाळकर.
,, ,, संतुराम सिताराम गडकरी.
श्री. रा. सिताराम नारायण फणसे.
रा. रा. सिताराम रघुनाथ देसाई.
,, ,, सिताराम अनंत पाराशर.
रा. बा. सिताराम विश्वनाथ पटवर्धन.
रा. रा. सिताराम रावजी दातार.
,, ,, सिताराम राजाराम जोशी.
,, ,, सिताराम दामोदर.
,, ,, सुंदर रामचंद्र.
,, ,, सुन्दरशेट दशरथशेट.

सेक्रेटरी. ने. ज. लाय. कुरुंदवाड.
,, ,, ,, ,, मालेगांव क्यॅाप.
,, ,, ,, ,, धुळें.
,, मुलाक ,, ठाणें.
,, ने. ज. ,, मीरज.
,, ,, ,, ,, फलटण.
,, ,, ,, ,, सांवतवाडी(कुडाळ).
,, ,, ,, ,, रत्नागिरी.
रा. रा. स्वरूपचंद जव्हेरचंद.

## ह.

,, ,, हनुमंतराव एकनाथ.
,, ,, हनुमंतराव धोंडदेव पोतनीस.
,, ,, हनुमंत रामचंद्र विजापुरकर.
रा. बा. हरगोवनदास द्वारकादास कोटावाळा
रा. रा. हरजीवन आबाईदास शेठ.
,, ,, हरी रामचंद्र देवधर ढमढेरे.
,, ,, हरी गणेश करमरकर.
,, ,, हरी कृष्ण गोरे.
,, ,, हरी येशवंत वकील.
,, ,, हरी कृष्ण अभ्यंकर.
,, ,, हरी दिनकर भट.
,, ,, हरी प्रभाकर लवाटे.
,, ,, हरीश्चंद्र जगन्नाथ.
,, ,, हरीश्चंद्र बाबाजी.
,, ,, हरीश्चंद्र शामराव कोठारे.
,, ,, हरीश्चंद्र नाना.
,, ,, हरीहर विनायक राईरकर.
,, ,, हरेश्वर महादेव जोशी.
,, ,, हिरालाल परशुराम.
,, ,, हेड मा. ऑ.व्ह. स्कूल ला.अकोला